
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. १२०१



# गांधी विचार दर्शन

## गीता-विचार

- अनासक्तियोग
- गीताबोध
- गीताभ्यास

REFBK-0010266

२

गांधी वाङ्मय प्रकाशन समिति

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३०६ वि: ...
क्रमांक ११०८ नों: दि: २-२१-३-६०.

गांधी-विचार-दर्शन : खंड दुसरा

# गीता-विचार

मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई
दा. क. १०२६६

अनासक्तियोग

गीताबोध • गीताभ्यास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६३०६ वि: निबंध
क्रमांक १२०९ नों: दि: २२।३।६०

REFBK-0010266

गांधी-वाङ्मय-प्रकाशन समिति, महाराष्ट्र

© नवजीवन ट्रस्ट अहमदाबाद १४
यांच्या सौजन्यानें

प्रथमावृत्ति : १७ डिसेंबर १९५९

मूल्य : रु. २=५०

मुद्रक : मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस प्रा. लि., ३८३, नारायण पेठ, पुणें २
प्रकाशक : शंकरराव देव, अध्यक्ष, गांधी-वाङ्मय-प्रकाशन समिति (महाराष्ट्र), १२४२, सदाशिव पेठ, विद्यापीठवाडा, पुणें २

# निवेदन

गांधीजींचे जीवनविचार भारतीय आणि अखिल मानवीय जीवन समृद्ध करणारे आहेत अशी आमची श्रद्धा आहे. कारण त्या विचारांना सत्याच्या वा सद्वस्तूच्या शोधांतून प्रेरणा मिळालेली आहे. याच कारणानें हे जीवनविषयक विचार ज्या शब्दांत मांडले गेले आहेत 'तें अक्षर वाङ्मय' आहे.

गांधीजींचे लेख व भाषणें यांच्यामागें ही सत्यशोधनाची प्रेरक शक्ति असल्यामुळें त्यांच्यांत आणखी असा एक गुण आहे कीं त्यांच्या संसारी, सेवक व साधक अशा सर्वांना सर्वकाळीं स्वतःच्या जीवनांत मार्गदर्शन होण्यासाठीं उपयोग आहे. गांधीजींच्या जीवन-विचारांत संसार, समाजसेवा आणि आध्यात्मिक साधना यांच्यामध्यें वेगळेपणा किंवा विरोध नव्हता, कारण त्यांच्या जीवनांत या तिहींचा पवित्र संगम झालेला होता. सत्य, अहिंसा, अस्तेय आदि पांच यम वा महान् तत्त्वें आणि इतर लहानसान नियम अथवा व्रत्तें यांची व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीं जरूरी आहे अशी या देशांत प्राचीन काळापासून समजूत आहे. परंतु व्यवहार अथवा समाजसेवा मोक्षदायी करण्यासाठीं सुद्धां यम-नियमांची जरूरी आहे ही गोष्ट प्रथम गांधीजींनीं लोकांपुढें मांडली व आचरून दाखविली. याचा परिणाम असा झाला आहे कीं व्याख्यानें, पत्रें व लेख यांच्या रूपानें गांधीजींच्या हातून जें उदंड वाङ्मय निर्माण झालें आहे त्याचा सर्व क्षेत्रांतील आणि वर्गांतील अगदीं सामान्यापासून अ-सामान्यापर्यंत सर्वांना प्रत्यक्ष आचरणाला मार्गदर्शक या दृष्टीनें उपयोग होत आहे. वाल्या कोळ्याचा जसा वाल्मीकि ऋषि झाला तसे या यम-नियमांच्या अखंड व जागरूक पालनानें एकाच जन्मांत 'मोहनदास करमचंद गांधी' हे 'महात्मा' झाले हा अद्भुत पुरुषार्थ साऱ्या जगानें पाहिला आहे.


गांधीजींचें जीवनकार्य पुढें चालविण्यासाठीं १९४९ सालीं 'गांधी-स्मारक-निधी'ची स्थापना झालेली आहे. त्या निधीच्या उद्दिष्टांत गांधीजींच्या

विचाराचा प्रचार देशांतील सर्व भाषांत व देशाबाहेरहि करणें हें एक उद्दिष्ट आहे. त्याच्या सिद्धीसाठीं निरनिराळ्या भाषिक प्रदेशांकरितां निधीनें वाङ्मयप्रकाशन-समित्या स्थापन करण्याचा उपक्रम केला आहे. आतांपर्यंत कानडी, तामीळ, मल्याळम् या भाषांच्या प्रदेशांकरितां अशा समित्या स्थापन झाल्या आहेत व त्यांच्यांतर्फे क्रमशः खंडरूपानें गांधी-वाङ्मय प्रसिद्ध होत आहे. याचप्रमाणें मराठी-भाषिक प्रदेशाकरितांहि निधीनें १९५८ सालच्या जुलै महिन्यांत ' गांधी वाङ्मय प्रकाशन समिति ' स्थापन केली. या समितीच्या कामाला रीतसर सुरुवात १९५९ च्या जानेवारी महिन्यापासून झाली आहे.

समितीनें ' गांधी-विचारदर्शन ' या नांवानें गांधीजींचें निवडक वाङ्मय विषयवारीनें वीस ते पंचवीस खंडांत प्रसिद्ध करण्याची योजना तयार केली आहे. या विषयांची जी वर्गवारी करण्यांत आली आहे तींत १ सत्य आणि सत्याग्रह, २ धर्म, ३ जीवनसाधना, ४ स्त्री-जीवन इत्यादि विषय येतील. गांधीजींची जीवननिष्ठा व जीवनमूल्यें ज्यांत नमूद झालीं आहेत असे तीन खंड प्रथम प्रसिद्ध करणें हें समितीनें उचित मानलें आहे. यांपैकीं पहिले दोन खंड गांधीजींनी स्वतःच त्या विषयांसंबंधीं लिहिलेल्या कांहीं पुस्तकांच्या अनुवादाचे आहेत. त्यांना गांधीजींच्या **जीवनमूल्यांची संहिता** म्हणतां येईल. तिसऱ्या खंडांत गांधीजींनीं या जीवनमूल्यांची साधना करण्याकरितां स्थापन केलेले आश्रम आणि त्या आश्रमांतील व्रती जीवन यांचा परिचय करून दिला आहे.

हें वाङ्मय महाराष्ट्रांत घरोघर जावें, त्याचें वाचन व अध्ययन व्हावें आणि गांधीजींचीं हीं जीवनमूल्यें व निष्ठा महाराष्ट्राच्या जीवनांत उतरावींत अशी आमची इच्छा आहे. म्हणून प्रत्येक खंड सामान्यतः २०० ते २५० पृष्ठांचा व्हावा व त्याची किंमत ३ रुपयांहून अधिक होऊं नये अशी योजना केलेली आहे. महाराष्ट्रीय जनता या उपक्रमाचें सक्रिय स्वागत करील अशी मला आशा आहे.

**पुणें, ता. ५ डिसेंबर १९५९** **शंकरराव देव**



# गांधीजींची विज्ञापना

माझ्या लिखाणाच्या साक्षेपी अभ्यासकास त्याचप्रमाणें त्यांत रस घेणाऱ्या इतरांनाहि मी सांगूं इच्छितों कीं, सर्व काळीं जगाला मीं एकरूपच दिसलें पाहिजे याची मला मुळींच पर्वा नाहीं. सत्याच्या माझ्या शोधांत मीं किती तरी विचारांचा त्याग केला आहे आणि किती तरी नव्या गोष्टी शिकलों आहें. वयानें मी भलें वृद्ध झालों असेन, परंतु माझा आंतरिक विकास कुंठित झाला आहे किंवा देह पडल्यानंतर माझा विकास कुंठित होईल असें मला वाटत नाहीं. मला एकाच गोष्टीची तळमळ आहे आणि ती गोष्ट म्हणजे प्रतिक्षणीं सत्यनारायणाच्या आदेशाचें अनुसरण करण्याची तत्परता. आणि म्हणून कोणाला माझ्या दोन वचनांत विरोध भासल्यास त्यानें, त्याचा माझ्या शहाणपणावर विश्वास असेल तर, एकाच विषयावरील त्या दोन वचनांपैकीं मागाहूनचें वचन प्रमाण मानावें.

मी 'महात्मा' म्हटला गेलों म्हणून माझें वचन प्रमाण आहे असें समजून कोणीं चालूं नये. 'महात्मा' कोण हें आपल्याला माहीत नाहीं. म्हणून चांगला मार्ग हा कीं 'महात्म्या'चें वचन देखील बुद्धीच्या कसोटीवर घासून घ्यावें आणि ते कसास न उतरल्यास त्याचा त्याग करावा.

जसजसा मी विचार करतों, जसजसा आपल्या गतकाळच्या जीवनावर दृष्टि टाकतों, तसतसें माझें अल्पत्व मला स्वच्छ दिसूं लागतें. मला जें साधायचें आहे, ज्याची मला, वर्षें झालीं, आस लागून राहिली आहे, तें म्हणजे आत्मदर्शन होय, ईश्वराचा साक्षात्कार होय, मोक्ष होय. माझी हालचाल सगळी त्याच दृष्टीनें होते. माझें लिहिणें-करणें सर्व याच दृष्टीनें आहे आणि माझें राजकारणाच्या क्षेत्रांत उडी घेणेंहि त्याच्याचकरितां आहे.

माझ्या प्रयोगांत आध्यात्मिक म्हणजे नैतिक समजावें; धर्म म्हणजे नीति; आत्म्याच्या दृष्टीनें आचरलेली नीति तोच धर्म. वैज्ञानिक ज्याप्रमाणें आपले प्रयोग अगदीं नियमांना धरून, विचारपूर्वक आणि बारकाव्यानें करतो

तथापि त्यांतून निघालेले निष्कर्ष तो शेवटचे म्हणून मांडीत नाहीं, किंवा हे निष्कर्ष त्या प्रयोगांचे बिनचूक असेच निष्कर्ष आहेत याविषयींहि तो साशंक नसला तरी तटस्थ राहतो, तसाच माझ्या प्रयोगांबाबतहि माझा दावा आहे. मीं खूप आत्मनिरीक्षण केलें आहे, एकूण एक मनोवृत्ति तपासली आहे, तिचें विश्लेषण केलें आहे. पण त्यांतून निघालेले निष्कर्ष हे सर्वांच्याच बाबतींत अंतिम आहेत, ते खरेच आहेत वा तेच खरे आहेत, असा दावा मी केव्हांहि करूं इच्छीत नाहीं.

पण एक दावा मात्र मी अवश्य करूं इच्छितों, आणि तो हा कीं माझ्या दृष्टीनें ते खरे आहेत आणि तूर्त तरी ते मला स्वतःला अंतिम असे वाटतात.

माझ्या मतें सत्यच सर्वश्रेष्ठ आहे आणि त्यांत असंख्य वस्तूंचा अंतर्भाव होऊन जातो. हें सत्य म्हणजे स्थूल वाचिक सत्य नव्हे. तें जसें वाचिक तसें वैचारिक देखील आहे. हें सत्य म्हणजे केवळ आपण कल्पिलेलेंच सत्य नव्हे तर स्वतंत्र चिरंतन सत्य होय. म्हणजे परमेश्वरच.

माझ्यासारख्या अनेकांचा भलें क्षय होवो, पण सत्याचा जय होवो. अल्पात्म्याला मापण्यासाठीं सत्याचा गज कधीं आंखूड न होवो.

●

# अनुक्रमणिका

निवेदन ... ३

गांधीजींची विज्ञापना ... ५

१. अनासक्तियोग : १–१४४

प्रस्तावना १, १. अर्जुनविषादयोग १३, २. सांख्ययोग १९, ३. कर्मयोग ३२, ४. ज्ञानकर्मसंन्यासयोग ४२, ५. कर्मसंन्यासयोग ५२, ६. ध्यानयोग ६०, ७. ज्ञानविज्ञानयोग ६८, ८. अक्षरब्रह्मयोग ७३, ९. राजविद्या-राजगुह्ययोग ७९, १०. विभूतियोग ८६, ११. विश्वरूपदर्शनयोग ९२, १२. भक्तियोग १०२, १३. क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग १०६, १४. गुणत्रयविभागयोग ११३, १५. पुरुषोत्तमयोग ११९, १६. दैवासुरसंपद्‌विभागयोग १२४, १७. श्रद्धात्रयविभागयोग १२८, १८. संन्यासयोग १३२.

२. गीता-बोध : १–६४

भूमिका ३, प्रास्ताविक ५, १. अध्याय १२ वा ७, २. अध्याय १ ला १०, ३. अध्याय २ रा ११, ४. अध्याय ३ रा १५, ५. अध्याय ४ था २०, ६. यज्ञ–१. २३, ७. यज्ञ –२. २५, ८. यज्ञ–३. २८, ९. अध्याय ५ वा ३०, १०. अध्याय ६ वा ३३, ११. अध्याय ७ वा ३६, १२. अध्याय ८ वा ३८, १३. अध्याय ९ वा ४१, १४. अध्याय १० वा ४४, १५. अध्याय ११ वा ४५, १६. अध्याय १३ वा ४८, १७. अध्याय १४ वा ५०, १८. अध्याय १५ वा ५२, १९. अध्याय १६ वा ५३, २०. अध्याय १७ वा ५५, २१. अध्याय १८ वा ५७.

३. गीताभ्यास : १–१८

१. गीतेचें महत्त्व १, २. गीताध्ययनाचा अधिकार २, ३. गीता-पाठक ५, ४. गीतेचें अध्ययन आणि आचरण ५, ५. गीता-माता ७, ६. गीतेचा ऐतिह्य उपोद्घात ८, ७. न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ९, ८. गीतेचा अर्थ ९, ९. गीतेची मुख्य शिकवण १८.

# अनासक्तियोग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३०६ वि: निबंध
क्रमांक १२०९ नों: दि: २३।३।६०

# प्रस्तावना

: १ :

स्वामी आनंदप्रभृति मित्रांच्या प्रेमाखातर मी "सत्याचे प्रयोग" सांगण्यापुरतें आत्मचरित्र लिहिण्यास[१] प्रारंभ केला, त्याच प्रमाणें गीतेच्या अनुवादासंबंधींही घडलें आहे. "तुम्ही गीतेचा जो अर्थ लावतां तो आम्हांला त्याच वेळीं समजेल कीं ज्या वेळीं तुम्ही एकदां सगळ्या गीतेचा अनुवाद करून त्यावर तुम्हांला जें कांहीं भाष्य लिहावयाचें असेल तें लिहाल आणि आम्हांला तें एकदां संपूर्ण वाचायला मिळेल. फुटकळ, सुट्या श्लोकांतून अहिंसा इ. काढून दाखवावयाचें हें मला तरी बरोबर वाटत नाहीं," असें स्वामी आनंदांनीं मला असहकारितेच्या चळवळीच्या[२] काळांत सांगितलें होतें; त्यांच्या या युक्तिवादांत तथ्य आहे असें मला वाटलें. 'फुरसतीच्या वेळीं मी हें करीन,' असें मीं त्यांना उत्तर दिलें. त्यानंतर[३] मी तुरुंगांत गेलों. तिथें तर गीतेचा, अधिक खोलांत शिरून, अभ्यास करण्यास सवड मिळाली. लोकमान्यांचें "ज्ञानभांडार"[४] वाचून काढलें. त्यांनीं मला मराठी गीतारहस्य आणि त्याचे हिंदी व गुजराती अनुवाद पूर्वींच 'प्रेमपूर्वक भेट' म्हणून पाठवून दिले होते आणि "मराठी वाचूं शकलां नाहींत तर गुजराती तरी जरूर वाचा" अशी शिफारसही केली होती.

तुरुंगाच्या बाहेर असतांना ते वाचतां आले नाहींतच, पण आंत गेल्यावर गुजराती अनुवाद वाचून काढला. तो वाचल्यानंतर गीतेसंबंधीं अधिक वाचण्याची इच्छा झाली आणि गीतेच्या अनुषंगानें असलेले अनेक ग्रंथ चाळले.

---

का. का. (काका कालेलकर) अशीं आद्याक्षरें नसलेल्या सर्व तळटिपा वि. प्र. लिमये यांनीं दिल्या आहेत.

[१] १९२७. [२] १९२०–१९२२. [३] १९२२. [४] "गीतारहस्य अथवा कर्मयोग" (१९१५).

गीतेचा प्रथम परिचय एडविन आर्नोल्ड[१] च्या पद्यमय अनुवादानें[२] सन १८८८–८९ मध्यें झाला. त्यावरून गीतेचे गुजराती अनुवाद वाचण्याची तीव्र इच्छा झाली; आणि जेवढे अनुवाद हातीं आले तेवढे वाचून काढले. पण असल्याही वाचनानें मला माझा अनुवाद लोकांसमोर मांडण्याचा मुळींच अधिकार पोंचत नाहीं; शिवाय माझें संस्कृत भाषेचें ज्ञानही बेताचें, गुजरातीचें ही ज्ञान साहित्यिक म्हणतां येईल इतकें नाहीं. मग मी हा अनुवाद करण्याचें धाडस कां केलें ?

गीतेचा जो अर्थ मी समजलों आहें त्याला अनुसरून आचरण करण्याचा, माझा आणि माझ्याबरोबर असलेल्या कित्येक सहकाऱ्यांचा, सतत प्रयत्न चालू आहे. आम्हांला गीता हा एक आध्यात्मिक निदानग्रन्थ[३] ( म्हणजे संदर्भग्रन्थ ) आहे. त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करीत असतांना अपयश हरघडी येत असतें; परंतु हें अपयश आमचा प्रयत्न असूनही ( म्हणजे त्याचें न चालून ) येत आहे. या निराशेंतच आशेचीं उगवतीं किरणें आम्हांला दिसतात. जो अर्थ मनांत घेऊन हा छोटासा [४]गट त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करीत आहे तो अर्थ या अनुवादांत आहे.

दुसरें असें कीं, स्त्रिया, वैश्य तसेंच शूद्र——ज्यांना अक्षरओळख बेताबाताचीच आहे, ज्यांना मूळ संस्कृतमधून गीता समजून घेण्यास वेळ नाहीं, इच्छा ( ही ) नाहीं, पण ज्यांना ( जीवनांत ) गीतेच्या आधाराची आवश्यकता वाटते——अशांच्या साठींच या अनुवादाची योजना केलेली आहे.

गुजराती भाषेचें माझें ज्ञान कमी असून सुद्धां त्याच भाषेच्या द्वारा, माझ्याजवळ जें कांहीं ( अकलेचें, अनुभवाचें ) भांडवल आहें तें गुजराती बांधवांना देऊन टाकावें, अशी मला नेहमीं भारी अभिलाषा वाटते. माझी खरोखर अशी इच्छा आहे कीं, सध्यां जिकडे तिकडे घाणेरड्या, गचाळ

---

[१] ( १८३२–१९०४ ) पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे कांहीं काळ प्रिन्सिपॉल, वृत्तपत्रकार, कवि व विद्वान्, बुद्धचरित्रावरील "आशियाचा दीप" हा प्रसिद्ध ग्रंथ ( १८७९ ). [२] The Song Celestial or भगवद्गीता. [३] अडचणी किंवा गुंतागुंतीचीं कोडीं उकलून दाखविणारें शास्त्र. [४] दक्षिण आफ्रिका व हिंदुस्थान या दोन्ही खंडांतील गांधींच्या आश्रमांतील त्यांचे सहकारी स्त्रीपुरुष.

साहित्याचा सुळसुळाट झाला असतांना हिंदुधर्मांत जो अद्वितीय ग्रंथ मानला आहे त्याचा सरळ अनुवाद गुजराती जनतेला मिळावा आणि वर वर्णिलेल्या प्रचंड प्रवाहाचा प्रतिकार करण्याची शक्ति तिनें कमवावी.

या माझ्या अभिलाषेंत दुसऱ्या गुजराती अनुवादांची अवहेलना करण्याचा इरादा नाहीं. त्या सर्वांना खुशाल जागा असो—पण त्या अनुवादांच्या पाठीमागें आचाररूपी अनुभवाचा, ते ते अनुवादक दावा करीत असतील, असें माझ्या पाहण्यांत आलेलें नाहीं. या अनुवादाच्या पाठीशीं मात्र अडतीस[१] वर्षांच्या आचरणाच्या प्रयत्नांचा दावा आहे. या कारणास्तव मला असें मनापासून वाटतें कीं, ज्या गुजराती बंधुभगिनींना धर्मांतील तत्त्वें अमलांत आणण्याची इच्छा आहे, त्या सर्वांनीं हा अनुवाद वाचावा, त्यावर विचार करावा आणि त्यापासून सामर्थ्य[२] मिळवावें.

हा अनुवाद तयार करण्यांत माझ्या सहकाऱ्यांचें मला साहाय्य झालें आहे. माझें संस्कृतचें ज्ञान पुष्कळच अपुरें असल्याकारणानें शब्दार्थाविषयीं मला पुरा विश्वास वाटत नव्हता; म्हणून तेवढ्यापुरता हा अनुवाद विनोबा[३], काका कालेलकर[४], महादेव देसाई[५] आणि किशोरलाल मशरूवाला[६] यांच्या नजरेखालून गेला आहे.

: २ :

गीतेच्या अर्थावर आतां मी येतों.

सन १८८८–८९ मध्यें गीतेचें प्रथम दर्शन मला झालें, त्यावेळींच माझा ग्रह झाला कीं, हा ग्रन्थ इतिहास कथन करणारा नसून त्यांत भौतिक, शस्त्रास्त्रांचें युद्ध वर्णन करण्याच्या मिषानें प्रत्येक माणसाच्या अन्तःकरणांत रात्रंदिवस चाललेल्या युद्धाच्या प्रसंगाचें वर्णन आलेलें आहे; मानवी लढ-

---

[१] १८९१ सालापासून. [२] मागील परिच्छेदांतील 'इच्छे'ची ही पुनरुक्ति आहे. [३] "गीताई", "गीताप्रवचनें" या ग्रंथांचे कर्ते. [४] "संकलित भगवद्गीता" "जीवनप्रदीप" "गीताधर्म" या ग्रंथांचे कर्ते. [५] (१९४२ सालीं वारले) The gospel of self-less action or The Gita according to Gandhi या ग्रंथांचे कर्ते. [६] (१९५२ सालीं वारले) "गीताध्वनि", "गीतामन्थन" या ग्रंथांचे कर्ते.

वय्यांची योजना, हृदयांत चाललेल्या द्वन्द्वाला काव्यमय बनविण्यासाठीं चालवलेली, कविकल्पना होय. हें प्राथमिक स्फुरण धर्म आणि गीता यासंबंधीं विशेष विचार केल्यानंतर पक्कें झालें. महाभारत वाचल्यानंतर तर सदर विचार आणखी दृढ झाला. आधुनिक अर्थानें महाभारत हा इतिहासग्रन्थ आहे, हें मी मानीत नाहीं. याचीं सयुक्तिक प्रमाणें आदिपर्वांतच सांपडतात. ( महाभारतांतील स्त्रीपुरुष ) पात्रांची अमानुष आणि अतिमानुष उत्पत्ति वर्णून भगवान् व्यासांनीं राजा-प्रजेच्या इतिहासाला साफ पुसून टाकलें आहे. त्यांत वर्णिलेलीं पात्रें मुळांत ऐतिहासिक खुशाल असोत, पण महाभारतांत तर त्यांचा उपयोग भगवान् व्यासांनीं केवळ धर्माचें दर्शन घडविण्यासाठींच केलेला आहे.

महाभारतकारांनीं भौतिक ( शस्त्रास्त्र ) युद्धाची आवश्यकता सिद्ध केलेली नाहीं; उलट त्याचा फोलपणा शाबीत केला आहे. जेत्यांना रडावयास लावलें आहे, त्यांच्यावर पस्ताव्याची पाळी आणली आहे, आणि दुःख-शोका-शिवाय दुसरें कांहीं उरूं दिलेलें नाहीं.

अशा या महाग्रंथांत गीता शिरोमणि म्हणून विराजमान आहे. तिचा दुसरा अध्याय भौतिक युद्ध कसें करावें याची शिकवण देण्याऐवजीं स्थितप्रज्ञलक्षणांचे धडे देत आहे. स्थितप्रज्ञाचा ऐहिक ( भौतिक ) युद्धाशीं कांहींही संबंध नाहीं, ही गोष्ट स्थितप्रज्ञाच्या लक्षणांवरूनच दिसून येते, असें मला तरी निदान प्रतीत झालें आहे. सामान्य कौटुंबिक भांडणें योग्य आहेत कां अयोग्य आहेत हें ठरवून त्याबाबत निर्णय देण्यासाठीं कांहीं गीतेसारख्या लोकोत्तर ग्रंथाची निर्मिति झाली असेल असें संभवत नाहीं.

गीतेंतील कृष्ण शुद्ध, संपूर्ण ज्ञानाची मूर्ति आहे, पण ती काल्पनिक आहे. असें म्हणण्यानें कृष्ण या नांवाच्या अवतारी पुरुषाच्या अस्तित्वाचा मी निषेध करीत नाहीं; मात्र संपूर्ण कृष्ण काल्पनिक आहे, संपूर्ण अवताराचें त्याच्या-वर मागाहून केलेलें आरोपण आहे, असें मला वाटतें.

अवतार म्हणजे देहधारी पुरुषविशेष. (तसें पाहिलें तर) प्रत्येक जीव ईश्वराचा (अंश म्हणजे) अवतारच आहे, परंतु लौकिक भाषेंत आपण सगळ्यांना कांहीं अवतार म्हणत नाहीं. जो पुरुष आपल्या स्वतःच्या काळांत सर्वश्रेष्ठ धार्मिक असतो, त्याची, भावी पिढी अवतार म्हणून, पूजा

करीत असते. यांत मला वावगें वाटत नाहीं; त्यांत ईश्वराच्या मोठेपणाला कमीपणा येत नाहीं किंवा सत्याला आघात होत नाहीं. "आदम खुदा नहीं; लेकिन खुदाके नूरसे आदम जुदा नहीं." ज्याच्या ठायीं, आपल्या स्वतःच्या काळांत, सर्वांपेक्षां अधिक धर्मजागृति वास करते, तो विशेषावतार होय. या विचारमालिकेप्रमाणें कृष्णरूपी संपूर्ण अवतार आज हिंदुधर्मांत सम्राट म्हणून सिंहासनावर अधिष्ठित झाला आहे.

हें चित्र मानवाच्या अंतिम, सुंदर आकांक्षेचें द्योतक आहे. परमेश्वरस्वरूप झाल्याविना मानवाला सुखाचा लाभ होत नाहीं, शांतीची प्राप्ति होत नाहीं. ईश्वरस्वरूप होण्याचा प्रयत्न, याचेंच नांव खरा आणि एकमेव पुरुषार्थ आणि हेंच आत्मदर्शन. आत्मसाक्षात्कार हा जसा सर्व धर्मग्रन्थांचा विषय आहे तसाच तो गीतेचा पण आहे. परंतु या विषयाचें प्रतिपादन करण्यासाठीं कांहीं गीताकारानें गीतेची रचना केलेली नाहीं. तर मुमुक्षूंना मोक्ष (म्हणजे आत्मदर्शन) प्राप्त करून देणारा, एक अद्वितीय उपाय सांगावा, असा गीतेचा उद्देश आहे. जी बाब हिंदुधर्मग्रंथांत इतस्ततः विखुरलेली आढळून येते, तिची, गीतेनें परोपरीनें, अनेक शब्दांत, पुनरुक्तीचा दोष पत्करूनही पण उत्तम तऱ्हेनें, स्थापना केली आहे.

हा अद्वितीय उपाय म्हणजे कर्मफलत्याग.

या मध्यबिंदूच्या भोंवतीं गीतेची सर्व गुंफण आहे. भक्ति, ज्ञान इ. या (सूर्याच्या) सभोंवार ग्रहचक्राप्रमाणें आपापल्या स्थानीं बसले आहेत. देह आहे तिथें कर्म हें (ठेवलेलें) आहेच. त्यांतून कुणाचीही सुटका नाहीं. असें असलें तरी देहाला "देवालय" बनवून त्याच्या द्वारा मोक्ष मिळतो, असेंच सर्व धर्म प्रतिपादन करीत आले आहेत. कोणतेंही कर्म[१] घ्या, त्यांत कांहीं तरी दोष हा असतोच. मोक्ष तर दोषरहितालाच असतो. तर मग कर्माच्या बंधनांतून म्हणजेच दोषाच्या तडाक्यांतून सुटका कशी व्हायची? या प्रश्नाचें उत्तर गीतेनें पुढीलप्रमाणें निःसंदिग्ध शब्दांत दिलें आहे: "निष्काम[२] कर्माचरणानें; यज्ञार्थ[३] कर्म करून; कर्माच्या

---

१. गी. १८–४८ सर्वारंभा हि दोषेण ... आवृताः। २. गी. २–७१ विहाय कामान् यः सर्वान् ... चरति। ३. गी. ३–९ तदर्थं (यज्ञार्थं) कर्म...मुक्तसंगः समाचर।

फळाचा[१] त्याग करून; सर्व कर्में "कृष्णार्पण"[२] करून म्हणजेच काया-वाचामनानें परमेश्वराच्या ठायीं स्वतःची आहुति देऊन (तल्लीन होऊन)!"

पण निष्कामता, कर्मफलत्याग ही कांहीं नुसती "तोंडची वाफ" नाहीं. ती केवळ बुद्धीची कसरतहि नाहीं. अंतःकरण घुसळून निघाल्यानेंच ती संभवते. त्यागाचें हें सामर्थ्य अंगीं बाणण्यासाठीं ज्ञानाची आवश्यकता आहे. एकप्रकारचें ज्ञान (म्हणजे बहुश्रुतपणा) तर सगळ्या पंडितांपाशीं सांपडतें. वेद इ. तर त्यांना तोंडपाठ असतात. पण त्यांच्यापैकीं बहुतेक-जण भोगादिकांत लोळत पडलेले असतात. ज्ञानाची परिणति शुष्क पांडित्यांत होऊं नये म्हणून गीताकारानें ज्ञानाची भक्तीशीं सांगड घालून दिली आहे आणि भक्तीला अग्रस्थान दिलें आहे. भक्तीविना असलेलें ज्ञान माजतें म्हणून सांगितलें : "भक्ति[३] कराल तर ज्ञान प्राप्त होईलच"; पण भक्ति ही "सुळावरची पोळी" आहे; यासाठीं गीताकारानें भक्तांचीं लक्षणें[४] स्थितप्रज्ञाच्या लक्षणांप्रमाणें[५] वर्णिलीं आहेत.

तात्पर्य, गीतेंतील भक्ति म्हणजे भावनेनें विवश होणें नव्हे किंवा भाबडेपणा नव्हे. गीतेनें दिग्दर्शित केलेल्या प्रक्रियेंत बाह्य व्यापार किंवा कर्में यांच्याशीं कमींत कमी संबंध आहे. टिळे, माळा, अर्घ्यादि उपकरणें यांचा भक्तानें वाटल्यास वापर करावा, पण तीं कांहीं भक्तीचीं लक्षणें नव्हत. "जो कोणाचाही द्वेष करीत नाहीं, जो करुणेचा सागर आहे, 'मी–माझें' यांतून जो मुक्त आहे, ज्याला सुख–दुःख, थंडी–ऊन हीं सारखीं वाटतात, जो क्षमाशील आहे, जो सदा संतुष्ट असतो, ज्याचा निश्चय कधींही फिरत नाहीं, ज्यानें आपलें मन आणि बुद्धि हीं ईश्वराला वाहिलीं आहेत, ज्याला लोक कंटाळत नाहींत आणि जो लोकांना कंटाळत नाहीं, जो हर्ष, शोक, भय इत्यादींतून मुक्त आहे, जो पवित्र आहे, जो कार्यांत दक्ष असून सुद्धां तटस्थ आहे, शुभ–अशुभ या दोहोंचा जो त्याग करतो, जो शत्रु आणि मित्र यांच्याशीं समान स्नेहभावानें वागतो, मान–अपमान हीं ज्याला तुल्य आहेत, स्तुति ऐकून जो फुलून

---

१. गी.१२–११ सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु...। २. गी.९–२७ तत् कुरुष्व मदर्पणम् । ३. गी. १८–५५ भक्त्या मामभिजानाति । ४. गी. १२·१३ – २०. ५. गी. २.५५–७२.

जात नाहीं आणि निंदा ऐकून जो कोमेजून जात नाहीं, ज्यानें मौनव्रत स्वीकारलें आहे, ज्याला 'एकान्तावरि बहु प्रीति' आहे, ज्याची बुद्धि स्थिर आहे, तो भक्त होय."

ही भक्ति विषयासक्त स्त्रीपुरुषांच्या ठायीं संभवत नाहीं.

यावरून आपण पाहूं शकतों कीं ज्ञान मिळविणें, भक्त होणें हेंच आत्मदर्शन. आत्मदर्शन ही गोष्ट या दोहींपेक्षां निराळी नाहीं. ज्याप्रमाणें एक रुपया टाकून हवें तर विष विकत घ्यावें, पाहिजे तर अमृतही घ्यावें त्याप्रमाणें ज्ञान किंवा भक्ति यांच्या मोबदल्यांत माणूस बंधनांतही पडेल आणि मोक्षही गांठेल, अशी गोष्ट नाहीं. याबाबत साधन आणि साध्य या दोन्ही गोष्टी संपूर्णपणें एकच नसल्या तरी त्या जवळजवळ एकच होत. साधनांची[१] पराकाष्ठा हाच मोक्ष, आणि गीतेंतला मोक्ष म्हणजे परम शांति.

पण अशा ज्ञानाला अथवा भक्तीला कर्मफलत्यागाच्या कसोटीस उतरावें लागतें. लोकांच्या समजुतीप्रमाणें शुष्कपांडित्यवाला माणूस ज्ञानी म्हणून खपून जातो. त्याला कसलेंहि काम करायाचें नसतें. लोटयासारखी (क्षुद्र) वस्तु (इकडून तिकडे) उचलून ठेवणें, एवढें देखील त्याच्या बाबत कर्मबंधन ठरतें म्हणे! यज्ञासारखी (मोठी) प्रवृत्ति टाकणाऱ्याला जिथें ज्ञानी मानण्यांत येतें तिथें लोटा उचलण्यासारख्या तुच्छ लौकिक क्रियेला अवकाश कोठून असणार?

लोकांची समजूत अशी कीं, भक्त म्हणजे भोळाभाबडा, अखंड माळ ओढणारा, सेवाकर्म करावें लागलें तर त्याच्या माळ ओढण्याच्या क्रियेंत बाध येणार (किंवा खंड पडणार), त्यामुळें असा माणूस खाणेंपिणें इ. भोग भोगण्याच्या वेळेपुरताच ती माळ हातांतून खालीं ठेवणार, जात्यावर बसून (स्वावलम्बनपूर्वक) पीठ दळण्यासाठीं किंवा आजाऱ्याची सेवाशुश्रूषा करण्यासाठीं तो ती माळ कधींही खालीं ठेवणार नाहीं! (हा म्हणे भक्त!)

या दोन्ही वर्गांना गीतामाउलीनें स्पष्ट शब्दांत सांगून टाकलें आहे

---

१. तै. उ. ३. २ पाहा: "तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्मेति।"

कीं, "कर्म केल्याशिवाय कुणालाही सिद्धि प्राप्त झालेली नाहीं. जनकादि[१] पुरुष देखील कर्माच्या आचरणानेंच ज्ञानी झाले आहेत. मी सुद्धां (भगवान् श्रीकृष्ण) जर आळस सोडून कर्म करणार नाहीं, तर या लोकांचा नाश होईल." तर मग इतरेजनांविषयीं काय विचारावें ?

पण एका बाजूनें (पाहिलें तर) कर्म म्हणून जें जें आहे, तें तें सर्व बंधनांत जखडून टाकतें, ही गोष्ट निर्विवाद होय. दुसऱ्या बाजूनें (विचार केला तर) माणसाला, त्याची इच्छा असो, नसो... कर्म केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. शरीराचा किंवा मनाचा, कोणताही व्यापार म्हणजे कर्म. तेव्हां कर्म करीत असतांना (व करीत असून) सुद्धां माणूस त्याच्या पकडींतून कसा सुटेल ? हें कोडें गीतामाउलीनें ज्या रीतीनें सोडविलें आहे त्याप्रमाणें दुसऱ्या कोणत्या धर्मग्रन्थांनीं सोडविलेलें माझ्या पाहण्यांत नाहीं. गीता सांगत आहे : " फलासक्ति सोडा आणि कर्म करा ", " निष्काम होऊन कर्म करा ". हा गीतेचा अविस्मरणीय ध्वनि आहे. कर्म सोडाल तर पडाल. कर्म करून सुद्धां त्याचें फळ सोडाल तर चढाल.

फलत्याग म्हणजे (कर्माच्या) परिणामाविषयीं बेदरकारी (किंवा बेपर्वाई), असा त्याचा अर्थ नाहीं. परिणाम, साधनविचार आणि त्यांचें ज्ञान, या गोष्टी अत्यावश्यक होत. हें सर्व झाल्यावर परिणामाची इच्छा (किंवा फलासंबंधीं आसक्ति) न ठेवतां जो " साधना " करण्यांत तल्लीन होऊन जातो, तो फलत्यागी होय.

पण येथें फलत्याग म्हणजे त्यागी माणसाला फळ मिळत नाहीं, असा अर्थ कोणी करूं नये. गीतेमध्यें अशा प्रकारच्या अर्थाला कुठेंच वाव नाहीं. फलत्याग म्हणजे फलाविषयींच्या आसक्तीचा अभाव. खरें पाहतां, फलत्यागीला सहस्रपटीनें[२] फळ मिळत असतें. गीतेच्या फलत्यागांत तर अथांग श्रद्धेची कसोटी आहे. जो माणूस परिणामाचें एकसारखें चिंतन करतो तो पुष्कळ वेळां आपल्या कर्तव्यकर्मापासून च्युत होत असतो. त्याला अधीरपणा सुटतो, त्यामुळें तो रागाच्या झपाट्यांत सांपडतो, आणि नंतर तो

---

१. गी. ३.२०; २४. २. दासबोध: " कामनेनें फळ जोडे । निष्कामभजनें भगवंत जोडे । फळभगवंताकडे । महदान्तर ॥ " भगवंत म्हणजे अनन्तहस्तें देणारा कमलाकर.

न करावयाच्या गोष्टी करूं लागतो, आणि एका कर्मांतून दुसऱ्यांत आणि दुसऱ्यांतून तिसऱ्यांत, याप्रमाणें तो पडत जातो. फलाचा ध्यास घेणाऱ्या माणसाची अवस्था विषयलंपट माणसासारखी होते आणि शेवटीं त्या विषयासक्ताप्रमाणें त्याचा सारासारविचार नाहींसा होतो, नीति-अनीति हा विवेक सुटतो आणि तो फळ हस्तगत करण्यासाठीं वाटेल त्या (सूक्तासूक्त) मार्गाचा अवलंब करितो आणि त्यालाच तो धर्म (किंवा कर्तव्यकर्म) मानूं लागतो.

याप्रमाणें फलासक्तींतून निघणारे कटु परिणाम विचारांत घेऊन गीताकारानें "अनासक्ती"चा म्हणजेच कर्मफलत्यागाचा सिद्धान्त बनविला, आणि तो जगापुढें अतिशय आकर्षक भाषेंत मांडिला.

साधारण समजूत अशी आहे कीं धर्म[१] आणि अर्थ (व्यवहार) या विरोधी गोष्टी आहेत. "व्यापार इ. लौकिक व्यवहारांत धर्म पाळला जात नसतो. व्यवहारांत धर्माला स्थानच नसतें; धर्माचा उपयोग केवळ मोक्षासाठींच करावा; धर्माच्या ठिकाणीं धर्म शोभून दिसतो; अर्थाच्या ठिकाणीं अर्थ." माझ्या समजुतीप्रमाणें गीताकारानें या भ्रमाचा निरास केला आहे. त्यानें मोक्ष आणि व्यवहार यांचे दरम्यान अशा प्रकारचा भेद राखलेला नाहीं. उलट, धर्माला व्यवहारांत उतरविलें आहे. जो धर्म व्यवहारांत (अमलांत) आणतां येत नाहीं, तो धर्म (च) नव्हे अशी सूचना (किंवा ध्वनि) गीतेमध्यें आहे, असें माझें मत आहे. याचा अर्थ असा कीं, जीं कर्में आसक्तीविना होणेंच शक्य नाहीं, अशा प्रकारचीं असतील तीं सर्व[२], गीतेच्या अभिप्रायाप्रमाणें, त्याज्य होत. असला सुवर्णनियम माणसाला अनेक धर्मसंकटांपासून बचावीत असतो. या अभिप्रायाप्रमाणें खून, असत्य, व्यभिचार इ. कर्में आपोआपच त्याज्य ठरतात; मनुष्याचें जीवन सरळ बनून जातें आणि सरळपणांतून शांति उत्पन्न होते.

या विचारसरणीचें अनुसरण करीत असतां माझें असें मत बनलें आहे कीं, गीतेची शिकवण अमलांत आणणारांना ओघानेंच सत्य आणि

---

१. उदाहरणादाखल "व्यवहारोऽपरमार्थ एव"... शंकराचार्य. २. गी. १८.२ काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः।

अहिंसा यांचें पालन करणें भाग आहे. फलासक्ति असल्याखेरीज खोटें बोलण्याचा मोह होणार नाहीं, तसेंच हिंसा करावीशी वाटणार नाहीं. हिंसामय अगर असत्य असें कोणतेंही कार्य आपण घेतलें तरी आपणांस असें आढळून येईल कीं, त्याच्या बुडाशीं फळाच्या प्राप्तीची आसक्ति वास करीतच आहे.

असें असलें तरी "अहिंसा" हा गीतेचा प्रतिपाद्य विषय नव्हे. कारण असें कीं, गीताकाळाच्या पूर्वींही "अहिंसा" ही "परम धर्म" म्हणून मान्यता पावली होती. गीतेला तर "अनासक्ती"चा सिद्धान्त दाखवावयाचा होता ( हीच गीतेची "अपूर्वता" होय ). दुसऱ्या[१] अध्यायांतच ही गोष्ट स्पष्ट होऊन जात आहे.

गीतेला जर अहिंसा मान्य होती अथवा अनासक्तींत अहिंसा सहजच अन्तर्भूत आहे, तर मग गीताकारानें भौतिक युद्धाचाच दाखला कां घेतला? गीताकाळांत अहिंसेला धर्म म्हणून मानण्यांत येत असलें तरी भौतिक ( म्हणजे शस्त्रास्त्रांच्या साहाय्यानें केलेलें ) युद्ध ही नित्याची वस्तु होती; म्हणून तें दाखल्यासाठीं घेण्यास गीताकाराला ( मुळींच ) संकोच वाटला नाहीं, वाटायचें कारणही नव्हतें.

पण फलत्यागाच्या सिद्धान्ताचें महत्त्वमापन करीत असतांना, गीताकाराच्या मनांत कोणता विचार खेळत होता, त्यानें अहिंसेची मर्यादा काय धरली होती यांचा विचार करण्याचें आपणांस कारण नाहीं. कवि ( म्हणजे क्रांतदर्शी पुरुष ) एखादा महत्त्वाचा सिद्धान्त जगापुढें मांडतो; यावरून तो नेहमींच आपण मांडलेल्या सिद्धान्ताचें महत्त्व संपूर्णपणें ओळखतो अथवा ओळखूनही तें सर्वच्या सर्व ( जसेंच्या तसें ) भाषेंत व्यक्त करूं शकतो, असें घडत नाहीं. यांत काव्याचा आणि कवीचा महिमा ( सांठविलेला ) आहे. कवीच्या[२] अर्थाला अंत (म्हणजे मर्यादा) नाहींच.

---

१. गी. २·४७ पासून पुढील श्लोक पाहा. २. "श्रुतिवचनाला अर्थाचा भार कधींच दुःसह होत नाहीं." या अर्थाचें श्रीशंकराचार्यांचें वाक्य पाहा. "न हि वचनस्यातिभारो नाम कश्चिदस्ति।" शां. भा. ब्र. सू. ३·४·३२. 'विहितत्वाच्च आश्रमकर्मापि।'

मनुष्यजातीचा ( व तींतील व्यक्तीचा ) जसा विकास होत आला आहे, त्याप्रमाणें महावाक्यांच्या अर्थाचा सुद्धां नेहमींच विकास होत आला आहे. भाषांचा इतिहास तपासला तर आपणांस दिसून येईल कीं, बहुतेक महान् शब्दांचा अर्थ नित्य नवा होत आला आहे, तसेंच गीतेच्या अर्थाबाबतही आहे. गीताकारानें स्वतःच, रूढ असलेल्या महान् शब्दांचा अर्थविस्तार ( किंवा अतिदेश ) केला आहे. गीता वरवर चाळली तरी ही गोष्ट आपल्या नजरेस येते.

गीतेच्या काळापूर्वीं यज्ञांतील पशुहिंसा कदाचित् मान्यता पावली असेल. गीतेच्या यज्ञांत तिचा गंधही नाहीं. गीतेंत तर "जपयज्ञ"[१] हा यज्ञांचा राजा आहे. तिसरा अध्याय असें सुचवीत आहे कीं, यज्ञ म्हणजे मुख्यतः परोपकारासाठीं शरीर राबवणें; तिसरा आणि चौथा अध्याय मिळून यज्ञाच्या आणखीही कांहीं व्याख्या बसवितां येतील; पण त्या व्याख्यांतून पशुहिंसा मात्र काढतां येणार नाहीं.

गीतेंतील "संन्यासा"च्या अर्थासंबंधीं तशीच स्थिति आहे. यच्चयावत् कर्माचा त्याग गीतेच्या "संन्यासा"ला मानवत नाहीं. गीतेचा संन्यासी कर्मातीत असून सुद्धां तो अकर्माच्याही पलीकडे आहे. या रीतीनें गीताकारानें महान् शब्दाचा व्यापक अर्थ करून स्वतः वापरलेल्या भाषेचाही तसाच व्यापक अर्थ करण्यास आपणांस[२] शिकविलें आहे. भौतिक युद्ध संपूर्ण कर्मफलत्यागी माणसाच्या हातून ही होणें शक्य आहे, असा अर्थ गीताकाराच्या शब्दांतून वाटल्यास निघो. परंतु गीतेची शिकवण पूर्णपणें आचरणांत आणण्याचा सतत प्रयत्न जवळजवळ चाळीस वर्षांपर्यन्त मी करीत असून मला नम्रपणें असें मत प्रगट करावेंसें वाटतें कीं, सत्य आणि अहिंसेच्या संपूर्ण पालनाविना मनुष्याच्या हातून कर्मफलत्याग घडणें असंभवनीय होय.

गीता हा कांहीं सूत्रबद्ध ग्रन्थ नाहीं. गीता एक महान् धर्मकाव्य आहे. त्यांत जसजसें अधिक खोल उतराल तसतसें त्यांतून नवे आणि सुंदर अर्थ मिळतील. गीता बहुजनसमाजासाठीं ( अवतरली ) असल्यामुळें

---

१. गी. १०. २५ "यज्ञानां जपयज्ञोऽस्मि" । २. गी. ६. १ वरील टीप पहा.

स्थळप्रत.
अनुक्रम २६३०६ वि: निबंध
क्रमांक १२०९ नोंः दिः २२।३।६०

तिच्यांत एकच गोष्ट अनेक रीतीनें समजावून दिली आहे. म्हणजे असें कीं, गीतेंत आलेल्या महाशब्दांचा अर्थ भिन्न भिन्न काळांत बदलेल आणि विस्तार पावेल. गीतेचा मूलमंत्र ( कधींही ) बदलणारा नाहीं. हा मूलमंत्र ( कर्मफलत्याग ) ज्या रीतीनें साधतां येईल त्या रीतीनें जिज्ञासूनें वाटेल तो अर्थ करावा.

तसेंच, गीता हा कांहीं विधिनिषेध सांगणारा ( स्मृतीसारखा ) संग्रह-ग्रंथ नाहीं. एकासाठीं जी गोष्ट " विहित " असेल ती दुसऱ्यासाठीं " निषिद्ध " ठरेल. एका काळीं किंवा एका देशांत जी ' विहित ' असेल ती दुसऱ्या काळीं किंवा दुसऱ्या देशांत " निषिद्ध " मानली जाईल. फलासक्ति मात्र सर्वथा " निषिद्ध " आहे; आणि " विहित " आहे अनासक्ति !

गीतेंत ज्ञानाचा महिमा संभाळला आहे. तथापि गीता बुद्धिगम्य नाहीं, ती हृदयगम्य आहे; म्हणून ती श्रद्धाहीनांसाठीं नाहीं. गीता-कारानेंच सांगितलें आहे:—

" जो तपस्वी नाहीं, जो भक्त नाहीं, जो ऐकूं इच्छीत नाहीं आणि जो माझा द्वेष करितो, त्याला तूं हें ( ज्ञान ) कधींही सांगूं नकोस. परंतु हें परमगुह्य ज्ञान जो माझ्या भक्तांना देईल तो माझी परमभक्ति करील आणि निःसंशय मला येऊन मिळेल. याखेरीज द्वेष सोडून, श्रद्धा-पूर्वक जो केवळ ( हें ज्ञान ) ऐकेल तो देखील मुक्त होऊन पुण्यवान् लोक जेथें राहतात त्या शुभलोकांत पोंहोचेल. " १८·६७–६८–७१

कौसानी ( हिमालय )
सोमवार, ज्येष्ठ वद्य द्वितीया
संवत् १९८५, ता. २४–६–१९२९

**मोहनदास करमचंद गांधी**

•

मराठी ... दा. क्र. १०२६५ ... शाखा (स्थळ प्रत)

# १. अर्जुनविषादयोग

*जिज्ञासेविना ज्ञान नाहीं. दुःखावीण सुख नाहीं.*
*धर्मसंकट–हृदयमंथन सर्व जिज्ञासूंच्या बाबतींत*
*केव्हां ना केव्हां तरी प्राप्त होतच असतें.*

: १ :

**धृतराष्ट्र म्हणाला :**

हे संजया, मला सांग बरें कीं, धर्मक्षेत्र असलेल्या कुरुक्षेत्रावर युद्ध करण्याच्या इराद्यानें एकत्र जमलेल्या माझ्या मुलांनीं आणि पांडूच्या मुलांनीं काय केलें ? १.

**टीप** : शरीररूपी क्षेत्र हें धर्मक्षेत्र होय; कारण तें मोक्षाचें द्वार होऊं शकतें. पापांत शरीराची उत्पत्ति आहे आणि पापाचें तें भाजन आहे तरीही तें कुरुक्षेत्र.

कौरव म्हणजे आसुरी वृत्ति; पांडव म्हणजे दैवी वृत्ति. प्रत्येक शरीरांत चांगल्या आणि वाईट वृत्तींचा झगडा नेहमीं चाललेलाच असतो, याचा अनुभव कुणाला नाहीं ?

**संजय म्हणाला :**

त्यावेळीं पांडवांच्या सेनेचा व्यूह रचलेला पाहून दुर्योधन राजा द्रोणाचार्यांजवळ जाऊन म्हणाला : २.

हे आचार्य, आपला बुद्धिमान् शिष्य, द्रुपदराजाचा मुलगा, धृष्टद्युम्न, यानें व्यूह रचिलेली पांडवांची ही सेना पहा. ३.

इथें भीमार्जुनासारखे लढण्यांत शूरवीर, महाधनुर्धारी, युयुधान (सात्यकि), विराट आणि महारथी द्रुपद राजा, धृष्टकेतु, चेकितान,

तेजस्वी काशिराज, पुरुजित–कुंतिभोज आणि नरश्रेष्ठ शैब्य, तसेंच पराक्रमी युधामन्यु, बलशाली उत्तमौजा, सुभद्रेचा मुलगा (अभिमन्यु) आणि द्रौपदीचे मुलगे दिसत आहेत. ते सगळेच जण महारथी आहेत. ४, ५, ६.

हे ब्राह्मणश्रेष्ठा, आतां आपल्यांतले मुख्य मुख्य योद्धे आहेत, ते आपण जाणून घ्या. माझ्या सैन्यांत (हे) कोणकोणते नायक आहेत, त्यांचीं नांवें आपल्या आठवणीसाठीं मी सांगतों. ७.

प्रथम तर आपण स्वतः; याखेरीज भीष्म, कर्ण, युद्धांत नेहमीं जयशाली असे कृपाचार्य, अश्वत्थामा, विकर्ण आणि सोमदत्ताचा मुलगा (भूरिश्रवा). याखेरीज दुसरेही पुष्कळ शूर लोक माझ्यासाठीं प्राणावर पाणी सोडून सिद्ध आहेत. ते सगळेच नाना प्रकारचीं शस्त्रें वापरणारे आणि लढाई करण्यांत तरबेज आहेत. ८, ९.

(असें असलें तरी) भीष्माच्या आधिपत्याखालील फौजांचें बळ मोजकें आहे, उलट भीमाच्या आधिपत्याखालील त्यांच्या सैन्याचें सामर्थ्य भरपूर आहे. १०.

म्हणून तुम्ही सर्वांनीं आपापल्या ठरलेल्या ठिकाणीं राहून, सगळ्या मार्गांनीं, भीष्म पितामहांचें संरक्षण केलें पाहिजे. ११.
(असें दुर्योधनानें सांगितलें खरें, परंतु द्रोणाचार्यांनीं त्यावर कांहींच जबाब दिला नाहीं).

तेव्हां त्याला धीर यावा म्हणून कुरुश्रेष्ठ, पराक्रमी, भीष्म पितामहांनीं उंच स्वरांत सिंहनाद करून शंख फुंकिला. १२.

त्यानंतर शंख, नगारे, ढोल, मृदंग आणि रणशिंगें, या सर्वांचा एकदम गजर झाला. तो आवाज घनघोर होता. १३.

अशा प्रसंगीं पांढऱ्या शुभ्र घोड्यांच्या रथांत बसलेल्या कृष्णार्जुनांनीं दिव्य शंख फुंकिले. १४.

श्रीकृष्णानें 'पांचजन्य' शंख फुंकिला, अर्जुनानें 'देवदत्त' शंख फुंकिला; अचाट कृत्यें करणाऱ्या भीमानें 'पौंड्र' या नांवाचा महाशंख फुंकिला. १५,

युधिष्ठिर राजानें 'अनंतविजय' नामक शंख फुंकिला आणि नकुल-सहदेवांनीं अनुक्रमें 'सुघोष' व 'मणिपुष्पक' (या नांवाचे) शंख फुंकिले. १६.

त्याचप्रमाणें महाधर्नुधारी काशिराज, महारथी शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट राजा, अजिंक्य सात्यकि, द्रुपद राजा, द्रौपदीचे मुलगे, सुभद्रेचा मुलगा पराक्रमी अभिमन्यु, या सर्वांनींच, हे धृतराष्ट्रा, आपापले शंख फुंकिले. १७, १८.

पृथ्वी आणि आकाश यांना गर्जून सोडणाऱ्या या भयंकर आवाजानें कौरवांच्या हृदयांच्या चिंधड्या उडविल्या. १९.

इतकें झाल्यावर, हे राजा, ( रथावर ) हनुमानाचें निशाण असलेल्या अर्जुनानें कौरवांचें सज्ज झालेलें सैन्य पाहिलें, आणि लढाई सुरू होण्याच्या बेतांत असतांना आपलें धनुष्य सज्ज करून तो ( अर्जुन ) हृषीकेशाला ( उद्देशून ) म्हणाला : २०.

**अर्जुन म्हणाला :**

"हे अच्युता, माझा रथ (जरा) दोन्ही सैन्यांच्या मध्यें नेऊन उभा कर, म्हणजे लढाईला कोण उभे ठाकले आहेत तें मी एकदां पाहून घेईन आणि मग मला समजून येईल कीं, मला या युद्धांत कोणाकोणाशीं सामना करावयाचा आहे तें. दुष्ट बुद्धीच्या दुर्योधनाच्या मनासारखी गोष्ट करायला हपापलेले जे कोणी लढवय्ये येथें गोळा झाले आहेत, ते मी एकदां पाहून तर घेतों."

२१, २२, २३.

**संजय म्हणाला :**

हे धृतराष्ट्रा, ज्यावेळीं अर्जुनानें श्रीकृष्णाला याप्रमाणें सांगितलें, त्यावेळीं श्रीकृष्णानें दोन्ही सैन्यांच्या मध्यें, सर्व राजे आणि भीष्म-द्रोण यांच्या समोर, तो उत्तम रथ उभा करून म्हटलें :

"हे अर्जुना, एकत्र जमा झालेल्या या कौरवांना पहा." २४,२५.

: २ :

त्या ठिकाणीं दोन्ही सैन्यांत असलेले वडील, आजे, आचार्य, मामे, भाऊ, मुलगे, नातू, मित्र, सासरे, स्नेही इत्यादि सर्व मंडळी अर्जुनानें पाहिली. हे सर्व भाऊबंद युद्धासाठीं एकमेकासमोर उभे राहिलेले पाहून त्याला खेद वाटला व दीन अंतःकरणानें तो म्हणाला : २६, २७, २८($\frac{१}{२}$).

**अर्जुन म्हणाला :**

हे कृष्णा, लढण्यासाठीं अधीर होऊन गोळा झालेल्या, या सग्यासोयऱ्यांना पाहून माझीं गात्रें शिथिल पडूं लागलीं आहेत. तोंड सुकलें आहे, अंगांत कांपरें भरलें आहे, आणि रोमांच उभे राहिले आहेत. हातांतून गांडीव धनुष्य गळून पडत आहे, अंगाचा दाह होत आहे. मला उभें राहवत नाहीं, कारण माझें डोकें फिरल्यासारखें वाटत आहे. २८($\frac{१}{२}$), २९, ३०.

आणि शिवाय, हे केशवा, मला सगळीं चिन्हें विपरीत, अशुभ दिसताहेत. युद्धांत स्वजनांना ठार मारून कांहीं कल्याण होईल, असें मला दिसत नाहीं. ३१.

हे कृष्णा, त्यांना ठार मारून नको मला जय, नको राज्य किंवा सुख; हे गोविंदा, आम्हांला राज्य किंवा भोग मिळवून, अथवा जगून तरी काय करावयाचें आहे ? ३२.

ज्यांच्यासाठीं राज्य, भोग आणि सुख हीं आम्हांला हवीं होतीं ते हे आचार्य, वडील, मुलगे, नातू, दादा, मामे, सासरे, मेहुणे आणि इतर नातलग मंडळी प्राणाची आणि वित्ताची तमा न बाळगतां लढाईसाठीं एकत्र उभी ठाकली आहेत. ३३, ३४.

ते भले मला मारून टाकोत, पण त्रैलोक्याच्याही राज्यासाठीं, हे मधुसूदना, मी त्यांना मारूं इच्छीत नाहीं; मग या पृथ्वीच्या राज्यासाठीं मी त्यांना कसा मारूं ? ३५.

हे जनार्दना, धृतराष्ट्राच्या मुलांना ठार मारून आम्हांला कसला आनंद व्हावयाचा आहे ? हे आततायी असले तरी यांना ठार मारले असतां आम्हांला पापच लागेल. ३६.

म्हणून हे माधवा, आमच्या स्वतःच्याच बांधवांना, या धृतराष्ट्रपुत्रांना आम्ही मारणें हें उचित नाहीं. स्वजनांनाच मारून आम्ही सुखी कसे बरे होऊं ? ३७.

लोभानें चित्त मलिन झाल्यामुळें, त्यांना कुलनाशामुळें उत्पन्न होणारे दोष व मित्रद्रोहामुळें घडणारें पाप भलें न दिसो; परंतु हे जनार्दना, तें सर्व समजत असतांना या पापापासून निवृत्त होण्याचें आम्हांला कां सुचूं नये ? ३८, ३९.

कुलाचा नाश झाला म्हणजे परंपरागत चालत आलेल्या कुलधर्माचा नाश होतो आणि धर्माचा नाश झाला म्हणजे अधर्म सर्व कुळालाच बुडवून टाकितो. ४०.

हे कृष्णा, अधर्म बोकाळला म्हणजे कुलीन स्त्रिया भ्रष्ट होतात; आणि त्या एकदां बिघडल्या म्हणजे वर्णसंकर होतो. ४१.

अशा प्रकारचा संकर कुलघातकांना व त्यांच्या कुलाला नरकांत पोंचवितो आणि पितरांना तर्पण आणि पिंडदान न मिळाल्यामुळें त्यांचीहि अधोगति होते. ४२.

कुळबुडव्या या लोकांच्या वर्णसंकरकारक दोषांमुळें सनातन जातिधर्म व कुळधर्म हे नाशाप्रत जातात. ४३.

हे जनार्दना, ज्यांच्या कुळधर्मांचा उच्छेद होतो, अशा माणसांना निश्चयेंकरून नरकांत वास घडतो, असें आम्ही ऐकत आलों आहोंत. ४४.

अरेरे, आम्ही हें केवढें महापाप करायला तयार झालों आहोंत! राज्यसुखाच्या लोभानें आमच्या भाऊबंदांना ठार मारावयास आम्ही तयार झालों अं ! ४५.

शस्त्रास्त्र-रहित आणि प्रतिकार न करणाऱ्या मला धृतराष्ट्राच्या शस्त्रधारी मुलांनीं रणांगणांत ठार मारलें तर तें मला अधिक कल्याणकारक होईल. ४६.

**संजय म्हणाला :**

रणांगणावर याप्रमाणें बोलून शोकसंतप्त अंतःकरणानें अर्जुन धनुष्यबाण खालीं टाकून, रथांतील आपल्या जागेवर मटकन् खालीं बसला. ४७.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याहि आहे आणि योगशास्त्रहि आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुन-संवादांत आलेला "अर्जुनविषादयोग" या नांवाचा पहिला अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# २. सांख्ययोग

मोहाच्या ताब्यांत जाऊन माणूस अधर्माला धर्म मानतो. मोहामुळेंच अर्जुनानें "हा आपला आणि हा परका" असा भेद केला. हा भेद खोटा आहे हें समजावून सांगतांना श्रीकृष्णानें देह आणि आत्मा हे भिन्न होत, असें दाखविलें आहे. तसेंच देह हे अनित्य आणि (परस्परांहून) वेगळे असून आत्मा हा नित्य आणि एकच आहे, हेंहि श्रीकृष्णानें दाखविलें आहे.

माणूस हा केवळ पुरुषार्थाचा (म्हणजे कर्माचा) अधिकारी आहे, परिणामाचा (म्हणजे फलाचा) अधिकारी नाहीं. म्हणून त्यानें आपण काय करावयाचें तें पक्कें ठरवून निश्चिंत राहावें, तें कर्तव्य करण्याबाबत त्यानें तत्पर राहिलें पाहिजे. या कर्तव्यपरायणतेमुळें त्याला मोक्ष मिळविणें शक्य होईल.

: ३ :

**संजय म्हणाला :**

याप्रमाणें करुणेनें[१] ग्रासलेल्या व डोळ्यांतून अश्रू वाहत असलेल्या दुःखी अर्जुनाला मधुसूदनानें उपदेश करण्यास आरंभ केला : १.

**श्रीभगवान म्हणाले :**

हे अर्जुना, थोर पुरुष ज्याला जवळ करीत नाहींत असा, स्वर्ग बुडवणारा आणि अपकीर्ति करणारा हा मोह तुला या भलत्या वेळीं कोठून झाला ? २.

---

[१] करुणा—ढिलेपणा, पोंचटपणा, ग्लानि- (का० का०)

हे पार्था, तूं नामर्दासारखा वागूं नकोस. तुला हें शोभत नाहीं. मनाचा हा दुबळेपणा झाडून टाकून, हे परंतपा, तूं ऊठ. ३.

**अर्जुन म्हणाला :**

हे मधुसूदना, रणांगणावर भीष्म आणि द्रोण यांच्यासमोर उभा राहून त्यांच्यावर बाण कसे सोडूं? हे अरिसूदना, ते तर मला वन्द्य आहेत. ४.

महानुभाव गुरुजनांना न मारतां या लोकीं मला भिक्षा मागून निर्वाह करावा लागला, तरी तें बेहेत्तर आहे. कारण, गुरुजनांना ठार मारून रक्तानें माखलेले अर्थरूपी आणि कामरूपी भोगच मीं भोगावयाचे, एवढेंच शिल्लक राहील. ५.

आम्ही कौरवांना जिंकावें का कौरवांनीं आम्हांला जिंकावें या दोन्हींपैकीं अधिक बरें कोणतें, तें मला समजत नाहीं. ज्यांना मारून आम्हांला जगण्याची इच्छा नाहीं, तेच हे धृतराष्ट्राचे मुलगे आमच्यासमोर उभे आहेत. ६.

दैन्यामुळें माझी मूळची वृत्ति पार नाहींशी झाली आहे. काय करावें, याविषयीं मी बुचकळ्यांत पडलों आहे. म्हणून ज्यांत कल्याण होईल, असें निश्चयपूर्वक मला सांगा, अशी मी तुम्हांला विनवणी करीत आहे. मी तुमचा शिष्य आहे. तुम्हांला शरण आलों आहे. मला वाट दाखवा. ७.

या पृथ्वीवर धनधान्यसंपन्न, निष्कंटक असें राज्य मिळालें, तसेंच देवलोकांत म्हणजे स्वर्गांत इन्द्रपद मिळालें तरी त्यायोगें इन्द्रियांना शोषून टाकणारा हा शोक टाळतां येईल, असें मला कांहींहि आढळून येत नाहीं. ८.

**संजय म्हणाला :**

हे धृतराष्ट्रा, हृषीकेश गोविंदानें वरीलप्रमाणें अर्जुनाला सांगितलें; शत्रूला धाबरवून सोडणारा अशी ज्याची ख्याति तो गुडाकेश अर्जुन " मी लढणार नाहीं " असें म्हणून गप्प राहिला. ९.

हे राजा, दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं याप्रमाणें उदास होऊन बसलेल्या अर्जुनाला उपहास करण्याच्या मिषानें हृषीकेश म्हणाला : १०.

: ४ :

**श्रीभगवान म्हणाले :**

शोक करूं नये त्यांचा तूं शोक करीत आहेस आणि शहाणपणाच्या (मोठ्या मोठ्या) गोष्टी बोलत आहेस; पण शहाणीं माणसें मेल्याजित्याविषयीं (कधीं) शोक करीत नाहींत. ११.

कारण, खरें पाहिलें असतां मी, तूं किंवा हे राजे कोण्याकाळीं (पूर्वीं) नव्हते, अथवा येथून पुढें (कधीं) असणार नाहींत, अशी (वास्तविक) गोष्ट नाहीं. १२.

देहधारी माणसाला या देहापुरतें बोलायचें झाल्यास ज्याप्रमाणें कौमार, यौवन आणि वार्धक्य हीं प्राप्त होतात, त्याचप्रमाणें दुसरा देहसुद्धां प्राप्त होतो. त्याबाबत बुद्धिवान माणूस कधीं घाबरत नाहीं. १३.

हे कौन्तेया, इन्द्रियांचा विषयांशीं संबंध आला म्हणजे त्यांतून थंडी व ऊन, सुख आणि दुःख या जोडया लाभतात. हे संबंध टिकणारे नव्हेत, ते येतात आणि नाहींसे होतात. ते तूं सहन करून मोकळा हो. १४.

हे पुरुषश्रेष्ठा, सुखदुःखें सारखीं मानणाऱ्या ज्या शहाण्या

पुरुषाला हे विषय कासावीस करूं शकत नाहींत तो मोक्षाला लायख होतो. १५.

असत् गोष्टींना अस्तिव नाहीं, आणि सत् गोष्टींना नाश नाहीं. या दोहोंचा निवाडा ज्ञानी माणसांनीं जाणलेला असतो. १६.

ज्याच्या योगें हें सर्व जग व्यापलें आहे, त्या तत्त्वाला तूं अविनाशी समज. या अविनाशी तत्त्वाचा नाश कोणालाही करतां येत नाहीं. १७.

शाश्वत असणाऱ्या, तसेंच मन आणि इन्द्रियें यांच्या आटोक्यांत न येणाऱ्या अशा अविनाशी आत्म्याचे हे देह नश्वर म्हटले आहेत; म्हणून हे भारता, तूं लढाई कर. १८.

जो या आत्म्याला "मारणारा" असा मानतो आणि जो "मारला जाणारा" असा मानतो त्या दोघांनाही कांहीं समजत नाहीं. हा आत्मा मारीत नाहीं, मारला जात नाहीं. १९.

हा कधीं जन्मत नाहीं, मरत नाहीं; हा होता आणि आतां होणार नाहीं, असेंही नाहीं; म्हणून तो जन्मरहित आहे, नित्य आहे, शाश्वत आहे, पुरातन आहे; शरीराला ठार मारल्यानें तो मारला जात नाहीं. २०.

हे पार्था, जो पुरुष आत्म्याला अविनाशी, नित्य, जन्ममृत्युरहित मानतो तो कसा आणि कोणाला मारवील किंवा कोणाला मारील ? २१.

माणूस ज्याप्रमाणें जुने कपडे टाकून देऊन नवे कपडे घालतो, त्याचप्रमाणें देहधारी जीव जीर्ण होऊन गेलेल्या शरीराला सोडून दुसऱ्या नव्या शरीरांत शिरतो. २२.

या (आत्म्या) ला शस्त्रें कापीत नाहींत, अग्नि जाळीत नाहीं, पाणी भिजवीत नाहीं, वायु सुकवीत नाहीं. २३.

याला कापतां येत नाहीं, जाळतां येत नाहीं, भिजवितां येत नाहीं किंवा सुकवितां येत नाहीं. हा नित्य आहे, हा स्थिर आहे, अचल आहे आणि सनातन आहे. २४.

शिवाय इन्द्रियें आणि मन यांना हा अप्राप्य आहें; त्याला "विकाररहित" असें म्हटलें आहे; यासाठीं त्याचें तसें ज्ञान करून (घेऊन) तूं त्याच्याबाबत शोक करणें बरोबर (होणार) नाहीं. २५.

आणि समज, हा नित्य जन्मतो आणि नित्य मरतो असें तूं मानलेंस तरीही, हे महाबाहो, त्याच्याबाबत शोक करणें तुला योग्य नाहीं. २६.

उपजलेल्याला मरण आणि मेलेल्याला जन्म, या (दोन्ही) गोष्टी अटळ आहेत; म्हणून ज्या गोष्टी अपरिहार्य आहेत, त्यांच्याविषयीं शोक करणें तुला उचित नाहीं. २७.

हे भारता, प्राणिमात्राची जन्मापूर्वींची स्थिति आणि मरणानंतरची स्थिति, ह्या पाहतां येत नाहींत; त्या अव्यक्त आहेत; मधली स्थितीच व्यक्त होत असते. यांत काळजीला जागाच कुठें आहे ? २८.

**टीप :** प्राणिमात्र म्हणजे चराचर सृष्टि.

कोणी याला "आश्चर्य" म्हणून पाहतो, "आश्चर्य" म्हणून कोणी याचें वर्णन करितो, तर कोणी याचें "आश्चर्य" म्हणून वर्णन केलेलें ऐकतो; आणि इतकें ऐकूनही कोणीच याला ओळखत नाहीं. २९.

हे भारता, सगळ्यांच्या शरीरांत राहिलेला देहधारी आत्मा नित्य आणि अवध्य आहे; म्हणून तुला प्राणिमात्राबद्दल शोक करणें शोभत नाहीं. ३०.

**टीप :** येथपर्यंत श्रीकृष्णानें बुद्धीच्या जोरावर म्हणजे तर्कानें आत्म्याचें नित्यत्व आणि देहाचें अनित्यत्व दाखवून दिलें; आणि असें सुचविलें कीं, जर एखाद्या परिस्थितींत देहाचा नाश करणें योग्य मानलें तर, हा आपला आणि हा परका असा फरक करून कौरव आपले नातलग आहेत, तेव्हां त्यांना कसें मारावें, हा विचार मोहांतून उत्पन्न झाला आहे.

आतां अर्जुनाला क्षत्रियधर्म कोणता, हें (श्रीकृष्ण) दाखवून देत आहेत.

: ५ :

स्वधर्माच्या दृष्टीनें विचार केला तरी तूं डगमगावें, हें बरोबर नाहीं; कारण असें कीं, क्षत्रियाला धर्मयुद्धापेक्षां अधिक श्रेयस्कर असें दुसरें कांहीं असूंच शकत नाहीं. ३१.

हे पार्था, यदृच्छेनें प्राप्त झालेलें आणि जणूं स्वर्गाचें दारच उघडलेलें, असें हें युद्ध भाग्यशाली क्षत्रियालाच लाभत असतें. ३२.

जर तूं हें प्राप्त धर्मयुद्ध केलें नाहींस तर स्वधर्म आणि कीर्ति (दोन्ही) गमावून बसशील. आणि पाप (मात्र) ओढवून घेशील. ३३.

सगळे लोक निरंतर तुझी निंदा करीत राहतील; आणि मानवंताला दुष्कीर्ति ही मरणापेक्षांही वाईट होय. ३४.

ज्या महारथी (योद्धयां)मध्यें तुला मान मिळाला ते तूं भिऊन रणांगणांतून पळ काढलास असें मानतील आणि त्यांच्या-मध्यें तुझी प्रतिष्ठा ओहटीस लागेल. ३५.

आणि तुझे शत्रु तुझ्या बळाची नालस्ती करून बोलूं नयेत असे बोल बोलतील; आणि (मग) याच्यापेक्षां अधिक दुःखदायक घटना कोणती असूं शकेल बरें? ३६.

(युद्धांत) तूं मारला गेलास तर तुला स्वर्ग मिळेल. तूं (युद्ध) जिंकलेंस तर तुला पृथ्वीचें राज्य भोगावयास मिळेल. म्हणून हे कौन्तेया, लढण्याचा निश्चय करून तूं ऊठ. ३७.

**टीप :** भगवानांनीं पहिल्यांदा आत्म्याचें नित्यत्व आणि देहाचें अनित्यत्व दाखवून दिलें. त्यामागून, सहज चालून आलेलें युद्ध करण्यानें क्षत्रियाला धर्माचा बाध येत नाहीं, हेंही दाखवून दिलें. म्हणजे असें कीं, ३१ व्या श्लोकापासून भगवानांनीं व्यवहाराची परमार्थाशीं सांगड घालून दाखविली आहे.

भगवान आतां एका श्लोकांत गीतेच्या मुख्य शिकवणीचा उपक्रम करीत आहेत.

सुख आणि दुःख, नफा आणि नुकसान, जय आणि पराभव यांना समान लेखून तूं लढण्यासाठीं तयार हो. असें करशील तर तुला पाप लागणार नाहीं. ३८.

येथपर्यंत मी तुला सांख्यसिद्धान्ताप्रमाणें (ज्ञाननिष्ठेप्रमाणें) तुझ्या कर्तव्याची जाणीव करून दिली;

: ६ :

आतां योगसिद्धान्ताप्रमाणें तुझी समजूत घालतों; तें ऐक. याचा आसरा घेऊन तुला कर्माचीं बंधनें तोडतां येतील. ३९.

या निष्ठेमुळें, केलेल्या उपक्रमांचा नाश होत नाहीं, यांत परिणामही भलता घडत नाहीं. या धर्माचें यत्किंचित् (म्हणजे अत्यल्प) जरी पालन झालें तरी तें मोठ्या संकटांतून निभावून नेतें. ४०.

हे कुरुनंदना, (योगसिद्धान्त आचरणाराची) बुद्धि एकाग्र असते; याउलट डळमळीत बुद्धि असणाऱ्यांची वासना; तिला पुष्कळ फांटे फुटतात व तिला अंत नसतो.

**टीप :** बुद्धीचें एकाग्रत्व नाहींसें होऊन ती ज्यावेळीं अनेक रूपें धारण करिते त्यावेळीं तिचें बुद्धीपण नाहींसें होऊन ती वासनेचें रूप घेते. म्हणून अनेक बुद्धी म्हणजे वासना.

अज्ञानी वैदिक (म्ह. कर्मकांडवाले), "याशिवाय दुसरें कांहीं नाहीं" असें बोलणारे, कामनायुक्त, आणि स्वर्गालाच श्रेष्ठ

मानणारे लोक जन्ममरणरूप कर्मफळें देणारी आणि भोग आणि ऐश्वर्य मिळविण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या (विविध) कर्मांच्या वर्णनांनीं भरलेली वाणी घोळघोळून बोलत असतात; भोग आणि ऐश्वर्य यांच्याविषयीं आसक्त झालेल्या त्यांची ती बुद्धि पार नाहींशी होते; त्यांची बुद्धि निश्चयात्मकही होत नाहीं, आणि ती समाधींत स्थिरही राहूं शकत नाहीं. ४२, ४३, ४४.

**टीप :** योगसिद्धांताविरुद्ध कर्मकांडाचें म्हणजेच वेदवादाचें वर्णन वरील तीन श्लोकांत येऊन गेलें आहे. कर्मकांड अथवा वेदवाद म्हणजे फलनिर्मिति होण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या असंख्य क्रिया. या क्रिया वेदान्ताहून किंवा वेदरहस्याहून अलग (होत). त्यांचें फळही अल्प असल्यामुळें त्या निरर्थक होत.

हे अर्जुना, जे तीन गुण वेदांचे विषय आहेत त्यांपासून तूं निर्लेप रहा. सुखदुःखादि जोडयांपासून मोकळा हो. नेहमीं सत्य वस्तूच्या ठायीं स्थिर रहा. कोणतीही वस्तु मिळविण्याच्या आणि संभाळण्याच्या भानगडींत पडूं नकोस; आणि आत्मपरायण हो. ४५.

ज्या गोष्टी विहिरीमुळें साध्य होतात, त्या सगळ्या सर्व प्रकारांनीं सरोवरापासून ज्याप्रमाणें मिळतात त्याचप्रमाणें जें कांहीं सगळें वेदांत (सांठविलेलें) आहे, तें ब्रह्मनिष्ठ ज्ञानी माणसाला आत्मानुभवांतून मिळत असतें. ४६.

फक्त कर्माविषयीं तुला अधिकार (ताबा) आहे, त्यांतून निष्पन्न होणाऱ्या अनेक फलांविषयीं कधींही नाहीं. कर्मफळ (मिळविणें) हा तुझा (कर्म करण्यांत) हेतु नसावा; (मग) कर्म करूं नये असाही तुझा आग्रह नसावा. ४७.

हे धनंजया, आसक्ति सोडून योगस्थ राहून म्हणजेच यश व

अपयश यांविषयीं समान भाव ठेवून तूं कर्म कर. समत्व हाच योग होय, असें सांगितलें आहे. ४८.

हे धनंजया, समत्वबुद्धीबरोबर तुलना केली असतां केवळ कर्म फारच हीन होय. तूं समत्वबुद्धीचा आसरा घे. फळाची लालसा बाळगणारे कींव करण्यालायख होत. ४९.

बुद्धियुक्त म्हणजेच समतायुक्त माणूस या जगींच पाप आणि पुण्य यांचा (आपणाला) स्पर्श होऊं देत नाहीं; म्हणून तूं समत्व बाणण्यासाठीं खटपट कर. समता म्हणजेच कार्यकुशलता होय. ५०.

कारण असें कीं, समत्वबुद्धियुक्त मुनि कर्मांतून उत्पन्न होणाऱ्या फळाचा त्याग करतात, जन्मबंधापासून मोकळे होतात, आणि निष्कलंक अशा मोक्षपदवीला जाऊन पोंचतात. ५१.

ज्यावेळीं तुझी बुद्धि मोहरूपी चिखल ओलांडून पलीकडे जाईल त्यावेळीं तुला, ऐकलेल्या व ऐकावयाचें शिल्लक राहिलेल्या गोष्टीं-विषयीं, उदासपणा प्राप्त होईल. ५२.

नाना प्रकारचे सिद्धान्त ऐकल्यामुळें गोंधळून गेलेली तुझी बुद्धि ज्यावेळीं समाधींत स्थिर होईल, त्यावेळींच तूं समत्वाला जाऊन पोंचशील. ५३.

: ७ :

**अर्जुन म्हणाला :**

हे केशवा, स्थितप्रज्ञ अथवा समाधिस्थ याचीं लक्षणें कोणतीं? स्थितप्रज्ञ बोलतो कसा, बसतो कसा, चालतो ( किंवा वागतो ) कसा? ५४.

**श्रीभगवान म्हणाले :**

हे पार्था, मनुष्य ज्यावेळीं मनांत उठणाऱ्या सर्व कामनांचा त्याग करितो आणि स्वतःच्या साहाय्यानें स्वतःच्या ठायींच संतुष्ट (होत्साता) राहतो, त्यावेळीं त्याला स्थितप्रज्ञ असें म्हणतात. ५५.

**टीप :** स्वतःच्या ठायींच, स्वतःच्या साहाय्यानें संतुष्ट राहणें म्हणजे आत्मानंद आंतून शोधणें, सुखदुःख देणाऱ्या बाह्य वस्तूंवर आनंदासाठीं विसंबून न राहणें.

आनंद आणि सुख या निरनिराळ्या वस्तु आहेत, हें लक्षांत ठेवणें युक्त होय. मला द्रव्य मिळतें, या गोष्टींत मी सुख मानतों, हा मोह होय. मी भिकारी असेन, (पण) भुकेनें व्याकुळ झालों असतांहि चोरी किंवा दुसरी लालूच यांत मी पडणार नाहीं, यांत जी वस्तु भरली आहे ती आनंद देते, यालाच आत्मसंतोष म्हणतां येईल.

दुःखांमुळें जो दुःखी होत नाहीं, सुखांची लालसा ठेवीत नाहीं आणि जो अनुराग, भीति आणि क्रोध यांनीं विरहित असतो, त्या मुनीला स्थितप्रज्ञ असें म्हणतात. ५६.

जो सगळ्या ठिकाणीं आसक्तिरहित असतो आणि चांगली गोष्ट मिळाली असतां तिनें हुरळून जात नाहीं किंवा वाईट प्राप्त झाली असतां गडबडून जात नाहीं, त्याची बुद्धि स्थिर होय. ५७.

कासव सर्व बाजूंनीं आपले अवयव आवरून घेतें त्याप्रमाणें हा पुरुष जेव्हां इंद्रियांना आपापल्या विषयांपासून दूर ठेवतो, त्यावेळीं त्याची बुद्धि स्थिर झाली, असें म्हणतां येईल. ५८.

माणूस ज्या वेळीं आहार वर्ज्य करतो, त्या वेळीं त्याचे विषय फिके पडतात; पण त्यांतील गोडी सुटत नाहीं, परमात्म्याचा— साक्षात्कार झाल्यावरच ती गोडी नाहींशी होते. ५९.

**टीप :** या श्लोकांत उपवास इ. साधनांचा निषेध केलेला नाहीं, तर त्यांची मर्यादा ध्वनित केली आहे. विषयांना ( म्हणजे विषयवासनेला )

शांत करण्यासाठीं उपवासादि आवश्यक आहेत, पण त्यांचें मूळ म्हणजे त्यांच्याविषयीं असलेली गोडी, ईश्वराचें दर्शन झाल्यावरच, नाहींशी होते (एरवीं नाहीं). ईश्वरसाक्षात्काराची गोडी ज्यानें चाखली तो इतर रस विसरूनच जातो.

हे कौन्तेया, शहाण्या माणसानें प्रयत्न केला तरी, इन्द्रियें अशीं घुसळून टाकतात कीं, त्याचें मन तीं जबरदस्तीनें ( विषयांकडे ) खेंचून घेतात. ६०.

या सर्व इंद्रियांना ताब्यांत ठेवून योग्यानें माझ्या ठायीं तल्लीन होऊन राहिलें पाहिजे. कारण स्वतःचीं इंद्रियें ज्याच्या ताब्यांत आहेत, त्याची बुद्धि स्थिर होते. ६१.

**टीप :** म्हणजे असें कीं, भक्तीविना–ईश्वरकृपा असल्याविना–माणसाचा प्रयत्न फुकट होय.

विषयांचा ध्यास घेणाऱ्या माणसाच्या मनांत त्यांच्याविषयीं आसक्ति उत्पन्न होत असते. आसक्तींतून कामना उत्पन्न होते, आणि कामनेंतून क्रोध उत्पन्न होतो. ६२.

**टीप :** कामना असणाऱ्यांना क्रोध हा अपरिहार्यच असतो, कारण काम कधीं तृप्त होतच नाहीं.

क्रोधांतून मूढता पैदा होते, मूढतेंतून भानाचा विसर पडतो, आणि भान गेल्यानें ज्ञानाचा नाश होतो. आणि ज्याच्या ज्ञानाचा नाश झाला, तो स्वतः ( जातीनें ) नष्ट झाला म्हणावयाचा.(त्याची सर्व प्रकारांनीं अधोगति होते.) ६३.

याच्या उलट, ज्याचें मन ( स्वतःच्या ) ताब्यांत असतें आणि जो रागद्वेषरहित आणि आपल्या हुकमांत वागणाऱ्या इंद्रियांच्या द्वारा ( उचित अशा ) विषयांचें ग्रहण ( अथवा सेवन) करतो त्या पुरुषाला मनाची प्रसन्नता प्राप्त होते. ६४.

मनाच्या प्रसन्नतेमुळें त्याचीं सर्व दुःखें नाहींशीं होतात आणि प्रसन्नचित्त माणसाची बुद्धि ताबडतोब स्थिर होते. ६५.

ज्याला समत्व नाहीं त्याला विवेक नाहीं, भक्ति नाहीं. आणि ज्याला भक्ति नाहीं, त्याला शांति नाहीं. आतां जिथें शांति नाहीं, तिथें सुख तरी कोठून असणार ? ६६.

विषयांत भटकणाऱ्या इंद्रियांच्या पाठीमागें ज्याचें मन पळत सुटतें, त्याचें मन, वारा ज्याप्रमाणें पाण्यावर नावेला ( वाटेल तिकडे ) खेंचून घेऊन जातो त्याप्रमाणें त्याच्या प्रज्ञेला वाटेल तिकडे खेंचून घेऊन जातें. ६७.

म्हणून हे महाबाहो, ज्याचीं इंद्रियें सर्व बाजूंनीं विषयांतून बाहेर पडून आपल्या कह्यांत आलीं आहेत, त्याची बुद्धि स्थिर होते. ६८.

ज्यासमयीं सर्व प्राणी झोपीं गेलेले असतात त्यासमयीं संयमशील पुरुष जागा असतो. आणि ज्यामध्यें लोक जागे असतात त्यांत ज्ञानी मुनि झोपीं गेलेला असतो. ६९

**टीप :** भोगांत गढलेलीं माणसें रात्रींच्या बारा एक बाजेपर्यंत नाचरंग, खाणेंपिणें इत्यादि विलासांत आपला वेळ घालवितात आणि नंतर सकाळच्या सात आठ वाजेपर्यंत झोंपून जातात. संयमी पुरुष रात्रीं सात आठ वाजतां निजून, मध्यरात्रींच्या सुमारास उठून ईश्वराचें ध्यान करीत बसतात. दुसरें म्हणजे भोगलुब्ध माणसें संसाराचा व्याप वाढवीत असतात, इकडे ईश्वराला विसरून जातात. याच्या उलट, संयमी पुरुष प्रपंचाला पारखे होतात आणि ईश्वराचा साक्षात्कार करून घेतात. याप्रमाणें दोघांचे मार्ग निराळे आहेत, हें भगवंतांनीं या श्लोकांत सुचविलें आहे.

सगळीकडून एकसारखा भरला जात असतांना सुद्धां ज्याची मर्यादा अचल राहते अशा समुद्रांत ज्याप्रमाणें पाणी सामावून जातें, त्याप्रमाणें ज्या माणसाच्या बाबत संसारांतील भोग नाहींसे

होतात त्यालाच शांति प्राप्त होते; कामना असणाऱ्याला प्राप्त होत नाहीं. ७०.

सर्व कामनांचा त्याग करून जो पुरुष इच्छा, ममता आणि अहंकार यांतून मुक्त होऊन वागतो, त्यालाच शांति मिळते. ७१.

हे पार्था, ईश्वराला ओळखणाराची याप्रमाणें स्थिति असते. ती प्राप्त झाल्यानंतर तो मोहाला बळी पडत नाहीं, आणि अंतकाळींसुद्धां हीच स्थिति टिकली तर तो ब्रह्मनिर्वाण प्राप्त करून घेतो. ७२.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे, आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुन संवादांत आलेला 'सांख्ययोग' या नांवाचा दुसरा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# ३. कर्मयोग

*हा अध्याय गीतेचें स्वरूप ओळखण्याची किल्ली आहे, असें म्हणतां येईल. त्यांत कर्म कसें करावें आणि कोणतें करावें, तसेंच खरें कर्म कशाला म्हटलें पाहिजे, तें स्पष्ट केलें आहे आणि असें दाखवून दिलें आहे कीं, खरें ज्ञान पारमार्थिक कर्मांत परिणत झालेंच पाहिजे.*

**अर्जुन म्हणाला :**

हे जनार्दना, जर तुम्ही कर्मापेक्षां बुद्धि श्रेष्ठ आहे असें मानतां तर हे केशवा, तुम्ही मला (युद्धासारख्या) घोर कर्माची प्रेरणा कां बरें देतां ? १.

**टीप :** बुद्धि म्हणजे समत्वबुद्धि.

तुमच्या संदिग्ध बोलण्यानें माझ्या बुद्धीला तुम्ही जणूं साशंक करीत आहांत; म्हणून तुम्ही मला (आतां) एकच गोष्ट ठामपणें सांगा, कीं ज्यामुळें माझें कल्याण होईल. २.

**टीप :** अर्जुन गोंधळला आहे; कारण एका बाजूनें, भगवान त्याला त्याच्या ढिलेपणाबद्दल ठपका देत आहेत आणि दुसऱ्या बाजूनें, दुसऱ्या अध्यायाच्या ४९–५० या श्लोकांत कर्मत्याग सांगत आहेत असा भास होतो. खोल विचार केला असतां तसें नाहीं, असें भगवान आतां दाखवितील.

**श्रीभगवान म्हणाले :**

हे निष्पाप (अर्जुना), मीं पूर्वींच सांगितलें आहे कीं, या लोकांत दोन प्रकारची निष्ठा असते; पहिली म्हणजे ज्ञानयोगाच्या द्वारा सांख्यांची आणि दुसरी कर्मयोगाच्या द्वारा योग्यांची. ३.

कर्माला आरंभ न करण्यानें माणूस नैष्कर्म्याचा अनुभव घेत नाहीं आणि कर्माच्या केवळ बाह्य त्यागानें मोक्ष मिळवत नाहीं. ४.

**टीप :** नैष्कर्म्य म्हणजे कायावाचामनेंकरून कर्माचें 'नकेलेंपण'. पण अशा निष्कर्मतेचा अनुभव, कर्म न करून, कोणाला घेतां येत नाहीं. तर मग अशा अवस्थेचा अनुभव कसा मिळतो, हें आतां पाहावयाचें आहे.

खरें पाहिलें असतां, कोणीही क्षणभर सुद्धां कर्म केल्याविना राहूं शकत नाहीं. प्रकृतीपासून उत्पन्न झालेले (सत्त्वादि) गुण परतंत्र बनलेल्या प्रत्येक जणाला कर्माच्या वेठीस धरीत आहेत. ५.

जो माणूस कर्म करणाऱ्या इंद्रियांना रोखून धरतो, पण मनानें त्या त्या इंद्रियांच्या विषयांचें चिंतन करीत राहतो, त्याला मूढात्मा, मिथ्याचारी (ढोंगी) म्हटलें आहे. ६

**टीप :** उदाहरणार्थ, जो वाणी (किंवा जीभ) आवरून धरतो पण मनांतून कोणाला तरी शिवीगाळ करतो, तो निष्कर्मी नव्हे, तर मिथ्याचारी होय.

याचा अर्थ असा नाहीं कीं, मन आवरत नाही तोंपर्यंत शरीराला (म्हणजे इंद्रियांना) आवरणें निरर्थक आहे. शरीराला आवरल्याविना मनावर ताबा येणारच नाहीं. पण शरीरावर अंकुश चालविण्याबरोबरच मनावरही अंकुश ठेवण्याचा प्रयत्न झालाच पाहिजे.

जे लोक भीति, लाज किंवा अशाच बाह्य (स्वरूपाच्या) कारणांमुळें शरीराला आवरतात पण मनाला (विषयांपासून) आवरत नाहींत, इतकेंच नव्हे तर मनानें ते विषय घोळघोळून त्यांचा भोग घेतात आणि संधि सांपडली तर शरीरानें सुद्धां भोगण्यास मागेंपुढें पहात नाहींत, अशा मिथ्याचारी (किंवा ढोंगी) लोकांची या श्लोकांत निंदा आहे.

यापुढचा श्लोक याच्या उलट आशय दाखवीत आहे.

पण हे अर्जुना, जो माणूस इंद्रियांना मनाच्या साहाय्यानें ताब्यांत ठेवून, अनासक्त होऊन कर्मेंद्रियांच्या द्वारा कर्मयोगाच्या आचरणास प्रारंभ करितो तो श्रेष्ठ पुरुष होय. ७.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३०६ वि: निबंध
क्रमांक १२०९ नों: दि: ३१।३।६०

**टीप :** या श्लोकांत बाहेरच्या आणि आंतल्या स्थितीचा मेळ साधला आहे. मनाला ताब्यांत ठेवत असतांना सुद्धां माणूस शरीराच्या द्वारा म्हणजेच कर्मेंद्रियांच्या द्वारा कांहीं ना कांहीं काम करणारच. पण ज्याचें मन ताब्यांत आलें आहे त्याचे कान घाणेरड्या गोष्टी ऐकणार नाहींत, पण ईश्वराचें भजन ऐकतील, संतांचें गुणकीर्तन श्रवण करतील; ज्याचें मन स्वाधीन झालें आहे तो आपण ज्यांना विषय म्हणून मानतों त्यांत रस घेणार नाहीं; असा माणूस "आत्म्याला" शोभतील अशींच कर्में करील. अशीं कर्में करणें म्हणजें कर्ममार्ग. ज्याच्या मार्फत आत्म्याला शरीराच्या बेडींतून सुटका करून घेण्याचा योग साधेल तो कर्मयोग. यांत विषयासक्तीला स्थान असूंच शकत नाहीं.

म्हणून तूं नियत कर्म कर. कर्म न करण्यापेक्षां कर्म करणें हें अधिक श्रेयस्कर आहे. तुझ्या शरीराची हालचाल सुद्धां कर्माशिवाय होणार नाहीं. ८.

**टीप :** "नियत" हा शब्द मूळ श्लोकांत आहे. त्याचा संबंध मागील श्लोकाशीं आहे. त्या श्लोकांत मनामार्फत इंद्रियांवर ताबा ठेवून, अनासक्त बुद्धीनें कर्म करणाराची स्तुति आहे. म्हणून या ठिकाणीं "नियत" कर्माची अर्थात् इंद्रियांना ताब्यांत ठेवून करावयाच्या कर्माची भलावणी (शिफारस) आहे.

: ९ :

यज्ञार्थ केलेल्या कर्माशिवाय बाकीच्या कर्मांपासून या लोकांत बंधन निर्माण होत असतें; म्हणून हे कौन्तेया, तूं संगरहित होऊन यज्ञार्थ कर्म कर. ९.

**टीप :** यज्ञ म्हणजे परोपकारासाठीं ईश्वरार्पणबुद्धीनें केलेलें कर्म.

प्रजा आणि यज्ञ या दोघांना एकमेकांसहवर्तमान उत्पन्न करून प्रजापति ब्रह्मदेव म्हणाला, "या यज्ञाच्या द्वारा तुमची भरभराट होवो. हा तुम्हाला हवें असलेलें फळ देवो. तुम्ही यज्ञामार्फत देवांचें पोषण करा आणि देव तुमचें पोषण करूं देत. अशा रीतीनें तुम्ही

एकमेकांचें पोषण करा आणि परम कल्याण पावा. यज्ञामुळें तुष्ट झालेले देव तुम्हांला इष्ट असे भोग्य पदार्थ देतील. जो कोणी त्यांनीं दिलेलें त्यांचें त्यांना परत दिल्याशिवाय भोगील तो चोरच होय." १०, ११, १२.

**टीप :** या श्लोकांत "देव" म्हणजे भूतमात्र, ईश्वराची सृष्टि. भूतमात्राची सेवा तीच ईशसेवा आणि तोच यज्ञ.

यज्ञाचा अवशेष जेवणारे लोक सर्व पातकांतून मुक्त होतात. [१]जे केवळ आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठीं अन्न शिजवितात ते (अन्न खात नसून) पापच भक्षण करितात. १३.

अन्नापासून प्राणिमात्र उत्पन्न होतें; अन्न पावसामुळें तयार होतें; पाऊस यज्ञामुळें पडतो; आणि यज्ञ कर्मामुळें निष्पन्न होतो. कर्म हें प्रकृतीपासून निर्माण होतें, प्रकृति अक्षरब्रह्मापासून (प्रकट होतें) आणि म्हणून सर्वव्यापक ब्रह्म हें नित्य यज्ञाच्या ठायीं वास करीत असतें, हें तूं जाण. १४, १५.

याप्रमाणें प्रवर्तिलेल्या चक्राला जो अनुसरत नाहीं, तो माणूस स्वतःचें जीवन पापमय करतो, विषयसुखांत दंग राहतो, आणि हे पार्था, या कारणांमुळें त्याचा जन्म निरर्थक होतो. १६.

पण जो पुरुष आत्म्याच्या ठायीं रममाण होतो, जो त्याच्यांतच समाधान पावतो आणि संतोष मानतो, त्याला कांहीं करायचें उरत नाहीं. १७.

करण्यांत किंवा न करण्यांत त्याचा कांहींच स्वार्थ (गुंतलेला) असत नाहीं. भूतमात्राविषयीं त्याचा कोणताहि वैयक्तिक स्वार्थ असत नाहीं. १८.

---

[१] गीतेनें हा विचार जशाचा तसा ऋग्वेदांतून घेतला आहे. "केवलाघो भवति केवलादि"। (१०–११७–६).

म्हणून तूं आसक्ति सोडून (देऊन) निरंतर कर्तव्य कर्म करीत जा. असंग राहून कर्म करणारा पुरुष मोक्षाप्रत जातो. १९.

जनकासारख्या अनेक लोकांनीं कर्माच्या द्वाराच परमसिद्धि प्राप्त करून घेतली आहे.

लोकसंग्रहाकडे[१] नजर दिली तरी सुद्धां तुला कर्म करणें उचित होय. २०.

(कारण) उत्तम पुरुष जें जें आचरण करीत असतात, त्याचें अनुकरण सामान्य लोक करूं लागतात. ज्या (आदर्शा) ला ते प्रमाणभूत मानतात त्याला अनुसरून लोक आपलें वर्तन ठेवितात. २१.

हे पार्था, या तिन्ही लोकांत मला कांहींच करावयाचें (शिल्लक) नाहीं; मिळविण्यालायख असें कांहीं मिळालें नाहीं, अशांतलीही गोष्ट नाहीं; तरी सुद्धां मी कर्मांत गढून गेलों आहे. २२.

**टीप :** सूर्य, चंद्र, पृथ्वी इत्यादिकांची निरंतर आणि बिनचूक गति ईश्वरी कर्मांचें सूचन करते. हीं कर्में मानसिक नव्हेत; शारीरिक (किंवा भौतिक) मानलीं पाहिजेत. 'ईश्वर निराकार असूनही तो शारीरिक कर्में करितो, असें कसें म्हणतां येईल ?" अशी शंका घेण्याला जागा नाहीं. कारण, तो 'अशरीर' असून सुद्धां 'सशरीराप्रमाणें वर्तन करतांना दिसून येतो. यामुळेंच तो कर्म करून सुद्धां 'अकर्मकृत्' आणि लेपरहित आहे. माणसानें एवढेंच ध्यानांत घ्यायचें आहे कीं ज्याप्रमाणें ईश्वराची प्रत्येक कृति यंत्राप्रमाणें काम करिते त्याप्रमाणें माणसानें सुद्धां यंत्राप्रमाणेंच पण बुद्धिपूर्वक नियमित काम करणें उचित आहे. यंत्राच्या नियमित गतीचा अनादर करून स्वच्छंदी वर्तन करण्यांत माणसाची विशेषता नसून ती विशेषता त्या गतीचें ज्ञानपूर्वक अनुकरण करण्यांत आहे.

---

[१] लोकांनीं भलत्या मार्गानें जाऊन समाजाचा नाश करूं नये, या हेतूनें मार्गदर्शन करून तद्द्वारा लोककल्याण साधणें, याचें नांव लोकसंग्रह. का० का०. 'लोकस्य उन्मार्गप्रवृत्तिनिवारणं लोकसंग्रहः'। शां. भा.

अलिप्त राहून, असंग होऊन तो यंत्रवत् काम करील तर त्याची झीज होत नाहीं. तो आमरण ताजातवाना ( किंवा नित्यनवा ) राहतो. देह आपल्या नियमाला अनुसरून मरणसमयीं गळून पडेल, पण त्यांत वास करणारा आत्मा जसा होता तसाच राहतो.

आळस देण्यापुरता क्षणभरसुद्धां न थांबतां मी जर कर्म करण्यांत प्रवृत्त असणार नाहीं तर हे पार्था, लोक सर्वप्रकारें माझ्या वर्तनाचें अनुकरण करतील; मी जर कर्म केलें नाहीं तर हे लोक नष्ट होतील; मी अंदाधुंदीचा प्रवर्तक होईन आणि हे लोक नष्ट करीन. २३, २४.

हे भारता, ज्याप्रमाणें अज्ञानी लोक आसक्त होऊन कर्में करितात त्याप्रमाणें ज्ञानी लोकांनीं आसक्तिरहित होऊन लोक-कल्याणाच्या हेतूनें कर्में केलीं पाहिजेत. २५.

कर्माच्या विषयीं आसक्त असलेल्या अशा अज्ञानी माणसांचा ज्ञानी पुरुषांनीं बुद्धिभेद करूं नये; याउलट, समत्वबुद्धीनें चांगल्या प्रकारें कर्में करून त्यांना कर्मांविषयीं प्रेरणा द्यावी. २६.

सगळीं कर्में प्रकृतीच्या गुणांमुळें केलीं जातात; असें असतांना अहंकारानें मूढ झालेला माणूस 'मीच कर्ता आहें' अशी समजूत करून घेतो; परंतु हे महाबाहो, (याच्या उलट) गुणकर्मविभागाचें रहस्य ओळखणारा पुरुष 'गुण गुणांच्या ठायीं वर्ततात' हें ध्यानांत आणून त्यांत आसक्त होत नाहीं. २७, २८.

**टीप :** श्वासोच्छ्वासादि क्रिया आपोआप होत असतात; त्यांच्याविषयीं माणसाला आसक्ति बाळगावी लागत नाहीं; ज्यावेळीं एखाद्या अवयवाला रोग होतो, त्याच वेळीं त्याला त्याची काळजी वहावी लागते किंवा त्याला त्या अवयवाचें अस्तित्व सुद्धां त्याच वेळीं भासमान होतें. त्याचप्रमाणें, स्वाभाविक कर्में आपोआप होत राहिलीं तर त्यांच्याविषयीं आसक्ति राहात नाहीं. जे स्वभावतः उदारात्मे आहेत त्यांना आपण उदार आहोंत याची

जाणीवही नसते. त्यांना दान केल्याविना राहवतच नाहीं. अशी अनासक्ति अभ्यास आणि ईश्वरकृपा यांमुळेंच येणें शक्य आहे.

प्रकृतीच्या गुणांनीं मूढ झालेलीं माणसें गुणकर्मांत आसक्त राहतात. या अज्ञानी, अल्पप्रज्ञ लोकांना प्राज्ञांनीं चाळवितां कामा नये. २९.

: ११ :

वृत्ति आत्मनिष्ठ राखून, सर्व कर्में मला अर्पण करून, आसक्ति आणि ममत्व सोडून आणि क्रोध ( किंवा संताप ) शांत करून तूं युद्ध कर. ३०.

**टीप :** देहांत राहणाऱ्या आत्म्याला जो ओळखतो आणि तो परमात्म्याचा अंश आहे हें जाणतो, तो सर्व कांहीं परमात्म्यालाच अर्पण करील. स्वामीचा आसरा घेऊन सेवक ज्याप्रमाणें निभावून जातो आणि सर्व कांहीं त्याला अर्पण करतो त्याप्रमाणें.

श्रद्धा ठेवून, द्वेष सोडून देऊन जीं माणसें माझ्या या मताप्रमाणें नित्य वागतात तीं सुद्धां कर्माच्या बंधनांतून मुक्त होतात. ३१.

पण जीं माणसें माझ्या या मतांत दोष काढतात, (आणि म्हणून) त्याप्रमाणें चालत नाहींत तीं ज्ञानहीन, मूर्ख होत. त्यांचा नाश झालाच म्हणून समज. ३२.

(ही गोष्ट खरी कीं) ज्ञानी सुद्धां आपापल्या वळणावर जातात; प्राणिमात्र आपल्या प्रकृतिधर्माप्रमाणें वागतात; तेथें जबरदस्ती काय कामाची ? ३३.

**टीप :** दुसऱ्या अध्यायांतील ६१ व्या किंवा ६८ व्या श्लोकाविरुद्ध हा श्लोक नाहीं. इंद्रियांचा निग्रह करतां करतां माणसाला मरूनही जावें लागेल, पण असें असून सुद्धां प्रयत्नांत साफल्य मिळालें नाहीं तर निग्रह म्हणजे जबरदस्ती निरर्थक म्हणावी लागेल. यांत निग्रहाची निंदा नाहीं सुचविली, तर प्रकृतीचें साम्राज्य ( केवढें बलाढ्य आहे तें ) दर्शविलें

आहे. 'हा आपला माझा स्वभाव आहे' असें म्हणून कोणी आपला दोष आहे तसाच ठेवील तर त्याला या श्लोकाचा अर्थ समजला नाहीं.

आपला स्वभाव काय आहे याचेंही भान आपणांस असत नाहीं. प्रत्येक संवय म्हणजे कांहीं स्वभाव नव्हे. वरवर जाणें ( ऊर्ध्वगमन ) हा आत्म्याचा स्वभाव आहे; म्हणून आत्मा ज्यावेळीं खालीं घसरतो त्यावेळीं त्याच्या विरुद्ध उभें ठाकणें हें कर्तव्य होय, म्हणून खालच्या श्लोकांत ही गोष्ट स्पष्ट केली आहे.

( असें असलें तरी ) आपापल्या विषयांच्या बाबत इंद्रियांना आवडनावड ( रागद्वेष ) ही असतेच; (हें ध्यानांत घेऊन) माणसानें तिच्या आहारीं जातां कामा नये; कारण हे रागद्वेष माणसाचे वाटमारे ( शत्रु ) आहेत. ३४.

**टीप :** श्रवण करणें हा कानाचा विषय होय. गोड लागेल तेंच ऐकणें त्याला आवडतें– हा राग; जें बदसूर वाटतें तें ऐकायला नको, असें कानाला वाटतें– हा द्वेष.

'हा तर स्वभावधर्म आहे' असें म्हणून रागद्वेषांच्या अधीन होण्याऐवजीं त्यांच्या विरुद्ध उभें राहणें, हें योग्य होय. आत्म्याचा स्वभाव (मुळांत)[१] सुखदुःखांपासून अलिप्त राहण्याचा. त्या स्वभावाप्रत माणसाला पोंचायचें आहे.

परधर्म सुकर असला तरी त्याच्यापेक्षां निकृष्ट असलेला सुद्धां स्वधर्म अधिक चांगला होय. स्वधर्मांत आलेला मृत्यु सुद्धां अधिक बरा; परधर्मांत फार धोके आहेत. ३५.

**टीप :** समाजांत एकाचा धर्म झाडू मारण्याचा असेल आणि दुसऱ्याचा धर्म हिशेब ठेवण्याचा असेल. हिशेब ठेवणाऱ्याला लोक खुशाल मोठा (किंवा श्रेष्ठ) समजोत; पण जर झाडूवाला आपला धर्म सोडून देईल तर तो भ्रष्ट होईल आणि त्यामुळें समाजाला हानि पोंचेल. ईश्वराच्या दरबारांत दोघांच्या सेवेचें मूल्यमापन त्यांच्या (अंगीं असलेल्या) निष्ठेच्या प्रमाणांत

---

१ "मानत मानत घालावें मुळाकडे ॥ " रामदास.

केलें जाईल. तिथें तर सर्व धंदे सारख्याच मापानें मोजले जातील. दोघेहि आपलें कर्म जर ईश्वरार्पणबुद्धीनें करतील तर ते मोक्षलाभास सारखेच लायख ठरतील.

: १२ :

**अर्जुन म्हणाला :**

हे वार्ष्णेया, जबरदस्तीनें जणूं जोखडाला बांधावा तसा, इच्छा नसून सुद्धां, माणूस कोणाच्या प्रेरणेनें पाप करण्यास उद्युक्त होतो ? ३६.

**श्रीभगवान म्हणाले :**

रजोगुणापासून उत्पन्न झालेला हा ( प्रेरक ) काम आहे, क्रोध आहे; याचें पोट कधीं भरतच नाहीं, हा महापापी आहे; या लोकांत हाच आपला शत्रु आहे असें समज. ३७.

**टीप :** आपला खरा शत्रु अंतःकरणांतच राहिला आहे, मग त्याला तुम्ही वाटेल तर काम म्हणा किंवा क्रोध म्हणा.

ज्याप्रमाणें धुरानें अग्नि किंवा धुळीनें आरसा किंवा वारेनें गर्भ झांकलेला असतो त्याप्रमाणें कामादिरूप शत्रूंनीं हें ज्ञान झांकलेलें असतें. ३८.

हे कौंतेया, कधींहि तृप्त करतां न येणारा कामरूप अग्नि हा नेहमींचा शत्रु आहे, त्याच्यामुळें ज्ञानी माणसाच्या बुद्धीस झांपड पडली आहे. ३९.

इंद्रियें, मन आणि बुद्धि हीं या शत्रूचे बालेकिल्ले होत; त्यांचा आसरा घेऊन, ज्ञानावर आवरण घालून हा शत्रु माणसाला मोहांत पाडतो. ४०.

**टीप :** इंद्रियांना काम ग्रासून टाकतो, त्यामुळें मन मलिन होतें, त्यामुळें विवेकशक्ति पांगळून जाते, आणि त्यामुळें ज्ञान नष्ट होतें. पहा –अध्याय २, श्लोक ६२–६४.

म्हणून हे भरतर्षभा, तूं झपाट्याला इंद्रियांच्या वर ताबा मिळव आणि ज्ञान व अनुभव यांचा चेंदामेंदा करणाऱ्या या पापी शत्रूला हांकलून दे. ४१.

इंद्रियें सूक्ष्म आहेत, मन सूक्ष्मतर आहे, आणि बुद्धि सूक्ष्मतम आहे; या बुद्धीहूनहि जो अत्यंत सूक्ष्म तो आत्मा होय. ४२.

**टीप :** म्हणजे जर इंद्रियांवर काबू राहील तर सूक्ष्म काम जिंकणें हें काम फार सोपें होऊन जाईल.

अशा रीतीनें बुद्धीच्याही पलीकडे असलेल्या आत्म्याला ओळखून आणि आत्म्याच्याच मार्फत मनाला वश करून हे महाबाहो, कामरूप, दुःसाध्य शत्रूचा पाडाव कर. ४३.

**टीप :** देहांत राहणाऱ्या आत्म्याला जर माणूस ओळखेल तर मन त्याच्या ताब्यांत राहील, तें इंद्रियांच्या मागें जाणार नाहीं. आणि मन जिंकल्यावर मग "कामा"ची बिशाद काय ?

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला "कर्मयोग" या नांवाचा तिसरा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# ४. ज्ञानकर्मसंन्यासयोग

या अध्यायांत तिसऱ्याचीच जास्त फोड केली आहे आणि निरनिराळ्या प्रकारच्या कित्येक यज्ञांचें वर्णन केलें आहे.

: १३ :

**श्रीभगवान म्हणाले :**

क्षीण न होणारा हा योग मी विवस्वानाला (सूर्याला) सांगितला. त्यानें तो मनूला आणि मनूनें इक्ष्वाकूला सांगितला. १.

अशा परंपरेनें मिळालेला तो योग राजर्षींना माहीत झाला. पण मागाहून, दीर्घ काळ लोटल्यामुळें, तो लोप पावला. २.

तोच पुरातन योग, (रहस्यांतलें रहस्य) म्हणून मी आज तुला सांगितला आहे; कारण, तूं माझा भक्तही आहेस आणि दोस्तही आहेस. ३.

**अर्जुन म्हणाला :**

तुमचा जन्म तर अलीकडला आहे, विवस्वानाचा फार पूर्वींचा आहे. तेव्हां तुम्ही तो (योग) सर्वांआधीं (विवस्वानाला) सांगितला होता हें माझ्या लक्षांत कसें यावें ? ४.

**श्रीभगवान म्हणाले :**

हे अर्जुना, माझे आणि तुझे जन्म तर (या वेळेपावेतों) पुष्कळच होऊन गेले आहेत. ते सगळे मी जाणतों, तूं जाणत नाहींस. ५.

मी जन्म आणि मृत्यु यांनीं रहित आहे, आणि शिवाय भूतमात्रांचा ईश्वर आहे; असें असूनही माझ्या स्वभावावर आरूढ होऊन, माझ्या मायेच्या शक्तीनें मी जन्म घेत असतों. ६.

हे भारता, ज्या ज्या वेळीं धर्माला ग्लानि येते आणि अधर्माला बळ चढतें, त्या त्या वेळीं मी जन्म घेत असतों. ७.

साधूंच्या रक्षणासाठीं आणि दुष्टांचें निर्दाळण करण्यासाठीं, तसेंच धर्माचा जीर्णोद्धार करण्यासाठीं प्रत्येक युगांत मी जन्म घेत असतों. ८.

**टीप** : येथें श्रद्धावान् लोकांना आश्वासन आहे आणि सत्याच्या—धर्माच्या अढळपणाची प्रतिज्ञा आहे. या जगांत भरती—ओहोटी ( एक-सारखी ) चालूंच असते. परंतु शेवटीं धर्माचाच विजय होत असतो. संतांचा नाश होत नाहीं, कारण सत्याचा ( कधींही ) नाश होत नाहीं. दुष्टांचा नाश हा ( ठेवलेला ) आहेच, कारण ( खरें पाहतां ) असत्याला अस्तित्वच नाहीं. हें ओळखून मनुष्यानें ‘ मी कर्ता ’ हा अभिमान धरून हिंसा करूं नये, दुराचारानें वागूं नये. ईश्वराची अगम्य माया आपलें काम पार पाडीतच असते. हाच अवतार किंवा ईश्वराचा जन्म. परमार्थतः ईश्वराला जन्म घेणें ही क्रिया ( संभवतच ) नाहीं.

याप्रमाणें जो माझा दिव्य जन्म आणि कर्म यांतलें रहस्य जाणतो त्याला हे अर्जुना, देहत्यागानंतर पुनरपि जन्म घ्यावा लागत नाहीं, (एवढेंच नव्हे तर ) तो मला येऊन मिळतो. ९.

**टीप** : कारण ज्यावेळीं मनुष्य, ईश्वर सत्याचाच जय करवील, असा विश्वास बाळगतो त्यावेळीं तो सत्याला सोडून देत नाहीं, धीर धरतो, हालअपेष्टा सहन करितो, आणि मीपणा टाकल्यामुळें जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटून, ईश्वराचेंच ध्यान धरून त्यांत शेवटीं लय पावतो.

आसक्ति, भीति आणि क्रोध यांनीं रहित झालेले, माझेंच ध्यान करून माझाच आसरा घेणारे, ज्ञानमय तपानें पावन झालेले, असे (आजपर्यंत ) पुष्कळ (संत-सज्जन) माझ्या स्वरूपाला येऊन मिळाले आहेत. १०.

जे ज्याप्रमाणें माझा आश्रय घेतात त्यांना त्याप्रमाणें मी फ़ळ

देत असतों. वाटेल त्या प्रकारानें कां होईना, हे पार्था, माणसें माझ्या मार्गाचें अनुसरण करतात, माझ्या शासनाखालीं राहतात. ११.

**टीप** : याचा अर्थ असा कीं कोणीही ईश्वराच्या कायद्याचें उल्लंघन करूं शकत नाहीं. जसें पेरावें तसें (पीक) कापावें; करावें तसें भरावें. ईश्वरी [१]कायद्याला-कर्माच्या कायद्याला-अपवाद नाहीं. सर्वांना सारखा म्हणजे ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें न्याय मिळतो.

कर्मांची सफलता इच्छिणारीं माणसें या लोकांत (निरनिराळ्या) देवतांचें ( भजन ) पूजन करीत असतात. त्यांना त्यांच्या कर्माचें फळ या लोकांतच लवकर मिळतें. १२.

**टीप** : देवता म्हणजे स्वर्गांत राहणारे इंद्र, वरुण इत्यादि व्यक्ति नव्हत. देवता म्हणजे ईश्वराचे अंश असलेल्या शक्ति. या अर्थानें मनुष्य पण देवताच आहे. वाफ, वीज इ. मोठ्या शक्ति या देवताच होत. त्यांची उपासना केल्याचें फळ त्वरित आणि या लोकांतच मिळतें, हें आपण पाहतों. हें फळ क्षणिक असतें. त्या (शक्ति) आत्म्याला संतोष देत नाहींत, तर मग त्या मोक्ष कोठून देतील बरें ?

मी गुणकर्मविभागाप्रमाणें चार वर्ण निर्मिले आहेत; त्यांचा कर्ता मी असून सुद्धां मला तूं अकर्ता, अविनाशी असें समज. १३.

मला कर्मांचा स्पर्श होत नाहीं. मला त्यांच्या फळाविषयीं लालसा नाहीं. अशाप्रमाणें जे मला चांगल्या रीतीनें जाणतात त्यांना कर्माचें बंधन लागत नाहीं. १४.

**टीप** : कारण माणसाजवळ कर्में करीत असतांना सुद्धां कर्मरहित राहण्याचें एक सर्वोत्तम उदाहरण आहे. सगळें कांहीं ईश्वरच घडवीत आहे, आपण केवळ निमित्तमात्र आहोंत, मग कर्तेपणाचा अभिमान कां असावा ?

---

[१] "पुण्यो वै पुण्येन कर्मणा भवति पापः पापेन"। बृ. उ. ३·२·१३

हें ओळखून पूर्वींच्या मुमुक्षुजनांनीं कर्में केलीं आहेत; म्हणून तूं देखील पूर्वज नेहमीं करीत आले आहेत त्याप्रमाणें कर्मेंच करीत जा. १५.

: १४ :

कर्म म्हणजे काय, तसेंच अकर्म म्हणजे काय, याविषयीं शहाणीं माणसें सुद्धां घोटाळ्यांत पडलीं आहेत. म्हणून कर्माविषयीं तुला योग्य तें सांगेन; तें जाणल्यामुळें तुझें अकल्याण होणार नाहीं. १६.

कर्म, विकर्म (म्हणजे निषिद्ध कर्म) आणि अकर्म यांमधील भेद जाणला पाहिजे. कर्माची गति गहन आहे. १७.

कर्मांत जो अकर्म पाहतो आणि अकर्मांत जो कर्म पाहतो, त्याला लोकांत बुद्धिमान् समजतात. तो योगी होय आणि तोच संपूर्ण कर्में करणारा होय. १८.

**टीप** : कर्म करून सुद्धां जो कर्तेपणाचा अभिमान बाळगत नाहीं त्याचें कर्म 'अकर्म' होय; जो कर्माचा बाह्यतः त्याग करतो आणि मनांत मांडे खातो (किंवा मनोराज्यें रचतो) त्याचें अकर्म सुद्धां 'कर्म'च होय.

ज्याचें अर्धांग गेलें आहे, असा माणूस हेतुपूर्वक -- अभिमानपूर्वक - (म्हणजे मुद्दाम) राहिलेलें अंग हलवील, त्याच वेळीं तें हलतें. आतां (या दाखल्यांत) हा रोगी आपलें अंग हलविण्याच्या क्रियेचा कर्ता बनला. आत्म्याचा गुण अकर्तेपणाचा आहे. जो मूर्ख बनून स्वतःला कर्ता समजतो, त्या आत्म्याबाबत समजावें कीं त्याचें अर्धांग गेलें आहे आणि तो अभिमानी होऊन कर्में करीत आहे.

या श्लोकाप्रमाणें (पाहिलें तर) जो कर्माची गति जाणतो, तोच बुद्धिमान्, योगी आणि कर्तव्यपरायण मानावा. 'मीच कर्ता आहें' असें मानणारा (पुरुष) कर्म-विकर्मांतील भेद विसरून जातो आणि साधनाबाबत सारासार विचार करीत नाहीं. आत्म्याची स्वाभाविक गति

ऊर्ध्व म्हणजे वर चढण्याची आहे; म्हणून जेव्हां ( एखादा ) माणूस नीतिमार्गानें जाण्याचें सोडून देतो तेव्हां त्याचे ठिकाणीं ' मीपणा ' आहेच, असें म्हणतां येतें. अभिमानरहित पुरुषाचीं कर्में आपोआपच सात्त्विक होतात.

ज्याचे सर्व उद्योग कामना आणि संकल्प यांनीं विरहित आहेत आणि ज्याचीं कर्में ज्ञानरूपी अग्नीनें जळून गेलीं आहेत, अशा पुरुषाला ज्ञानी लोक ' पंडित ' म्हणतात. १९.

कर्मफळाची आसक्ति सोडून जो नेहमीं संतुष्ट राहतो, ज्याला कोणत्याही आसऱ्याची अपेक्षा नाहीं, तो कर्मांत गुंतला असला तरी कांहींच करीत नाहीं, असें म्हणतां येईल. २०.

**टीप** : याचा अर्थ असा कीं, त्याला कर्माचें बंधन भोगावें लागत नाहीं.

आशेचीं मुळें ज्यानें खणून काढलीं आहेत, ज्याचें मन स्वतःच्या कह्यांत आहे, ज्यानें आपल्याजवळ कसलाही संग्रह बाळगलेला नाहीं आणि ज्याचें केवळ शरीरच काम करीत आहे तो कर्म करून सुद्धां त्याच्या दोषापासून अलिप्त राहतो. २१.

**टीप** : अभिमानपूर्वक केलेलें कोणतेंही कर्म–मग तें कितीही सात्त्विक असो–बंधनांत घालणारेंच असतें. तें ज्यावेळीं निरभिमानपणें आणि ईश्वरार्पणबुद्धीनें केलें जातें, त्याच वेळीं तें बंधनरहित होतें. ज्याचा ' अहं ' शून्य झाला आहे, त्याचें शरीरच फक्त काम करतें. झोपीं गेलेल्या माणसाचें फक्त शरीरच काम करीत आहे, असें म्हणतां येईल. जो कैदी जबरदस्तीला शरण जाऊन अनिच्छेनें नांगर ओढतो, त्याचें शरीरच केवळ काम करीत असतें. जो स्वेच्छापूर्वक ईश्वराचा कैदी बनला आहे त्याचेंही शरीरच फक्त काम करीत असतें. कारण तो स्वतः शून्यवत् झालेला असतो; त्याचा प्रेरक ईश्वर असतो.

यदृच्छेनें ( म्हणजे सहज ) मिळेल त्या वस्तूवर जो खूष असतो, जो सुखदुःखादि द्वंद्वांतून सुटला आहे, ज्याच्या ठायीं द्वेषाची

खूणही नाहीं आणि जो (कर्माची) सिद्धि अथवा असिद्धि यांबावत उदासीन असतो, तो कर्मे करूनही त्यांत अडकत नाहीं. २२.

जो आसक्तिरहित आहे, ज्याचें चित्त ज्ञानांत स्थिर झालें आहे, जो मुक्त आहे आणि जो केवळ यज्ञार्थंच कर्मे करितो, त्याचें सर्व कर्म लयाला जातें. २३.

(यज्ञांतील) अर्पण हें ब्रह्म, हवि म्हणजे हवनाची वस्तु हें ब्रह्म, ब्रह्मरूपी अग्नीमध्यें हवन करणारा (होता) हेंही ब्रह्म; याप्रमाणें कर्माबरोबर ज्यानें ब्रह्माचा मेळ साधला आहे तो ब्रह्मालाच (जाऊन) पोंचतों. २४.

दुसरे कित्येक योगी देवतांचें पूजन हाच यज्ञ अनुष्ठितात; आणि इतर (कांहींजण) ब्रह्मरूप अग्नीमध्यें यज्ञाच्या साहाय्यानें यज्ञालाच यजितात (म्हणजे होमून टाकतात); शिवाय (आणखी) कित्येक श्रवणादि इंद्रियांना संयमरूप अग्नींत जाळतात; आणि त्यांहून आणखी कोणी शब्दादि विषयांची इंद्रियाग्नींत आहुति देतात. २५, २६.

**टीप** : ऐकण्याची क्रिया इ.चा संयम करणें हा एक प्रकार; आणि इंद्रियांना राबवीत असतांना त्यांचे विषय प्रभुप्रीत्यर्थ वापरणें-जसें भजन इ. ऐकणें – हा दुसरा प्रकार; वस्तुतः दोन्ही एकच होत.

आणखी दुसरे (कांहींजण) सगळ्या इंद्रियकर्मांना व प्राणकर्मांना, ज्ञानदीपानें शिलगलेल्या म्हणजे पेट घेतलेल्या आत्मसंयमरूपी योगाग्नींत, जाळून टाकतात. २७.

**टीप** : म्हणजे परमात्म्यांत तल्लीन होऊन जातात.

तात्पर्य, कोणी यज्ञार्थ द्रव्यअर्पण करणारे असतात, तर कोणी तपआचरण करणारे असतात; कित्येक अष्टाङ्गयोगाचें साधन करणारे असतात; तर कांहींजण स्वाध्याय आणि ज्ञान या

यज्ञांत मग्न असतात. हे सर्व कडक व्रत पाळणारे, प्रयत्नशील याज्ञिक होत. २८.

दुसरे कोणी प्राणायामांत तल्लीन असणारे, अपानाचा प्राणांत होम करितात आणि प्राणाचा अपानांत होम करितात, किंवा प्राण आणि अपान (या) दोन्ही वायूंचा निरोध करतात, (म्हणजे त्यांना रोखून धरतात). २९.

**टीप :** हा तीन प्रकारचा प्राणायाम आहे. रेचक, पूरक आणि कुंभक. संस्कृतांत प्राणवायूचा अर्थ आपण तो शब्द वापरतो त्याच्या उलट आहे; वर आलेला प्राणवायु हा आंतून बाहेर पडणारा आहे. जो बाहेरून आंत घेतला जातो त्याला आपण प्राणवायु (म्हणजे ऑक्सिजन) या नांवानें ओळखतों.

आणखी दुसरे कोणी आहारावर नियमन ठेवून प्राणांचा प्राणांत होम करितात. ज्यांनीं यज्ञाच्या द्वारा आपल्या पापांचा क्षय केलेला आहे असे हे सर्वजण यज्ञ जाणणारे होत. ३०.

हे कुरुसत्तमा, यज्ञांत उरलेला 'प्रसाद' खाणारे लोक सनातन ब्रह्माला (जाऊन) पोंचतात. यज्ञ न करणाऱ्या माणसाला हा लोक (लाभदायक) होत नाहीं, मग परलोक (सुखकारक) कोठून होणार? ३१.

याप्रमाणें वेदांत नाना प्रकारच्या यज्ञांचें वर्णन आलें आहे. या सर्वांची निष्पत्ति कर्मांतून होत असते, हें तूं समजून घे. या ज्ञानानें तुला मोक्ष मिळेल. ३२.

**टीप :** या ठिकाणीं 'कर्मा'चा व्यापक अर्थ आहे. म्हणजे (सर्व तऱ्हेचीं कर्में) शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक. अशा कर्मांविना यज्ञच (पुरा) होणार नाहीं. यज्ञाची सांगता झाली नाहीं तर मोक्ष (मिळणार) नाहीं. असें जाणून त्याप्रमाणें आचरण ठेवणें, याचाच अर्थ, यज्ञाचें ज्ञान असणें.

तात्पर्य, माणसानें आपलें शरीर, बुद्धि आणि आत्मा सुद्धां प्रभुसेवेपायीं–लोकसेवेच्या कर्मांत (लोकसंग्रहासाठीं) वेचलें नाहीं तर तो चोर ठरेल. तो मोक्षाला लायख बनूं शकत नाहीं. केवळ बुद्धीचा जो उपयोग करूं देतो आणि शरीर आणि आत्मा चोरून ठेवतो तो संपूर्ण याज्ञिक नव्हे. या शक्ति हस्तगत केल्याशिवाय त्यांचा परोपकारार्थ वापर होऊं शकत नाहीं. म्हणून आत्म-शुद्धिशिवाय लोकसेवा (घडणें) असंभवनीय होय. सेवकानें शरीर, बुद्धि आणि आत्मा या तिहींच्या बाबतचें सर्व सामर्थ्य सारख्याच रीतीनें अंगीं बाणवलें पाहिजे.

: १५ :

हे परंतपा, द्रव्ययज्ञापेक्षां ज्ञानयज्ञ अधिक श्रेष्ठ आहे; कारण हे पार्था, प्रत्येक कर्म ( शेवटीं )ज्ञानांतच पराकाष्ठेला पोंचतें. ३३.

**टीप** : परोपकारबुद्धीनें दिलेलें द्रव्य सुद्धां, जर तें ज्ञानपूर्वक दिलेलें नसेल, तर पुष्कळ वेळां हानिकारक होतें, याचा कुणाला अनुभव नाहीं ? चांगल्या वृत्तीनें झालेलीं सर्व कर्में तेव्हांच शोभून दिसतात, जेव्हां त्यांचा ज्ञानाशीं पुरा समन्वय (मेळ) साधलेला असतो. म्हणून प्रत्येक कर्माची पूर्णाहुति ही (अवभृथ) ज्ञानांतच होते.

तत्त्वज्ञानी अशा जाणत्यांची सेवा करून आणि नम्रतापूर्वक विवेकानें त्यांना फिरून फिरून पुसून तें ज्ञान तूं समजून घे. ते ( जाणते ) तुझी जिज्ञासा तृप्त करितील. ३४.

**टीप** : ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या तीन अटी–प्रणिपात, परिप्रश्न आणि सेवा या युगांत चांगल्या ध्यानांत ठेवण्याजोग्या आहेत. प्रणिपात म्हणजे नम्रता, विवेक; परिप्रश्न म्हणजे पुनः पुनः विचारून घेणें : सेवेशिवाय धरलेल्या नम्रतेची गणना खुशामतींत होण्याचा (दाट) संभव आहे; शिवाय ज्ञान हे शोध केल्याशिवाय मिळण्याचा संभव नाहीं. म्हणजे समजेपर्यंत शिष्यानें गुरूला नम्रतापूर्वक प्रश्न विचारीत गेलें पाहिजे. ही जिज्ञासेची खूण होय. यांत श्रद्धेची जरूर आहे. ज्याच्या विषयीं श्रद्धा असत नाहीं त्याच्या पुढें अंतःकरणांपासून मस्तक लवणार नाहीं. मग त्याची सेवा कोठून होणार ?

४

तें ज्ञान मिळाल्यानंतर हे पांडवा, तुला फिरून असा मोह घेरणार नाहीं; त्या ज्ञानामुळें तूं भूतमात्राला माझ्या ठायीं आणि आपल्या ( स्वतःच्या ) ठायीं पाहशील. ३५.

**टीप :** पिंडीं तें ब्रह्मांडीं ( यथा पिण्डे तथा ब्रह्माण्डे ) याचा हाच अर्थ. ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे तो आपण स्वतः आणि इतर यांच्यामध्यें भेद पाहत नाहीं.

सगळ्या पाप्यांमध्यें तूं मोठ्यांत मोठा पापी असलास तरी ज्ञानरूपी नावेनें तूं सर्व पापें तरून जाशील. ३६.

हे अर्जुना, पेटलेला अग्नि ज्याप्रमाणें सगळें सरपण जाळून टाकतो, त्याप्रमाणें ज्ञानरूपी अग्नि सर्व कर्मांना खाक करून टाकतो. ३७.

ज्ञानासारखी या जगांत दुसरी कांहीं पवित्र म्हणजे शुद्ध करणारी वस्तु नाहीं. योगांत म्हणजे समत्वांत पूर्णपणें स्थिरावलेला ( किंवा पूर्ण झालेला ) माणूस कालान्तरानें स्वतःच तें ज्ञान प्राप्त करून घेतो. ३८.

श्रद्धावान्, ईश्वरपरायण, जितेंद्रिय पुरुषाला ज्ञान मिळतें; आणि ज्ञान मिळाल्यावर लगेच त्याला परमशांति प्राप्त होते. ३९.

जो अज्ञानी आणि श्रद्धारहित असल्यामुळें संशयात्मा असतो, त्याचा नाश ठेवलेलाच आहे. संशयात्म्याला नाहीं हा लोक, नाहीं परलोक; त्याला कुठेंच सुख मिळत नाहीं. ४०.

ज्यानें समत्वरूपी योगाच्या साहाय्यानें कर्मांचा म्हणजेच कर्मफळांचा त्याग केला आहे आणि ज्ञानाच्या साहाय्यानें संशय छेदून टाकले आहेत, अशा त्या आत्मज्ञान्याला हे धनंजया, कर्में बांधत नाहींत. ४१.

म्हणून हे भारता, हृदयामध्यें अज्ञानामुळें उत्पन्न झालेल्या

संशयांचा आत्मज्ञानरूपी तलवारीनें नाश करून योगाचें समत्व धारण करून तूं उभा राहा. ४२.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याहि आहे आणि योगशास्त्रहि आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुन-संवादांत आलेला "ज्ञानकर्मसंन्यासयोग" नांवाचा चौथा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

ग्रंथ संग्रहालय
१०२६६

# ५. कर्मसंन्यासयोग

*या अध्यायांत कर्मयोगाखेरीज कर्मसंन्यास (साध्य) होऊंच शकत नाहीं आणि वस्तुतः ते दोन्ही एकच होत, हें दाखविलें आहे.*

: १६ :

**अर्जुन म्हणाला :**

हे कृष्णा, कर्मांच्या त्यागाची आणि पुनः कर्मांच्या योगाची देखील तुम्ही प्रशंसा करीत आहांत; या दोहोंपैकीं कोणतें श्रेयस्कर आहे तें मला बरोबर आणि निश्चित सांगा. १.

**श्रीभगवान म्हणाले :**

कर्मांचा संन्यास आणि योग, दोन्ही मोक्षदायक आहेत. त्यांतहि कर्मसंन्यासापेक्षां कर्मयोग वरचढ आहे. २.

जो मनुष्य द्वेष करीत नाहीं आणि इच्छा बाळगत नाहीं त्याला नित्यसंन्यासी ओळखावा. कारण हे महाबाहो, जो सुखदुःखादि द्वंद्वांपासून मुक्त आहे, तो सहजगत्या बंधनांतून सुटतो. ३.

**टीप** : मतलब एवढाच कीं, कर्माचा त्याग हें संन्यासाचें खास लक्षण नव्हे, तर द्वंद्वातीत होणें हेंच होय. एक मनुष्य कर्म करून सुद्धां संन्यासी असूं शकतो. दुसरा कर्म न करून देखील मिथ्याचारी असूं शकतो. अध्याय ३, श्लोक ६ पाहा.

सांख्य आणि योग—ज्ञान आणि कर्म—हे दोन्ही अलग आहेत, असें अज्ञानी म्हणतात. ज्ञानी म्हणत नाहींत. एकांतच (कां होईना) चांगल्या प्रकारें स्थिर राहणारा दोहोंचें फळ मिळवितो. ४.

**टीप** : लोकसंग्रहरूपी कर्मयोगाचें जें विशेष फळ आहे तें ज्ञानयोगी संकल्पमात्रेंकरून मिळवितो; तर कर्मयोगी स्वतः अनासक्त असल्यामुळें बाह्य कर्म करीत असून सुद्धां ज्ञानयोग्याची शांति सहजगत्या अनुभवतो.

जें स्थान सांख्यमार्गी प्राप्त करून घेतो तेंच योगी पण प्राप्त करून घेतो. सांख्य आणि योग हे एकरूप आहेत असें पाहतो, तोच खरा पाहणारा होय. ५.

हे महाबाहो, कर्मयोगाविना कर्मसंन्यास कष्टसाध्य होय, पण समत्व बाणलेला मुनि ताबडतोब मोक्ष पावतो. ६.

ज्यानें योग साधला आहे, ज्यानें हृदय शुद्ध केलें आहे आणि ज्यानें मन आणि इंद्रियें जिकलीं आहेत, तसेंच जो प्राणिमात्राला आपणासारखेच मानतो, असा माणूस कर्म करून सुद्धां त्यापासून अलिप्त राहतो. ७.

पाहतांना, ऐकतांना, शिवतांना, हुंगतांना, खातांना, चालतांना, झोपतांना, श्वासोच्छ्वास करतांना, बोलतांना, सोडतांना, धरतांना आणि डोळ्यांची उघडझांप करतांना केवळ इंद्रियेंच आपलीं कार्यें करीत आहेत अशी भावना ठेवून तत्त्वज्ञ योगी 'मी कांहीं करीतच नाहीं' असें समजतो. ८–९

**टीप** : जोंपर्यंन्त अभिमान (शिल्लक) आहे तोंपर्यंत अशी अलिप्त स्थिति येत नाहीं. म्हणून विषयलंपट माणूस 'विषयांचा मी उपभोग घेत नाहीं; इंद्रियें आपलीं कामें करीत आहेत" असें म्हणून सुटूं शकत नाहीं. असा अनर्थ (म्हणजे भलता अर्थ) करणाऱ्याला नाहीं गीता कळली कीं धर्म समजला. ही गोष्ट खालील श्लोकावरून स्पष्ट होत आहे.

जो मनुष्य कर्में "ब्रह्मार्पण" करून, आसक्ति सोडून वागतो तो (मनुष्य) पाण्यांत असलेलें (उगवलेलें) कमळ ज्याप्रमाणें (पाण्यापासून) अलिप्त असतें त्याप्रमाणें पापापासून अलिप्त राहतो. १०.

शरीरानें, मनानें, बुद्धीनें किंवा केवळ इंद्रियांनींहि योगी लोक आसक्तिरहित होऊन आत्मशुद्धीसाठीं कर्म करितात. ११.

समत्वयुक्त योगी कर्मफळाचा त्याग करून परम शांति पावतो; तर रागद्वेषयुक्त (माणूस) कामनाप्रेरित असल्यामुळें फळांत गुरफटून बंधनांत पडतो. १२.

संयमी पुरुष मनापासून (किंवा मनानें) सगळ्या कर्मांचा त्याग करून, नऊ दरवाजे असलेल्या नगररूपी शरीरांत राहात असून सुद्धां, न करतां आणि न करवतां, सुखांत राहतो. १३.

**टीप** : दोन नाकपुड्या, दोन कान, दोन डोळे, मलमूत्रत्यागाचीं दोन द्वारें आणि तोंड अशीं शरीराला (एकंदर) नऊ द्वारें आहेत; बाकी (तसें पाहिलें तर) आपल्या कातडीला असलेलीं असंख्य छिद्रें, हीं सुद्धां द्वारेंच होत. या दरवाजांवरील रखवालदार जर दरवाजांतून ये-जा करणाऱ्या अधिकारी पुरुषांनाच आंतबाहेर येऊंजाऊं देईल आणि (अशा रीतीनें) आपलें कर्तव्य चोख बजावील, तर त्याच्याविषयीं असें म्हणतां येईल कीं, तो ही ये-जा चालू असून सुद्धां त्यांत भागीदार होत नाहीं, तर केवळ साक्षीभूत असतो; यामुळें तो (कांहीं) करीत नाहीं, आणि करवीत नाहीं.

: १७ :

जगताचा प्रभु कर्तेपण निर्मीत नाहीं, कर्म निर्मीत नाहीं, कर्म आणि फळ यांचा मेळहि घालींत नाहीं. प्रकृतिच सर्व (कांहीं) करीत असते. १४.

**टीप** : ईश्वर कर्ता नाहीं. कर्माचा नियम (किंवा कायदा) अचल आणि अनिवार्य असतो. आणि जो जसें करतो त्याला तसेंच भरावें लागतें. यांत ईश्वराची महाकृपा सांठलेली आहे, त्याचा न्याय राहिला आहे. शुद्ध न्यायांत शुद्ध दया वास करते. शुद्ध न्यायाच्या विरुद्ध असलेली दया ती दया नव्हे, पण क्रूरता होय. परंतु मनुष्य कांहीं त्रिकालज्ञानी नाहीं. यास्तव दया-क्षमा हाच त्याच्याबाबत न्याय होय. स्वतां निरंतर

न्यायाला पात्र असल्यामुळें तो क्षमा भाकतो. दुसऱ्याच्या बाबत क्षमा करूनच त्याला न्याय चुकता करितां येईल. ज्याचे अंगीं क्षमेचा गुण बाणला आहे, तोच अखेरीस अकर्ता–योगी–समत्वयुक्त–कर्मकुशल बनतो.

ईश्वर कोणाचें पाप किंवा पुण्य आपल्यावर घेत नाहीं. अज्ञानामुळें ज्ञान झांकलें जातें; आणि त्यामुळें लोक मोहाच्या जाळ्यांत फसतात. १५.

**टीप** : अज्ञानामुळें म्हणजे "मी कर्ता आहे" या वृत्तीमुळें मनुष्य कर्मबंधांत बांधून घेतो आणि असें असूनही उलट चांगल्यावाईट फलांचा आरोप ईश्वरावर करतो, हेंच मोहजाल होय.

पण ज्यांचें अज्ञान आत्मज्ञानामुळें नाहींसें झालें आहे त्यांच्याकडून तें प्रकाशमय ज्ञान, सूर्याप्रमाणें, परमतत्त्वाचें दर्शन घडवितें. १६.

ज्ञानामुळें ज्यांचें पाप साफ धुऊन निघालें आहे, असे ईश्वरध्यानांत मग्न असणारे, तन्मय झालेले, त्याच्यांतच स्थिर राहणारे, त्यालाच सर्वस्व मानणारे, लोक मोक्ष पावतात. १७.

विद्वान् आणि विनयसंपन्न ब्राह्मण किंवा गाय, मोठा हत्ती, कुतरा आणि (कुतऱ्याचें मांस शिजवून खाणारा) चाण्डाळ या सर्वांविषयीं ज्ञानी दृष्टि सम ठेवतात. १८.

**टीप** : याचा अर्थ असा कीं, सर्वांची त्यांच्या त्यांच्या जरुरीप्रमाणें, सेवा करितात. ब्राह्मण आणि चांडाळ या दोहोंविषयीं समभाव ठेवणें म्हणजे ब्राह्मणाला साप चावला असतांना त्याचें विष ज्याप्रमाणें ज्ञानी प्रेमानें चोखून घेऊन त्या ब्राह्मणाला विषबाधेपासून मुक्त करण्याचा प्रयत्न करील, त्याचप्रमाणें चांडाळाबाबत, तशाच परिस्थितींत, वर्तन ठेवील.

ज्यांचें मन समत्वाच्या ठायीं स्थिर झालें आहे, त्यांनीं याच[१] देहांत संसाराला जिंकलें आहे. ब्रह्म निष्कलंक आणि सम आहे. त्यामुळें ते ब्रह्माच्या ठायींच स्थिर राहतात. १९.

---

१ याचि देहीं याचि डोळां। संसारीं होइजे निराळा ॥...दासबोध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३०५ विः निबंध
क्रमांक १२०१ नोंः दिः २२/३/६०

**टीप** : मनुष्य जसें आणि ज्याचें चिंतन करतो, तसा तो होतो. म्हणून समत्वाचें चिंतन करून, निर्दोष होऊन मूर्तिमंत समत्व आणि निर्दोषत्व अशा ब्रह्माला तो गांठतो.

ज्याची बुद्धि स्थिर झाली आहे, ज्याचा मोह नाशातें पावला आहे, जो ब्रह्माला जाणतो आणि ब्रह्मपरायण होत्साता राहतो तो प्रिय आलें असतां सुख मानीत नाहीं आणि अप्रिय आलें असतां दुःख मानीत नाहीं. २०.

बाह्यविषयोपभोगांत ज्याला आसक्ति नाहीं असा पुरुष अंतरांत जो आनंद उपभोगतो तसला आनंद हा (वरील) ब्रह्मपरायण (किंवा ब्रह्मनिष्ठ) पुरुष अक्षय्य अनुभवितो. २१.

**टीप** : जो अंतर्मुख झाला आहे तोच ईश्वरसाक्षात्कार करून घेऊं शकतो आणि त्यालाच परमानंद मिळतो. विषयांपासून पराङ्मुख होऊन कर्म करणें आणि ब्रह्मानंदांत रममाण होणें, या दोन निरनिराळ्या गोष्टी नाहींत, तर एकाच गोष्टीकडे पाहण्याच्या दोन दृष्टी आहेत— एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

विषयजन्य भोग हे निःसंशय दुःखाचें मूळ होत. हे कौन्तेया, त्यांना आरंभ आहे आणि शेवट आहे. शहाणीं माणसें त्यांत रमून जात नाहींत. २२.

शरीर पडण्यापूर्वी जो मनुष्य काम आणि क्रोध यांच्या आवेगांना याच देहांत—याच जन्मांत जिरवून घेण्याची शक्ति मिळवितो, तो समत्वाला पोंचला आहे, तो सुखी होय. २३.

**टीप** : मढयाला ज्याप्रमाणें इच्छा किंवा द्वेष (यांपैकीं कांहीं) असत नाहीं, सुखदुःखें असत नाहींत, त्याचप्रमाणें जिवंत असून सुद्धां मेल्यासमान, जडभरताप्रमाणें, देहातीत राहूं शकतो, त्यानेंच या जगांत जिंकली आणि तोच खरें आत्मसुख (म्हणजे काय चीज आहे तें) जाणतो.

ज्याला अंतरांत आनंद आहे, ज्याच्या अंतरंगांत शांति वास करते, ज्याला अंतर्ज्ञान झालें आहे तो योगी ब्रह्मरूप होऊन ब्रह्मनिर्माण प्राप्त करून घेतो. २४.

ज्यांचें पाप नाश पावलें आहे, ज़्यांच्या शंका, द्वैत इ. नष्ट झालें आहे, ज्यांनीं आपल्या मनावर ताबा मिळविला आहे आणि जे (सदा) प्राणिमात्राच्या कल्याणांतच गर्क झाले आहेत असे ऋषि ब्रह्मनिर्वाण प्राप्त करून घेतात. २५.

जे स्वतःला ओळखतात, ज्यांनीं कामक्रोध जिंकले आहेत, ज्यांनीं मनाला स्वाधीन ठेविलें आहे, अशा यतींना सर्वत्र ब्रह्मनिर्वाणच आहे. २६.

बाहेरच्या विषयभोगांवर बहिष्कार टाकून, दृष्टि भुवयांच्या मधोमध स्थिर करून, नाकपुड्यांच्या द्वारा आंत बाहेर करणाऱ्या प्राण आणि अपान या वायूंची गति सम किंवा एकसारखी राखून, इंद्रियें, मन आणि बुद्धि यांना वश करून, तसेंच इच्छा, भय आणि क्रोध यांनीं रहित होऊन ज़ो मुनि मोक्षपरायण राहतो तो सदा मुक्तच आहे. २७, २८.

**टीप** : प्राणवायु म्हणजे आंतून बाहेर जाणारा वायु आणि अपानवायु म्हणजे बाहेरून आंत जाणारा वायु. या श्लोकांत प्राणायाम इ. यौगिक क्रियांचें समर्थन आहे. प्राणायाम इ. तर बाह्य क्रिया होत आणि त्यांचा परिणाम (अथवा उपयोग) शरीरस्वास्थ्य राखणें आणि त्याला (म्ह. शरीराला) परमात्म्याला राहण्यालायख असें योग्य मंदिर बनविणें, या (दोन) गोष्टींपुरताच आहे. भोगी माणसाकरितां सामान्य व्यायामादिमुळें जें काम भागतें तें योग्याच्या बाबतींत प्राणायामादिमुळें होतें. भोगी करतो त्या व्यायामादिमुळें इंद्रियांना उत्तेजित करण्याचें कामीं मदत होते. शरीर निरोगी आणि सुदृढ बनवून, खेरीज इंद्रियांना शांत राखण्याचे कामीं प्राणायामादि योग्याला मदतनीस होतात.

आजकाल ( स्थिति पाहिली तर ) प्राणायामादि क्रिया फार थोड्या माणसांनाच अवगत आहेत, आणि त्यांतलेहि फारच थोडे त्यांचा सदुपयोग करितात. ज्यानें इंद्रियें, मन आणि बुद्धि यांच्यावर कांहीं नाहीं तरी निदान प्राथमिक विजय मिळविला आहे, ज्यांना मुक्तीची तळमळ आहे आणि ज्यानें रागद्वेषादि जिंकून भय टाकून दिलें आहे, त्याला प्राणायामादि उपयुक्त आणि साहाय्यकर्त्या होतात. अंतःकरणाचें पावित्र्य असल्याशिवाय केलेल्या प्राणायामादि क्रिया बंधनाचें एक साधन बनतात आणि माणसाला मोहरूपी विहिरींत आणखी खोल घेऊन जाण्याचा संभव असतो, असा पुष्कळांचा अनुभव आहे. म्हणून योगशास्त्रकर्त्या पतंजलींनीं यमनियमांना अग्रस्थान देऊन ते पाळणाऱ्यांनाच[१] मोक्षमार्गांत प्राणायामादि साहाय्यकारक होतात, असें मानलें आहे.

यम[२] पांच आहेत : अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह.

नियम[३] पांच आहेत : शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान.

यज्ञ आणि तप यांचा भोक्ता, सर्व लोकांचा महेश्वर आणि प्राणिमात्राचा हितकर्ता, अशा मला जाणून (वर उल्लेखिलेला ) मुनि शांति प्राप्त करून घेतो. २९.

**टीप** : या अध्यायांतील चौदाव्या, पंधराव्या आणि अशाच दुसऱ्या श्लोकांना विरुद्ध जाणारा हा श्लोक आहे, असें कोणी मानूं नये. ईश्वर सर्वशक्तिमान् असल्यामुळें कर्ता–अकर्ता, भोक्ता–अभोक्ता, जें म्हणाल[४] तें तो आहे आणि नाहीं. तो वर्णनातीत आहे. मनुष्याच्या[५] वाणीच्या तो पलीकडे आहे. म्हणून त्याच्यावर परस्परविरोधीही गुण आणि शक्ति यांचा आरोप करून माणसानें त्याचें दर्शन घडावें अशी आशा बाळगिली आहे.

ॐ तत् सत्

---

[१] यो. सू. २-२८ योगाङ्गानुष्ठानादशुद्धिक्षये ज्ञानदीप्तिरा विवेकख्याते :। [२] यो. सू. २-३० अहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमा :। [३] यो. सू. २-३२ शौचसंतोषतपः-स्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमा :। [४] तुका म्हणे जें जें बोलां। तें तें साजे या विठ्ठला ॥ [५] " यतो वाचो निवर्तन्ते...... । " ( तै. उ. २,४,९ )

जें ब्रह्मविद्याहि आहे आणि योगशास्त्रहि आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला, "कर्मसंन्यासयोग" या नांवाचा पांचवा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# ६. ध्यानयोग

या अध्यायांत योग साधण्याचीं म्हणजे समत्वा-
प्रत नेणारीं कांहीं साधनें सांगितलीं आहेत.

: १८ :

**श्रीभगवान म्हणाले :**

कर्मफलाचा आश्रय घेतल्याशिवाय जो मनुष्य विहित कर्म करतो, तो संन्यासीही होय आणि तो योगीही होय. जो अग्नि-होत्राचा आणि ( दुसऱ्या ) कोणत्याही क्रियेचा त्याग करून बसतो तो नव्हे. १.

**टीप** : विहित म्हणजे कर्तव्य म्हणून प्राप्त झालेलें (सत्कर्म). अग्नि म्हणजे कोणतेंही साधन. ज्यावेळीं अग्नीच्या द्वारा होम होत असत त्यावेळीं अग्नीची आवश्यकता होती. संन्यासी होम करूं शकत नव्हते म्हणून त्यांना "निरग्नि" असें म्हणत. या काळांत, समजा कीं चरखा हें सेवेचें साधन आहे तर त्याचा त्याग करण्यानें कांहीं संन्यासी होतां येणार नाहीं.

हे पांडवा, ज्याला संन्यास म्हणतात तो तूं योग जाण. ज्यानें मनांतील संकल्पांचा त्याग केलेला नाहीं, तो कधींही योगी होऊं शकत नाहीं. २.

योग साध्य करणाऱ्यासाठीं कर्म साधन आहे, ज्यानें तो साध्य करून घेतला आहे त्याच्यासाठीं उपशम म्हणजे विरति, शांति हेंच साधन आहे. ३.

**टीप** : ज्याची आत्मशुद्धि झाली आहे, ज्याला समत्व साधलें आहे त्याला आत्मदर्शन हें सोपें आहे. याचा अर्थ असा नाहीं कीं, योगारूढाला लोकसंग्रहार्थ सुद्धां कर्में करण्याची राहात नाहींत. लोकसंग्रहाशिवाय तो

जगूंच शकत नाहीं. म्हणजे सेवाकर्म करणें हें सुद्धां त्याला सहज असतें. तो देखाव्यासाठीं कांहीं करीत नाहीं. अध्याय ३, श्लोक ४ आणि अध्याय ५, श्लोक २ ताडून पहा.

ज्यावेळीं मनुष्य इंद्रियांच्या विषयांत किंवा कर्मांत आसक्त होत नाहीं आणि सर्व संकल्पांचा त्याग करतो, त्यावेळीं त्याला "योगारूढ" असें म्हणतात. ४.

मनुष्यानें आत्म्याच्या द्वारा आत्म्याचा उद्धार करावा; त्याला अधोगतीला नेऊं नये. आत्माच आत्म्याचा बंधु होय; आणि आत्माच आत्म्याचा शत्रु होय. ५.

आत्मा त्याचा बंधु होतो, कीं ज्यानें स्वतःच्या बळावर आपणा स्वतःला जिंकिलें आहे; ज्यानें आपल्या स्वतःला जिंकिलें नाहीं तो स्वतःशीं शत्रुवत् वागतो. ६.

ज्यानें स्वतःचें मन जिंकिलें आहे आणि जो संपूर्णपणें शांत झाला आहे त्याचा आत्मा थंडी-ऊन, सुख-दुःख, मान-अपमान यां-(द्वंद्वा) विषयीं समान वागतो. ७.

ज्ञान आणि अनुभव यांच्यामुळें जो तृप्त झाला आहे, जो अचल आहे, जो जितेन्द्रिय आहे, ज्याला माती, दगड, सोनें समान आहेत, अशा ईश्वरपरायण मनुष्याला योगी म्हणतात. ८.

हितेच्छु[१], मित्र, शत्रु, तटस्थ, मध्यस्थ, नावडता किंवा आवडता या सर्वांच्या बाबतींत, तसेंच साधु आणि पापी या दोघांबाबत जो समान वृत्ति बाळगतो तो योगी श्रेष्ठ होय. ९.

: १९ :

चित्त स्थिर करून, वासना आणि संग्रहबुद्धि यांचा त्याग करून,

---

१ दोनी पक्षांविषयीं सारखाच उदासीन किंवा बेदरकार तो तटस्थ. दोनी पक्षांचें भलें अिच्छिणारा तो मध्यस्थ. का. का.

एकान्तांत एकटे राहून योग्यानें निरंतर आत्म्याचें परमात्म्याशीं अनुसंधान राखावें. १०.

पवित्र ठिकाणीं, फ़ार उंच नाहीं आणि फार सखल नाहीं असें, आणि त्याचप्रमाणें ज्यांत दर्भ, हरणाजिन आणि वस्त्राची घडी, हीं (खालून) एकावर एक घातलीं आहेत असें स्थिर आसन आपल्यासाठीं (तयार) करून त्यावर एकाग्र चित्तानें बसून, इंद्रियें आणि मन आवरून आत्मशुद्धीसाठीं योग साधावा. ११–१२.

स्थिरपणानें शरीर (म्ह. पाठीचा कणा) मान आणि डोकें समरेषेंत (ठेवून) हलूं न देतां, इकडे तिकडे न पाहतां, स्वतःच्या नासिकाग्रावर दृष्टि स्थिर ठेऊन पूर्ण शांतीनें, निर्भय वृत्तीनें, ब्रह्मचारिव्रतानें, मनाला मारून मत्परायण होत्साता योग्यानें माझें ध्यान धरून बसावें. १३–१४.

**टीप:** नासिकाग्र म्हणजे भुवयांमधील भाग (पहा अध्याय ५ श्लोक २७). ब्रह्मचारिव्रत म्हणजे केवळ "वीर्यसंग्रह" एवढेंच नसून ब्रह्माला पोंचण्यासाठीं आवश्यक अशीं अहिंसादि सर्व व्रतें.

याप्रमाणें ज्याचें मन कह्यांत आलें आहे, असा योगी आत्म्याचें परमात्म्याशीं अनुसंधान राखतो आणि मला येऊन मिळण्यांत असलेली मोक्षरूप परम शांति मिळवितो. १५.

हे अर्जुना, हा समत्वरूप योग नाहीं प्राप्त होत खादाडाला, नाहीं प्राप्त होत कडक उपवास करणाऱ्याला; आणि तसाच तो नाहीं मिळत अति झोंपाळू माणसाला अथवा (रात्रीच्या रात्री) जागणाऱ्याला. १६.

जो मनुष्य आहारविहारांत, झोंपण्याजागण्यांत, त्याचप्रमाणें दुसऱ्या कर्मांत प्रमाणशीरपणा पाळतो त्याला दुःखनाश करणारा योग प्राप्त होतो. १७.

चांगल्यापैकीं ताब्यांत आणलेलें चित्त ज्यावेळीं आत्म्याच्या ठायीं स्थिर होऊन राहतें, आणि सर्व कामनांविषयीं मनुष्य निःस्पृह बनतो त्या वेळीं तो " योगी " म्हटला जातो. १८.

आत्म्याला परमात्म्याशीं जोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या, स्थिरचित्त योग्याची अवस्था निर्वातस्थळीं अचल राहणाऱ्या दिव्याप्रमाणें सांगितली आहे. १९.

योगाच्या आचरणानें स्वाधीन झालेलें मन ज्या ठिकाणीं शांत होतें, आत्म्याच्या ठायीं ज्या अवस्थेंत मनुष्य संतोष पावतो; या खेरीज, इंद्रियांच्या पलीकडे असलेलें, (पण) बुद्धीला ग्रहण करण्यास योग्य, अशा अनंत सुखाचा ज्या ठिकाणीं अनुभव येतो; जिथें राहिल्यानें मनुष्य मूळ वस्तू (तत्त्वा) पासून वळत नाहीं, आणि जें मिळाल्यानंतर त्याच्यापेक्षां दुसऱ्या कोणत्याही लाभाला तो अधिक (श्रेष्ठ) मानीत नाहीं; ज्या ठिकाणीं स्थिर राहून मोठ्या संकटांतही डगमगत नाहीं, अशी दुःखसंबंधरहित स्थिति म्हणजेच योगाची अवस्था समजावी. हा योग न कंटाळतां निश्चयानें साध्य करून घेण्याजोगा आहे. २०-२१-२२-२३.

संकल्पांतून उत्पन्न होणाऱ्या सर्व कामनांचा संपूर्णपणें त्याग करून, मनानेंच सर्व इंद्रियांना सगळीकडून चांगल्यापैकीं ताब्यांत आणून, निश्चल बुद्धीनें हळूहळू विरत व्हावें आणि मनाला आत्म्यांत रोवून दुसऱ्या कशाचाही विचार करूं नये. २४–२५.

चंचळ आणि अस्थिर मन जिथें भटकत जातें तिथून तिथून त्याला खेंचून आणून (योग्यानें) आपल्या स्वतःच्या तंत्रांत आणावें. २६.

ज्याचें मन चांगल्या रीतीनें शांत झालें आहे, ज्याचे विकार

शमले आहेत, अशा ब्रह्मरूप झालेल्या निष्कलंक योग्याला खात्रीनें उत्तम सुखाची प्राप्ति होते. २७.

अशा तऱ्हेनें आत्म्याबरोबर सदैव संधान बांधीत, निष्पाप झालेला हा योगी सहजरीत्या ब्रह्मप्राप्तिरूप अनंत, अपार सुखाचा अनुभव घेतो. २८.

सर्व ठिकाणीं समान भाव ठेवणारा योगी स्वतःला भूत-मात्रामध्यें आणि भूतमात्राला स्वतःमध्यें पाहतो. २९.

जो मला सर्व ठिकाणीं पाहतो आणि सर्वांना माझ्या ठायीं पाहतो, तो माझ्या नजरेसमोरून (केव्हांही) हालत नाहीं आणि मी त्याच्या नजरेसमोरून नाहींसा होत नाहीं. ३०.

याप्रमाणें माझ्यांत लीन झालेला जो योगी भूतमात्राच्या ठायीं राहिलेल्या मला भजतो तो सर्व प्रकारें (कर्मांत) वागत असून सुद्धां माझ्या ठिकाणींच राहतो. ३१.

**टीप** : "आपण (स्वतः)" हें जोंपर्यंत बाकी आहे, तोंपर्यंत तर परमात्मा लांबच आहे. "आपण (स्वतः, मी)" ही भावना मिटली–शून्य झाली तरच एकमेव परमात्म्याला सर्व ठिकाणीं पाहूं शकतो. पुढें अध्याय १३ श्लोक २३ वरील टीप पहा.

हे अर्जुना, जो मनुष्य सर्वांना आपल्यासारखें (आत्मवत्) मानतो, मग ती सुखाची अवस्था असो अथवा दुःखाची अवस्था असो, सर्वत्र समान वृत्तीनें पाहतो, तो योगी[१] श्रेष्ठ मानावा. ३२.

---

१ : श्रीशंकराचार्य म्हणतात : कोणाचेंही वाकडें न करणारा हा अहिंसक, समग्र-दर्शननिष्ठ योगी सर्व योग्यांमध्यें श्रेष्ठ होय. (का.का.) "न कस्यचित् प्रतिकूलमाचरति, अहिंसक इत्यर्थः। य एवमहिंसकः सम्यग्दर्शननिष्ठ उत्कृष्टोऽभिप्रेतः सर्वयोगिनां मध्ये॥"

: २० :

**अर्जुन म्हणाला :**

हे मधुसूदना, तुम्ही हा जो समत्वरूप योग सांगितला त्याची स्थिरता मनाच्या चंचळपणामुळें मी पाहूं शकत नाहीं. ३३.

कारण, हे कृष्णा, मन चंचळच आहे, तें फार "बळिकट[१]" असून माणसाला घुसळून काढतें. ज्याप्रमाणें वाऱ्याची मोट बांधणें हें अत्यंत अवघड आहे त्याप्रमाणें मनाला अंकुश लावणें सुद्धां मी फार कठिण मानतों. ३४.

**श्रीभगवान म्हणाले :**

हे महाबाहो, मन चंचळ असल्यामुळें त्याला लगाम लावणें महाकर्म कठिण आहे, यांत शंकाच नाहीं; पण हे कौंतेया, अभ्यास आणि वैराग्य[२] या साधनांनीं तें ताब्यांत ठेवणें शक्य आहे. ३५.

माझें असें मत आहे कीं, ज्याचें मन आपल्या स्वतःच्या ताब्यांत नाहीं त्याला योगसाधना फार कठिण आहे; पण ज्यानें (स्वतःच्या) मनाला ताब्यांत ठेवलें आहे आणि जो प्रयत्नशील आहे त्याला उपाय सांपडून तो आपलें उद्दिष्ट साध्य करून घेऊं शकतो. ३६.

**अर्जुन म्हणाला :**

हे कृष्णा, जो श्रद्धावान तर आहे पण प्रयत्नांत कसूर झाल्यामुळें योगभ्रष्ट झाला आहे त्याला यश न मिळाल्यानें त्याची (मग) काय गति होते ? ३७.

---

१ "ऐसें बळिकटपण आहे। इंद्रियांचें ॥" ज्ञा० २·३१४

२ यो. सू. १-१२ "अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः।"
व्या. भा. "वैराग्येण विषयस्रोतः खिलीक्रियते।
विवेकदर्शनाभ्यासेन विवेकस्रोत उद्घाट्यते।"

हे महाबाहो, योगमार्गांतून च्युत झालेला, ब्रह्ममार्गांत भांबावलेला असा तो पुरुष, इकडे तिकडे विखुरलेल्या सुटचा ढगाप्रमाणें, उभयभ्रष्ट होऊन नाश तर नाहीं पावत ? ३८.

हे कृष्णा, ही माझी शंका तुलाच समूळ दूर केली पाहिजे. तुझ्याशिवाय दुसरा कोणी ती शंका दूर करणारा मिळेल, असें मला वाटत नाहीं. ३९.

**श्रीभगवान म्हणाले :**

हे पार्था, अशा मनुष्याचा नाश नाहीं होत या लोकांत कीं नाहीं परलोकांत. कल्याणमार्गानें[१] जाणाऱ्यास हे बापा ! कधींही दुर्गति प्राप्त होत नाहीं. ४०.

पुण्यवान लोक ज्या लोकांत जातात त्या ठिकाणीं पोंचून तेथें तो दीर्घकाळपर्यन्त राहतो आणि नंतर तो योगभ्रष्ट पुरुष पवित्र आणि साधनवंतांच्या घरीं जन्म घेतो. ४१.

किंवा ज्ञानवान योग्यांच्याच कुळांत तो जन्मतो. जगांत अशा प्रकारचा जन्म निःसंशयच दुर्मिळ होय. ४२.

हे कुरुनंदना, तेथें त्याला पूर्वजन्मींचा बुद्धिसंस्कार प्राप्त होतो आणि तेथून पुढें तो मोक्षमार्गांत प्रगति करूं लागतो. ४३.

त्याच पूर्वींच्या अभ्यासाच्या जोरावर तो अवश्य योगाकडे खेंचला जातो. योगाचा केवळ जिज्ञासु सुद्धां सकाम वैदिक कर्म करणाऱ्याच्या स्थितीला पार ओलांडून जातो. ४४.

शिवाय चिकाटीपूर्वक खटपट करणारा योगी पापांतून सुटका करून घेतो आणि अनेक जन्मांनंतर विशुद्ध होत्साता परम गतीप्रत जातो. ४५.

---

१ बृ. उ. ३-२-१३ "पुण्यो वै पुण्येन कर्मणा भवति।"

तपस्व्यापेक्षां योगी वरचढ आहे; ज्ञान्यापेक्षां सुद्धां त्याची योग्यता मोठी मानली आहे; तसेंच कर्मठापेक्षां ( तर ) तो अधिक आहे(च). म्हणून हे अर्जुना, तूं योगी हो. ४६.

**टीप** : येथें तपस्व्याची तपश्चर्या ही कामनायुक्त समजायची, आणि ज्ञानी म्हणजे अनुभवज्ञानी घ्यायचा नाहीं.

सर्व योग्यांमध्यें देखील माझ्या ठायीं मन रोवून जो मला श्रद्धापूर्वक भजतो तो सर्वश्रेष्ठ योगी होय, असें मी मानतों. ४७.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याहि आहे आणि योगशास्त्रहि आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला "ध्यानयोग" या नांवाचा सहावा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# ७. ज्ञानविज्ञानयोग

*या अध्यायांत ईश्वरतत्व आणि ईश्वरभक्ति म्हणजे काय तें समजावून देण्यास सुरवात केली आहे.*

**श्रीभगवान म्हणाले :**

हे पार्था, माझ्या ठायीं मन लावून, तसेंच माझा आसरा घेऊन योगसाधन करीत असतां निश्चितपणें आणि संपूर्णपणें मला तूं कसें जाणशील, तें ऐक. १.

अनुभवासहित असें हें ज्ञान मी तुला पूर्णतया सांगेन. तें जाणल्यानंतर या लोकांत फिरून कांहीं जाणण्याजोगें ( शिल्लक ) राहात नाहीं. २.

हजारों माणसांतून कोणी एखादाच सिद्धी (मिळविण्या) साठीं खटपट करीत असतो. धडपडणाऱ्या या सिद्धांतून सुद्धां एखादाच मला वास्तविक स्वरूपांत ओळखतो. ३.

पृथ्वी, आप, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि आणि अहंकार अशी आठ प्रकारची माझी प्रकृति आहे. ४.

**टीप** : या आठ तत्त्वांचें मिळून जें स्वरूप (किंवा गांठोडें) तें क्षेत्र अथवा क्षर पुरुष. अध्याय १३, श्लोक ५ आणि अध्याय १५ श्लोक १६ पहा.

ही सांगितली ती अपरा प्रकृति. तिच्यापेक्षांही वर ( श्रेष्ठ ) असलेली जीवरूप परा प्रकृति होय. हे महाबाहो, हें जग तिच्या आधारावर टिकून राहिलें आहे. ५.

भूतमात्रांच्या उत्पत्तीचें कारण या दोन्ही प्रकृती आहेत, असें तूं जाण. सर्व जगाच्या उत्पत्तीचें आणि संहाराचें कारण मी आहे. ६.

हे धनंजया, माझ्यापेक्षां पलीकडे असें दुसरें कांहीं नाहीं. ज्याप्रमाणें सुताच्या धाग्यांत मणि ओंवलेले असतात त्याप्रमाणें हें सर्व (विश्व) माझ्यांत ओंवलेलें आहे. ७.

हे कौंतेया, पाण्यांत मी रस आहे; सूर्यचंद्रांआंतली प्रभा मी आहे; आकाशांतील शब्द[१] मी आहे; आणि नरांमधील पराक्रम मी आहे. ८.

पृथ्वींतील सुगंध मी आहे; अग्नींतील तेज मी आहे; प्राणिमात्रांतील जीवन (सूत्र) मी आहे; तपस्व्यांतील तप मी आहे. ९.

हे पार्था, सर्व जीवांचें सनातन बीज (असें) मला जाण; बुद्धिमंतांची बुद्धि मी आहे; तेजस्व्यांमधील तेज मी आहे. १०.

काम आणि राग (आसक्ति) यांनीं विरहित असें, बळवानांचें बळ मी आहे; आणि हे भरतर्षभा! प्राण्यांमधील धर्माला अविरोधी असा काम मी आहे. ११.

जे जे सात्त्विक, राजस आणि तामस भाव म्हणजेच पदार्थ आहेत ते माझ्यापासून उत्पन्न झाले आहेत, असें जाण. पण मी त्यांच्यामध्यें आहे, असें नाहीं; ते (मात्र) माझ्यामध्यें आहेत. १२.

**टीप :** या भावांवर परमात्मा अवलंबून नसतो. पण ते भाव (मात्र) परमात्म्यावर निर्भर आहेत. ते त्याच्या आधारावर राहतात आणि त्याच्या अधीन असतात.

: २२ :

या त्रिगुणात्मक भावांनीं हें अखिल जग मोहित झालें आहे, आणि म्हणून, त्याच्यापेक्षां उंच आणि वेगळ्या, व अविनाशी अशा मला तें जाणत नाहीं. १३.

---

[१] न्यायशास्त्रांतील "शब्दगुणमाकाशम्", "गन्धवती पृथिवी" इ. व्याख्या प्रसिद्ध आहेत.

ही माझी त्रिगुणात्मक दैवी म्हणजेच अद्भुत माया तरून जाणें मुष्किल आहे. परंतु जे माझ्याच कासेस लागले आहेत ते ही माया तरून जातात. १४.

दुराचारी, मूर्ख, नीच माणसें मला शरण येत नाहींत. ते आसुरी भावांनीं युक्त असतात; आणि मायेनें त्यांचें ज्ञान हिरावून घेतलेलें असतें. १५.

हे अर्जुना, चार प्रकारचीं सदाचारी माणसें मला भजतात: दुःखी, जिज्ञासु, कांहीं मिळावें अशी इच्छा बाळगणारे हितार्थी आणि ज्ञानी. १६.

त्यांच्यांतही नित्य समतावान आणि एकटचा मलाच भजणारा असा जो ज्ञानी तो श्रेष्ठ होय. मी ज्ञान्याला अत्यंत प्रिय आहे आणि ज्ञानी मला प्रिय आहे. १७.

ही सर्वच भक्तमंडळी चांगली आहे; पण त्यांतही ज्ञानी तर माझा आत्माच आहे, असें माझें मत आहे. कारण, माझी प्राप्ति करून घेण्यापेक्षां दुसरें अधिक चांगलें प्राप्तव्य नाहींच असें जाणल्या-मुळें तो योगी माझाच आश्रय घेतो. १८.

हें सर्व ( विश्व ) वासुदेवच आहे असें 'बहुतां जन्मांच्या' शेवटीं ओळखून ज्ञानी पुरुष मला शरण येतात. असा महात्मा विरळाच होय. १९.

निरनिराळचा कामनांच्या योगानें ज्यांचें ज्ञान हिरावलेलें आहे असे लोक आपल्या स्वभावाला वश होऊन निरनिराळचा विधि-विधानांचा आसरा घेऊन दुसऱ्या देवतांना शरण जातात. २०.

जीं जीं माणसें ज्या ज्या (देवता-) स्वरूपाला भजूं चाहतात त्या त्या स्वरूपांच्या ( मूर्तींच्या ) ठायीं त्यांची ती श्रद्धा मी दृढ करीत असतों. २१.

अशा श्रद्धेच्या बळावर त्या त्या स्वरूपाची ते आराधना (उपासना) करितात आणि त्यांच्या द्वारा मींच निर्मिलेल्या आणि त्यांनीं इच्छिलेल्या कामना ते पूर्ण करून घेतात. २२.

पण त्या अल्पमति लोकांना जें फळ मिळतें तें नाशवंत असतें. देवांना भजणारे देवांप्रत जातात. मला भजणारे मला पावतात. २३.

माझ्या परम, अविनाशी आणि निरुपम स्वरूपाला न जाणणारे बुद्धिहीन लोक इंद्रियांना गोचर नसणाऱ्या मला " मी इंद्रियगम्य झालों " असें मानतात. २४.

माझ्या योगमायेनें झांकलेला असल्यामुळें मी सर्वांना प्रकट ( किंवा उघड ) नाहीं. हें मूढ जग जन्म आणि मृत्यु यांनीं रहित अशा मला खऱ्या अर्थानें जाणत नाहीं. २५.

**टीप** : या दृश्य जगाला निर्माण करण्याची शक्ति बाळगीत असून सुद्धां (त्यापासून) अलिप्त असल्याकारणानें परमात्म्याचें अदृश्य राहणें ही त्याची योगमाया.

हे अर्जुना, होऊन गेलेल्या, असणाऱ्या आणि ( उत्पन्न ) होणाऱ्या सर्व भूतांना मी जाणतों, परंतु मला कोणी जाणत नाहींत. २६.

: २३ :

हे परंतप भारता, इच्छा आणि द्वेष या(जोडी)पासून उत्पन्न झालेल्या सुखदुःखादि द्वंद्वांच्या मोहानें प्राणिमात्र या जगांत मायाजालांत अडकलेले राहतात. २७.

याउलट सदाचारी असल्याकारणानें ज्या लोकांच्या पापांचा शेवट झाला आहे आणि जे द्वंद्वांच्या मोहांतून सुटले आहेत असे दृढव्रती ( लोक ) माझें भजन करितात. २८.

जे माझा आश्रय घेऊन म्हातारपण आणि मरण यांतून

सुटण्याची धडपड करतात, ते पूर्णब्रह्माला, अध्यात्माला आणि अखिल कर्माला जाणतात. २९.

अधिभूत, अधिदैव, आणि अधियज्ञ इ. नीं युक्त अशा मला ज्यांनीं ओळखलें आहे असे (ते) समत्व पावलेले लोक मरण-समयीं देखील माझें भान राखतात. ३०.

**टीप** : अधिभूत इ. चा अर्थ आठव्या अध्यायांत (आरंभींच) आला आहे. या श्लोकाचा मथितार्थ एवढाच कीं, या जगांत ईश्वराशिवाय दुसरें कांहीं नाहीं आणि सर्व कर्मांचा कर्ता-भोक्ता तोच आहे असें समजून जे मरणसमयीं शांत राहून ईश्वरांतच तल्लीन असतात आणि कोणतीही वासना त्यासमयीं ज्यांना असत नाहीं, त्यांनीं ईश्वराला ओळखलें आहे आणि ते मोक्षाला पोंचले आहेत.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुन-संवादांत आलेला 'ज्ञानविज्ञानयोग' या नांवाचा सातवा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# ८. अक्षरब्रह्मयोग

*या अध्यायांत ईश्वरतत्त्वांसंबंधीं*
*विशेष ओळख करून दिली आहे.*

: २४ :

**अर्जुन म्हणाला :**

हे पुरुषोत्तमा, या ब्रह्माचें स्वरूप काय आहे ? अध्यात्म म्हणजे काय ? कर्म म्हणजे काय ? अधिभूत कशाला म्हणतात ? अधिदैव म्हणजे काय ? १.

हे मधुसूदना, या देहाच्या संबंधांत अधियज्ञ म्हणजे काय आणि तो कोणत्या प्रकारें असतो ? आणि संयमी (पुरुष) तुम्हांला अंतकाळीं कसें जाणूं शकतात ? २.

**श्रीभगवान म्हणाले :**

जें सर्वोत्तम अविनाशी आहे तें ब्रह्म; प्राणिमात्राचे ठायीं जें स्वसत्तेनें राहतें तें अध्यात्म; आणि प्राणिमात्राला उत्पन्न करणारा सृष्टिव्यापार तें कर्म, असें म्हणतात. ३.

अधिभूत हें माझें नाशवंत स्वरूप होय. अधिदैव म्हणजे त्याच्या ठिकाणीं असलेलें माझें जीवस्वरूप होय. आणि हे मनुष्य-श्रेष्ठा, अधियज्ञ हें देहाच्या ठिकाणीं असलेलें, पण यज्ञाच्या द्वारा शुद्ध झालेलें जीवस्वरूप होय. ४.

**टीप** : तात्पर्य, अव्यक्त ब्रह्मापासून प्रारंभ करून ते थेट दृश्य नाशवंत पदार्थमात्रापर्यंत परमात्माच आहे आणि सर्व त्याचीच करणी आहे. तर मग मनुष्यानें "आपण कर्ता" हा अभिमान बाळगण्याऐवजीं परमेश्वराचा दास बनून सर्व त्याला समर्पण कां करूं नये ?

अंतकाळीं माझेंच स्मरण करीत करीत जो कोणी देह सोडतो तो माझ्या स्वरूपाप्रत पावतो, यांत कसलाहि संशय नाहीं. ५.

अथवा (फार काय सांगावें) हे कौंतेया, मनुष्य ज्या ज्या स्वरूपाचें ध्यान धरितो आणि त्या त्या स्वरूपाचें अंतकाळीं सुद्धां स्मरण करीत देह सोडतो, नेहमीं त्याच भावनेनें भावित म्हणजे पुष्ट झाल्यामुळें, तो त्या त्या स्वरूपाला जाऊन पोंचतो. ६.

एवढ्याकरितां हमेशा माझें स्मरण कर आणि (कर्मक्षेत्रांत) झुंजत रहा; याप्रमाणें माझ्या ठायीं मन आणि बुद्धि ठेवल्यामुळें तूं मला अवश्य पावशील. ७.

हे पार्था, अभ्यासाच्या साहाय्यानें चित्ताला स्थिर करून, दुसरीकडे कोठेंही त्याला धावूं न देतां जो एकचित्त होतो तो दिव्य अशा परम पुरुषाला पावतो. ८.

जो मनुष्य अंतकाळीं निश्चळ मनानें, भक्तीनें भिनलेला होऊन, योगसामर्थ्यानें भुवयांच्या मध्यें चांगल्या रीतीनें प्राण स्थापित करून सर्वज्ञ, पुरातन, नियंता, सूक्ष्मतम, सर्वांचा पालनकर्ता, अचिंत्य, सूर्याप्रमाणें तेजस्वी, अज्ञानरूपी अंधाराच्या पलीकडे असलेला—अशा स्वरूपाचें योग्य प्रकारें स्मरण करितो, तो दिव्य परम पुरुषाला पावतो. ९–१०.

वेद जाणणारे ज्याचें "अक्षर" या नांवानें वर्णन करितात, ज्यांत वैराग्यशील मुनि प्रवेश करितात आणि ज्याच्या प्राप्तीच्या लालसेनें लोक ब्रह्मचर्याचें पालन करितात त्या पदाचें मी (आतां) तुला थोडक्यांत वर्णन करीन. ११.

इंद्रियांचीं सर्व कवाडें लावून, मनाला हृदयांत स्थिर करून, मस्तकीं प्राण धारण करून, समाधिस्थ होऊन "ॐ" या एकाक्षरी

ब्रह्माचें उच्चारण करीत आणि माझें चिंतन करीत जो मनुष्य देह सोडतो तो परम गतीला पोंचतो. १२–१३.

हे पार्था, दुसऱ्या कुठेंही चित्त न ठेवतां जो नित्य आणि निरंतर माझेंच स्मरण करितो तो नित्ययुक्त योगी मला सहजरीत्या येऊन मिळतो. १४.

मला पावून परम गतीला पोहोंचलेले महात्मे दुःखाचें घर अशा, अशाश्वत पुनर्जन्माला प्राप्त करून घेत नाहींत. १५.

: २५ :

हे कौंतेया, ब्रह्मलोकापासून प्रारंभ करून पुढचे सर्व लोक फिरून फिरून येणारे आहेत. परंतु माझी प्राप्ति झाल्यानंतर मनुष्याला फिरून जन्म नाहीं. १६.

हजार युगांपर्यंतचा ब्रह्मदेवाचा एक दिवस आणि हजार युगांपर्यंतची ब्रह्मदेवाची एक रात्र जे जाणतात त्यांना "अहोरात्रवेत्ते" म्हणजे रात्रदिवस जाणणारे असें म्हणतात. १७.

**टीप** : मतलब हा कीं आपली चोवीस तासांची एक दिवसरात्र ही कालचक्राच्या गणनेंत एका क्षणापेक्षांही सूक्ष्म आहे. तिची कांहींच खिजगणती नाहीं. म्हणून तेवढ्या (क्षणिक) काळांत मिळणारे भोग [१]गगनौल्यांप्रमाणें (आकाशपुष्प किंवा खपुष्प) आहेत असें मानून आपण त्यांविषयीं उदासीन राहावें, आणि तेवढाच जो काळ आपणापाशीं आहे तो भगवद्भक्तींत, सेवाकार्यांत घालवून सार्थकीं लावावा; त्याचप्रमाणें आजच्या आज आत्म्याचें दर्शन झालें नाहीं तरी धीर धरावा.

(ब्रह्मदेवाचा) दिवस उजाडल्यावर सर्व भूतें अव्यक्तांतून (बाहेर पडून) व्यक्त होतात आणि रात्र पडल्यावर त्यांचा प्रलय

[१] "कायि बहू सांगों ऐसे। ते आसुरप्रकृति पीसे। तुरंबित असोसें। गगनौलेयां॥" ज्ञा० १६-३६१.

होतो, म्हणजे तीं ( पुनः ) अव्यक्तांत लय पावतात. १८.

**टीप** : एवढें जाणून सुद्धां मनुष्यानें समजावें कीं त्याच्या हातांत फार थोडी सत्ता आहे. उत्पत्ति आणि नाश यांची जोडी एकमेकांबरोबर सतत वाटचाल करीतच आहे.

हे पार्था, प्राणिमात्रांचा हा समुदाय याप्रमाणें वरचेवर निर्माण होतो आणि रात्र पडतांक्षणीं त्याचें कांहीं न चालतां लयाला जातो, आणि दिवस उगवतांक्षणीं विवश होत्साता उत्पन्न होतो. १९.

या अव्यक्तापलीकडे असाच दुसरा सनातन अव्यक्तभाव आहे; सर्व प्राण्यांचा ( भूतांचा ) नाश होत असतांना सुद्धां हा सनातन अव्यक्तभाव कधींही नाश पावत नाहीं. २०.

ज्याला अव्यक्त, अक्षर ( अविनाशी ) म्हणतात त्यालाच परम गति असें सुद्धां म्हणतात. जेथें पोंचल्यानंतर लोकांना पुनर्जन्म नाहीं, असें तें माझें परम धाम होय. २१.

हे पार्था, भूतमात्र ज्याच्या ठायीं राहिलें आहे आणि हें सर्व ज्यानें व्यापलें आहे, त्या पुरुषोत्तमाचें दर्शन अनन्यभक्तीच्या द्वारा होतें. २२.

: २६ :

ज्याकाळीं मरण आलें असतां योगी मोक्षाप्रत जातात आणि ज्याकाळीं मरण आलें असतां त्यांना पुनर्जन्म प्राप्त होतो, ते ( दोन्ही ) काळ, हे भरतर्षभा, मी तुला सांगतों. २३.

उत्तरायणाचे सहा महिने चालू असतांना, शुक्लपक्षांत, दिवसां, ज्यावेळीं अग्नीची ज्वाळा चालू राहिली असेल त्यावेळीं, ज्याला मरण येईल तो ब्रह्माला जाणणारा होऊन ब्रह्माप्रत जातो. २४.

दक्षिणायनाच्या सहामाहीच्या दरम्यान, कृष्णपक्षांत ( किंवा

वद्यपक्षांत ), रात्रीच्या वेळीं, ज्यावेळीं धूर सर्वत्र फैलावतो अशा वेळीं मरणारा चंद्रलोकाला जाऊन परत जन्म पावतो. २५.

**टीप :** वरील दोन श्लोक मला चांगले समजले नाहींत. त्यांचा शब्दार्थ गीतेच्या शिकवणींत बसेल (शिकवणीला अनुकूल असेल), असा नाहीं. त्या शिकवणीप्रमाणें तर जो भक्तीनें भरलेला असेल, जो सेवा-मार्गानें जात आहे आणि ज्याला ज्ञान झालें आहे तो कोणत्याही वेळीं मरण पावला तरी त्याला मोक्ष हा ठेवलेलाच आहे. या शिकवणीशीं या श्लोकांचा [१]शब्दार्थ विरुद्ध जातो.

त्यांचा भावार्थ हा निघेल खरा कीं जो यज्ञ करतो म्हणजे परोप-कारांतच आपलें सगळें आयुष्य वेंचतो, ज्याला ज्ञान झालें आहे, जो ब्रह्मवेत्ता म्हणजे ज्ञानी आहे तो, अंतकाळीं सुद्धां त्याची अशी स्थिति टिकेल तर, मोक्ष पावतो. याच्या उलट जो यज्ञ करीत नाहीं, ज्याला ज्ञान (झालें) नाहीं, ज्याला भक्ति कशाशीं खातात हें ठाऊक नाहीं, तो चंद्रलोकांत म्हणजे क्षणभंगुर लोकांत जाऊन परत या भवचक्रांत फिरूं लागतो. चंद्र हा स्वयंप्रकाशित नाहीं.

जगांत प्रकाशमय आणि अंधारमय म्हणजे ज्ञानमय आणि अज्ञानमय, असे दोन पूर्वापार चालत आलेले मार्ग मानले आहेत. त्यांपैकीं एकानें म्हणजे ज्ञानाच्या मार्गानें मनुष्य मोक्षाला जाऊन पोंचतो आणि दुसऱ्यानें म्हणजे अज्ञानाच्या वाटेनें तो वरचेवर पुनर्जन्म पावतो. २६.

हे पार्था, हे दोन्ही मार्ग जाणणारा कोणीही योगी मोहांत

---

[१] ज्ञानदेवानें गीतेचा शब्दार्थ बाजूला सारून भावार्थ घेतला आहे :—
"देह जाउनु वस्तु होआवें । मार्गें कीं ॥२४५॥
तरि आतां देह असो अथवा जाओ । आम्ही तंव वस्तू चि केवल आहों ।... ॥२४६॥
मग मार्ग ते काइसेया शोधावे । कवणें कोठूनि कें जावें ।
जरि देशकालादि आघवें । आपणपां चि असिजे ॥२५०॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३०६ विः निबंध
क्रमांक १२०९ नोंः दिः २२।३।५०

पडत नाहीं. म्हणून हे अर्जुना, सर्वकाळीं तूं योगानें जोडलेला असा रहा. २७.

**टीप** : दोन्ही मार्ग जाणणारा आणि समभाव राखणारा योगी अंधाराच्या–अज्ञानाच्या–वाटेनें जाणारच नाहीं, हा मोहांत न पडण्याचा अर्थ आहे.

ही गोष्ट जाणल्यानंतर वेदांत, यज्ञांत, तपांत आणि दानांत जें पुण्यफल सांगितलें आहे, तें सर्व ओलांडून योगी उत्तम असें जें आद्य स्थान तें प्राप्त करून घेतो. २८.

**टीप** : म्हणजे ज्यानें ज्ञान, भक्ति आणि सेवाकर्म यांच्या योगें समत्व मिळविलें आहे, त्याला सर्व पुण्यकर्मांचें[१] फळ मिळून चुकलें इतकेंच नाहीं तर त्याला परम मोक्षपद मिळतें.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला "अक्षरब्रह्मयोग" या नांवाचा आठवा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

---

[१] महाभाष्यकार पतंजलीनें ( इ. स. पूर्व १५० ) व्याकरणशास्त्रासंबंधीं समान विचार मांडला आहे :—" सर्ववेदपुण्यफलावाप्तिश्चास्य ( अक्षरसमाम्नायस्य वाक्समाम्नायस्य... ब्रह्मराशेः) ज्ञाने भवति । मातापितरौ चास्य स्वर्गे लोके महीयेते ॥ ( अध्याय १ पाद १ आह्निक २ – समारोप )

# ९. राजविद्याराजगुह्ययोग

यांत भक्तीचा महिमा गायिला आहे.

: २७ :

**श्रीभगवान म्हणाले :**

तूं द्वेषरहित असल्यामुळें तुला मी गुह्यांतलें गुह्य असें अनुभवयुक्त ज्ञान देईन; तें जाणल्यानें अकल्याणांतून तूं वांचशील (म्हणजे तुझें कल्याण होईल.) १.

सर्व विद्यांमध्यें हें राजा आहे, गूढ वस्तूंमध्येंही हें श्रेष्ठ आहे. ही विद्या पवित्र आहे, उत्तम आहे, प्रत्यक्ष अनुभवाला येण्याजोगी आणि धर्माला अनुकूल अशी आहे. तसेंच आचरण करण्यास सोपी आणि अविनाशी आहे. २.

हे परंतपा, या धर्माविषयीं ज्यांना श्रद्धा नाहीं असे लोक मला न पावतां या मृत्युमय संसारमार्गावर वरचेवर रखडत असतात. ३.

मींच माझ्या अव्यक्त स्वरूपानें हें अखिल जग व्यापिलें आहे. माझ्या ठायीं – माझ्या आधारानें — सर्व प्राणी राहतात; मी त्यांच्या आधारानें रहात नाहीं. ४.

असें असलें तरी प्राणी माझ्यांत रहात नाहींत, असें देखील म्हणतां येईल. हें माझें योगसामर्थ्य तूं पहा. मी जीवांचें भरणपोषण करणारा आहे, तथापि मी त्यांच्या मध्यें नाहीं. पण मी त्यांचें उत्पत्तिकारण आहे. ५.

**टीप** : माझ्या ठायीं जीवमात्र आहे आणि नाहीं. त्यांच्यांत मी आहे आणि नाहीं. हें आहे ईश्वराचें योगसामर्थ्य, त्याची माया, त्याचा चमत्कार. ईश्वराचें वर्णन भगवंतांना देखील माणसांच्या भाषेंतच करणें

भाग होतें, म्हणून अनेक प्रकारचे भाषाप्रयोग करून त्याला संतोषवितात. सर्व (कांहीं) ईश्वरमय आहे, म्हणून सर्व त्याच्या ठायीं आहे. तो अलिप्त आहे, प्राकृत (सामान्य) कर्ता नाहीं, यास्तव त्याच्यांत जीव रहात नाहींत असें म्हणतां येईल. पण जे त्याचे भक्त आहेत त्यांच्यांत तो आहेच. जें नास्तिक (अभक्त) आहेत, त्यांच्या मध्यें त्यांच्या दृष्टीनें तर तो नाहींच. आणि हा त्याचा चमत्कार म्हणायचा नाहीं तर त्याला दुसरें काय म्हणावयाचें ?

ज्याप्रमाणें सर्व ठिकाणीं संचार करणारा महान् वारा नेहमींच आकाशाच्या ठिकाणीं राहिलेला असतो, त्याप्रमाणें सर्व प्राणी माझ्या ठायींच राहतात, असें समज. ६.

हे कौंतेया, सर्व प्राणी कल्पाच्या शेवटीं माझ्या प्रकृतींत लय पावतात, कल्पाला पुनः सुरवात झाली म्हणजे मी त्यांना पुनः निर्मितों. ७.

प्रकृतीच्या ताब्यांत असल्याकारणानें पराधीन अशा या तमाम प्राणिसमुदायाला, माझ्याच या मायेला — प्रकृतीला – हातांत घेऊन, मी पुनः पुनः उत्पन्न करितों. ८.

हे धनंजया, हीं कर्में मला बंधन करणारीं होत नाहींत, कारण मी त्यांच्याबाबत उदासीना(तटस्था)प्रमाणें आणि आसक्ति सोडून वागत असतों. ९.

माझ्या देखरेखीखालीं प्रकृति स्थावर आणि जंगम अशा जगाला निर्माण करिते आणि या कारणास्तव हे कौंतेया, जग (रहाटगाडग्याप्रमाणें) एकसारखें फिरत राहातें. १०.

प्राणीआदि सर्व भूतांचा महेश्वररूप असा जो माझा श्रेष्ठ भाव तो न जाणतां मूर्ख लोक मनुष्यरूप धारण केलेल्या माझी अवहेलना करितात. ११.

**टीप** : जे ईश्वराच्या सत्तेला मानीत नाहींत ते देहांत राहणाऱ्या

अंतर्यामीला ओळखत नाहींत, आणि त्याच्या अस्तित्वाचा इनकार करून जडवादी राहतात.

मोहांत घालणाऱ्या राक्षसी किंवा आसुरी प्रकृतीचा आसरा घेऊन राहिलेले हे उलटया बुद्धीचे लोक,—त्यांच्या आशा, त्यांचीं कर्में, तसेंच त्यांचें ज्ञान, हें सर्व कांहीं फुकट जातें. १२.

याच्या उलट हे पार्था, भूतमात्रांचें उगमस्थान आणि विनाशरहित अशा मला जाणून महात्मे लोक दैवी प्रकृतीचा आश्रय घेऊन एकनिष्ठपणानें मला भजतात. १३.

दृढनिश्चयानें झटणारे ते लोक माझें निरंतर कीर्तन करितात, मला भक्तिपूर्वक नमस्कार करितात, आणि नेहमीं ध्यानस्थ राहून माझी उपासना करितात. १४.

(याखेरीज) दुसरे कित्येक लोक अद्वैतरूपानें, द्वैतरूपानें किंवा बहुरूपानें सर्वत्र राहिलेल्या माझी, ज्ञानयज्ञाच्या द्वारा, उपासना करितात. १५.

(अशा) यज्ञाचा संकल्प मी आहें, यज्ञ मी आहे, यज्ञद्वारा पितरांचा आधार मी आहे, यज्ञाची वनस्पति (सोम) मी आहे, मंत्र मी आहे, घृताची आहुति मी आहे, अग्नि मी आहे आणि हवनद्रव्य मी आहे. १६.

या जगताचा पिता मी, माता मी, जगाला धारण करणारा मी, मी पितामह (आजोबा), जाणण्याजोगी पवित्र (वस्तु) मी, ओंकार मी; ऋग्वेद, सामवेद आणि यजुर्वेद सुद्धां (त्रयी विद्या) मीच आहे. १७.

(सर्वांचें) निर्वाणीचें स्थान मी, पोषण करणारा मी, सत्ता गाजविणारा मी; साक्षी, निवास, आणि आश्रय मी आहे; मी (सर्वांचें) हित इच्छिणारा आहे; उत्पत्ति आणि स्थिति मी आहे;

भांडार आणि अव्यय बीज देखील मीच आहे. १८.

ऊन्ह मीच पाडत असतों, पावसाला मीच रोखून धरतों आणि मीच (नंतर) पडूं देतों. अमृत आणि मृत्यु, दोन्ही मीच आहे, आणि हे अर्जुना, सत् आणि असत् सुद्धां मीच आहे. १९.

: २९ :

तीन वेदांत सांगितलेलीं कर्में करून सोमरसाचें पान करून पापरहित झालेलीं माणसें यज्ञाच्या द्वारा माझी पूजा करून स्वर्ग-लोकाची मागणी करितात. आणि पुण्येंकरून मिळालेल्या इंद्र-लोकास पोंचून ते स्वर्गांतील दिव्य भोग भोगतात. २०.

**टीप** : सर्व वैदिक कर्में फलप्राप्तीच्या उद्देशानें केलीं जात असत आणि त्यांच्यापैकीं कित्येक कर्मांचें अंगभूत म्हणून सोमपान होत असे, या गोष्टीचा येथें उल्लेख आला आहे. या क्रिया कोणत्या होत्या आणि सोमरस काय होता, या गोष्टी आज वस्तुतः (म्हणजे नक्की) कोणी सांगूं[१] शकत नाहीं.

तो विशाल स्वर्गलोक भोगल्यानंतर, पुण्य संपतांक्षणीं ते फिरून मृत्युलोकांत प्रवेश करितात. याप्रमाणें तीन वेदांत सांगितलेलीं कर्में करणाऱ्या फलेच्छूंना जन्ममरणाच्या या फेऱ्यांत गिरक्या खाव्या लागतात. २१.

जे लोक अनन्यभावानें माझें (सतत) चिंतन करीत माझी भक्ति करितात, त्या नित्य माझ्या ठायींच रममाण झालेल्यांच्या योगक्षेमाचा भार मी उचलतों. २२.

---

१ हें म्हणणें आजहि बरोबर आहे. "मूजवत्" पर्वतावर "सोम" मिळत असे असें ऋ. १०-३४-१ "सोमस्येव मौजवतस्य भक्षः" यावरून दिसतें. पारशी लोकांचा "हओम" तो हाच; त्याचाही निश्चय नाहीं. विद्वानांत अनेक मतें आहेत : कोणी "द्राक्षारस" म्हणतो, कोणी "इक्षुरस" म्हणतो इत्यादि.

टीप : याप्रमाणें योग्याला ओळखण्याच्या तीन सुंदर खुणा आहेत :– समत्व, कर्मांत कौशल्य, अनन्यभक्ति. या तिन्ही खुणा एकमेकांत ओतप्रोत (किंवा अनुस्यूत) असल्या पाहिजेत. भक्तीविना समत्व मिळणार नाहीं, समत्वाशिवाय भक्ति सांपडणार नाहीं, आणि कर्मकौशल्याखेरीज भक्ति आणि समत्व हीं (दोन्हीं) आभासमात्र असण्याचें भय आहे.

योग[१] म्हणजे न मिळालेली वस्तु मिळविणें आणि क्षेम म्हणजे मिळालेली संभाळून ठेवणें.

शिवाय हे कौंतेया, जे श्रद्धापूर्वक इतर देवतांना भजतात, ते सुद्धां, विधिवीण कां असेना, पण मलाच भजतात. २३.

टीप : विधिवीण म्हणजे अज्ञानानें; मी जो निरंजन, निराकार आहे त्याला न ओळखतां.

मी च सर्व यज्ञांचा भोक्ता, स्वामी आहे. पण माझ्या या खऱ्या स्वरूपांत माझें ज्ञान न झाल्यामुळें ते च्युत होतात ( खालीं पडतात ). २४.

देवतांचें पूजन करणारे देवलोकाला पावतात, पितरांचें पूजन करणारे पितृलोकाला जातात, भुतांखेतांची पूजा करणारे भूतगणांचा लोक प्राप्त करून घेतात; आणि मला भजणारे मला येऊन मिळतात. २५.

: ३० :

पत्र, फूल, फळ किंवा जळ जो कोणी मला भक्तिपूर्वक अर्पण

---

१ अप्राप्तस्य प्रापणं योगः, प्राप्तस्य परिरक्षणं क्षेमः, गी. २·४५ :– "निर्योगक्षेमः" यांत हीच कल्पना निराळ्या शब्दानें व्यक्त केली आहे. ऋग्वेदांत "क्षेम" शब्द आधीं येतो; "योग" मागाहून येतो; उदाहरणार्थ ऋ. ५·३७·५ पहा : "पुष्यात् क्षेमे अभि योगे भवाति" योग = प्रवृत्ति; क्षेम = विश्रांति ( निवृत्ति ).

करितो, त्या प्रयत्नशील[१] माणसानें भक्तिपूर्वक अर्पिलेल्या वस्तूचें मी सेवन करितों. २६.

**टीप** : तात्पर्य हें कीं, ईश्वराप्रीत्यर्थ प्राणिमात्राला सेवाभावानें जें कांहीं दिलें जातें, त्याचा स्वीकार त्या त्या प्राण्याच्या ठायीं अंतर्यामी-रूपानें राहणारा भगवानच करितो.

म्हणून हे कौंतेया, जें तूं करितोस, खातोस, हवन म्हणून (अग्नींत) अर्पण करितोस, जें तूं दान देतोस अथवा जें तप आचरितोस, तें सर्व मला अर्पण करून करीत जा. २७.

यामुळें बरेंवाईट फळ देणाऱ्या कर्मबंधनांतून तुझी सुटका होईल, आणि फलत्यागरूपी समत्व प्राप्त होऊन जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन तूं मला पावशील. २८.

सर्व प्राण्यांच्या बाबतींत मी समभावानें राहतों; मला कोणी आवडता आणि नावडता, असें नाहीं. असें (तात्त्विक दृष्टचा) असलें तरी जे मला भक्तिपूर्वक भजतात, ते माझ्यांत असतात आणि मीही त्यांच्यांत असतों. २९.

मोठा दुराचारी सुद्धां जर मला अनन्यभावानें भजेल तर तो साधु झालाच असें मानावें. कारण, त्याचा संकल्प आतां चांगला (किंवा शुद्ध) झाला आहे. ३०.

**टीप** : कारण कीं, अनन्यभक्ति दुराचार नाहींशी करून टाकते, (एवढें तिचें सामर्थ्य आहे).

तो ताबडतोब "धर्मात्मा" होतो आणि निरंतर शांति पावतो.

---

१ "प्रयत" शब्दाचा अर्थ "पवित्र" असा करितात. त्याचा "प्रयत्न" शब्दाशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं. "यम्" "देणें" या धातूचें "यत" हें रूप आहे. ज्यानें आपला "आत्मा" दिला आहे (प्रयत:) तो "प्रयतात्मन्". "प्रयतदक्षिण: यज्ञ:" असा प्रयोग ऋग्वेदांत (१·३१·१५) येतो.

हे कौंतेया, तूं हें खात्रीपूर्वक समज कीं, माझा भक्त कधींही नाश पावत नाहीं. ३१.

हे पार्था, जे माझा आश्रय घेतात, ते पापयोनि असोत कीं स्त्रिया असोत, वैश्य असोत कीं शूद्र असोत, परम गतीला पोंचतात. तर मग पुण्यवान[१] आणि भक्त असे ब्राह्मण आणि राजर्षि यांची गोष्ट कशास ती ?

या अनित्य आणि सुखरहित लोकांत तूं जन्म पावला आहेस; (यास्तव) तूं मला भजत जा. माझ्यांत मन ठेव, माझा भक्त हो, माझ्यासाठीं यज्ञ कर, मला नमस्कार कर, म्हणजे स्वतःला माझ्याशीं जोडून देऊन, माझ्यांत परायण होऊन, "मीच श्रेष्ठ स्थान" म्हणून मला मानणारा तूं मला पावशील. ३२–३३–३४.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला "राजविद्याराजगुह्ययोग" या नांवाचा नववा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

---

१ गीतेप्रमाणें वैश्य, शूद्र आणि स्त्रिया याच "पापयोनि" होत; ब्राह्मण आणि क्षत्रिय या "पुण्ययोनि" होत. छां. उ. ( ५-१०-७ ) मध्यें "रमणीया योनि" व "कपूया योनि" असे वर्ग पाडले असून पहिल्यांत "ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य" आणि दुसऱ्यांत "चण्डाल" असे येतात.

# १०. विभूतियोग

*सातव्या, आठव्या आणि नवव्या अध्यायांत भक्ति इ. चें निरूपण केल्यानंतर भगवान स्वत:च्या अनंत विभूतींचें किंचित् दर्शन भक्तांच्या साठीं घडवीत आहेत.*

: ३१ :

**श्रीभगवान म्हणाले :**

हे महाबाहो, आणखी एकदा माझें परम वचन ऐक. तूं मला फार आवडतोस म्हणून हें मी तुला तुझ्या हितासाठीं सांगणार आहें. १.

देव आणि महर्षि यांना मी कसा उत्पन्न झालों हें ठाऊक नाहीं; कारण, मीच देव आणि ऋषि यांचें सर्व प्रकारें मूळकारण आहें. २.

अजन्मा आणि अनादि असा मीच लोकांचा महेश्वर आहे, असें जो जाणतो तो माणसांमध्यें निर्मोह होऊन सर्व पातकांतून मुक्त होतो. ३.

बुद्धि, ज्ञान, अमूढता, क्षमा, सत्य, इंद्रियनिग्रह, शांति, सुख, दु:ख, उद्भव आणि नाश, भय तसेंच अभय, अहिंसा, समता, संतोष, तप, दान, यश, अपयश असे प्राणिमात्रांचे वेगवेगळे भाव[१] माझ्यापासून उत्पन्न होतात. ४, ५.

सप्तर्षि, त्यांच्या पूर्वीचे सनकादि चार, आणि (चौदा) मनु माझ्या संकल्पांतून उत्पन्न झाले आहेत आणि त्यांच्यापासून हे लोक पैदा झाले आहेत. ६.

---

[१] भाव म्हणजे पदार्थ, वृत्ति अथवा अवस्था. का. का.

ही माझी विभूति आणि (हें माझें) सामर्थ्य जो यथार्थ जाणतो तो अचल साम्याला पोंचतो, यांत संशय नाहीं. ७.

मी सर्वांच्या उत्पत्तीचें मूळ आहे, आणि सर्व माझ्यापासूनच निघालें आहे. असें समजून शहाणे लोक भक्तिभावानें माझ्या भजनीं लागतात. ८.

माझ्यांत चित्त रोवणारे, मला प्राण अर्पण करणारे, परस्परांना बोध करीत, माझेंच नित्य कीर्तन करीत, संतोषानें आणि आनंदानें राहतात. ९.

याप्रमाणें माझ्यांत तल्लीन होणारे आणि मला प्रेमपूर्वक भजणारे जे असतात त्यांना मी ज्ञान देतों; त्याच्या साहाय्यानें ते मला येऊन मिळतात. १०.

त्यांच्यावर अनुग्रह करून त्यांच्या हृदयांत राहणारा मी, ज्ञानरूपी प्रकाशाच्या दिव्यानें, त्यांच्या अज्ञानरूपी अंधाराचा नाश करितों. ११

: ३२ :

**अर्जुन म्हणाला :**

हे भगवन्, तुम्ही परमब्रह्म आहांत, परमधाम आहांत, परम-पवित्र आहांत. सर्व ऋषि, देवर्षि नारद, असित, देवल आणि व्यास तुम्हांला अविनाशी, दिव्य पुरुष, आदिदेव, अजन्मा आणि सर्वव्यापी असें संबोधतात आणि तुम्ही स्वतः सुद्धां तसेंच सांगत आहां. १२, १३.

हे केशवा, तुम्ही जें सांगतां तें मी मान्य करितों. हे भगवन्, तुमचें स्वरूप नाहीं कळत देवांना, नाहीं दानवांना. १४.

हे पुरुषोत्तमा, हे जीवांच्या (उत्पत्ति करणाऱ्या) बापा, हे

जीवेश्वरा, हे देवाधिदेवा, हे जगताच्या अधिपते, तुम्ही आपणच आपल्यामार्फत आपणांला जाणतां ! १५.

ज्या विभूतींच्या योगानें या लोकांना तुम्ही व्यापून राहिलां आहांत, त्या तुमच्या दिव्य विभूति मला कृपा करून संपूर्णतया सांगा. १६.

हे योगिन्, तुमचें नित्य चिंतन करीत करीत तुम्हांला मी कोणत्या रीतीनें ओळखूं शकेन ? हे भगवन्, कोणत्या कोणत्या स्वरूपांत मी तुमचें ध्यान करावें ? १७.

हे जनार्दना, तुमची शक्ति आणि तुमच्या विभूति यांचें वर्णन माझ्याजवळ फिरून विस्तारपूर्वक करा. तुमची अमृतमय वाणी ऐकत असतांना तृप्तिच होत नाहीं. १८.

**श्रीभगवान म्हणाले :**

ठीक आहे, तर मग तुला आतां मी माझ्या ठळक ठळक दिव्य विभूति सांगतों. पण हे कुरुश्रेष्ठा, माझ्या विभूतिविस्ताराला अंत हा नाहींच. १९.

हे गुडाकेशा, मी सर्व प्राण्यांच्या हृदयाच्या ठायीं राहणार आत्मा आहे. मीच भूतमात्राचा आदि, मध्य आणि अंत आहे २०.

आदित्यांमध्यें विष्णु मी आहे; ज्योतींमध्यें तळपणारा सूर्य मी आहे; वायूंमध्यें [१]मरीचि मी आहे, नक्षत्रांमध्यें चंद्र मी आहे. २१.

वेदांमध्यें सामवेद मी आहे; देवांमध्यें इंद्र मी आहे; इंद्रियांमध्यें मन मी आहे; प्राण्यांमध्यें चैतन्य मी आहे. २२.

---

[१] 'मरुत्' व 'मरीचि' या दोन्ही शब्दांत 'मृ (मर्)' 'प्रकाशणें' हा धातु आहे; तो 'मर्य' 'मार' या शब्दांत आढळतो.

रुद्रांमध्यें मी शंकर आहे; यक्ष आणि राक्षस यांच्यामध्यें कुबेर मी आहे; वसूंमध्यें अग्नि मी आहे; पर्वतांमध्यें मेरु मी आहे. २३.

हे पार्था, पुरोहितांमध्यें मुख्य जो बृहस्पति तो मीच आहे असें समज; सेनापतींमध्यें कार्तिकस्वामी मी आहे; आणि सरोवरांमध्यें सागर मी आहे. २४.

महर्षींमध्यें भृगु मी आहे; वाचेमध्यें एकाक्षरी ॐ मी आहे; यज्ञांमध्यें जपयज्ञ मी आहे आणि स्थावरांमध्यें हिमालय मी आहे. २५.

सर्व वृक्षांत अश्वत्थ (पिंपळ) मी आहे; देवर्षींमध्यें नारद मी आहे; गंधर्वांमध्यें चित्ररथ मी आहे आणि सिद्धांमध्यें कपिलमुनि मी आहे. २६.

अश्वांमध्यें अमृतमंथनाच्या प्रसंगीं उत्पन्न झालेला उच्चैःश्रवा मला समज. हत्तीमध्यें ऐरावत आणि मनुष्यांमध्यें राजा मी आहे. २७.

हत्यारांमध्यें वज्र मी आहे, गायींमध्यें कामधेनु मी आहे, प्रजोत्पत्तीचें कारण जो कामदेव तो मी आहे, सर्पांमध्यें वासुकि मी आहे. २८.

नागांमध्यें शेषनाग मी आहे, जलचरांमध्यें वरुण मी आहे, पितरांमध्यें अर्यमा मी आहे आणि नियमन करणाऱ्यांमध्यें यम मी आहे. २९.

दैत्यांमध्यें प्रल्हाद मी आहे, गणना करणाऱ्यांमध्यें काळ मी आहे, पशूंमध्यें सिंह मी आहे, पक्ष्यांमध्यें गरुड मी आहे. ३०.

पावन करणाऱ्यांमध्यें पवन (म्हणजे वारा) मी आहे, शस्त्रधाऱ्यांमध्यें (परशु) राम मी आहे, मत्स्यांमध्यें मकर (किंवा सुसर) मी आहे, नद्यांत गंगानदी मी आहे. ३१.

हे अर्जुना, सृष्टींचा आरंभ, अंत आणि मध्य मी आहे, विद्यांत अध्यात्मविद्या मी आहे, आणि विवाद करणारांचा वाद मी आहे. ३२.

अक्षरांत अकार मी आहे, समासांत द्वंद्व (समास) मी आहे, अविनाशी काल मी आहे, सर्व बाजूंना मुखें असलेला चतुर्मुख म्हणजे ब्रह्मदेव ही मी आहे. ३३.

सर्वांचे प्राण हरण करणारा मृत्यु मी आहे, भविष्यकाळांत निर्माण होणाऱ्यांचें आदिकारण मी आहे, आणि स्त्रीलिंगी नामांमध्यें कीर्ति, लक्ष्मी, वाणी, स्मृति, मेधा (बुद्धि), धृति (धैर्य) आणि क्षमा मी आहे. ३४.

सामांमध्यें बृहत्सामस्तोत्र मी आहे, छंदांमध्यें गायत्रीछंद मी आहे, महिन्यांमध्यें मार्गशीर्ष मी आहे, ऋतूंमध्यें वसंत मी आहे. ३५.

छल (कपट) करणाऱ्यांचें द्यूत मी आहे, प्रतापशाली पुरुषांचा पराक्रम मी आहे, सात्त्विक वृत्ति असणाऱ्यांचें सत्त्व मी आहे. ३६.

**टीपः** छल (कपट) करणाऱ्यांचें द्यूत मी आहे या वाक्यानें बिचकून जाण्याचें कारण नाहीं. यांत चांगल्यावाइटाचा विवेक नसून जें कांहीं होत असतें तें ईश्वराच्या अनुज्ञेविना होत नाहीं, हें दाखविण्याचा उद्देश आहे.

आणि छल करणाऱ्यानें देखील सर्व कांहीं परमेश्वराच्या अधीन आहे हें ओळखून स्वतःचा अभिमान सोडावा आणि छलाचा त्याग करावा.

यादवकुलांत वासुदेव मी आहे, पांडवांत धनंजय (अर्जुन) मी आहे, मुनींमध्यें व्यास आणि क्रांतदर्शी कवींमध्यें उशना (शुक्राचार्य) मी आहे. ३७.

राज्यकर्त्यांचा दंड[१] मी आहे, जय इच्छिणाऱ्यांची नीति मी आहे,

---

[१] दंडं धर्मं विदुर्बुधाः म. भा. १२-१५-२

गुह्य गोष्टींत मौन मी आहे, आणि ज्ञान्यांचें ज्ञान मी आहे. ३८.

हे अर्जुना, सर्व प्राण्यांच्या उत्पत्तीचें जें कांहीं बीज आहे, तें मी आहे; जें कांहीं स्थावर आणि जंगम आहे, तें माझ्याविना (असूं शकत) नाहीं. ३९.

हे परंतपा, माझ्या दिव्य विभूतींना अंत नाहीं. विभूतींचा एवढा विस्तार मीं केवळ उदाहरणादाखल सांगितला आहे. ४०.

जें जें कांहीं विभूतियुक्त, लक्ष्मीवंत किंवा प्रभावशाली आहे, तें तें माझ्या तेजाच्या अंशापासूनच उत्पन्न झालेलें आहे, असें जाण. ४१.

अथवा हे अर्जुना, हा एवढा विस्तार जाणून तुला करावयाचें आहे काय ? माझ्या केवळ एका[१] अंशानें मी या अखिल जगताचें धारण करून राहिलों आहे. ४२.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला "विभूतियोग" या नांवाचा दहावा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

---

१ पुरुषसूक्त ( ऋ. १०-९०-३ ) : "एतावानस्य महिमा......पादोऽस्य विश्वा भूतानि......"

# ११. विश्वरूपदर्शनयोग

*या अध्यायांत भगवान आपलें विराट स्वरूप अर्जुनाला दाखवीत आहेत. हा अध्याय भक्तांचा अतिशय आवडता आहे. यांत तर्क[१] नसून केवळ काव्य आहे. हा अध्याय म्हणतांना मनुष्य थकतच नाहीं.*

: ३३ :

**अर्जुन म्हणाला :**

तुम्ही माझ्यावर कृपा करून हें आध्यात्मिक परमरहस्य सांगितलेंत. जीं वचनें तुम्हीं मला सांगितलीत त्यांमुळें माझा हा मोह टळला आहे. १.

जें कांहीं आहे त्या सर्वांची उत्पत्ति आणि नाश, यांविषयीं तुमच्याकडून मीं विस्तारपूर्वक ऐकलें, तसेंच तुमचें अविनाशी माहात्म्य देखील हे कमलपत्राक्षा, मीं ऐकलें. २.

हे परमेश्वरा, हे पुरुषोत्तमा, तुम्ही ज्या स्वरूपानें स्वतःची ओळख करून देतां तशाच तुमच्या त्या ईश्वरी रूपाचें दर्शन घडावें अशी मला इच्छा होत आहे. ३.

हे प्रभो, मला तें दर्शन घडणें तुम्हांला शक्य वाटलें तर हे योगेश्वरा, त्या अव्यय रूपाचें दर्शन घडवा. ४.

---

[१] याचा अथ हा "बुद्धी"चा प्रदेश नसून "प्रतिभे"चा आहे; यांमुळेंच कीं काय, या अध्यायांतील श्लोकांवर गांधींची एकही टीप नाहीं. मध्यें कांहीं अडथळा न येतां, काव्य फडेपर्यंत वाचावें ही अपेक्षा.

**श्रीभगवान म्हणाले :**

हे पार्था, नाना प्रकारचीं, दिव्य, तशींच निरनिराळे रंग आणि आकृति असलेलीं माझीं शेंकडों आणि हजारों रूपें तूं पहा. ५.

हे भारता, आदित्य, वसु, रुद्र, अश्विनीकुमारांची जोडी, आणि मरुत् यांना पहा. पूर्वीं न पाहिलेलीं अशीं पुष्कळ आश्चर्यें तूं पहा. ६.

हे गुडाकेशा, या माझ्या देहांत एकरूपानें राहिलेलें अखिल स्थावर आणि जंगम जगत् आणि दुसरें जें कांहीं पाहण्याची तुझी इच्छा असेल तें आज पाहून घे. ७.

पण ह्या तुझ्या चर्मचक्षूंनीं तूं मला पाहूं शकणार नाहींस. यास्तव तुला मी दिव्य चक्षु देतों. त्यानें तूं माझें ईश्वरी योगसामर्थ्य पहा. ८.

**संजय म्हणाला :**

हे राजा, महायोगेश्वर कृष्णानें असें म्हणून अर्जुनाला स्वतःचें परम ईश्वरी रूप दाखविलें. ९.

अनेक तोंडें आणि डोळे असलेलें, अनेक अद्भुत देखावे असलेलें, अनेक दिव्य अलंकार ल्यालेलें आणि उगारलेलीं अनेक दिव्य शस्त्रें हातांत असलेलें, असें तें रूप होतें. १०.

त्यानें अनेक दिव्य माळा आणि वस्त्रें धारण केलीं होतीं, त्याला दिव्य सुगंधांचे लेप लावलेले होते. असा हा सर्वप्रकारें आश्चर्यमय, अनंत, सर्वव्यापी देव होता. ११.

आकाशांत हजार सूर्यांचें तेज एकवटून प्रकाशमान झालें तर कदाचित् तें तेज त्या महात्म्याच्या तेजासारखें होईल. १२.

अनेक तऱ्हेनें विभागलेलें अखिल जगत् पांडवानें (अर्जुनानें) तेथें, त्या देवदेवाच्या शरीरांत एकवटलेलें पाहिलें. १३.

त्यानंतर आश्चर्यचकित आणि रोमांचित झालेला धनंजय शिर लववून, हात जोडून याप्रमाणें बोलला. १४.

: ३४ :

**अर्जुन म्हणाला :**

हे देवा, तुझ्या देहाच्या ठायीं देवांना, निरनिराळ्या प्रकारच्या सर्व प्राण्यांच्या समुदायांना, कमलासनावर विराजमान झालेला, प्रजांचा ईश्वर असा ब्रह्मदेव त्याला, सगळ्या ऋषींना, तसेंच दिव्य सर्पांना मी पहात आहे. १५.

तुम्हांला अनेक हात, पोटें, तोंडें आणि डोळे असलेले, चोहों बाजूंला अनंत रूपें असलेले, असे मी पाहतों. हे विश्वेश्वरा, हे विश्वरूपा, मला नाहीं दिसत तुमचा अंत, तुमचा मध्य किंवा तुमचा आदि. १६.

मुगुटधारी, गदाधारी, चक्रधारी, तेजाचा गोळा, सर्वत्र झळकणाऱ्या ज्योतींनीं युक्त, आणि मोठ्या मुश्किलीनें पाहतां येईल असा, अमाप आणि पेटलेला अग्नि किंवा सूर्य यांच्याप्रमाणें सर्व दिशांना प्रकाशणारा, अशा तुम्हांला मी (न्याहाळून) पहात आहे. १७.

मी मानतों कीं तुम्हीच जाणण्यास पात्र, असें परम अक्षर आहांत. तुम्हीच या जगाचा अखेरचा आधार आहांत; धर्माचे[१] शाश्वत रक्षक तुम्ही आहांत, आणि तुम्हीच चिरंतन, तुम्हीच सनातन पुरुष आहां. १८.

---

[१] शां. भा. : " शश्वद्भवः शाश्वतः नित्यः धर्मः तस्य गोप्ता शाश्वतधर्मगोप्ता " असें पाहिजे; पहा गी १४-२७ " …… … प्रतिष्ठा अहं … शाश्वतस्य च धर्मस्य… "

तुम्हाला आदि, मध्य किंवा अंत नाहीं, तुमची शक्ति अफाट आहे; तुम्हाला अनंत बाहू आहेत, सूर्य आणि चंद्र हे तुमचे डोळे आहेत, तुमचें मुख पेटलेल्या अग्नीसारखें आहे, तुम्ही स्वतःच्या तेजानें या जगाला तापवीत आहांत; असें तुमचें स्वरूप मी पहात आहे. १९.

आकाश आणि पृथ्वी या दोहोंमधील अंतराळाला आणि सर्व दिशांना तुम्ही एकटयांनींच व्यापून सोडिलें आहे. हे महात्मन्, हें तुमचें अद्‌भुत उग्र रूप पाहून तिन्ही लोक थरथर कांपत आहेत. २०.

हे सगळे देव तुमच्यांत शिरत आहेत. भयभीत होऊन कित्येक हात जोडून तुमची प्रार्थना[१] करीत आहेत. महर्षि आणि सिद्ध यांचे समुदाय "( जगाचें ) कल्याण होवो" असें म्हणत अनेक प्रकारांनीं तुमच्या यशाचें गान गात आहेत. २१.

रुद्र, आदित्य, वसु, साध्य, विश्वेदेव, अश्विनीकुमार, मरुत, केवळ ऊनच[२] ( औष्ण्य ) पिणारे पितर, गंधर्व, यक्ष, असुर, आणि सिद्ध यांचे संघ, ही सर्व मंडळी विस्मित होऊन तुमच्याकडे ( निरखून ) पहात आहेत. २२.

---

१ ज्ञानदेवांनीं पुढील सुंदर प्रार्थना आपणांसाठीं करून ठेविली आहे:

"देवा, थोरीं मोहार्णवीं पडिलों । विषयवागुरें आंतुडलों ।
स्वर्गसंसाराच्या सांपडलों । दोहिं आंगिं ॥ ३२४ ॥
ऐसें आमचें सोडवणें । तुज वांचौनि कीजैल कवणें ।
तुज शरण आलों सर्वप्राणें । म्हणत देवा ॥ ३२५ ॥"

२ शरिराची उष्णता टिकून आहे तोंपर्यंतच शरीर टिकूं शकतें. ही उष्णता आपण अन्नांतून मिळवितों. सूक्ष्म शरीर धारण करणारे पितर प्रत्यक्ष अन्न खाऊं शकत नाहींत पण त्याची केवळ उष्णताच सरळ पिऊं शकतात, अशी समजूत त्यावेळीं असेल. का. का. तै. ब्रा. ( १·३·१०·६ ) "आ ऊष्मणः व्यावृतः उपास्ते । ऊष्मभागाः हि पितरः ।" ( पितरांना घातलेले ऊन ऊन भाताचे पिंड थंड होईपर्यन्त श्राद्ध करणारानें बसावें; कारण पिंडांतील केवळ उष्ण भाग पितर घेऊं शकतात. )

हे महाबाहो, पुष्कळ तोंडें आणि डोळे असलेलें, पुष्कळ हात, मांड्या आणि पाय असलेलें, पुष्कळ पोटें असलेलें, पुष्कळ दाढां-मुळें विक्राळ दिसणारें, तुमचें विशाल रूप पाहून लोक व्याकुळ होऊन गेले आहेत; तसाच मीही व्याकुळ झालों आहे. २३.

आकाशाला भिडणाऱ्या, झळाळणाऱ्या, अनेक रंग असलेल्या, तोंडाचा आ पसरलेल्या, विशाळ आणि तेजस्वी डोळे असलेल्या अशा तुम्हाला पाहून हे विष्णो, माझें अंतःकरण व्याकुळ झालें आहे आणि मी नाहीं राखूं शकत शांति किंवा धीर. २४.

प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें भासणारीं आणि विकराळ दाढा असणारीं तुमचीं तोंडें पाहून मला दिशा सुचेनाशा झाल्या आहेत आणि शांतिही मिळत नाहीं; यास्तव हे देवाधिदेवा, हे जगन्निवासा, प्रसन्न व्हा. २५.

राजांच्या संघांसहवर्तमान धृतराष्ट्राचे हे पुत्र, भीष्म, द्रोणाचार्य, हा सूतपुत्र कर्ण, आणि आमचे मुख्य मुख्य योद्धे, सर्वजण विक्राळ दाढा असलेल्या या तुमच्या भयानक तोंडांत वेगानें शिरताहेत; कित्येकांच्या डोक्यांचा चुरा होऊन ते तुमच्या दांतांच्या मधोमध चिकटलेले दिसत आहेत. २६–२७.

ज्याप्रमाणें नद्यांचे मोठमोठे प्रवाह समुद्राकडे तोंड करून जोरानें वाहतात, त्याप्रमाणें हे लोकाग्रणी तुमच्या धगधगत्या तोंडांत घुसताहेत. २८.

ज्याप्रमाणें पतंग स्वतःच्या नाशासाठीं वाढत जाणाऱ्या वेगानें, पेटलेल्या ज्वालेंत उडी घेतात, त्याप्रमाणें तुमच्या तोंडांत हे सर्व लोक वाढत्या वेगानें प्रवेश करीत आहेत. २९.

सर्व लोकांना सर्व बाजूंनीं ग्रासून टाकून तुम्ही आपल्या पेटत्या तोंडांनीं त्यांना चाटीत आहांत. हे (सर्वव्यापी) विष्णो, तुमचा

उग्र प्रकाश अखिल जगताला आपल्या तेजांनीं भरून टाकीत आहे आणि ताप देत आहे. ३०.

उग्र रूप धारण करणारे असे तुम्ही कोण आहांत तें मला सांगा. हे देववरा, मी तुम्हांला नमस्कार करीत आहे. तुम्ही प्रसन्न व्हा. आदिकारण अशा तुम्हाला जाणण्याची माझी इच्छा आहे. तुमची प्रवृत्ति ( काय आहे हें ) माझ्या नाहीं ध्यानांत येत. ३१.

**श्रीभगवान म्हणाले :**

लोकांचा नाश करणारा, वाढलेला असा' मी काळ आहे. लोकांचा संहार करण्यासाठीं मीं येथें ठाकलों आहे. तूं लढण्याचें नाकारलेंस तरीही प्रत्येक सैन्यांत जे हे सर्व योद्धे आहेत त्यांच्यापैकीं कोणीही (शिल्लक) राहणार नाहीं. ३२.

म्हणून तूं उठून उभा रहा, कीर्ति मिळीव, शत्रूंना जिंकून धनधान्यानें भरलेल्या राज्याचा भोग घे. ह्यांना मीं पूर्वींच ठार मारलेलें आहे. हे सव्यसाचिन्, तूं तर केवळ निमित्तमात्र हो. ३३.

मीं ठार मारलेले द्रोण, भीष्म, जयद्रथ, कर्ण आणि दुसरे योद्धे यांना तूं नाममात्र ठार मार. व्याकुळ होऊं नकोस, लढ; शत्रूंना रणांगणांत जिंकणारच आहेस. ३४.

: ३५ :

**संजय म्हणाला :**

केशवाचें हें वचन ऐकून मुगुटधारी अर्जुन कांपत कांपत हात जोडून वरचेवर नमस्कार करीत पुनःपुनः भीतभीत प्रणाम करून कृष्णाला, सद्‌गदित होऊन, याप्रमाणें म्हणाला. ३५.

**अर्जुन म्हणाला :**

हे हृषीकेशा, तुमचें कीर्तन (गुणवर्णन) करून जग आनंद पावतें आणि तुमच्याविषयीं त्याला अनुराग उत्पन्न होतो, हें ठीकच आहे. भ्यालेले राक्षस सैरावैरा पळत आहेत आणि सिद्धांचे सर्व समुदाय तुम्हांला नमस्कार करीत आहेत, (तें सुद्धां ठीकच आहे.) ३६.

हे महात्मन्, त्यांनीं तुम्हांला नमस्कार कां न करावा? तुम्ही ब्रह्मदेवापेक्षांही मोठे, आदिकारण आहांत. हे अनंता, हे देवेशा, हे जगन्निवासा, तुम्ही अक्षर आहांत, सत् आहांत आणि असत् आहांत; आणि म्हणून त्यांच्याही पलीकडे जें आहे तें सुद्धां तुम्हीच आहांत. ३७

तुम्ही आदिदेव आहांत. तुम्ही पुराण पुरुष आहांत. तुम्ही या विश्वाचें परम आश्रयस्थान आहांत; तुम्ही जाणणारेही आहांत आणि जाणण्यायोग्य वस्तुही पण तुम्हीच आहांत. तुम्ही परमधाम आहांत. हे अनंतरूपा, या जगताला तुम्ही व्यापून राहिलां आहांत. ३८.

वायु, यम, अग्नि, वरुण, चंद्र, प्रजापति, प्रपितामह (पितामह जो ब्रह्मदेव त्याचा पिता) तुम्हीच आहांत. तुम्हांला हजारों वेळां नमस्कार असो. पुनःपुनः तुम्हांला नमस्कार असो. ३९.

हे सर्वा, तुम्हांला पुढून, मागून, सर्व बाजूंनीं नमस्कार. तुमचें सामर्थ्य प्रचंड आहे, तुमचा पराक्रम अचाट आहे, तुम्हीच सर्व व्यापून राहिलां आहांत. म्हणून तुम्ही "सर्व" आहांत. ४०

तुमचा हा महिमा न जाणून, संवगडी मानून "हे कृष्णा, हे यादवा, हे गड्या," अशी (एकेरी) हांक मारण्यांत माझ्याकडून

चुकीनें किंवा प्रेमानें (कां होईना) जो अविवेक झाला असेल आणि विनोदासाठीं खेळतांना, झोंपतांना, बसतांना, खातांना, एकांतांत किंवा लोकांतांत तुमचा माझ्याकडून जो कांहीं अपमान घडला असेल त्याची क्षमा करण्यास्तव मी तुमची विनवणी करीत आहे; तुमच्या महिम्याचें आकलन होत नाहीं. ४१–४२.

या स्थावरजंगम जगाचे तुम्ही वडील आहांत. तुम्ही त्या (जगा)चे पूज्य आणि श्रेष्ठ गुरु आहांत. (तिन्ही लोकांतही) तुमच्या प्रभावाला जोड नाहीं अशा देवा, तुमच्या बरोबरीचाच जर कोणी नाहीं तर तुमच्यापेक्षां वरचढ कोठून असणार? ४३.

म्हणून साष्टांग नमस्कार घालून पूज्य ईश्वर अशा तुम्हांला "प्रसन्न व्हा" अशी मी विनंति करीत आहे. ज्याप्रमाणें बाप आपल्या मुलाला, मित्र आपल्या मित्राला निभावून घेतो, त्या-प्रमाणें तुम्ही माझे आवडते असल्यामुळें माझ्या कल्याणासाठीं कृपा करून मला संभाळून घ्या. ४४.

पूर्वीं न पाहिलेलें असें तुमचें रूप पाहून माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले आहेत आणि भयामुळें माझें मन व्याकुळ झालें आहे. म्हणून हे देवा, तुमचें पहिलें रूप दाखवा. हे देवेशा, हे जगन्निवासा, तुम्ही प्रसन्न व्हा. ४५.

पूर्वींच्या प्रमाणें मुगुटगदाचक्रधारी अशा तुमचें दर्शन घेण्याची माझी इच्छा आहे. हे सहस्रबाहो, हे विश्वमूर्ते, तुमचें तेंच पहिलें चतुर्भुज रूप धारण करा. ४६.

: ३६ :

**श्रीभगवान म्हणाले :**

हे अर्जुना, तुझ्यावर प्रसन्न होऊन माझ्या योगसामर्थ्यानें माझें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २६३०६ वि: निबंध
क्रमांक १२०९ नों: दि: २२।३।६०

तेजोमय, विश्वव्यापी, अनंत, परम, आदिम असें रूप तुला दाखविलें आहे. तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणींही पूर्वी तें पाहिलेलें नाहीं. ४७.

हे कुरुप्रवीरा, वेदाभ्यास करून, यज्ञ करून, इतर शास्त्रांचें अध्ययन करून, दानें देऊन, क्रिया आचरून किंवा उग्र तपश्चर्या करून, तुझ्याखेरीज दुसरें कोणी हें माझें रूप पाहण्यास समर्थ नाहीं. ४८.

हें माझें विक्राळ रूप पाहून तूं व्याकुळ होऊं नकोस. गडबडून जाऊं नकोस. भय सोडून शांतचित्त हो आणि हें माझें तुझ्या परिचयाचें नेहमींचें रूप पहा. ४९.

**संजय म्हणाला :**

वासुदेवानें असें बोलून अर्जुनाला स्वतःचें रूप फिरून दाखविलें. आणि पुनः शांत मूर्ति धारण करून त्या महात्म्यानें भ्यालेल्या अर्जुनाला आश्वासन दिलें. ५०.

**अर्जुन म्हणाला :**

हे जनार्दना, हें तुमचें सौम्य मनुष्यस्वरूप पाहून आतां मी शांत झालों आहे आणि ठिकाणावर आलों आहे. ५१.

**श्रीभगवान म्हणाले :**

जें माझें रूप तूं पाहिलेंस त्याचें दर्शन फार दुर्मिळ आहे. देवसुद्धां तें रूप (न्याहाळून) पाहण्यासाठीं हपापलेले असतात. ५२.

जें माझें दर्शन तुला घडलें आहे तें दर्शन नाहीं वेदामुळें, नाहीं तपामुळें, नाहीं दानामुळें, किंवा नाहीं यज्ञामुळें घडत. ५३.

पण हे अर्जुना, हे परंतपा, माझ्या विषयींचें अशा प्रकारचें ज्ञान, अशा प्रकारचें माझें दर्शन आणि माझ्यांत वास्तविक (म्हणजे तत्त्वतः) प्रवेश केवळ अनन्यभक्तीनेंच शक्य आहे. ५४.

हे पांडवा, जो कोणी सगळीं कर्में मला समर्पण करतो, माझ्यांत तल्लीन राहतो, माझा भक्त बनतो, आसक्ति सोडतो आणि प्राणिमात्राविषयीं द्वेषरहित होऊन राहतो, तो मला येऊन मिळतो. ५५.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला " विश्वरूपदर्शनयोग " या नांवाचा अक्रावा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०२६६
संदर्भ शाखा

# १२. भक्तियोग

पुरुषोत्तमाचें दर्शन अनन्य भक्तीनेंच होतें, असें असल्यामुळें भगवंताच्या दर्शनानंतर आतां भक्तीचें स्वरूपच रेखाटलें पाहिजे.

हा बारावा अध्याय सर्वांनीं तोंडपाठ केला पाहिजे. लहानांतल्या लहानांपैकीं हा एक आहे. यांत दिलेलीं भक्तांचीं लक्षणें नित्य मनन करण्याजोगीं आहेत.

: ३७ :

**अर्जुन म्हणाला :**

याप्रमाणें जे भक्त तुमचें निरंतर ध्यान करून तुमची उपासना करतात आणि जे तुमच्या अविनाशी अव्यक्त स्वरूपाचें ध्यान करतात त्यां (दोहों) पैकीं कोणते योगी श्रेष्ठ मानावेत ? १.

**श्रीभगवान म्हणाले :**

नित्य ध्यान करणारे, माझ्यांत मन रोवून जे अत्यंत श्रद्धेनें माझी उपासना करतात, त्यांना मी श्रेष्ठ योगी मानतों. २.

सर्व इंद्रियांना ताब्यांत ठेवून, सर्व ठिकाणीं समत्व बाळगून जे अचिंत्य, दृढ, अचळ, धीर, सर्वव्यापी, अव्यक्त, अवर्णनीय, अविनाशी अशा स्वरूपाची उपासना करतात आणि जे सर्व प्राण्यांच्या हितांत गढलेले असतात ते मलाच येऊन मिळतात. ३–४.

ज्यांचें चित्त अव्यक्ताच्या ठायीं चिकटलेलें आहे त्यांना कष्ट फार. देहधारी माणूस अव्यक्त गति मोठ्या कष्टानेंच प्राप्त करून घेऊं शकतो. ५.

**टीप** : देहधारी माणूस अमूर्त स्वरूपाची फक्त कल्पनाच करूं शकतो, पण त्याच्यापाशीं अमूर्त स्वरूपाचें वर्णन करण्यासाठीं एकही निश्चयात्मक शब्द नाहीं, म्हणून त्याला निषेधात्मक 'नेति नेति' शब्दावर समाधान मानणें भाग पडलें. म्हणूनच मूर्तिपूजेचा निषेध करणारा सुद्धां, सूक्ष्म विचार केला असतां, मूर्तिपूजकच होय; ग्रंथाची[१] पूजा करणें, देवळांत[२] जाऊन पूजाअर्चा करणें, एकाच[३] दिशेकडे तोंड करून नमाज पढणें हीं सारीं साकार पूजेचींच लक्षणें होत. असें असलें तरी साकाराच्या पलीकडे निराकार अचिंत्य स्वरूप आहे, हें सर्वांनीं समजून घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. भक्तीची पराकाष्ठा हीच कीं भक्त भगवानांत बुडून मुरून जातो आणि शेवटीं फक्त एक, अद्वितीय, अरूपी भगवानच काय तो राहतो. पण या स्थितीला साकाराच्या मार्फत सहजरीत्या पोंचतां येईल. म्हणून थेट निराकारापर्यंत पोंचविणारा मार्ग कष्टसाध्य म्हणून सांगितला.

परंतु हे पार्था, जे माझ्यांत तन्मय राहतात, सर्व कर्में मला समर्पण करतात, एकनिष्ठपणानें माझें ध्यान करून माझी उपासना करतात आणि माझ्यांत ज्यांचें चित्त रोविलेलें आहे, अशा भक्तांना मृत्युरूपी संसारसागरांतून मी ताबडतोब पलीकडे तरून नेतों. ६–७.

तुझें मन माझ्या ठायीं ठेव, तुझी बुद्धि माझ्यांत रोव, म्हणजे या जन्मानंतर तूं खात्रीनें मलाच येऊन मिळशील. ८.

आतां जर तूं माझ्या ठायीं आपलें मन स्थिर करण्यास असमर्थ असशील तर हे धनंजया, अभ्यासयोगाचें आचरण करून मला गांठण्याची इच्छा बाळग. ९.

असा अभ्यास चालू ठेवण्याला देखील जर तूं असमर्थ असशील तर कर्ममात्र (म्हणजे प्रत्येक कर्म) मला अर्पण कर. म्हणजे माझ्यासाठीं कर्म करतां करतां (शेवटीं) तुला मोक्ष मिळेल. १०.

---

[१] शीख. [२] हिंदु. [३] मुस्लिम.

आणि जर माझ्यासाठीं कर्म करण्याइतकी देखील तुझी शक्ति नसेल तर प्रयत्नपूर्वक सर्व कर्मांच्या फळाचा त्याग कर. ११.

अभ्यासमार्गापेक्षां ज्ञानमार्ग श्रेयस्कर होय. ज्ञानमार्गापेक्षां ध्यानमार्ग विशेष होय. आणि ध्यानमार्गापेक्षां कर्मफलत्याग सरस होय. कारण, या त्यागाच्या शेवटीं लगेच शांति (ठेवलेलीच) आहे. १२.

**टीप** : अभ्यास म्हणजे चित्तवृत्तिनिरोधाची (योगाची) साधना; ज्ञान म्हणजे श्रवणमननादि; ध्यान म्हणजे उपासना[१]. या सर्वांचा परिणाम म्हणून जर कर्मफलत्याग दिसला नाहीं तर अभ्यास हा अभ्यास नव्हे, ज्ञान हें ज्ञान नव्हे, आणि ध्यान हें ध्यान नव्हे.

: ३८ :

जो सर्वभूतांचे ठायीं द्वेषरहित, जगमित्र, दयाळू, क्षमाशील, 'मी, माझें' असें कांहीं न म्हणणारा, सुखदु:खाविषयीं सारखा, नेहमीं संतुष्ट, योगयुक्त, इंद्रियनिग्रही, दृढनिश्चयी आहे आणि ज्यानें माझ्या ठायीं आपलीं मनबुद्धि हीं अर्पिलीं आहेत, असा माझा भक्त मला आवडतो. १३–१४.

ज्याला लोक कंटाळत नाहींत आणि जो लोकांना कंटाळत नाहीं, जो हर्ष, क्रोध, मत्सर, भय आणि उद्वेग यां( विकारां )-पासून मुक्त आहे, तो मला आवडतो. १५.

जो इच्छारहित आहे, पवित्र आहे, दक्ष म्हणजे सावधान आहे, फलप्राप्तीविषयीं तटस्थ आहे, भय आणि चिंता यांविरहित आहे,

---

[१] चित्तांत शांति नसेल तर ध्यान संभवत नाहीं; आणि अशांतीचें कारण म्हणजे तऱ्हेतऱ्हेच्या फलवासनाच होत; म्हणून फलत्याग प्रथम केला पाहिजे. या त्यागानंतर ध्यानाला आवश्यक अशी शांति त्वरित मिळणें शक्य आहे. का. का.

सर्व संकल्पांचा ज्यानें त्याग केला आहे तो माझा भक्त होय, तो मला आवडतो. १६.

जो हरखून (किंवा हुरळून) जात नाहीं, जो द्वेष करीत नाहीं, जो काळजी करीत (बसत) नाहीं, जो आशेचे मनोरे रचीत नाहीं, जो बऱ्या-वाईटांचा त्याग करितो, असा भक्तिपरायण (माणूस) मला आवडतो. १७.

शत्रु–मित्र, मान–अपमान, थंडी–ऊन, सुख–दुःख, या सर्वांविषयीं जो समभाव राखतो, ज्यानें आसक्ति सोडली आहे, 'कुणी निंदा, कुणी वंदा' ज्याचें वर्तन सारखेंच राहतें, जो मौन धारण करतो, जें मिळेल (तें गोड मानून) त्यांत जो संतोष मानतो, ज्याला स्वतःचें असें कोणतेंच आश्रयस्थान नाहीं, जो स्थिरचित्त आहे, असा भक्त मला आवडतो. १८–१९.

या पवित्र अमृतरूप ज्ञानाचें, जे माझ्यांत परायण राहून, श्रद्धापूर्वक सेवन करितात, ते भक्त मला फार आवडतात. २०.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत "भक्तियोग" या नांवाचा बारावा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# १३. क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग

*या अध्यायांत शरीर आणि शरीरी (आत्मा) यांमधील भेद दाखविला आहे.*

: ३९ :

**श्रीभगवान म्हणाले :**

हे कौंतेया, या शरीराला "क्षेत्र" असें म्हणतात; आणि याला जो जाणतो त्याला "क्षेत्रज्ञ" असें तत्त्वज्ञानी म्हणतात. १.

आणि शिवाय हे भारता, सर्व क्षेत्रांत– शरीरांत– राहिलेल्या मला "क्षेत्रज्ञ" जाण. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्यांतील भेदाचें जें ज्ञान तें "ज्ञान" होय, असें माझें मत आहे. २.

हें क्षेत्र कोण आहे, कसलें आहे, ह्यांत कोणते विकार आहेत, कोठून आलें, आणि क्षेत्रज्ञ कोण, त्याचें सामर्थ्य काय, हें माझ्या-जवळून थोडक्यांत ऐक. ३.

विविध छंदांत, निरनिराळ्या रीतींनीं ऋषींनीं हा विषय गायिला आहे आणि उदाहरणें आणि युक्तिवादही करून निश्चयात्मक अशा ब्रह्मसूचक वाक्यांतही या विषयाचें निरूपण केलें आहे. ४.

महाभूतें, अहंकार, बुद्धि, प्रकृति, दहा इंद्रियें, एक मन, पांच विषय; इच्छा, द्वेष, सुख, दुःख, संघात, चेतनशक्ति, धृति— हें त्याच्या विकारांसहित थोडक्यांत क्षेत्र सांगितलें. ५–६.

**टीप** : महाभूतें पांच : पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश. अहंकार म्हणजे शरीराविषयीं असणारी अहंता, अहंप्रत्यय, अहंपणा. अव्यक्त म्हणजे अदृश्य असलेली माया, प्रकृति. दहा इंद्रियांपैकीं पांच ज्ञानेंद्रियें — नाक,

कान, डोळा, जीभ आणि त्वचा. तशींच पांच कर्मेंद्रियें — हात, पाय, तोंड आणि दोन गुह्येंद्रियें. पांच गोचर (मूळ श्लोकांतील "पंच चेन्द्रिय-गोचराः") म्हणजे पांच ज्ञानेंद्रियांचे पांच विषय -- हुंगणें, ऐकणें, पाहणें, चाखणें आणि स्पर्शणें. संघात म्हणजे शरीरांतील तत्त्वांची एकमेकांबरोबर सहकार्य करण्याची शक्ति. धृति म्हणजे धैर्यरूप सूक्ष्म गुण नव्हे, पण या शरीरांतील परमाणूंचा एकमेकाला बिलगून राहण्याचा गुण. हा गुण अहंभावामुळेंच संभवतो, आणि हा अहंभाव अव्यक्त प्रकृतींत असतो. सावध माणूस या अहंभावाचा ज्ञानपूर्वक त्याग करतो. आणि त्यामुळें अंतकाळीं किंवा दुसऱ्या आघातांनीं तो दुःख पावत नाहीं. शेवटीं ज्ञानी-अज्ञानी, या सर्वांना या विकारी क्षेत्राचा त्याग केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

अमानित्व, अदंभित्व, अहिंसा; क्षमा, सरळपणा, गुरूची सेवा, शुचिता, स्थिरता ( दमदारपणा ), आत्मसंयम, इंद्रियांच्या विषयांबद्दल वैराग्य, अहंकार-शून्यता, जन्म, मृत्यु, म्हातारपण, रोग यांसंबंधींचीं दुःखें आणि दोष यांचें सतत भान; घरदार, बायकामुलें इ. संबंधीं मोहममतेचा अभाव; प्रिय अथवा अप्रिय— जें कांहीं घडेल त्यासंबंधीं मनाचा नित्य सारखेपणा, माझ्या ठायीं अनन्य, ध्यानपूर्वक एकनिष्ठ भक्ति, "एकांतावरी बहु प्रीति", जनसमुदायांत मिसळण्याचा कंटाळा, आध्यात्मिक ज्ञानासंबंधीं स्थिर निष्ठा, आत्मसाक्षात्कार— या सर्वाला ( मिळून ) ज्ञान असें म्हणायचें. याच्या विपरीत तें अज्ञान. ७-८-९-१०-११.

ज्याचें ज्ञान झाल्यानें माणूस मोक्ष पावतो तें ज्ञेय काय आहे तें तुला आतां मी सांगतों. तें अनादि, परब्रह्म आहे, त्याला "सत्" म्हणतां येत नाहीं आणि "असत्" ही म्हणतां येत नाहीं. १२.

**टीप** : परमेश्वराला "सत्" अथवा "असत्" एकही म्हणतां येत नाहीं. कोणत्या एका शब्दानें त्याची व्याख्या, ओळख होणें शक्य नाहीं, असें तें गुणातीत स्वरूप आहे.

त्याला हात, पाय, डोळे, डोकें, तोंड आणि कान सर्वत्रच आहेत. या लोकांत तें सर्वाला व्यापून राहिलें आहे. १३.

सर्व इंद्रियांच्या गुणांचा आभास त्याच्या ठिकाणीं होतो, तथापि तें स्वरूप इंद्रियविरहित आणि सर्वांपासून अलिप्त आहे; असें असूनही तें सर्वांना धारण करणारें आहे; तें गुणरहित असूनही गुणांचा भोग घेतें. १४.

तें भूतांच्या बाहेरही आहे आणि आंतही आहे. तें गतिमान आहे आणि स्थितिमानही आहे. सूक्ष्म असल्यामुळें तें जाणण्याजोगें नाहीं. तें दूर आहे आणि नजीक आहे. १५.

**टीप** : जो त्याला ओळखतो, त्याच्या आंत तें आहे, गति आणि स्थिरता, शांति आणि अशांति या दोहोंचा आपणांला अनुभव येतो आणि हे सर्व भाव त्यांच्यांतूनच पैदा होतात, म्हणून तें गतिमान आणि स्थिर, दोन्हीही आहे.

तें अविभक्त असूनही भूतांच्या ठायीं विभागल्याप्रमाणें सुद्धां राहतें. तें "ज्ञेय" ( म्हणजे जाणण्याजोगें ) ( ब्रह्म ) प्राणिमात्रांचें पालक, नाशकारक आणि उत्पत्तिकारक ( असें तत्त्व ) आहे. १६.

ज्योतींचेंही तें ज्योती आहे, तें अंधाराच्या पलीकडे आहे, असें म्हटलें आहे. ज्ञान तेंच, ज्ञेय ( जाणण्याजोगें ) तेंच आणि ज्ञानानें जें पावायचें तेंही तेंच आहे. असें तें सर्वांच्या अंतर्यामीं वास करीत आहे. १७.

याप्रमाणें क्षेत्र, ज्ञान आणि ज्ञेय, याविषयीं थोडक्यांत सांगितलें. माझा भक्त तें जाणून माझ्या स्वरूपापर्यंन्त ( थेट ) येऊन पोंचण्यास योग्य होतो. १८.

: ४० :

प्रकृति आणि पुरुष दोन्ही अनादि आहेत. आणि सर्व विकार[१] आणि गुण प्रकृतींतून उत्पन्न होतात, असें जाण. १९.

कार्यकारणसंबंधाची उत्पत्ति प्रकृतीच्या कारणानें, असें मानतात; तर सुखदु:खाचें भोगणें हें पुरुषाच्या कारणानें, असें मानतात. २०.

प्रकृतीच्या ठायीं राहिलेला पुरुष प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या गुणांचा उपभोग घेतो; आणि गुणांचा हा संगच बऱ्यावाईट योनींमध्यें पुरुषाच्या जन्माचें कारण बनतो. २१.

**टीप** : लौकिक[२] भाषेंत प्रकृतीला आपण "माया" या नांवानें ओळखतों. पुरुष म्हणजे जीव होय. मायेच्या म्हणजे मूळ स्वभावाच्या तंत्रानें वागून जीव सत्त्व, रज आणि तम यांपासून घडणाऱ्या कार्यांचीं फळें भोगतो आणि म्हणून कर्माप्रमाणें पुनर्जन्म पावतो.

या देहांत राहणाऱ्या त्याला परम पुरुष, सर्वसाक्षी, अनुमंता (अनुमति किंवा संमति देणारा), भर्ता, भोक्ता, महेश्वर आणि परमात्मा सुद्धां म्हणतात. २२.

जो मनुष्य याप्रमाणें पुरुषाला आणि (त्रिगुणात्मिका) गुणमयी प्रकृतीला जाणतो तो सर्वप्रकारें कार्य करीत असला तरी पुन: जन्म पावत नाहीं. २३.

**टीप** : २, ९, १२ आणि इतर अध्यायांच्या आधारानें आपण जाणूं शकतों कीं हा श्लोक स्वेच्छाचाराचें समर्थन करणारा नाहीं, पण भक्तीचा

---

१ वास्तविक "प्रकृती"ची विकृति (विकार) तेच "गुण" होत. ही परिभाषा मुळांत सांख्यांची आहे.

२ उपनिषदांत देखील प्रकृतीला "माया" म्हटलें आहे. पहा श्वे. उ. ४·१० "मायां तु प्रकृतिं विद्यात्, मायिनं तु महेश्वरम्।"

महिमा सूचित करणारा आहे. कर्ममात्र सगळें जीवाला बंधांत टाकतें, पण माणूस जर आपलीं सर्व कर्में परमात्म्याला अर्पण करील तर तो बंधमुक्त होतो. याप्रमाणें ज्याच्यामधून कर्तेपणाचा अहंभाव पार नाहींसा झाला आहे आणि जो अंतर्यामीला अष्टौ ते प्रहर कधींही विसंबत नाहीं, त्याच्या हातून पापकर्म घडणारच नाहीं. पापाचें मूळच मुळीं अभिमान हें आहे. "अहं" किंवा "मी" नाहीं तेथें पाप नाहीं. हा श्लोक पापकर्म न करण्याची युक्ति दाखवीत आहे.

कोणी ध्यानमार्गानें आत्म्याच्या साहाय्यानें आत्म्याला स्वतःच्या ठायीं पाहतात; दुसरे कांहीं ज्ञानमार्गानें आणि दुसरे कित्येक कर्ममार्गानें. २४.

दुसरे कोणी हे मार्ग न जाणतां दुसऱ्यांच्या कडून परमात्म्याविषयीं ऐकून आणि ऐकलेल्यावर श्रद्धा ठेवून, त्यांत तन्मय होऊन, उपासना करतात. ते सुद्धां मृत्युमय संसाराला ओलांडून जातातच. २५.

: ४१ :

जी कोणतीही वस्तु, मग ती चर (जंगम) असो अगर अचर (स्थावर) असो, उत्पन्न होते, ती, हे भरतर्षभा, क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ, म्हणजेच प्रकृति आणि पुरुष यांच्या संयोगापासून होते, असें जाण. २६.

सर्व नाशवंत प्राण्यांच्या ठायीं अविनाशी परमेश्वर समभावानें वास करितो, हें जो जाणतो तोच त्याला ओळखतो. २७.

जो माणूस ईश्वराला सर्वत्र सारखेपणानें असलेला पाहतो, तो स्वतः स्वतःचा घात करीत नाहीं आणि त्यामुळें परम गतीला जाऊन पोंचतो. २८.

**टीप** : समभावानें असलेल्या ईश्वराला पाहाणारा स्वतः त्याच्यांत

सामावून जातो आणि दुसरें कांहीं पाहात नाहीं. म्हणून तो विकारवश होत नाहीं आणि त्या कारणानें तो मोक्ष पावतो, स्वतःचा शत्रु (आत्म-हत्यारा) बनत नाहीं.

प्रकृतिच सर्व कांहीं करते हें जो जाणतो आणि म्हणूनच जो "आत्मा अकर्ता आहे" असें जाणतो तोच खरा जाणकार होय. २९.

**टीप** : ज्याप्रमाणें निजलेल्या मनुष्याचा आत्मा निद्रेचा कर्ता नाहीं, परंतु प्रकृति निद्रेचें कर्म करते त्याप्रमाणें. निर्विकार पुरुषाचे डोळे घाणेरडें कांहीं पाहणार नाहींत. प्रकृति व्यभिचारिणी नसते. अभिमानी पुरुष ज्यावेळीं तिचा स्वामी बनतो, त्यावेळीं त्या समागमांतून विषयविकार उत्पन्न होतात.

जेव्हां तो (जाणकार) जीवांचें अस्तित्व भिन्न भिन्न असतांही एकाचेच ठायीं राहिलेलें अनुभवतो आणि सर्व विस्तार त्या (एकां)तून झाला आहे, याची प्रचीति घेतो त्यावेळीं तो ब्रह्मपदाला पोंचतो. ३०.

**टीप** : अनुभवानें सर्व ब्रह्मांतच पाहणें, यालाच "ब्रह्मपदाला पोंचणें" असें म्हणतात. त्यावेळीं जीव शिवापासून वेगळा राहात नाहीं (त्यांचें ऐक्य होतें).

हे कौंतेया, हा अविनाशी परमात्मा अनादि आणि निर्गुण असल्यामुळें शरीरांत राहून सुद्धां नाहीं कांहीं करीत आणि नाहीं कशानीं लिप्त होत. ३१.

ज्याप्रमाणें सर्वव्यापी आकाश सूक्ष्म असल्यामुळें (कशानेंही) लिप्त होऊं शकत नाहीं (मलिन होत नाहीं), त्याप्रमाणें सर्व देहांत राहणारा हा आत्मा (कोणत्याही कर्मानें) लिप्त होऊं शकत नाहीं. ३२.

ज्याप्रमाणें एकलाच सूर्य या अखिल जगताला प्रकाश देतो, त्याप्रमाणें हे भारता, क्षेत्री अखिल क्षेत्राला प्रकाशित करतो. ३३.

जें ज्ञानचक्षूंनीं क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्यामधला भेद, तसेंच प्रकृतीच्या बंधनांतून प्राण्यांची मुक्ति कशी होते, तें जाणतो, तो ब्रह्माला जाऊन पोंचतो. ३४.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला "क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग" या नांवाचा तेरावा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# १४. गुणत्रयविभागयोग

*त्रिगुणात्मक प्रकृतीची थोडी ओळख करून दिल्यानंतर ओघानेंच तीन गुणांचें वर्णन या अध्यायांत येत आहे. आणि तें करीत असतां गुणातीताचीं लक्षणें भगवान वर्णन करतात. दुसऱ्या अध्यायांत जीं लक्षणें स्थितप्रज्ञाचीं दिसून येतात, बाराव्या अध्यायांत जीं भक्ताचीं दिसतात, तींच या अध्यायांत गुणातीताचीं आहेत.*

: ४२ :

**श्रीभगवान म्हणाले :**

ज्ञानामध्यें जें उत्तम ज्ञान आहे आणि जें अनुभवून सगळे मुनि या देहबंधनांतून सुटल्यानंतर परमगतीला जाऊन पोंचले, तें मी तुला फिरून सांगतों. १.

या ज्ञानाचा आश्रय घेऊन जे माझ्या स्वरूपाप्रत पावले त्यांना (जगाच्या) उत्पत्तिकाळीं जन्मावें लागत नाहीं आणि प्रलयकाळीं नाशावें लागत नाहीं. २.

हे भारता, महद्ब्रह्म म्हणजे प्रकृति ती माझी योनि होय. तिच्यांत मी गर्भाचें आधान करतों आणि त्यापासून प्राणिमात्राची उत्पत्ति होते. ३.

हे कौंतेया, सर्व योनींमध्यें जे जे जीव उत्पन्न होतात त्यांचें उत्पत्तिस्थान महद्ब्रह्म म्हणजेच माझी प्रकृति होय, आणि तिच्यांत बीजारोपण करणारा पिता—पुरुष—मी होय. ४.

हे महाबाहो, प्रकृतीपासून उत्पन्न होणारे सत्त्व, रज आणि तम हे गुण अविनाशी देहधारी जीवाला या देहांत बांधून टाकतात. ५.

त्यांच्यापैकीं सत्त्व गुण निर्मळ असल्यामुळें प्रकाशक आणि आरोग्यकारी आहे आणि हे निष्पापा, तो देहीला सुखांत आणि ज्ञानांत आसक्ति निर्माण करून बांधून टाकतो. ६.

हे कौंतेया, रजोगुण अनुरागरूप असून तो तृष्णा आणि आसक्ति यांचें मूळ आहे, तो देहधारीला कर्मपाशांत बांधून टाकतो. ७

हे भारता, तमोगुण अज्ञानमूलक असल्यामुळें तो सर्व देहधाऱ्यांना मोहांत (जखडून) टाकतो आणि तो बेसावधपणा (गफलत), आळस आणि निद्रा या पाशांनीं देहीला बांधून टाकतो. ८.

हे भारता, सत्त्व आत्म्याला शांतिसुखाचा संग घडवितें. रज कर्माचा, आणि तम ज्ञानाला झांकून प्रमादाचा, संग घडवितें. ९.

हे भारता, ज्यावेळीं रज आणि तम (खालीं) दबलीं जातात, त्या वेळीं सत्त्व वर येतें. सत्त्व आणि तम दबलीं जातात तेव्हां रज, आणि सत्त्व आणि रज दबलीं जातात तेव्हां तम वर येतें. १०.

सर्व इंद्रियांच्या द्वारा या देहाच्या ठायीं ज्यावेळीं प्रकाश आणि ज्ञान यांचा उदय होतो, त्यावेळीं सत्त्वगुणाची वृद्धि झाली आहे, असें समजावें. ११.

हे भरतर्षभा, ज्यावेळीं रजोगुणाची वृद्धि होते त्यावेळीं लोभ, प्रवृत्ति, कर्मांचा आरंभ, अशांति (अतृप्ति) आणि इच्छा यांचा उदय होतो. १२.

हे कुरुनंदना, ज्यावेळीं तमोगुणाची वृद्धि होते त्यावेळीं अज्ञान, मंदता आणि बेसावधपणा व मूर्खपणा हीं उत्पन्न होतात. १३.

स्वतःच्या ठिकाणीं सत्त्वगुणाची वृद्धि झाली असतांना देहधाऱ्याला मृत्यु आला तर तो उत्तमविदांच्या (ज्ञात्यांच्या) निर्मळ लोकाला पावतो. १४.

रजोगुणांत मृत्यु आला तर तो देहधारी कर्मसंगींच्या लोकांत जन्मतो आणि तमोगुणांत मृत्यु पावणारा मूढयोनीमध्यें जन्म घेतो. १५.

**टीप** : कर्मसंगी म्हणजे मनुष्यलोक आणि मूढयोनि म्हणजे पशुलोक इत्यादि.

सत्कर्माचें फळ सात्त्विक आणि निर्मळ असतें. राजस कर्माचें फळ दुःखरूप असतें आणि तामस कर्माचें फळ अज्ञान हें असतें. १६.

**टीप** : ज्यांना आपण सुखदुःख मानतों त्या सुखदुःखांचा उल्लेख या ठिकाणीं घ्यायचा नाहीं. सुख म्हणजे आत्मानंद, आत्मप्रकाश. त्याच्या उलट तें दुःख. १७ व्या श्लोकांत ही गोष्ट स्पष्ट होते.

सत्त्वगुणांतून ज्ञान उत्पन्न होतें. रजोगुणांतून लोभ, आणि तमोगुणांतून बेसावधपणा, मोह आणि अज्ञान, हीं निपजतात. १७.

सात्त्विक माणसें वर ( उंच ) चढतात, राजस मध्यैंच राहतात. आणि निकृष्ट गुण असणारे तामस लोक अधोगतीला जातात. १८.

तत्त्वदर्शी ज्ञानी जेव्हां पाहतो कीं, गुणांखेरीज दुसरा कोणी कर्ता नाहीं आणि जेव्हां तो गुणांपलीकडे असणाऱ्या तत्त्वाला जाणतो, त्यावेळीं तो माझ्या स्वरूपाला येऊन पोंचतो. १९.

**टीप** : गुण हे 'कर्ता' आहेत हें पाहाणाऱ्याला अहंभाव असणारच नाहीं, त्यामुळें त्याचीं सर्व कामें स्वाभाविक घडतात आणि शरीरयात्रेपुरतींच होतात. आणि शरीरयात्रा ही परमार्थाकरितांच असल्यामुळें त्याच्या सर्व कार्यांत निरंतर त्याग आणि वैराग्य हीं असलीं पाहिजेत. अशा प्रकारचा ज्ञानी सहजच गुणांच्या पलीकडे असलेल्या निर्गुण ईश्वराची कल्पना करील, त्याला ओळखील आणि त्याची भक्ति करील.

देहाच्या संगामुळें उत्पन्न होणाऱ्या या तीन गुणांना तरून जाऊन

देहधारी जन्म, मृत्यु आणि जरा यांच्या दुःखांतून सुटतो आणि मोक्षाप्रत पावतो. २०.

: ४३ :

**अर्जुन म्हणाला :**

हे प्रभो, या गुणांना तरून जाणारा कोणत्या चिन्हांनीं ओळखतात ? त्याचे आचार कोणते ? आणि तो तीन गुणांना कोणत्या रीतीनें (साधनानें) तरून जातो ? २१.

**श्रीभगवान म्हणाले :**

हे पांडवा, प्रकाश, प्रवृत्ति आणि मोह हीं प्राप्त झालीं असतां जो दुःख मानीत नाहीं आणि तीं प्राप्त झालीं नाहींत म्हणून जो त्यांची इच्छा करीत नाहीं; उदासीनाप्रमाणें जो स्थिर असतो, ज्याला गुण विचलित करूं शकत नाहींत, 'गुणच आपापला भाग उचलीत आहेत' असें मानून जो स्थिर राहतो, विचलित होत नाहीं; जो सुखदुःखांत सारखा वागतो, स्वस्थ राहतो, मातीचें ढेंकूळ, दगड आणि सोनें यांना समान मानतो, प्रिय अथवा अप्रिय वस्तु प्राप्त झाली असतां जो सारखाच राहतो, स्वतःची निंदा किंवा स्तुति ज्याला सारख्याच वाटतात असा धीरगंभीर पुरुष, ज्याला मान आणि अपमान सारखेच आहेत, जो मित्रपक्ष आणि शत्रुपक्ष यांना सारखे लेखतो, आणि ज्यानें सर्व उद्योगांचा त्याग केला आहे त्याला गुणातीत म्हणतात.

२२–२३–२४–२५.

**टीप** : २२ ते २५ श्लोकांचा बरोबर (एकत्र) विचार करावयास हवा. प्रकाश, प्रवृत्ति आणि मोह पूर्वीच्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें सत्त्व, रज आणि तम यांचें अनुक्रमेंकरून परिणाम किंवा चिन्हें होत. म्हणून गुणांना

जो ओलांडून गेला आहे त्याच्यावर त्या परिणामांची छाप पडणार नाहीं हें सांगण्याचा यांत उद्देश आहे. दगड प्रकाशाची इच्छा करीत नाहीं, किंवा प्रवृत्ति अथवा जडता यांचा द्वेष करीत नाहीं. इच्छिल्याविना त्याला शांति असते; त्याला कोणी गति दिली तरी त्याचा तो द्वेष करीत नाहीं. गति दिल्यानंतर त्याला कोणी स्थिर करून सोडलें, त्यामुळें त्याची प्रवृत्ति – गति बंद पडली, मोह – जडता प्राप्त झाली असें त्याला (दगडाला) वाटन दुःख होत नाहीं; तर तिन्ही स्थितींत तो एकसारखा राहतो. दगड आणि गुणातीत यांच्यामध्यें फरक असा कीं, गुणातीत चैतन्यमय आहे, त्यानें ज्ञानपूर्वक गुणांच्या परिणामांचा, स्पर्शाचा त्याग केला आहे, आणि तो एकप्रकारें दगडासारखा बनला आहे. दगड गुणांच्या म्हणजे प्रकृतीच्या कार्यांचा साक्षी आहे, पण कर्ता नाहीं, तसाच ज्ञानी त्यांचा साक्षी असतो, कर्ता म्हणून रहात नाहीं. अशा ज्ञान्याच्या बाबतींत अशी कल्पना करणें शक्य आहे कीं तो २३ व्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें "गुण आपापलें कार्य करीत आहेत" असें समजत असल्यामुळें चळत नाहीं आणि अडग राहतो; "उदासीनाप्रमाणें बसतो," याचा अर्थ डगमगत नाहीं. ही स्थिति गुणांत गढून केलेले आपण सावधानतेनें, केवळ कल्पनाच करून समजूं शकतो, अनुभवूं शकत नाहीं. पण त्या कल्पनेला नजरेसमोर ठेवून आपण "अहं" पणाला दिवसेंदिवस निर्बल करूं तर शेवटीं गुणातीताच्या स्थितीच्या अगदीं नजीक जाऊं आणि त्या स्थितीचें दर्शन घेऊं. गुणातीत स्वतःच्या अवस्थेचा **अनुभव** घेतो, तिचें **वर्णन** करूं शकत नाहीं. त्याला जर तिचें वर्णन करतां आलें तर तो गुणातीत नव्हे, कारण कीं त्याच्यांत अहंभाव शिरला. सर्वांना सहज अनुभवास येणाऱ्या गोष्टी म्हणजे शांति, प्रकाश (सत्त्वगुण), धांदल-प्रवृत्ति (रजोगुण) आणि जडता-मोह (तमोगुण) — ह्या होत. सात्त्विकता ही गुणातीताच्या जवळच्यांत जवळची स्थिति आहे, असें गीतेंत ठायीं ठायीं स्पष्ट केलें आहे, म्हणून मनुष्यमात्राचा प्रयत्न सत्त्वगुण **अंगीं बाणविण्याचा** असावा. आणि शेवटीं त्याला गुणातीताची अवस्था प्राप्त होईलच असा त्यानें विश्वास बाळगावा.

जो एकनिष्ठ होऊन भक्तियोगानें माझी सेवा करतो, तो या

गुणांना ओलांडून ब्रह्मरूप बनण्यास पात्र होतो. २६.

ही ब्रह्माची स्थिति ती मीच, शाश्वत मोक्षाची अवस्था ती मीच, तसेंच सनातन धर्म आणि उत्तम सुख यांची प्रतिष्ठा सुद्धां मीच आहे. २७.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याहि आहे आणि योगशास्त्रहि आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला "गुणत्रयविभागयोग" या नांवाचा चौदावा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# १५. पुरुषोत्तमयोग

*या अध्यायांत क्षर आणि अक्षर यांच्या पलीकडचें असें आपलें उत्तम स्वरूप भगवानांनीं समजावून सांगितलें आहे.*

: ४४ :

**श्रीभगवान म्हणाले :**

ज्याचें मूळ वर आहे, ज्याच्या शाखा खालीं आहेत, आणि वेद ज्याचीं पानें आहेत, असा जो अविनाशी अश्वत्थ "संसारवृक्ष" म्हणतात, त्याला जो जाणतो तो वेद जाणणारा ज्ञानी होय. १.

**टीप** : "श्वः" म्हणजे उद्यां. त्यापासून अ-श्व-त्थ म्हणजे उद्यांपर्यन्त न टिकणारा असा क्षणिक संसार. संसाराचें प्रतिक्षणीं रूपान्तर होत असतें म्हणून तो अश्वत्थ[१] होय. पण अशा स्थितींत तो नेहमीं राहणार असल्यामुळें आणि त्याचें मूळ "ऊर्ध्व" म्हणजे ईश्वर असल्यामुळें तो (संसार) शाश्वत, अविनाशी आहे. त्यावर वेद म्हणजे धर्माचें शुद्ध ज्ञान, हींच पानें नसतील तर तो शोभणार नाहीं. याप्रमाणें संसाराचें यथार्थ ज्ञान ज्याला झालें आहे आणि जो धर्माला जाणतो, तो ज्ञानी होय.

गुणांच्या संबंधामुळें वृद्धि पावलेल्या आणि विषयांची पालवी फुटलेल्या अशा या अश्वत्थ वृक्षाच्या डाहाळ्या खालवर पसरलेल्या आहेत; कर्माचें बंधन करणारीं त्याचीं मुळें मनुष्यलोकांत खालीं फैलावलीं आहेत. २.

---

१ अश्वत्थाची "क्षणिक" या अर्थाची व्युत्पत्ति मागाहूनची असावी. मुळांत ज्या प्रचंड वृक्षाखालीं घोडे (अश्व) उभे (स्थ) राहण्याची जागा असे, त्याला "अश्वत्थ" हें अन्वर्थ नांव होतें; पहा : ऋ. १०-९७-५ "अश्वत्थे वो निषदनं पर्णे वो वसतिष्कृता"; शांभा : "न श्वः अपि स्थाता इति अश्वत्थः क्षणप्रध्वंसी..."

**टीप** : अज्ञानी पुरुषाच्या दृष्टीनें संसारवृक्षाचें हें वर्णन आहे. त्या वृक्षाचें वर, ईश्वरामध्यें असलेलें मूळ तो पाहात नाहीं, तर विषयांच्या रमणीयतेंत गुंग होऊन तिन्ही गुणांनीं या वृक्षाला तो पुष्ट करतो आणि मनुष्यलोकांत कर्मपाशांनीं बांधलेला राहतो.

या (वृक्षा)चें यथार्थ स्वरूप पाहण्यांत येत नाहीं. त्याला अंत नाहीं, आदि नाहीं, पाया नाहीं; खूप खोलवर मुळें गेलेल्या या अश्वत्थ वृक्षाला असंगरूपी बलवान् शस्त्रानें तोडून (टाकून) मनुष्यानें ही प्रार्थना करावी :

" ज्यानें सनातनप्रवृत्तीचा–मायेचा पसारा मांडला आहे, त्या आदिपुरुषाला मी शरण[१] जात आहें !" आणि त्या पदाचा त्यानें शोध घ्यावा कीं जेथें गेलें असतां फिरून जन्ममरणाच्या चक्रांत पडावें लागत नाहीं. ३–४.

**टीप** : असंग म्हणजे असहकार, वैराग्य. जोंपर्यंत मनुष्य विषयांबरोबर असहकार करणार नाहीं, त्यांच्या प्रलोभनांतून दूर सरणार नाहीं तोंपर्यंत तो त्यांत अडकतच राहणार. विषयांशीं खेळावयाचें आणि त्यांच्यापासून अलग राहावयाचें, हें जमायचें नाहीं, असें हे श्लोक बजावीत आहेत.

ज्यांनीं मानाचा आणि मोहाचा त्याग केला आहे, ज्यांनीं आसक्तीमुळें येणारे दोष दूर केले आहेत, जे आत्म्याच्या ठायीं नेहमीं निमग्न असतात, ज्यांचे विषय ( वासना ) शमले आहेत, जे सुखदु:ख-संज्ञ द्वंद्वांपासून मुक्त आहेत, असे ज्ञानी अविनाशी पदाला पावतात. ५.

---

१ "प्रपद्ये" ऐवजीं "प्रपद्येत्" असा पाठ कांहीं घेतात; उ. गीताईकार : "द्यावी बुडी त्या परमात्मतत्त्वीं". शांभा : "पुरुषं प्रपद्ये" इति एवं परिमार्गितव्यं तच्छरणतया इत्यर्थ: ।

त्या ( स्थाना )ला सूर्य, चन्द्र किंवा अग्नि यांनीं प्रकाश पाडावयाचा आहे असें नाहीं; जेथें जाणाऱ्याला फिरून जन्मावें लागत नाहीं, तें माझें परम धाम होय. ६.

माझाच सनातन अंश जीवलोकांत जीव होऊन प्रकृतींत असलेल्या मनाला आणि पांच इंद्रियांना ओढून घेतो. ७.

शरीराचा मालक म्हणजेच जीव जेव्हां शरीर धारण करतो किंवा सोडून जातो तेव्हां वारा ज्याप्रमाणें पुष्पादिकांतून वास घेऊन जातो त्याप्रमाणें तो ( जीव ) मन आणि त्याच्याबरोबर इंद्रियें यांना आपणाबरोबर नेतो. ८.

आणि कान, डोळे, त्वचा, जीभ, नाक तसेंच मन यांचा आश्रय घेऊन तो विषयांचें सेवन करितो. ९.

**टीप** : या ठिकाणीं " विषय " शब्दाचा अर्थ " बीभत्स विलास " असा नसून त्या त्या इंद्रियांच्या " स्वाभाविक क्रिया " असा आहे; जसें, डोळ्यांचा विषय " पाहणें ", कानांचा " ऐकणें ", जिभेचा " चाखणें ". या क्रिया जेव्हां विकारयुक्त, अहंभावयुक्त होतात त्यावेळीं त्या दूषित --बीभत्स ठरतात. निर्विकार असतात त्यावेळीं त्या निर्दोष होत. लहान मुलानें डोळ्यानें पाहिलें किंवा हातानें स्पर्श केला तरी त्याचे ठायीं विकार उठत नाहींत. म्हणून खालच्या श्लोकांत सांगितलें आहे.

(शरीराचा) त्याग करणारा अथवा त्यांत राहणारा, तसेंच गुणांच्या आधारानें विषयभोग घेणारा असा जो ( हा अंशरूपी ईश्वर ) त्याला मूर्ख पाहत नाहींत, तर ज्ञानी दिव्यचक्षूंनीं पाहतात. १०.

यत्न करणारे योगीलोक अंतर्यामीं असणाऱ्या या ईश्वराला पाहतात. याउलट ज्यांनीं स्वतःच्या स्वभावाला वळण लावलेलें नाहीं, आत्मशुद्धि केली नाहीं असे मूर्ख लोक प्रयत्न करून सुद्धां या ईश्वराला ओळखूं शकत नाहींत. ११.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३०६ वि: निबंध
क्रमांक १२०९ नों. दि: २२।३।६०

**टीप** : यामध्यें, आणि नवव्या अध्यायांत दुराचरणी लोकांना भगवानानें जें वचन[१] दिलें आहे त्यामध्यें, विरोध नाहीं. अकृतात्मा म्हणजे भक्तिहीन, स्वेच्छाचारी, दुराचारी.

नम्रपणानें श्रद्धापूर्वक जो ईश्वराला भजतो त्याची आत्मशुद्धि होते व तो ईश्वराला ओळखतो. जो यमनियमादि साधनांची पर्वा न करितां केवळ बुद्धीच्या (तर्कादि) जोरावर ईश्वराला ओळखूं पाहतो, तो अचेता—चित्त नसलेला, राम नसलेला, रामाला ओळखूं शकत नाहीं.

: ४५ :

सूर्यांत असलेलें जें तेज अखिल जगताला प्रकाश देतें आणि जें तेज चंद्रांत आणि अग्नींत आहे, तें माझें आहे असें ओळख. १२.

पृथ्वीमध्यें प्रवेश करून माझ्या शक्तीनें मी प्राण्यांना (पृथ्वीवर) धारण करतों, आणि रस उत्पन्न करणारा सोम (म्हणजे चंद्र होऊन) सर्व वनस्पतींचें मी पोषण करितों. १३.

जठराग्नि बनून प्राण्यांच्या देहाचा आश्रय घेऊन मी प्राण आणि अपान या वायूंच्या द्वारा चारी प्रकारचीं अन्नें पचवितों. १४.

मी सर्वांच्या हृदयांत वास करितों; माझ्यामुळेंच स्मृति, ज्ञान आणि त्यांचा अभाव हीं (सर्व) होतात. सर्व वेदांनीं जाणण्याजोगा तो मीच आहे, वेदांना जाणणारा आणि वेदान्ताला प्रगट करणारा सुद्धां मीच आहे. १५.

: ४६ :

या लोकांत क्षर म्हणजे नाशवंत आणि अक्षर म्हणजे अविनाशी असे दोन पुरुष आहेत. भूतमात्र तें "क्षर" होय; आणि

---

[१] गीता अध्याय ९ श्लोक ३०

त्यांच्यांत जो स्थिर असलेला अंतरात्मा आहे त्याला "अक्षर" म्हणतात. १६.

यांखेरीज एक दुसरा "उत्तम" पुरुष आहे; त्याला "परमात्मा" असें म्हणतात. हा अव्यय ईश्वर तिन्ही लोकांत प्रवेश करून त्याचें धारणपोषण करितो. १७.

कारण असें कीं, मी "क्षरा" च्या पलीकडे आहे आणि "अक्षरा"हून ही उत्तम आहे; म्हणून वेदामध्यें आणि लोकामध्यें मी "पुरुषोत्तम" या नांवानें प्रसिद्ध आहे. १८.

हे भारता, मोहरहित होऊन मला, पुरुषोत्तमाला याप्रमाणें जो जाणतो, तो सर्व (कांहीं) जाणतो आणि सर्वभावानें मला भजतो. १९.

हे निष्पापा, गुह्यांतलें गुह्य असें हें शास्त्र मीं तुला सांगितलें. हे भारता, हें जाणल्यानें मनुष्यानें बुद्धिमान व्हावें आणि आपल्या आयुष्याचें सार्थक करावें. २०.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुन संवादांत आलेला "पुरुषोत्तमयोग" या नांवाचा पंधरावा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# १६. दैवासुरसंपद्विभागयोग

*या अध्यायांत दैवी आणि आसुरी संपत्तींचें वर्णन आहे.*

: ४७ :

**श्रीभगवान म्हणाले :**

हे भारता, अभय, अंतःकरणाची शुद्धि, ज्ञान आणि योग यांच्या ठायीं निष्ठा, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, अपैशुन, भूतदया, अलोलुपता, मार्दव, मर्यादा, अचंचळपणा, तेज, क्षमा, धृति, शुचिता, अद्रोह, निरभिमान—इतके गुण, जो दैवी संपत्ति घेऊन जन्माला आला आहे, त्याच्यांत असतात. १-२-३.

**टीप** : दम म्हणजे इंद्रियनिग्रह; अपैशुन म्हणजे कोणाचीही चहाडी न करणें; अलोलुपता म्हणजे हावरा न होणें, लंपट न होणें; तेज म्हणजे प्रत्येक हीनवृत्तीविरुद्ध उभे राहण्याची हिंमत; अद्रोह म्हणजे कोणाचेंही वाईट न चिंतणें किंवा न करणें.

हे पार्था, दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरपणा आणि अज्ञान इतके गुण आसुरी संपत्ति घेऊन जन्माला आलेल्यांत असतात. ४.

**टीप** : जें स्वतःमध्यें नाहीं तें दाखविणें हा दंभ, ढोंग, पाखंड; दर्प म्हणजे बढाई.

दैवी संपत्ति मोक्ष देणारी आणि आसुरी संपत्ति बंधनांत टाकणारी आहे. हे पांडवा, तूं विषाद मानूं नकोस. तूं दैवी संपत्ति घेऊन जन्माला आला आहेस. ५.

: ४८ :

या लोकांत दोन प्रकारची सृष्टि आहे; दैवी आणि आसुरी. हे पार्था, दैवीचें विस्तारपूर्वक वर्णन केलें; आसुरीचें आतां ऐक. ६.

आसुर लोक प्रवृत्ति (म्हणजे) काय आणि निवृत्ति (म्हणजे) काय, काय केलें पाहिजे आणि काय न केलें पाहिजे हें जाणत नाहींत. तसेंच त्यांना नाहीं होत शुचिता किंवा आचार यांचें भान आणि त्यांच्यामध्यें नसतें सत्य. ७.

ते म्हणतात: जगत् खोटें (आहे), त्याला (धर्माचा) आधार नाहीं, नाहीं त्याला ईश्वर; केवळ स्त्रीपुरुषांच्या संबंधांतून तें निर्माण झालें आहे. त्यांत विषयोपभोगाशिवाय दुसरा कोणता हेतु असणार? ८.

या विचाराचा आग्रह धरून भयानक कृत्यें करणारे, ते मंदमति, दुष्ट, जगाचे शत्रू बनून त्याच्या नाशासाठीं मोठ्या संख्येनें निपजतात. ९.

कधींही पुऱ्या न होणाऱ्या अशा वासना मनांत वागवून हे ढोंगी, मानी, मदोन्मत्त, कुबुद्धि लोक मोहामुळें दुष्ट इच्छा बाळगून (कर्में करण्यास) प्रवृत्त होतात! १०.

ज्यांना कधीं अंतच नाहीं अशा अफाट चिंतांचा प्रलयापर्यंत आश्रय करून कामांच्या उपभोगामागें लागलेले, "भोग हेंच सर्वस्व आहे," असा दृढ ग्रह करून घेतलेले, शेंकडों आशांच्या जाळ्यांत सांपडलेले, कामी, क्रोधी, विषयोपभोगासाठीं अन्यायानें अर्थसंचय करूं इच्छितात. ११-१२.

"आज मीं हें मिळविलें, आतां हा मनोरथ मी पुरा करीन; एवढें धन माझ्यापाशीं आहे, आणखी उद्यां एवढें दुसरें माझें होईल; या शत्रूला तर मारलें, दुसऱ्यांना पण मारीन; मी सर्वसंपन्न आहे, भोगी आहे; मी सिद्ध आहे, बलाढ्य आहे, सुखी आहे; मी श्रीमंत आहे, कुलीन आहे; माझ्यासारखा दुसरा कोण आहे? मी यज्ञ करीन, दान देईन, चैन करीन" अशा रीतीनें अज्ञानानें

मोहित झालेले लोक खुषींत असतात; आणि अनेक भ्रांतींत पडून, मोहजालांत अडकून विषयभोगांत मस्त झालेले लोक अशुभ अशा नरकांत पडतात. १३-१४-१५-१६.

आपणच आपल्याला मोठे मानणारे, ताठ्यांत असलेले, संपत्ति आणि मानसन्मान यांच्या मदानें धुंद झालेले असे हे लोक विधि-विधानाची बूज न ठेवतां ढोंगानें केवळ नांवाचे यज्ञ करितात. १७.

ते अहंकार, बळ, घमेंड, काम आणि क्रोध यांचा आश्रय घेणारे, (दुसऱ्याची) निंदा करणारे आणि स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्या अंतःकरणांत राहणाऱ्या माझा द्वेष करणारे असतात. १८.

ह्या नीच, द्वेषी, क्रूर, अमंगल नराधमांना मी या संसारांतील आसुरी योनींतच वारंवार ढकलतों. १९.

हे कौंतेया, जन्मजन्मांतरीं आसुरी योनि पावून आणि मला येऊन न मिळाल्यामुळें हे मूढ लोक याहीपेक्षां अधमतर गतीला जाऊन पोंचतात. २०.

: ४९ :

आत्म्याचा नाश करणारें, नरकाचें हें तिहेरी दार आहे: काम, क्रोध आणि लोभ. म्हणून या तिन्हींचा माणसानें त्याग करावा. २१.

हे कौंतेया, या तिहेरी नरकद्वारापासून दूर राहणारा माणूस आत्म्याचें कल्याण आचरितो आणि तो परम गतीला पावतो. २२.

जो मनुष्य शास्त्रविधि सोडून देऊन स्वच्छंदानें भोग भोगण्यांत आनंद मानून असतो त्याला नाहीं मिळत सिद्धि कीं सुख; परम गतिसुद्धां त्याला मिळत नाहीं. २३.

**टीप** : " शास्त्रविधि " याचा अर्थ धर्म म्हणून मान्यता पावलेल्या ग्रन्थांत सांगितलेल्या अनेक क्रिया नव्हेत, तर साक्षात्कारी सत्पुरुषांनीं रुळविलेला संयममार्ग.

म्हणून कार्य कोणतें आणि अकार्य कोणतें यांचा निर्णय करतांना तूं शास्त्राला प्रमाण[१] मान. शास्त्रविधि काय आहे तो जाणून या लोकीं तूं कर्म करणें योग्य आहे. २४.

**टीप** : शास्त्राचा वर जो अर्थ सांगितला तोच येथेंही आहे. सगळ्यांनीं आपापला नियम बनवून स्वेच्छाचारी बनूं नये, तर धर्माचा साक्षात्कार झालेल्यांचें वचन प्रमाण मानावें हा या श्लोकाचा आशय आहे.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला " दैवासुरसंपद्विभागयोग " या नांवाचा सोळावा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

---

१ पाहिजे तर " तस्माच्छात्रं प्रमाणं ते " ( १६–२४ ) यांत "इति गुह्यतमं शास्त्रं" ( १५.२० ) याचा उल्लेख असेल तो कां मानूं नये ? शिवाय शास्त्राची व्याख्या पाहा : " यास्तेषां स्वैरकथास्ता एव भवन्ति शास्त्राणि "; उदाहरणार्थ, स्वामी रामकृष्ण परमहंसांचें "कथामृत".

# १७. श्रद्धात्रयविभागयोग

शास्त्राला म्हणजेच शिष्टाचाराला प्रमाण मानावें असें ऐकल्यावर अर्जुनाला शंका आली कीं ज्याला शिष्टाचार कबूल नाहीं पण जो श्रद्धेनें वागतो त्याची काय गत होते ? त्याचें उत्तर देण्याचा, या अध्यायांत, प्रयत्न आहे. पण शिष्टाचाररूपी दीपगृहाला सोडल्यानंतरच्या श्रद्धेंत धोका भरला आहे, असें दाखवून भगवानांनीं संतोष मानला आहे. आणि म्हणून श्रद्धा आणि तिच्या आश्रयानें राहणाऱ्या यज्ञ, तप, दान इत्यादिकांचे गुणांप्रमाणें तीन विभाग करून दाखविले आहेत आणि शेवटीं ॐ तत् सत् चा महिमा गायिला आहे.

: ५० :

**अर्जुन म्हणाला :**

हे कृष्णा, शास्त्रविधि म्हणजे शिष्टाचार, त्याला बाजूला सारून जे केवळ श्रद्धेनेंच पूजा इत्यादि करतात, त्यांची वृत्ति कशी म्हणावयाची ? सात्त्विक, राजस कीं तामस ? १.

**श्रीभगवान म्हणाले :**

माणसाची त्याच्या स्वभावाप्रमाणें तीन प्रकारची श्रद्धा असते, सात्त्विक, राजस आणि तामस. ती तूं ऐक. २.

हे भारता, सर्वांची श्रद्धा त्यांच्या स्वतःच्या प्रकृति-स्वभावाला धरून असते; मनुष्याला कांहीं ना कांहीं श्रद्धा ही असतेच. ज्याची जशी श्रद्धा तसा तो होतो. ३.

सात्त्विक लोक देवांना भजतात, राजस लोक यक्ष आणि राक्षस यांना आणि बाकी राहिलेले तामस लोक भूतप्रेतादिकांना भजतात. ४.

दंभ आणि अहंकार यांनीं युक्त, तसेंच काम आणि आसक्ति यांच्या बळानें प्रेरित झालेले जे लोक शास्त्रीय विधीला सोडून असलेलें, घोर तप आचरतात, ते मूर्ख लोक शरीरांतील पंचमहाभूतांना आणि अंतःकरणांतील मलाही कष्ट देतात. अशांना आसुरी निष्ठा असलेले लोक समज. ५–६.

आहार देखील माणसाला तीन प्रकारांनीं प्रिय होतो. तसेंच यज्ञ, तप आणि दान हींही तीन प्रकारें प्रिय होतात. त्यांचा हा भेद तूं ऐक. ७.

आयुष्य, सात्त्विकपणा, बळ, आरोग्य, सुख आणि रुचि वृद्धिंगत करणारा, सरस, स्निग्ध, पौष्टिक आणि मनाला प्रसन्न करणारा असा आहार सात्त्विक लोकांना आवडतो. ८.

तिखट, आंबट, खारट, फार गरम, चमचमीत, रुक्ष, जळजळीत असा आहार राजस लोकांना आवडतो. तो ( आहार ) दुःख, शोक आणि रोग पैदा करणारा असतो. ९.

प्रहरभर पडून राहिलेला, नीरस झालेला, वाशेळा, पारोसा, उष्टा, अपवित्र असा आहार ( भोजन ) तामस लोकांना आवडतो. १०.

ज्यांत फळाची अपेक्षा नाहीं, जो विधिपूर्वक, कर्तव्यबुद्धीनें, मन लावून होतो तो यज्ञ सात्त्विक होय. ११.

हे भरतश्रेष्ठा, जो फळाच्या उद्देशानें आणि वर दंभपूर्वक होतो, त्या यज्ञाला राजस समज. १२.

ज्या यज्ञांत विधि नाहीं, अन्नाची उत्पत्ति आणि संतर्पण नाहीं, मंत्र नाहीं, श्रद्धा नाहीं, त्याला तामस यज्ञ असें म्हणतात. १३.

देव, ब्राह्मण, गुरु आणि ज्ञानी यांची पूजा, पावित्र्य, सरळपणा, ब्रह्मचर्य, अहिंसा याला शारीरिक तप म्हणतात. १४.

दुःखदायक ( बोंचक ) नाहीं असें, सत्य, प्रिय, हितकर वचन आणि धर्मग्रन्थांचा अभ्यास याला वाचिक तप असें म्हणतात. १५.

मनाची प्रसन्नता, सौम्यपणा, मौन, आत्मसंयम, भावनाशुद्धि याला मानसिक तप असें म्हणतात. १६.

समत्ववान् पुरुष जेव्हां फलाशेचा त्याग करून परमश्रद्धापूर्वक हें तीन प्रकारचें तप करतात, तेव्हां त्या तपाला शहाणे लोक सात्त्विक तप असें म्हणतात. १७.

सत्कार, मान आणि पूजा यांच्यासाठीं दंभपूर्वक जें आचरिलें जातें, त्या अस्थिर आणि अनिश्चित तपाला राजस तप असें म्हणतात. १८.

जें तप स्वतःला पीडा देऊन, दुराग्रहानें अथवा दुसऱ्याचा नाश करण्यासाठीं केलें जातें त्या तपाला तामस तप असें म्हणतात. १९.

देणें कर्तव्य आहे असें समजून, तसेंच मोबदला मिळण्याची आशा न ठेवतां देश, काल आणि पात्र यांचा विचार करून जें दान होतें, तें सात्त्विक दान म्हटलें आहे. २०.

जें दान मोबदला मिळविण्यासाठीं अथवा फळावर नजर ठेवून आणि मोठ्या कष्टानें देण्यांत येतें, तें राजस दान म्हटलें आहे. २१.

भलत्या ठिकाणीं, भलत्या वेळीं आणि कुपात्रीं दिलेलें, किंवा अपमान करून, तुच्छतापूर्वक देण्यांत आलेलें दान तामस म्हटलें आहे. २२.

: ५१ :

"ॐ तत् सत्" असें तीन प्रकारांनीं ब्रह्माचें वर्णन झालेलें आहे, आणि या निर्देशानें पूर्वीं ब्राह्मण, वेद आणि यज्ञ यांची निर्मिति झालेली आहे. २३.

म्हणून ब्रह्मवाद्यांच्या यज्ञ, दान आणि तप या क्रिया नेहमीं " ॐ " चें उच्चारण करून विधीप्रमाणें होतात. २४.

खेरीज, " तत् " असा उच्चार करून फलाची आशा न ठेवतां मुमुक्षु यज्ञ, तप आणि दान या विविध क्रिया करतात. २५.

सत्य आणि कल्याण या अर्थी " सत् " शब्दाचा प्रयोग होतो. आणि हे पार्था, शुभ कर्म या अर्थीं सुद्धां " सत् " शब्द वापरला जातो. २६.

यज्ञ, तप आणि दान यांच्या ठायीं दृढता, हिला सुद्धां " सत् " म्हणतात. यज्ञादिसाठींच कर्म आहे अशा संकल्पालाही " सत् " असें म्हणतात. २७.

**टीप** : वरील तीन श्लोकांचा भावार्थ असा झाला कीं, प्रत्येक कर्म ईश्वरार्पणबुद्धीनेंच करावें; कारण " ॐ " हेंच " सत् " आहे, सत्य आहे. त्याला अर्पण केलेलेंच उगवणार.

हे पार्था, यज्ञ, दान, तप आणि इतर कर्म, जें श्रद्धेशिवाय होतें, तें "असत्" म्हटलें जातें. तें नाहीं इहलोकाच्या कामाचें, कीं नाहीं परलोकाच्या. २८.

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुनसंवादांत आलेला " श्रद्धात्रयविभागयोग " या नांवाचा सतरावा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला.

# १८. संन्यासयोग[१]

हा अध्याय उपसंहाररूप म्हणतां येईल. त्याचा, किंबहुना सगळ्या गीतेचा प्रेरक मंत्र हा सांगतां येईल: "सर्व धर्मांना[२] टाकून मला शरण ये". हा खरा संन्यास होय. पण सर्व धर्मांचा त्याग म्हणजे सर्व कर्मांचा त्याग नव्हे. परोपकारार्थ कर्में सुद्धां ईश्वराला अर्पण करणें आणि फलेच्छा सोडणें, हेंच सर्वोत्कृष्ट कर्म होय; हाच सर्वधर्मत्याग किंवा संन्यास होय.

: ५२ :

**अर्जुन म्हणाला :**

हे महाबाहो, हे हृषीकेशा, हे केशिनिषूदना, संन्यास आणि त्याग यांचें वेगवेगळें रहस्य जाणण्याची माझी इच्छा आहे. १.

**श्रीभगवान म्हणाले :**

कामनेमुळें निर्माण झालेल्या (काम्य) कर्मांच्या त्यागाला ज्ञाते लोक संन्यास या नांवानें ओळखतात. सर्व कर्मांच्या फळाच्या त्यागाला शहाणे लोक त्याग म्हणतात. २.

कित्येक विचारवंत पुरुष सांगत असतात: कर्ममात्र दोषमय असल्यामुळें टाकणें योग्य आहे; दुसरे सांगतात: यज्ञ, दान आणि तप या कर्मांचा त्याग योग्य नाहीं. ३.

हे भरतसत्तमा, [३]या त्यागाविषयीं माझा निर्णय ऐक. हे पुरुषव्याघ्रा, त्याग तीन प्रकारांनीं वर्णिला आहे. ४.

---

[१] गी. १८-४९. [२] गी. १८.६६. [३] पुढील ५-६ आणि ७-८-९ यांचा हा श्लोक "संग्रहश्लोक" आहे, असें म्हणतां येईल. १०-११-१२ यांत "त्यागा"विषयीं विवेचन व स्तुति आहे.

यज्ञ, दान आणि तप हीं कर्में त्याज्य नाहींत, पण तीं करणें योग्य आहे. यज्ञ, दान आणि तप हीं विवेकी माणसांना पावन करणारीं आहेत. ५.

हे पार्था, हीं कर्में सुद्धां आसक्ति आणि फलेच्छा सोडून केलीं पाहिजेत, असें माझें निश्चित आणि उत्तम मत आहे. ६.

नियत कर्माचा त्याग योग्य नाहीं. मोहाला वश होऊन जर त्याचा त्याग केला तर तो त्याग तामस मानला जातो. ७.

दुःखकारक समजून शरीराला कष्ट होतील या भीतीनें कर्मांचा जो त्याग होतो, तो राजस त्याग असून त्याला त्यागाचें फळ मिळत नाहीं. ८.

हे अर्जुना, कर्तव्याच्या भावनेनें जें नियत कर्म संग आणि फल यांचा त्याग करून केलें जातें, तो त्याग सात्त्विक मानला आहे. ९.

संशयरहित झालेला, शुद्ध भावना असलेला, त्यागी आणि बुद्धिमान पुरुष कठिण (किंवा अवघड) कर्माचा द्वेष करीत नाहीं, अथवा सोप्या (किंवा सहज होणाऱ्या) कर्मांत आनंद मानीत नाहीं. १०.

कर्मांचा पूर्णपणें त्याग करणें देहधारीला शक्य नाहीं. पण जो कर्मफलाचा त्याग करतो तो त्यागी म्हटला जातो. ११.

त्याग न करणाऱ्याला कर्माचें फळ [१]कालांतरानें तीन प्रकारचें मिळतें : अशुभ, शुभ आणि शुभाशुभ (मिश्र). जे त्यागी (संन्यासी) आहेत त्यांना कधींही तसें मिळत नाहीं. १२.

---

[१] मुळांत 'प्रेत्य' आहे; त्याचा 'रूढ' अर्थ 'मेल्यावर; परलोकांत'; पहा गी. १७-२८ 'न च तत्प्रेत्य नो इह'. या ठिकाणीं 'प्रेत्य' = 'आगळ जतां' असा 'यौगिक' अर्थ केला आहे. पहा: ऋ. १·३३·४ 'अयज्वानः सनकाः प्रेतिमीयुः', येथें ही 'मरणं प्राप्ताः' असा अर्थ आहे.

: ५३ :

हे महाबाहो, कर्ममात्राच्या सिद्धीविषयीं सांख्यशास्त्रांत पांच कारणें सांगितलीं आहेत. तीं माझ्याजवळून समजून घे. १३.

तीं पांच हीं होत : क्षेत्र (अधिष्ठान), कर्ता, विविध प्रकारचीं साधनें, वेगवेगळ्या क्रिया, आणि पांचवें दैव. १४.

कायेनें, वाचेनें अथवा मनानें जें 'कोणतेंही कर्म मनुष्य नीतीला धरून 'किंवा नीतीला सोडून करतो, त्याचीं हीं पांच कारणें असतात. १५.

असें असलें तरी असंस्कारी बुद्धीमुळें जो स्वतःलाच कर्ता मानतो, त्या मूर्खाला कांहीं समजत नाहीं. १६.

ज्याच्यामध्यें (मी करीत आहे असा) अहंकारभाव नाहीं, ज्याची बुद्धि (आसक्तीच्या योगें) मलिन नाहीं, तो या जगाला मारूनही मारीत नाहीं, बंधनांत पडत नाहीं. १७.

**टीप** : वरवर वाचला असतां हा श्लोक माणसाला गोंधळांत टाकणारा आहे. गीतेंतले पुष्कळ श्लोक "कल्पनेंतील आदर्श"ला पुढें ठेवून रचले आहेत. त्याचा अचूक (किंवा हुबेहूब) नमुना जगांत सांपडायचा नाहीं. तथापि उपयोगासाठीं सुद्धां ज्याप्रमाणें भूमितींत काल्पनिक, आदर्श आकृतींची आवश्यकता असते तशीच ती धर्मव्यवहाराच्या पोटीं असते. म्हणून या श्लोकाचा अर्थ असाच बशिवतां येईल :

ज्याची अहंता (जळून) खाक झाली आहे आणि ज्याच्या बुद्धींत लेशमात्र मळ नाहीं, तो 'साऱ्या जगाला मारतो' असें खुशाल म्हणावें. पण ज्याच्यांत अहंता नाहीं, त्याला शरीरच नाहीं. ज्याची बुद्धि विशुद्ध आहे, तो त्रिकाळदर्शी असतो. अशा प्रकारचा पुरुष तर केवळ एक भगवान आहे. तो करून सुद्धां अकर्ता आहे; हिंसा करून सुद्धां अहिंसक आहे. म्हणून मनुष्याजवळ तर एक न मारण्याचा आणि शिष्टाचाराचा —शास्त्राचा—च मार्ग आहे.

कर्माच्या प्रेरणेंत तीन तत्त्वें सामावलेलीं असतात : ज्ञान, ज्ञेय, आणि परिज्ञाता. कर्माचीं अंगें तीन प्रकारचीं असतात. : इंद्रियें, क्रिया आणि कर्ता. १८.

**टीप :** यामध्यें विचार आणि आचार यांचें समीकरण आहे. पहिल्यांदा मनुष्य, करायचें काय (ज्ञेय), त्याची रीत (ज्ञान) जाणतो —(परिज्ञाता) बनतो. हा कर्मप्रेरणाचा प्रकार झाल्यानंतर तो इंद्रियां(करण)मार्फत क्रियांचा (कर्म) करणारा (कर्ता) बनतो. हा कर्मसंग्रह.

ज्ञान[१], कर्म आणि कर्ता — हीं गुणभेदाप्रमाणें तीन प्रकारचीं आहेत. गुणसंख्यानशास्त्रांत जशीं तीं सांगितलीं आहेत, तशीं ऐक. १९.

**टीप :** नियत कर्म म्हणजे मनाच्या साहाय्यानें इंद्रियांना नियमनांत (ताब्यांत) ठेवून केलेलें कर्म; पहा टीप ३–८ (अध्याय ३ श्लोक८).

ज्याच्या योगानें मनुष्य सगळ्या भूतांत एकच अविनाशी भाव (जाणतो) आणि विविधतेंत एकता पाहतो, तें सात्त्विक ज्ञान समज. २०.

वेगवेगळे (दिसणारे) असल्यामुळें सर्व भूतांत ज्यामुळें मनुष्य वेगवेगळे विभागलेले भाव पाहतो, तें राजस ज्ञान जाण. २१.

ज्यामुळें कांहीं कारण (युक्ति) नसलेलें, एकाच गोष्टींत सर्व (कांहीं) येऊन जातें असें मानून आसक्त राहतो, आणि ज्यांत रहस्य (किंवा मतलबाची बाब) नसतें आणि जें तुच्छ असतें, त्याला तामस ज्ञान म्हणतात. २२.

फलेच्छारहित पुरुषानें आसक्ति आणि रागद्वेष सोडून केलेलें नियत कर्म सात्त्विक म्हटलें जातें. २३.

---

[१] ज्ञान आणि कर्म या जोडीच्या प्रत्येकीं तीन प्रमाणें सहा विभागांपैकीं विचारार्थ ज्ञान, कर्म आणि कर्ता हीं तीन घेतलीं आहेत.

भोगाची इच्छा बाळगणारा, " मी कर्ता आहे " अशा ( अहं- ) भावानें आणि मोठ्या खटाटोपानें जें कर्म केलें जातें, त्याला राजस म्हणतात. २४.

(अनुबंधाचा [१] )परिणामांचा, हानीचा, हिंसेचा किंवा स्वतःच्या आंवाक्याचा विचार न करितां मोहाला वश होऊन माणूस जें कर्म आरंभतो, त्याला तामस कर्म म्हणतात. २५.

जो आसक्ति आणि अहंकार यांनीं विरहित आहे, ज्याच्यामध्यें दृढता (चिकाटी किंवा भक्कमपणा) आणि उत्साह आहे, जो यश येवो, अपयश येवो त्यांत हर्ष, शोक मानीत नाहीं, त्याला सात्त्विक कर्ता असें म्हणतात. २६.

जो रागी (आसक्तियुक्त) आहे, कर्मफलाची इच्छा धरणारा आहे, लोभी आहे, हिंसक आहे, घाणेरडा आहे, ज्याला हर्ष आणि शोक आहेत, त्याला राजस कर्ता असें म्हणतात. २७.

जो अव्यवस्थित, संस्कारहीन, घमंडानंदन, आंतल्या गांठीचा ( शठ ), घातकी, आळशी, उदास आणि दीर्घसूत्री आहे, त्याला तामस कर्ता म्हणतात. २८.

हे धनंजया, बुद्धीचे तसेंच धृतीचे गुणभेदाप्रमाणें सविस्तर आणि वेगवेगळे तीन प्रकार सांगतों ते ऐक. २९.

प्रवृत्ति-निवृत्ति, कार्य-अकार्य, भय-अभय, तसेंच बंध-मोक्ष यांतील भेद जी बुद्धि योग्य तऱ्हेनें जाणते ती सात्त्विक होय. ३०.

---

१ " अनुबंधां"त " परिणामा "पेक्षां जादा अर्थ आहे. एका कर्माचा संबंध, सरळ किंवा आडवळणानें, जिथें जिथें पोंचतो आणि त्याची छाप जिथें जिथें पडते, त्या सगळ्या पसाऱ्याला " अनुबंध " म्हणतात. का. का.

गीतेंतच " अनुबंध " म्हणजे " परिणाम " हा अर्थ सुचविला आहे. पहा १८-३७-३८ ( अग्रे ...परिणामे ) आणि १८-३९ ( अग्रे ... अनुबन्धे )-

जी बुद्धि धर्म-अधर्म, कार्य-अकार्य यांचा विवेक अशुद्ध रीतीनें करिते ती बुद्धि हे पार्था, राजस होय. ३१.

हे पार्था, जी बुद्धि अंधारानें घेरलेली असल्याकारणानें अधर्मालाच धर्म मानते आणि सर्व गोष्टींकडे उलटयाच तऱ्हेनें पाहते, ती तामस होय. ३२.

ज्या एकनिष्ठ धृतीनें मनुष्य मन, प्राण आणि इंद्रियें यांच्या (कडून होणाऱ्या) क्रियांचें, समत्वबुद्धीनें, धारण करितो ती धृति हे पार्था, सात्त्विक होय. ३३.

ज्या धृतीमुळें मनुष्य फलाकांक्षी बनून धर्म, अर्थ आणि काम (तीन पुरुषार्थ) यांना आसक्तिपूर्वक धारण करितो, ती धृति राजस होय. ३४.

ज्या धृतीमुळें दुर्बुद्धि पुरुष निद्रा, भय, शोक, खेद आणि मद सोडूं शकत नाहीं ती हे पार्था, तामस धृति होय. ३५.

हे भरतर्षभा, आतां तीन प्रकारच्या सुखाचें वर्णन माझ्याजवळून ऐक. अभ्यासानेंच ज्याच्यामध्यें मनुष्य रंगतो, ज्याच्यामुळें त्याच्या दुःखाचा अंत होतो, जें आरंभीं विषासारखें असतें, परंतु जें परिणामीं अमृतासारखें असतें, जें आत्मज्ञानाच्या प्रसन्नतेंतून उत्पन्न झालेलें असतें, त्याला सात्त्विक सुख [१] म्हणतात. ३६–३७.

---

१ "अभ्यासाद्रमते [यत्र दुःखांतं च निगच्छति" ही सुखाची सवसाधारण व्याख्या मानल्यास, या श्लोकार्धाची सांगड पुढील "सात्त्विक" सुख सांगण्यासाठीं घातलेल्या श्लोकार्शी घालण्याचें कारण दिसत नाहीं. व्याख्येंतील दोन लक्षणें :— १ दुःखाचा नाश व २ अभ्यासानें गोडी वाटणें राजस, तामस "सुखां" ना कां लावूं नयेत? शंकराचार्य याचप्रमाणें अर्थ करत असावेत, असें वाटतें :

"परिचयात् आवृत्ते रतिं प्रतिपद्यते यस्मिन् सुखानुभवे, दुःखावसानं दुःखोपशमं च निश्चयेन प्राप्नोति।"; ज्ञानदेवही आचार्यांना वाट पुसतात, असें वाटतें :— "तेवि जालेनि सुखलेसें। जीउ भाविलेयां अभ्यासें। जीवपणाचें नासे। दुःख जेथ ॥७७३॥ तें येथ आत्मसुख। जालें असे त्रिगुणात्मक।…… "

विषय आणि इंद्रियें यांचा संबंध आल्यामुळें जें आरंभीं अमृतासारखें वाटतें पण परिणामीं जें विषासारखें ठरतें, त्या सुखाला राजस म्हणतात. ३८.

जें आरंभीं आणि शेवटीं आत्म्याला मूढतेंत ढकलणारें असतें आणि जें निद्रा, आळस आणि प्रमाद यांमधून निर्माण होतें, त्याला तामस सुख असें म्हणतात. ३९.

पृथ्वीवर किंवा देवांविषयीं (बोलावयाचें तर) स्वर्गांत असें कांहींही नाहीं कीं जें प्रकृतीमधून उत्पन्न झालेल्या या तीन गुणांपासून मुक्त आहे. ४०.

: ५४ :

हे परंतपा, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्रांच्या (या चार वर्णांच्या) कर्मांचें सुद्धां त्यांच्या स्वभावजन्य गुणांप्रमाणेंच भाग पाडले आहेत. ४१.

शम, दम, तप, शौच, क्षमा, सरळपणा, ज्ञान, अनुभव, आस्तिकता हीं ब्राह्मणांचीं स्वभावजन्य कर्में होत. ४२.

शौर्य, तेज, धृति, दक्षता, लढाईंत मागें न हटणें, दान आणि प्रभुत्वशक्ति हीं क्षत्रियाचीं स्वभावजन्य कर्में होत. ४३.

शेती, गोरक्षण आणि व्यापार हीं वैश्याचीं स्वभावजन्य कर्में होत; आणि शूद्राचें स्वभावजन्य कर्म नोकरी-चाकरी हें होय. ४४.

आपापल्या कर्मांत मग्न (किंवा दंग) राहून पुरुष मोक्ष मिळवितो. आपल्या कर्मांत निमग्न असलेल्या मानवाला कोणत्या रीतीनें मोक्ष मिळतो तें ऐक. ४५.

ज्याच्यामुळें प्राण्यांची प्रवृत्ति चाललेली आहे, ज्यानें हें सर्व

व्यापिलें आहे त्या परमेश्वराची जो पुरुष स्व[१]कर्मकुसुमांजलीनें पूजा करितो तो मोक्षाप्रत जातो. ४६.

परधर्म सुकर असूनसुद्धां त्याच्यापेक्षां विगुण असा स्वधर्म अधिक चांगला होय. स्वभावाप्रमाणें नक्की ठरलेलें कर्म करणाऱ्या मनुष्याला पाप लागत नाहीं. ४७.

**टीप** : स्वधर्म म्हणजे स्वतःचें कर्तव्य. गीतेच्या शिकवणीचा मध्यबिंदु कर्मफलत्याग हा आहे, आणि स्वकर्मापेक्षां (निराळें) दुसरें (कांहीं) उत्तम कर्तव्य शोधूं लागलें तर फलत्यागाला कांहीं स्थानच राहात नाहीं; म्हणून स्वधर्म श्रेष्ठ म्हटला. सर्व धर्मांचें फळ त्याच्या पालनांत येऊन जातें.

हे कौंतेया, सहजप्राप्त कर्म सदोष असलें तरी सोडूं नये. ज्याप्रमाणें अग्नीबरोबर धूर हा आलाच, त्याप्रमाणें कोणत्याही कर्माबरोबर दोष हे (ठेवलेले) आहेतच. ४८.

ज्यानें सर्वांतून आसक्ति काढून घेतली आहे, ज्यानें कामना टाकून दिल्या आहेत, ज्यानें स्वतःला जिंकलें आहे, तो संन्यासाच्या योगानें नैष्कर्म्यरूप परमसिद्धि पावतो. ४९.

हे कौंतेया, सिद्धि मिळाल्यावर मनुष्य ब्रह्माला कोणत्या रीतीनें गांठतो तें माझ्यापासून थोडक्यांत ऐक. तेंच (ब्रह्म) ज्ञानाची पराकाष्ठा होय. ५०.

ज्याची बुद्धि शुद्ध झाली आहे असा योगी दृढतापूर्वक स्वतःला वश करून, शब्दादि विषयांचा त्याग करून, रागद्वेषांना जिंकून, एकांताचें सेवन करून, आहार अल्प (म्हणजे बेताचा) राखून, काया, वाचा आणि मन यांना काबूंत ठेवून, ध्यानयोगांत नित्य

---

१ "अभ्यर्च्य" पद आल्यावरोबर ज्ञानदेवांनीं "स्वकर्मा"ला कुसुमाची उपमा दिली : "तेया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमाची वीरा। पूजा केली होये, अपारा। तोखा लागी॥"; विनोबा 'गीताई'त ज्ञानदेवाला अनुसरतात.

परायण ( म्हणजे तन्मय ) राहून, "वैराग्याची आंगीं बाणूनियां वज्रांगी", अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध आणि परिग्रह यांचा त्याग करून, ममत्व सोडून, शांत होत्साता ब्रह्मभावाला गांठण्यास योग्य बनतो. ५१-५२-५३.

ब्रह्मभाव गांठलेला, प्रसन्नचित्त मनुष्य नाहीं शोक करीत, किं नाहीं कांहीं इच्छीत; भूतमात्राविषयीं समभाव बाळगून तो माझी परमभक्ति मिळवितो. ५४.

मी केवढा आणि कोण आहे हें तो भक्तीमुळें यथार्थ जाणतो आणि अशा प्रकारें मला यथार्थ जाणून माझ्या ठायीं प्रवेश करितो. ५५.

माझा आश्रय घेणारा, नेहमीं सर्व कर्मे करीत असूनसुद्धां माझ्या कृपाप्रसादामुळें, शाश्वत आणि अव्यय पदाला प्राप्त करून घेतो. ५६.

: ५५ :

मनानें सगळीं कर्मे माझ्या ठायीं अर्पण करून, माझ्यामध्यें तल्लीन होऊन, विवेकबुद्धीचा आश्रय घेऊन, निरंतर माझ्यांत चित्त रोव. ५७.

माझ्यामध्यें चित्त रोविल्यामुळें संकटांचे सर्व डोंगर माझ्या कृपेनें तूं ओलांडून जाशील, पण अहंकाराला ( —अभिमानाला ) पेटून माझें ऐकणार नसशील तर तुझा नाश होईल. ५८.

अहंकाराच्या झपाट्यांत सांपडून "मी लढणार नाहीं" असें तूं मानशील तर हा तुझा निश्चय मिथ्या ( म्हणजे व्यर्थ ) आहे. तुझा स्वभाव च तुला तिकडे जबरदस्तीनें खेंचून घेऊन जाईल. ५९.

हे कौंतेया, स्वभावजन्य स्वकर्मानें तूं बांधिला आहेस म्हणून मोहाच्या आधीन होऊन जें करूं नये असें तुला वाटत आहे तें तूं निरुपाय म्हणून करशील. ६०.

हे अर्जुना, ईश्वर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयांत वास करितो; आणि आपल्या मायेच्या सामर्थ्यानें चक्रावर चढविलेल्या गाडग्या-प्रमाणें (एकसारखें) त्यांना गरगर फिरवितो. ६१.

हे भारता, सर्वभावानें तूं त्यालाच शरण जा. त्याच्या कृपेच्या बळानें तूं परमशांतिमय अमरपदाला प्राप्त करून घेशील. ६२.

याप्रमाणें गुह्यांतलें गुह्य ज्ञान मीं तुला दिलें. या सगळ्याचा चांगला विचार करून तुला जें ठीक वाटेल तें कर. ६३.

आणखी, सर्वांपेक्षांही गुह्य असें माझें परम वचन ऐक. तूं मला फार आवडतोस म्हणून मी तुला तुझें हित (कशांत आहे तें) सांगतों : ६४.

माझ्यांत मन लाव, माझा भक्त हो, माझ्याकरितां यज्ञ कर, मला नमस्कार कर; तूं मलाच पावशील, ही माझी सत्य प्रतिज्ञा आहे. तूं मला प्रिय आहेस. ६५.

सर्व धर्मांचा त्याग करून एकट्या मलाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन; तूं शोक करूं नकोस. ६६.

: ५६ :

जो तपस्वी नाहीं, जो भक्त नाहीं, जो ऐकूं इच्छीत नाहीं आणि जो माझा द्वेष किंवा हेवा करतो, त्याला हें (ज्ञान) तूं कधींही सांगूं नकोस. ६७.

पण हें परमगुह्य ज्ञान जे माझ्या भक्तांना देतील ते माझी परमभक्ति केल्यामुळें निःसंशय मलाच पावतील. ६८.

मनुष्यांत त्याच्यापेक्षां कोणी अधिक प्रिय माझा सेवक नाहीं आणि या पृथ्वीवर त्याच्यापेक्षां कोणी मला अधिक प्रिय होणारा-ही नाहीं. ६९.

**टीप** : यांतील तात्पर्य हें कीं, हें ज्ञान ज्यानें अनुभविलें आहे तोच तें दुसऱ्याला देऊं शकतो. शुद्ध उच्चार करून अर्थासहित जो वाचीत जातो, त्याच्याविषयीं वर आलेले दोन श्लोक नाहींत.

आपणांमधील या धर्म्य संवादाचा जो अभ्यास करील तो माझी ज्ञानयज्ञानें पूजा करील, असें माझें मत आहे. ७०.

आणि जो मनुष्य द्वेषरहित होऊन श्रद्धेनें केवळ ऐकेल तो सुद्धां मुक्त होऊन पुण्यवान् राहतात अशा शुभ लोकाप्रत जाईल. ७१.

हे पार्था, तूं हें एकाग्र चित्तानें ऐकलेंस कां? हे धनंजया, अज्ञानामुळें तुला जो मोह उत्पन्न झाला होता तो नाश पावला ना? ७२.

**अर्जुन म्हणाला :**

हे अच्युता, तुमच्या कृपेमुळें माझा मोह नाश पावला आहे. मी भानावर आलों आहे, शंकांचें समाधान झालें आहे आणि म्हणून मी स्वस्थ झालों आहे. तुमच्या सांगण्याप्रमाणें मी वागेन. ७३.

**संजय म्हणाला :**

याप्रमाणें वासुदेव आणि महात्मा पार्थ यांच्या दरम्यान झालेला, हा अंगावर (आनंदाचे) रोमांच उभे करणारा अद्भुत संवाद मीं ऐकला. ७४.

व्यासमुनींच्या कृपाप्रसादेंकरून योगेश्वर कृष्णाच्या श्रीमुखां-[१]तून मीं हा गुह्य परमयोग ऐकिला. ७५.

हे राजा (धृतराष्ट्रा), केशव आणि अर्जुन यांच्यामधील हा अद्‌भुत आणि पवित्र संवाद मनांत घोळघोळवून मी फिरूनफिरून हर्षानें बेहोष झालों आहे. ७६.

आणखी (विशेष) हे राजा, हरीचें तें अद्‌भुत (विश्व)रूप खूप आठआठवून मला महदाश्चर्य वाटत आहे; आणि वारंवार हर्षाचें (आनंदाचें) भरतें येत आहे. ७७.

जिथें योगेश्वर कृष्ण आहे, जिथें धनुर्धारी पार्थ आहे, तिथें श्री आहे, विजय आहे, वैभव आहे, आणि अविचल नीति आहे, असा माझा अभिप्राय आहे. ७८.

**टीप** : योगेश्वर कृष्ण म्हणजे अनुभवसिद्ध शुद्ध ज्ञान आणि धनुर्धारी अर्जुन म्हणजे तदनुसारी क्रिया; या दोघांचा संगम जिथें असतो तिथें संजयानें सांगितल्याप्रमाणें दुसरा कोणता परिणाम घडून येणें शक्य आहे ?

ॐ तत् सत्

जें ब्रह्मविद्याही आहे आणि योगशास्त्रही आहे आणि जें श्रीकृष्णांनीं गाइलेलें आहे अशा उपनिषदांत असलेल्या श्रीकृष्णार्जुन-संवादांत आलेला "संन्यासयोग" या नांवाचा अठरावा अध्याय या ठिकाणीं पुरा झाला आहे.

"अनासक्तियोग" देखील येथें पुरा होत आहे.

ॐ शांति :

---

[१] चांगल्या अर्थानें; उपरोधिक अर्थानें नाहीं. पहा :

" ऐसिं श्रीमुखौनि अक्षरें । निगति ना जवं एकसरें ।
तवं अविद्येचें आंधारें । निगौनि गेलें ॥" ज्ञा० ११.१७७.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक २६३०६ वि: निबंध
क्रमांक १२०९ नों. दि. २२/३/६०

# गीताबोध

# भूमिका

"... आश्रमांत पाळण्यांत येणाऱ्या व्रतांविषयीं, यज्ञाविषयीं आणि व्रताच्या आवश्यकतेविषयीं आपण पूर्वी विचार केला. *आतां ज्या ग्रंथाचें आपण दर पंधरवड्याला रोज थोडें थोडें करीत एक पारायण करतों आणि ज्याचें आपण मनन करतों, ज्याला आपण आपला आध्यात्मिक दीपस्तंभ म्हणून मानलें आहे, तो ग्रंथ मला जसा कांहीं समजला आहे तसा त्याचा विचार करावा असें मी इच्छितों. ही गोष्ट यापूर्वीहि एका पत्रामुळें माझ्या मनांत आलीच होती, पण गेल्या आठवड्यांत श्री...चें मला पत्र आलें त्यानें हा विचार पक्का झाला. तो लिहितो कीं, "अनासक्तियोग मी वाचतों खरा पण तो कळायला अवघड वाटतो." सर्वांना समजावें अशा भाषेंत अर्थ आणण्याचा प्रयत्न करूनसुद्धां, शब्दशः अनुवाद दिल्यानें समजायला अवघड जाणें साहजिक आहे. विषयच जेथें अवघड तेथें सोपी भाषा काय करणार ? तेव्हां आतां विषयच सोपा करून मांडण्याचा प्रयत्न करावा म्हणतों. ज्या गोष्टीचा आपण उठतां बसतां उपयोग करूं इच्छितों, ज्याच्या साहाय्यानें आपल्या अंतरांतील सर्व गुंतागुंती उकलण्याचा आपला प्रयत्न आहे, तो ग्रंथ जितक्या आणि जशा प्रकारें समजून घेतां येईल तशा प्रकारें समजून घ्यावा आणि वारंवार त्याचें आपण मनन करावें, म्हणजे अंतीं आपल्याला तन्मय होतां येईल. मी तर माझ्या सर्व अडचणींच्या वेळीं गीतामातेकडेच धांव घेतों आणि आजपर्यंत तिच्याकडून मला आश्वासन मिळत आलें आहे. म्हणून ज्यांना तिच्याकडून आश्वासन मिळवायचें असेल त्यांना, ज्या प्रकारें मला तिचें रोजच्यारोज ज्ञान होत जात आहे, त्या प्रकारें तिला समजून घेतल्यानें कदाचित् कांहीं अधिक मदत मिळूं शकेल, किंवा त्यांना तिचें कांहीं नवेंच दर्शन होईल असाहि संभव आहे."

४–११–१९३०
येरवडा जेल

# प्रास्ताविक

गीता हा महाभारताचा एक लहानसा भाग आहे. महाभारत हा ऐतिहासिक ग्रंथ समजला जातो, पण आपल्या मतानें महाभारत आणि रामायण हे ऐतिहासिक ग्रंथ नसून धर्मग्रंथ आहेत. किंवा त्यांना इतिहास म्हणायचें असलें तर तो आत्म्याचा इतिहास आहे. आणि हजारों वर्षांपूर्वी काय झालें त्याचें तें वर्णन नसून आज प्रत्येक मनुष्यदेहांत जें कांहीं चाललें आहे त्याचें तें चित्र आहे. महाभारत आणि रामायण या दोन्हींत देव आणि असुर– राम आणि रावण–यांच्यामध्यें रोज चालत असलेल्या लढाईचें वर्णन आहे. अशा वर्णनांत आलेला गीता हा कृष्ण-अर्जुन यांच्यामधला संवाद आहे. तो संवाद अंध धृतराष्ट्राला संजय वर्णन करून सांगत आहे. गीता म्हणजे गाइलेली. यांत 'उपनिषद्' हा शब्द अध्याहृत आहे. म्हणजे पूर्ण अर्थ 'गाइलेली उपनिषद्' असा झाला. उपनिषद् म्हणजे ज्ञान–बोध. म्हणजे गीतेचा अर्थ श्रीकृष्णानें अर्जुनाला केलेला बोध असा झाला. आपल्या देहांत अंतर्यामी श्रीकृष्णभगवान् आज विराजत आहेत आणि जेव्हां जिज्ञासू आपण अर्जुनरूप होऊन धर्म संकटांत सांपडला असतांना अंतर्यामी भगवंताला प्रश्न करतों, त्याला शरण जातों, तेव्हां तो तें ज्ञान द्यावयाला तयारच आहे, असें मनांत समजून घेऊन आपण गीता वाचणें योग्य होईल. आपण झोपलों आहोंत, अंतर्यामी हा नित्य जागा आहे. आपल्याला जिज्ञासा केव्हां होते याची तो वाटच पाहात बसला आहे. पण आपल्याला प्रश्न कुठें विचारतां येतात ? प्रश्न विचारावेसेहि वाटत नाहींत. म्हणून गीतेसारख्या पुस्तकाचें रोज आपण ध्यान करतों तिचें मनन करतां करतां आपल्यांत धर्म-जिज्ञासा निर्माण व्हावी, प्रश्न करायला शिकावें अशी आपण इच्छा बाळगतों, आणि जेव्हां जेव्हां आपण अडचणींत सांपडूं तेव्हां तेव्हां आपली अडचण दूर करून घ्यायला आपण गीतेकडे धांव घेतों आणि तिच्याकडून आश्वासन मिळवितों. या दृष्टीनें

गीता वाचायची आहे. ती आपल्याला सद्गुरूसारखी, आईसारखी आहे, आणि तिच्या मांडीवर डोकें ठेवल्यानें आपण सुरक्षित राहूं असा आपण विश्वास ठेवला पाहिजे. गीतेकडून आपण धर्माच्या सर्व गुंतागुंती सोडवून घेऊं शकूं. अशा प्रकारें जो रोज गीतेचें मनन करील, त्याला तिच्यांतून रोज नवा आनंद मिळेल, नवे अर्थ मिळतील. असा एकहि धर्माचा गुंता नाहीं कीं ज़्याचा उकल गीता करूं शकणार नाहीं. आपल्या अल्प श्रद्धेमुळें आपल्याला ती वाचायला आणि समजून घ्यायला येत नाहीं हें वेगळें. पण आपली श्रद्धा रोज वाढत जावी, आपण सावधान राहावें, याकरितां गीतेचें आपण पारायण करतों. असें गीतेचें मनन करीत असतां जो कांहीं अर्थ मला त्यांतून मिळाला आणि सतत मिळत राहिला आहे, त्याचें सार आश्रमवासी-यांच्या मदतीकरितां म्हणन मी येथें देत आहें.

११–११–१९३०
येरवडा जेल

• •

# गीताबोध

## अध्याय १२ वा

ता. ४–११–१९३०
मंगलप्रभात

आज बाराव्या अध्यायाचा सारांश द्यावा असें योजिलें आहे. हा भक्तियोग आहे. विवाहप्रसंगीं दांपत्यानें करावयाच्या पांच यज्ञांत हाहि एक यज्ञ म्हणून पाठ करावा आणि त्याचें मनन करावें असें आपण त्यांना सांगतों. भक्तीवांचून ज्ञान आणि कर्म हीं शुष्क आहेत आणि तीं कदाचित् बंधनरूप ठरण्याचा संभव आहे म्हणून भक्तिमय होऊन गीतेचें हें मनन सुरू करूं या.

अर्जुन भगवंतांना विचारतो : 'साकाराची पूजा करणारे भक्त आणि निराकाराची पूजा करणारे भक्त यांच्यांत अधिक चांगले कोण ?' या प्रश्नाचें उत्तर देतांना भगवान् म्हणतात :

जे माझ्या साकार रूपाचें श्रद्धापूर्वक मनन करतात, त्यांत लीन होतात ते श्रद्धावान् माझे भक्त आहेत. पण जे निराकार तत्त्वाला भजतात आणि त्याकरितां जे सर्व इंद्रियांचा संयम करतात, सर्व जीवांविषयीं समभाव ठेवतात, त्यांची सेवा करतात, कोणालाहि उच्च-नीच मानीत नाहींत, तेसुद्धां मला पावतात. तेव्हां दोहोंत श्रेष्ठ अमुक असें म्हणतां येणार नाहीं. पण निराकाराची भक्ति शरीरधाऱ्याकडून संपूर्णपणें होणें अशक्य आहे. निराकार हें निर्गुण आहे. त्यामुळें माणसाच्या कल्पनेच्याहि पर आहे. म्हणून सगळे देहधारी हे कळत नकळत साकाराचेच भक्त आहेत. तेव्हां तूं आपला माझ्या साकार विश्वरूपांतच तुझें मन गुंतवून टाक. सर्व कांहीं त्याला अर्पण कर. पण हें जर शक्य न झालें तर चित्ताच्या विकारांच्या निरोधाचा अभ्यास ठेव, म्हणजे यमनियमादींचें पालन करून

प्राणायाम-आसनादींची मदत घेऊन मनावर ताबा मिळव. हेंहि जर तुला शक्य होत नसेल तर जें कांहीं करशील तें माझ्याकरितांच करीत आहे अशी धारणा ठेवून तुझीं सारीं कामें कर; त्यामुळें तुझा मोह, तुझें ममत्व हीं मंद पडतील आणि तसा तसा तूं निर्मळ, शुद्ध होत जाशील, तुझ्यामध्यें भक्तिरस येईल. हेंसुद्धां जर साधत नसेल तर जें कांहीं करशील त्या कर्माच्या फळाचा त्याग कर, म्हणजेच फळाची इच्छा सोडून दे. तुझ्या वांट्याला जें कांहीं काम आलें असेल तें करीत राहा. फळाचा स्वामी मनुष्य होऊंच शकत नाहीं. पुष्कळ अंगें (कारणें) एकत्र होतात तेव्हां तें फळ निर्माण होतें, म्हणून तूं केवळ निमित्तमात्र हो. या चार रीती मीं तुला सांगितल्या त्यांत एक चढती, एक उतरती असें समजूं नकोस. त्यांपैकीं जी तुला आवडेल त्यांतून तूं भक्तीचा रस घे. वर जो यम-नियम-प्राणायाम-आसनादींचा मार्ग सांगितला त्याच्यापेक्षां श्रवण-मनन इत्यादि ज्ञानमार्ग सोपा असूं शकेल, त्यापेक्षां उपासनारूप ध्यानमार्ग सोपा असूं शकेल, आणि ध्यानापेक्षांसुद्धां कर्मफलत्याग सोपा असूं शकेल, असें वाटतें. सर्वांच्या बाबतींत एकच गोष्ट सारख्या रीतीनें सोपी असेल असें नाहीं. आणि कांहींना तर सर्वच मार्ग घ्यावे लागतात. ते अर्थात् एक-मेकांत मिसळलेले आहेत. कोणच्याहि कां मार्गानें होईना तुला भक्त व्हावयाचें आहे. ज्या मार्गानें भक्ति साधेल त्या मार्गानें ती साध. भक्त कोणाला म्हणायचें हें मी तुला सांगतों. भक्त कोणाचा द्वेष करणार नाहीं, तो कोणाविषयीं वैरभाव ठेवणार नाहीं, जीवमात्राशीं मैत्री ठेवील, जीवमात्राविषयीं हृदयांत करुणा बाळगील, त्याकरितां ममत्व सोडील, मीपणा टाकून शून्यवत् होईल, सुख-दुःख सारखें मानील, कोणीं दोष केला तर त्याला क्षमा करील (असें समजून कीं आपल्याहि दोषांची जगानें क्षमा करावी म्हणून आपण भुकलेले आहोंत),संतुष्ट राहील, आपल्या शुभ निश्चया-पासून ढळणार नाहीं, मन-बुद्धीसकट सर्व कांहीं मला अर्पण करील. त्याच्या-पासून लोकांना उद्वेग वाटणार नाहीं, लोक त्याला भिणार नाहींत, तोहि लोकांपासून दुःख मानणार नाहीं कीं त्यांना भिणार नाहीं. माझा भक्त हर्ष-शोक-भय वगैरेपासून मुक्त असेल, त्याला कसलीहि इच्छा असणार नाहीं, तो पवित्र असेल, दक्ष असेल, त्यानें मोठमोठे आरंभ सोडून दिलेले

असतील, निश्चयाचा पक्का राहून शुभ आणि अशुभ दोन्ही परिणामांचा तो त्याग करील, म्हणजेच त्यांविषयीं निश्चिंत राहील. त्याला शत्रु कोण आणि मित्र कोण ? त्याला मान काय, अपमान काय ? तो आपला मौन धारण करून, मिळेल त्यांत संतोष पावून जणूं एकटाच असल्याप्रमाणें विचरेल, आणि कोणत्याहि स्थितींत स्थिर होऊन राहील. याप्रमाणें जो श्रद्धावान् होऊन वर्तेल तो माझा प्रिय भक्त आहे.

**टीप :**

प्रश्न : भक्त आरंभ करणार नाहीं म्हणजे काय हें एखादा दृष्टान्त देऊन सांगाल ?

उत्तर : भक्त आरंभ करणार नाहीं याचा अर्थ कोणत्याहि व्यवसायाचे त्यानें मनोरथ रचलेले नसतील. तो व्यापारी असेल आणि आज कापडाचा व्यापार करीत असून जर उद्यां आणखी लाकडाचा सुरू करण्याचा प्रयत्न करील किंवा कापडाच्या व्यापारांत आज एक दुकान असून जर उद्यां आणखी पांच काढून बसेल तर त्याचें नांव आरंभ. भक्त अशा भानगडींत पडणार नाहीं. हा नियम सेवाकार्यालाहि लागू पडतो. आज सेवा खादीच्या द्वारां करतो, तर उद्यां गायीच्या द्वारां, परवां शेतीच्या द्वारां तर चौथ्या दिवशीं डॉक्टरीच्या द्वारां, अशा रीतीनें सेवकानेंसुद्धां धडपड करूं नये. त्याच्या वांटचाला जें येईल तें पुरतें करून त्यानें मोकळें व्हावें. जेथें 'मी' गेला तेथें 'मला' काय करायचें राहातें ? 'सूतरने तांतणे मने हरजीए बांधी, जेम ताणी तेम तेमनी रे, मने लागी कटारी प्रेमनी' (सुताच्या धाग्यानें मला हरीनें बांधलें, तो जसें ओढील तशी मी त्याची होते, मला प्रेमाची कट्यार लागली आहे). भक्ताचे सर्व आरंभ भगवान् मांडतो. त्याचीं सर्व कर्में प्रवाहप्राप्त असतात, म्हणून त्यानें 'संतुष्टो येन केन चित्' असें राहावें. सर्वारंभत्यागाचा-सुद्धां हाच अर्थ आहे. सर्वारंभ म्हणजे सर्व प्रवृत्ति किंवा कार्य नव्हे तर तीं करण्याचे विचार करीत राहणें, कल्पनांचे घोडे नाचविणें; त्याचा त्याग म्हणजे ते आरंभ न करणें, घोडे नाचविण्याची संवय असेल तर ती सोडून देणें. 'इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम्।' हें आरंभत्यागाच्या उलट आहे. यांत मला वाटतें तुम्हांला जें विचारायचें होतें तें सर्व येऊन जातें.

• •

# अध्याय १ ला

११–११–१९३०
मंगलप्रभात.

कौरव-पांडव जेव्हां आपापल्या सेना घेऊन लढाईचें मैदान जें कुरुक्षेत्र तेथें येऊन उभे राहिले तेव्हां कौरवांचा राजा दुर्योधन द्रोणाचार्यांना दोन्हीकडील मुख्य मुख्य लढवय्यांचें वर्णन करून सांगतो. लढाईची तयारी होतांच दोन्हीकडचे शंख वाजतात आणि अर्जुनाचा रथ हांकणारे श्रीकृष्ण भगवान् त्याचा रथ दोन्ही फौजांच्या मधोमध आणून उभा करतात. त्यांना पाहून अर्जुन घाबरतो आणि श्रीकृष्णांना म्हणतो : ' मी यांच्याविरुद्ध कसा लढूं ? परक्यांशीं लढायचें असेल तर मी आत्तां लढतों, पण हें तर स्वजन आहेत, माझेच आहेत. कौरव कोण आणि पांडव कोण ? ते तर चुलत भाऊ. आम्ही एकत्र वाढलों. द्रोण म्हणजे काय एकट्या कौरवांचे आचार्य थोडेच आहेत ? आम्हांलासुद्धां त्यांनींच सगळी विद्या शिकविली. भीष्म हे आमचे सर्वांचे वडील. त्यांच्याशीं लढाई करायची म्हणजे काय ? कौरव आततायी आहेत खरे, त्यांनीं फार दुष्ट कर्में केलीं आहेत, अन्याय केला आहे, पांडवांची जमीन हिसकावून घेतली आहे, द्रौपदीसारख्या महासतीचा अपमान केला आहे; हे सर्व अपराध त्यांनीं केले आहेत खरे, पण त्यांना मारून मीं कुठें जावें ? ते मूढ आहेत, त्यांच्यासारखें का मीं व्हावें ? मला थोडें ज्ञान आहे, सारासार विवेक आहे. म्हणून आप्तांशीं लढणें हें पाप आहे हें मी समजून घेतलें पाहिजे. ते पांडवांचा हिस्सा पचवून बसले आहेत, बसोत, ते आम्हांला मारूं पाहात आहेत, मारोत, पण आम्हीं त्यांच्यावर हात कसा टाकावा ? हे कृष्णा, मी तरी या आप्तेष्टांच्या विरुद्ध लढणार नाहीं. ' असें म्हणून चक्कर येऊन अर्जुन आपल्या रथांत मट्कन् बसतो.

अशा प्रकारें हा पहिला अध्याय पूर्ण होतो. त्याचें नांव ' अर्जुन विषादयोग ' असें आहे. विषाद म्हणजे दुःख. जसें दुःख अर्जुनाला झालें तसें आपणां सर्वांना झालें पाहिजे. धर्मवेदनेवांचून, धर्मजिज्ञासेवांचून ज्ञान

मिळत नाहीं. ज्याच्या मनाला बरें काय, वाईट काय हें जाणण्याची इच्छा-सुद्धां होत नाहीं त्याच्याशीं धर्माबद्दल बोलून काय उपयोग ? कुरुक्षेत्राची लढाई ही निमित्तमात्र आहे, किंबहुना खरें कुरुक्षेत्र आपलें हें शरीर आहे. तें कुरुक्षेत्र आहे तसें धर्मक्षेत्रहि आहे. त्याला जर आपण ईश्वराचें निवासस्थान मानून वागलों तर तें धर्मक्षेत्र आहे. त्या क्षेत्रांत आपल्यापुढें रोज कांहीं ना कांहीं लढाई चालू असते आणि असे पुष्कळ झगडे 'हें माझें आणि हें तुझें' यांतून होतात, स्वजन–परजन अशा भेदांतून होतात. म्हणूनच भगवान् अर्जुनाला हें सांगणार आहेत कीं सर्व अधर्माचें मूळ राग-द्वेष हें आहे. 'माझें' मानलें तेथें राग उत्पन्न झाला, 'परक्याचें' मानलें कीं द्वेष उत्पन्न झाला, वैरभाव आला; म्हणून 'तुझें-माझें'चा भेद विसरणें इष्ट आहे, म्हणजेच रागद्वेष सोडणें इष्ट आहे, असें गीता आणि सर्व धर्मग्रंथ ओरडून ओरडून सांगत आहेत. हें सांगणें वेगळें आणि त्याप्रमाणें करणें वेगळें. गीता त्याप्रमाणें करण्यालाहि आपल्याला शिकविते. तें कसें हें समजावून घेण्याचा आपण प्रयत्न करूं.

● ●

## अध्याय २ रा

१७–११–१९३०
सोमप्रभात

अर्जुन जेव्हां थोडा शांत झाला तेव्हां भगवंतांनीं त्याला ठपका दिला आणि म्हटलें, 'असा मोह तुला कोठून झाला ? तो तुझ्यासारख्या वीर-पुरुषाला शोभत नाहीं.' पण अर्जुनाचा मोह एवढ्यानें टळण्याजोगा नव्हता. त्यानें लढण्याचें नाकारलें आणि म्हटलें, 'या आप्तेष्ट वडील माणसांना मारून मला सिंहासनच काय स्वर्गाचें सुखसुद्धां नको. मी अगदीं गोंधळून गेलों आहे. या वेळीं धर्म काय हें समजेनासें झालें आहे, मी तुम्हांला शरण आलों आहे, मला माझें कर्तव्य समजावून सांगा.'

असा अर्जुनाला खूप गोंधळून गेलेला आणि समजावून घेण्याची इच्छा असलेला बघून भगवंतांना दया आली आणि ते त्याला समजावूं लागले :

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २६३०६ वि: निबंध
क्रमांक १२०९ नों. दि: २२।३।६०

तूं विनाकारण दु:खी होत आहेस आणि कांहीं समजत नसून ज्ञानाच्या गोष्टी बोलत आहेस. देह आणि देहांत राहणारा आत्मा यांमधला भेदच तूं विसरून गेलेला दिसतोस. देह मरतो, आत्मा मरत नाहीं. देह हा जन्मापासूनच नाशवंत आहे. देहाला तरुणपण आणि म्हातारपण येतें तसा त्याचा नाशहि आहे. देहाचा नाश झाल्यानें देहीचा नाश कधीं होत नाहीं. देहाला जन्म आहे, आत्म्याला जन्म नाहीं. आत्मा अजन्मा आहे. त्याच्यांत वाढ-घट नाहीं. तो पूर्वीं होता, आज आहे आणि यानंतरहि राहाणारच आहे. तेव्हां तूं शोक कशाचा करतोस ? तुझा शोक तुझ्या मोहांतूनच निर्माण झालेला आहे. या कौरवांना तूं आपले मानतोस त्यामुळें तुला ममता उत्पन्न झाली आहे, पण ज्या देहाविषयीं तुला ममत्व आहे त्याचा नाश ठरलेला आहे हें तूं लक्षांत घे. त्याच्यांत राहणाऱ्या जीवाचा जर विचार केलास तर तुला लगेच समजून येईल कीं त्याचा नाश करायला कोणीहि समर्थ नाहीं. त्याला अग्नि जाळूं शकत नाहीं, पाण्यांत तो बुडूं शकत नाहीं; वारा त्याला सुकवूं शकत नाहीं. दुसरें म्हणजे, तूं तुझ्या धर्माचा विचार करून पहा बरें. तूं आहेस क्षत्रिय. तुझ्याभोंवतीं हें लष्कर गोळा झालें आहे. आतां तूं जर व्याकुळ झालास तर त्यानें तूं इच्छितोस त्याच्यापेक्षां उलटाच परिणाम होईल आणि तुझें हंसें होईल. आजवर तुझी गणना बहादुर म्हणून झाली आहे. आतां तूं आधींमधींच लढाई सोडून दिलीस तर तूं भिऊन पळालास असें सर्व म्हणतील. पळणें हा जर धर्म असेल तर लोकनिंदेची पर्वा नाहीं, पण येथें तूं पळून जाणें हा अधर्म होईल आणि लोकनिंदा योग्यच ठरेल, असा दुहेरी दोष येईल.

हा मीं तुझ्यापुढें बुद्धीचा युक्तिवाद केला, आत्म्याचा आणि देहाचा भेद तुला दाखविला आणि तुझ्या कुळधर्माची तुला जाणीव करून दिली. पण आतां तुला कर्मयोगाविषयीं सांगतों. हा योग आचरणाऱ्याचें नुकसान कधीं व्हायचेंच नाहीं. यांत तर्क नाहीं, ही आचरणाची, करून अनुभवण्याची गोष्ट आहे. आणि हजारों मण तर्कापेक्षां छटाकभरसुद्धां आचरण श्रेष्ठ आहे. या आचरणांतहि जर बऱ्या वाईट परिणामांचा तर्क मिसळला तर तें दूषित होईल. परिणामाचा विचार करतांच बुद्धि मलिन होते. वेद

घोकलेलीं पढतमूर्ख माणसें कर्मकांडांत गुरफटून जाऊन अनेक प्रकारचीं फळें मिळविण्याकरितां अनेक क्रिया सुरू करून ठेवतात. एका क्रियेनें फळ नाहीं मिळालें तर दुसरी करण्याच्या मागें लागतात. आणखी कोणी तिसरें दाखविलें तर तें करण्याची धडपड करतात आणि असें करतां करतां त्यांच्या मतींत खळबळ माजते. वास्तविक मनुष्याचा धर्म फळाचा विचार न करतां कर्तव्यकर्म करीत राहण्याचा आहे. या वेळीं हें युद्ध करणें तुझें कर्तव्य आहे, तें पुरें करणें हा तुझा धर्म आहे. लाभ-हानि, हार-जीत हीं तुझ्या हातीं नाहींत. गाडीखालच्या कुत्र्यासारखा तूं त्यांचा भार कां उचलतोस? हार-जीत, थंडी-ऊन, सुख-दुःख हीं देहीला लागलेलींच आहेत; तीं माणसानें सहन करणेंच योग्य. वाटेल तो परिणाम होवो, त्याविषयीं निश्चित राहून, समता ठेवून, माणसानें आपल्या कर्तव्यांत तन्मय होऊन जाणें हें योग्य आहे. याचेंच नांव योग आणि त्यांतच कर्मकुशलता आहे. म्हणजे कार्याची सिद्धि कार्य करण्यामध्यें आहे, त्याच्या परिणामांत नाहीं. तूं शांत हो, फळाचा अभिमान सोडून दे आणि कर्तव्याचें पालन कर.

हें ऐकून अर्जुन विचारतो: हें तर माझ्या आवाक्याबाहेरचें वाटतें. हार-जीतचा विचार सोडायचा, परिणामाचा विचारच करायचा नाहीं अशी समता, अशी स्थिर बुद्धि कशी येणार? अशी स्थिरबुद्धि असणारे कसे असतात, त्यांना ओळखायचें कसें हें मला समजावून सांगा बरें.

तेव्हां भगवंतांनीं उत्तर दिलें :

हे राजा! ज्या मनुष्यानें आपल्या एकूण एक कामनांचा त्याग केला आहे आणि आपल्या अंतरांतूनच जो संतोष मिळवितो त्याला स्थिरचित्त, स्थितप्रज्ञ, स्थिरबुद्धि किंवा समाधिस्थ म्हणतात. असा मनुष्य दुःखानें दुःखी होत नाहीं, सुखानें फुलून जात नाहीं. सुखदुःखादि हे पांच इंद्रियांचे विषय आहेत. म्हणून असा शहाणा मनुष्य कासवाप्रमाणें आपलीं इंद्रियें आवरून घेतो. कासवाला शत्रु दिसला कीं तें ढालीच्या आंत आपले अवयव ओढून घेतें; पण माणसाच्या इंद्रियांवर विषय हे सतत हल्ला करण्याला उभेच असतात म्हणून मनुष्याला नेहमींच इंद्रियांना आवरून घेऊन स्वतः ढालीप्रमाणें होऊन विषयांशीं लढा द्यावयाचा असतो; हेंच खरें युद्ध. कोणी विषयांचें निवारण करण्यासाठीं देह-दमन करतात, उपवास करतात. तें

ठीकच आहे. उपवास असेल तोंवर इंद्रियें विषयांकडे धांवत नाहींत, पण नुसत्या उपवासानें विषयांची गोडी सुकून जात नाहीं. उपवास सोडतांच ती पुनः वाढण्याचाहि संभव आहे. गोडी नाहींशी करण्याकरितां ईश्वर-प्रसादच अवश्य आहे. इंद्रियें अशीं कांहीं बलवान् आहेत कीं तीं मनुष्याला तो सतत सावधान नसेल तर जबरदस्तीनें ओढून घेऊन जातात. आणि म्हणून माणसानें इंद्रियांना नेहमीं आपल्या ताब्यांत ठेवलें पाहिजे. पण हें जेव्हां तो ईश्वराचें ध्यान धरील, अंतर्मुख होईल, हृदयांत असलेल्या अंतर्यामीला ओळखील, त्याची भक्ति करील तेव्हां घडेल. अशा रीतीनें जो मनुष्य माझ्यांत मग्न होऊन आणि राहून आपल्या इंद्रियांना स्वाधीन ठेवतो तो स्थिरबुद्धि योगी म्हणायचा. असें जो करीत नाहीं त्याची अवस्था कशी होते तेंहि सांगतों. ज्याचीं इंद्रियें स्वच्छंदीपणानें वागतात तो रोज विषयाचें ध्यान धरतो. त्यामुळें त्याचा त्याला छंद लागतो. त्या-शिवाय त्याला दुसरें सुचतच नाहीं, अशा छंदामधून त्याच्या ठिकाणीं काम उत्पन्न होतो. तो पूर्ण झाला नाहीं कीं क्रोध येतो. क्रोधातुर मनुष्य अर्ध-वट वेड्यासारखाच बनतो. त्याला स्वतःची शुद्धि राहात नाहीं, त्यामुळें स्मरण न राहून वाटेल तसें तो बकतो आणि वागतो. अशा माणसाचा शेवटीं नाश न होईल तर काय होईल? ज्याचीं इंद्रियें अशीं भटकतात त्याची स्थिति सुकाणूं नसलेल्या गलबतासारखी होते. एवढासा वारासुद्धां त्याला इकडे तिकडे ओढून नेतो आणि शेवटीं कुठल्या तरी खडकावर आपटून त्या गलबताचा चेंदामेंदा होऊन जातो. अशी स्थिति ज्याचीं इंद्रियें भटकत राहतात त्याची होते. म्हणून माणसांनीं कामना सोडून द्याव्या, इंद्रियांवर ताबा ठेवावा हें योग्य आहे. याचा अर्थ, इंद्रियें न करावें तें करणार नाहींत, डोळे सरळ राहतील, पवित्र वस्तूच ते पाहतील, कान भगवद्भजन ऐकतील किंवा दुःखी जनांचा आर्तनाद ऐकतील, हातपाय सेवा-कार्यांत गुंतून राहतील, सर्व इंद्रियें मनुष्याचीं जीं कर्तव्यकर्में त्यांतच मग्न राहतील आणि त्यांतून ईश्वरप्रसाद लाभेल. हा प्रसाद लाभला कीं सर्व दुःखें गेलींच समजा. सूर्यापुढें जसें बर्फ वितळून जातें तसें ईश्वरप्रसादाच्या तेजानें दुःखमात्र पळून जातें. असा मनुष्य स्थिरबुद्धि म्हणायचा. पण ज्याची बुद्धि स्थिर नाहीं त्याला सद्भावना कुठली, ज्याला सद्भावना नाहीं त्याला

शांति कुठली, आणि जेथें शांति नाहीं तेथें सुख कुठलें ? स्थिरबुद्धि मनुष्याला जेथें दिव्याप्रमाणें स्पष्ट दिसतें तेथें अस्थिर मनाच्या, दुनियेच्या गडबड-गोंधळांत सांपडलेल्या माणसांना कांहीं दिसूं शकत नाहीं; आणि जें अशा गडबडचा माणसांना स्वच्छ असल्यासारखें वाटतें तें समाधिस्थ योगी स्पष्टपणें गलिच्छ आहे असें पाहतो आणि त्याकडे नजरहि टाकीत नाहीं. नदीनाल्यांचें पाणी जसें समुद्राला मिळून शांत होऊन जातें तसे सर्व विषय या योगीरूपी समुद्रांत शमन पावतात, अशी या योग्याची अवस्था असते. आणि असा मनुष्य समुद्राप्रमाणें नेहमीं शांत राहतो. म्हणून जो मनुष्य सर्व कामना टाकून देऊन, निरहंकार होऊन, ममता सोडून तटस्थपणें वर्ततो तो शांति पावतो. ही ईश्वरप्राप्तीची अवस्था आहे आणि अशी अवस्था ज्याची मरणापर्यंत टिकून राहते तो मोक्ष पावतो.

• •

## अध्याय ३ रा

२४–११–१९३७
सोमप्रभात

स्थितप्रज्ञाचीं लक्षणें ऐकून अर्जुनाला वाटलें, माणसानें शांत होऊन स्वस्थ बसून राहिलें पाहिजे. त्या लक्षणांत कर्माचें त्यानें नांवसुद्धां ऐकलें नाहीं. म्हणून त्यानें भगवंताला विचारलें : कर्माहून ज्ञान मोठें असे तुमच्या सांगण्यावरून वाटतें. त्यामुळें माझी बुद्धि गोंधळून जात आहे. ज्ञानच चांगलें तर मला घोरकर्मांत कां घालतां ? माझें भलें कशांत आहे तें मला स्पष्ट सांगा.

तेव्हां भगवंतांनीं उत्तर दिलें :

हे पापरहित अर्जुना ! पूर्वींपासूनच या जगांत दोन मार्ग चालत आले आहेत, एकांत ज्ञानाला प्रधानपद दिलें आहे आणि दुसऱ्यांत कर्माला. परंतु तुलाच दिसून येईल कीं कर्माशिवाय मनुष्य अ-कर्मी होऊं शकत नाहीं, कर्मावांचून ज्ञान होणारच नाहीं. सर्व कांहीं सोडून देऊन मनुष्य स्वस्थ बसून राहिला तर तेवढ्यानें तो कांहीं सिद्ध पुरुष झाला असें

म्हणतां येणार नाहीं. प्रत्येक मनुष्य कांहीं ना कांहीं कर्म करीतच असतो हें तूं पाहातोसच. त्याचा स्वभावच त्याच्याकडून कांहीं ना कांहीं करवून घेणार. पण जगाचा असा कायदा असूनसुद्धां जो मनुष्य हातपाय आंखडून घेऊन बसून राहील आणि मनांत अनेक प्रकारचे मनोरथ रचीत राहील तो मूर्ख ठरेल आणि मिथ्याचारीहि म्हटला जाईल. त्यापेक्षां इंद्रियांना ताब्यांत ठेवून, राग-द्वेष सोडून, गडबड न करतां, आसक्ति न बाळगतां म्हणजे अनासक्त राहून हातांपायांनीं कांहींना कांहीं कर्म करावें, कर्मयोग आचरावा हें बरें नाहीं का ? नियत कर्म – म्हणजे तुझ्या वांटचाला आलेलें सेवाकार्य – तूं इंद्रियांना वश ठेवून करीत राहा. आळशासारखें बसून राहण्यापेक्षां तेंच चांगलें. आळशी होऊन बसून राहणाऱ्याचें शरीर शेवटीं पडतेंच. पण कर्म करतांना एवढें ध्यानांत ठेवावें कीं यज्ञकार्याशिवायचीं सर्व कर्में लोकांना बंधनांत टाकतात. यज्ञ म्हणजे स्वतःकरितां नव्हे तर दुसऱ्याकरितां, परोपकाराकरितां घेतलेले श्रम, म्हणजे थोडक्यांत, सेवा. आणि जेथें सेवेकरितांच सेवा करायची तेथें आसक्ति, रागद्वेष असणार नाहींत. असा यज्ञ, अशी सेवा तू करीत राहा. ब्रह्मदेवानें हें जग उत्पन्न केलें त्याबरोबरच यज्ञहि उत्पन्न केला, जणूं कांहीं असा मंत्र त्यानें आपल्या कानांत फुंकला कीं – ' पृथ्वीवर जा, एकमेकांची सेवा करा आणि वृद्धि पावा; जीवमात्राला देवरूप समजा, या देवांची सेवा करून तुम्ही त्यांना प्रसन्न ठेवा, ते तुम्हांला प्रसन्न ठेवतील. प्रसन्न झालेले देव तुम्ही न मागतां मनोवांच्छित फल देतील. ' ह्याचा अर्थ असा कीं, लोकसेवा न करतां, त्यांचा भाग त्यांना प्रथम न देतां जे खातात ते चोर आहेत. आणि जे लोकांचा, जीवमात्राचा भाग त्यांना देऊन नंतर खातात किंवा उपभोग घेतात त्यांना भोगण्याचा अधिकार आहे, म्हणून ते पापमुक्त होतात. याच्याविरुद्ध, जे स्वतः करितांच कमावतात, मेहेनत करतात ते पापी आहेत आणि पापाचें अन्न खातात. सृष्टीचा नियमच असा आहे कीं अन्नानें जीव जगतात, अन्न पावसानें उत्पन्न होतें आणि पाऊस यज्ञानें म्हणजे जीवमात्राच्या मेहेनतीनें उत्पन्न होतो. जेथें जीव नाहींत तेथें पाऊस आढळत नाहीं, जेथें जीव आहे तेथें पाऊस आहेच. जीवमात्र श्रमजीवी आहे. कोणी निष्क्रिय राहून खाऊं म्हणेल तर तें शक्य नाहीं, आणि मूढ

जीवांच्या बाबतींत जर तें खरें तर मनुष्याच्या बाबतींत किती अधिक प्रमाणांत तें लागू झालें पाहिजे बरें ? म्हणून भगवान् म्हणाले, कर्म हें ब्रह्यानें उत्पन्न केलें, ब्रह्याची उत्पत्ति अक्षरब्रह्मांतून आहे, म्हणून यज्ञमात्रांत – जें म्हणून सेवाकार्य आहे त्यांत अक्षरब्रह्म म्हणजे परमेश्वर विराजतो असें जाणावें. अशा या रहाटगाडग्याचें जो मनुष्य अनुसरण करीत नाहीं तो पापी आहे, तो व्यर्थ जगतो.

(मंगलप्रभात)

जो मनुष्य अंतरांत शांति भोगतो आणि संतुष्ट राहतो त्याला करावयाचें कांहीं उरत नाहीं असें म्हणतां येईल, त्याला कर्म केल्यानें कांहीं लाभ नाहीं, न करण्यानेंहि नाहीं. कोणाविषयीं कांहीं स्वार्थ त्याला असत नाहीं तरी यज्ञकार्य तो सोडूं शकणार नाहीं. म्हणून तूं आपला कर्तव्यकर्म नित्य करीत राहा पण त्यांत राग-द्वेष ठेवूं नकोस, त्यांत आसक्ति ठेवूं नकोस. जो अनासक्तिपूर्वक कर्म आचरतो त्याला ईश्वर-साक्षात्कार होतो. शिवाय जर जनकासारखे निःस्पृही राजेसुद्धां कर्म करीत करीतच सिद्धि पावले, कारण कीं ते लोकहितार्थ कर्म करीत असत, तर तुला याच्याविरुद्ध वर्तन कसें करतां येईल ? नियमच मुळीं असा आहे कीं सज्जन आणि मोठीं म्हटलेलीं माणसें जसें आचरण करतात त्यांचें अनुकरण सामान्य माणसें करीत असतात. माझ्याकडेच पहा. कार्य करून मला काय स्वार्थ साधावयाचा आहे ? पण मी अष्टौप्रहर दम न घेतां कर्म करीतच आहे आणि त्यामुळें लोकसुद्धां त्याप्रमाणें कमीजास्त प्रमाणांत वागत आहेत. पण मी जर आळस केला तर जगाचें काय होईल ? सूर्य, चंद्र, तारे इत्यादि स्थिर होतील तर जगाचा नाश होईल हें तूं समजूं शकतोस, आणि या सर्वांना गति देणारा, नियमांत ठेवणारा मीच आहें ना ? पण लोकांत आणि माझ्यांत एवढा फरक आहे कीं मला आसक्ति नाहीं, लोक आसक्त आहेत, स्वार्थाला वश होऊन श्रम करीत राहतात. तुझ्यासारख्या शहाण्या ज्ञानी माणसानें जर कर्म सोडलें तर लोकहि तसेंच करतील आणि बुद्धिभ्रष्ट होतील. तूं आसक्ति सोडून कर्तव्य केलें पाहिजेस कीं ज्यामुळें लोक कर्मभ्रष्ट होणार नाहींत आणि हळूंहळूं अनासक्त व्हावयाला शिकतील. मनुष्याच्या

स्वभावांत जे गुण आहेत त्यांना वश होऊनच तो कार्य करीत राहणार. मूर्ख असेल तोच ‘ मी करतों ’ असें मानील. श्वास घेणें ही जीवमात्राची प्रकृति आहे, स्वभाव आहे. डोळ्यावर कांहीं आलें कीं लगेच मनुष्य सहजच पापणी हलवितो. त्या वेळीं तो ‘ मी श्वास घेतों, मी पापणी हलवितों ’ असें म्हणत नाहीं. अशा रीतीनें जितकीं कर्में करायचीं तीं सगळीं स्वाभाविकपणेंच गुणाप्रमाणें कां न व्हावीं ? त्याच्याविषयीं अहंकार कशाला ? आणि अशा रीतीनें ममत्व न धरतां सहज-कर्म करण्याचा सुवर्णमार्ग हा कीं सगळीं कर्में मला अर्पण करावीं आणि मला निमित्त करून ममत्व काढून टाकून तीं करावींत. असें करीत असतां जेव्हां मनुष्यां-तून अहंवृत्ति, स्वार्थ नाश पावतो तेव्हां त्याचीं सर्व कर्में स्वाभाविक आणि निर्दोष होऊन जातात, तो पुष्कळ जंजाळांतून सुटतो. त्याच्या बाबतींत मग कर्मबंधन असें कांहीं राहात नाहीं. आणि जेथें स्वभावाप्रमाणें कर्म होतें तेथें हट्टानें ‘ मी कर्म करणार नाहीं ’ असा दावा करणें यांतच अहंता असते. असा हट्ट करणारा बाहेरून जरी कर्म न करणारा वाटला तरी अंतरांतून त्याचें मन प्रपंच रचीतच राहातें. आणि बाह्य हालचाली-पेक्षां तें वाईट आणि अधिक बंधनकारक आहे.

खरी गोष्ट अशी कीं इंद्रियांना त्यांच्या त्यांच्या विषयांबद्दल राग-द्वेष असतोच. कानांना अमुक ऐकणें आवडतें आणि अमुक आवडत नाहीं; नाकाला गुलाबाच्या फुलाचा वास घेणें आवडतें, विष्ठेचा दुर्गंध आवडत नाहीं. असेंच सर्व इंद्रियांविषयीं समज. तेव्हां माणसानें करायचें आहे तें हें कीं या राग-द्वेषरूपी वाटमाऱ्यांना वश व्हायचेंच नाहीं. आणि राग-द्वेष काढून टाकायचे असतील तर कर्म शोधीत फिरूं नये. आज हें, उद्यां तें, परवां तिसरें अशी तडफड करूं नये. तर आपल्या वांट्याला जी सेवा येईल ती ईश्वराप्रीत्यर्थ करण्याला तत्पर असावें. असें केल्यानें जें आपण करूं तें ईश्वरच करवीत आहे अशी भावना उत्पन्न होईल, तसें ज्ञान उत्पन्न होईल आणि अहंभाव निघून जाईल. याचें नांव स्वधर्म. स्वधर्माला चिकटून राहावें कारण आपल्याकरितां तोच उत्तम आहे. परधर्म खुशाल चांगला दिसो. तसा तो दिसला तरी तो भयानक आहे. असें समजावें. स्वधर्म आचरीत असतांना मृत्यूची भेट झाली तरी त्यांत मोक्ष आहे.

रागद्वेषरहित होऊन कर्में करावीं, तोच यज्ञ, असें भगवान म्हणाले तेव्हां अर्जुनानें विचारलें : कोणाच्या प्रेरणेनें मनुष्य पापकर्म करतो ? पुष्कळ वेळां पापकर्माकडे कोणीतरी त्याला फरफटत नेत आहे असें वाटतें.

भगवान् म्हणाले: मनुष्याला पापकर्माकडे ओढून नेणारा काम आहे, क्रोध आहे. ते सख्ख्या भावासारखे आहेत; काम पूर्ण झाला नाहीं कीं क्रोध येऊन उभा राहिलाच. आणि ज्याच्यांत काम-क्रोध आहेत त्याला आपण रजोगुणी म्हणतों. माणसाचा मोठा शत्रु तोच आहे. त्याच्याशीं रोज युद्ध करायचें आहे. आरशावर धूळ चढली म्हणजे तो जसा धुरकट होतो, किंवा विस्तवावर धूर आहे तोंवर तो जसा बरोबर पेटत नाहीं, किंवा गर्भ जोंपर्यंत आच्छादनांत आहे तोंवर तो गुदमरत असतो, तसा क्रोध हा ज्ञान्याच्या ज्ञानाला तेजस्वी होऊं देत नाहीं, किंवा त्याला तो निस्तेज करतो वा गुदमरून टाकतो. हा काम अग्नीसारखा विक्राळ आहे आणि तो इंद्रियें, मन, बुद्धि या सर्वांना आपल्या ताब्यांत घेऊन मनुष्याला हरवितो. म्हणून तूं अगोदर इंद्रियांनाच ताब्यांत घेऊन टाक, मग मनाला जिंकून घे आणि तें केल्यानें बुद्धीहि तुझ्या स्वाधीन होऊन राहील, कारण कीं जरी इंद्रियें, मन किंवा बुद्धि हीं एकाहून एक वरचढ असल्यासारखीं आहेत तरी त्या सर्वांहून आत्मा फार विशेष आहे. मनुष्याला आत्म्याच्या– स्वतःच्या– शक्तीचें भान नसतें म्हणूनच इंद्रियें ताब्यांत राहात नाहींत, मन वश होत नाहीं, किंवा बुद्धि काम करीत नाहीं असें तो समजतो. आत्म्याच्या शक्तीचा विश्वास आला कीं लगेच बाकी सगळें सोपें होऊन जातें. आणि ज्यानें इंद्रियें, मन आणि बुद्धि स्थिर केलीं त्याला काम, क्रोध किंवा त्यांची असंख्य फौज कांहींच करूं शकत नाहीं.

हा अध्याय म्हणजे गीता समजण्याची किल्ली असें मीं म्हटलें आहे. आणि एका वाक्यांत त्याचें सार हें आपल्याला दिसतें कीं 'जीवन हें सेवेकरितां आहे, भोगाकरितां नाहीं.' म्हणून आपण जीवनाला यज्ञमय करून टाकणें इष्ट आहे. असें समजलें तरी तसें होतेंच असें नाहीं; तरी हें जाणून आचरण केल्यानें आपण उत्तरोत्तर शुद्ध होत जातों. पण खरी सेवा कशाला म्हणायची ? हें समजण्याकरितां इंद्रियदमनाची आवश्यकता

उत्पन्न होते, आणि असें करीत करीत उत्तरोत्तर आपण सत्यरूपी परमात्म्याच्या निकट येऊं लागतों. युगायुगाला आपणांला सत्याचें अधिकाधिक दर्शन होतें. सेवाकार्यसुद्धां जर स्वार्थदृष्टीनें झालें तर तें यज्ञ होत नाहीं. म्हणून अनासक्तीची परम आवश्यकता. एवढें जाणल्यानंतर आपल्याला आणखी कोणत्याहि विवादांत पडण्याची गरज राहात नाहीं. अर्जुनाला खरोखरच स्वजन मारण्याचा उपदेश केला काय ? त्यांत धर्म कसा असूं शकेल ? असले प्रश्न शमून जातात. अनासक्ति आली कीं एखाद्याला मारण्याकरितां आपल्या हातांत सुरा असला तरी तो सहजच गळून पडतो. पण अनासक्तीचा आव आणल्यानें ती येत नाहीं. आपण प्रयत्न करीत राहूं तर ती आज येईल किंवा हजारों वर्षें प्रयत्न करूनहि येणार नाहीं. त्याचीहि चिंता सोडावी. प्रयत्नांतच साफल्य आहे. आपण खरोखरच प्रयत्न करतों कीं नाहीं हें आपण बारकाईनें तपासण्याची जरूर आहे. त्यांत आत्म्याची फसवणूक असूं नये. आणि एवढें ध्यानांत ठेवणें सर्वांना अगदीं शक्य आहे.

• •

## अध्याय ४ था

१–१२–१९३०
सोमप्रभात

भगवान् अर्जुनाला सांगतात : मीं जो निष्काम कर्मयोग तुला सांगितला तो फार प्राचीन काळापासून चालत आला आहे. तो कांहीं नवीन नाहीं. तूं माझा प्रिय भक्त आहेस म्हणून, आणि आतां तूं धर्मसंकटांत आहेस त्यांतून तुला सोडविण्याकरितां, मीं तुला तो शिकविला. जेव्हां जेव्हां धर्माची निंदा होते आणि अधर्म पसरतो, तेव्हां तेव्हां मी अवतार घेतों आणि भक्तांचें रक्षण करतों, पाप्यांचा संहार करतों. ही माझी माया जे जाणतात त्यांना अधर्माचा लोप होणारच असा विश्वास असतो. साधु पुरुषांचा वाली ईश्वरच आहे; ते धर्माचा त्याग करीत नाहींत आणि शेवटीं मला पावतात. कारण ते माझें ध्यान धरणारे असल्यामुळें

काम-क्रोधादींपासून मुक्त राहातात आणि तपानें आणि ज्ञानानें शुद्ध अशा अवस्थेंत राहातात. माणसाला कृतीप्रमाणें फळ मिळतें. माझ्या कायद्याच्या बाहेर कोणी राहूं शकत नाहीं. गुणकर्माच्या भेदानुसार मीं चार वर्ण उत्पन्न केले आहेत. असें असूनहि मी त्यांचा कर्ता आहें असें मानूं नकोस. कारण मला या कर्मांतून कांहीं फळाची अपेक्षा नाहीं, त्याचें पापपुण्य मला नाहीं. ही ईश्वरी माया जाणण्याजोगी आहे. जगांत जी जी प्रवृत्ति चालते ती सर्व ईश्वरी नियमांना वश राहून चालते, तरी ईश्वर त्यापासून अलिप्त असतो, म्हणून तिचा तो कर्ता आहे आणि अकर्ता पण आहे. आणि असा अलिप्त राहून, विटाळला न जातां, फळाची इच्छा न करतां जसा ईश्वर वर्ततो तसा मनुष्यहि निष्काम राहून वर्तेल तर अवश्य मोक्ष पावेल. अशा मनुष्याला कर्मांत अकर्म दिसतें आणि अशा माणसाला न करावयाचें कर्महि लगेच समजून येऊं लागतें. ज्यांविषयीं कामना आहे, जीं कामनेवांचून होऊंच शकत नाहींत, तीं सर्व न करावयाचीं कर्में म्हणायचीं– जशी चोरी, व्यभिचार इ. अशीं कर्में कोणी अलिप्त राहून करूं शकणार नाहीं. म्हणून जे कामना आणि संकल्प सोडून कर्तव्यकर्म करीत जातात त्यांनीं आपल्या ज्ञानरूपी अग्नीनें आपली कर्में जाळून टाकलीं आहेत असें म्हणतां येईल. असा ज्यानें कर्मफळाचा संग सोडला तो मनुष्य सदोदित संतुष्ट राहतो, स्वतंत्र असतो. त्याचें मन ठिकाणावर असतें, तो कसल्याहि संग्रहांत गुंतत नाहीं, आणि जशा निरोगी पुरुषाच्या शारीरिक क्रिया सहज चालत राहतात तशा अशा मनुष्याच्या प्रवृत्ती सहज चालत राहातात. आपण स्वतः त्या चालवीत आहों असा अभिमान त्याला नसतो, तशी त्याला जाणीवसुद्धां नसते. तो स्वतः निमित्तमात्र असतो– सफळता मिळाली तरी काय आणि न मिळाली तरी काय ? तो फुलतहि नाहीं, घाबरतहि नाहीं. त्याचीं सर्व कर्में यज्ञरूपानें, सेवेप्रीत्यर्थ चालतात. तो सर्व क्रियांत ईश्वरालाच पाहतो आणि शेवटीं तो स्वतः ईश्वरालाच पावतो.

यज्ञ पुष्कळ प्रकारचे सांगितलेले आहेत. त्या सर्वांच्या मुळाशीं शुद्धि आणि सेवा असते. इंद्रियदमन हा एक प्रकारचा यज्ञ आहे. दान करणें हा दुसरा यज्ञ आहे. प्राणायामादिसुद्धां शुद्धीकरितां केलेले यज्ञ आहेत.

त्यांचें ज्ञान कोणा जाणत्या गुरूकडून मिळवावें. अशा गुरूची भेट विनय, तळमळ आणि सेवा यांमुळेंच होऊं शकते. न समजतांच यज्ञाच्या नांवानें कोणी अनेक प्रवृत्ती करायला लागला तर, त्या अज्ञानामुळें केलेल्या असल्यानें तो हिताऐवजीं अहितहि करील. म्हणून प्रत्येक कर्म ज्ञानपूर्वक करण्याची फार आवश्यकता आहे.

हें ज्ञान म्हणजे अक्षर–ज्ञान नव्हे. या ज्ञानांत शंकेला स्थानच राहात नाहीं. त्याचा आरंभ श्रद्धेपासून होतो आणि अनुभवांत त्याची परिणति होते. अशा ज्ञानाच्या योगानें मनुष्य सर्व जीवांना आपल्यामध्यें आणि आपल्याला ईश्वरामध्यें पाहतो, म्हणजेच हें सर्व प्रत्यक्षाप्रमाणें त्याला ईश्वरमय वाटतें. असें ज्ञान पाप्यांतल्या पाप्यालासुद्धां तारतें. असें ज्ञान कर्मबंधनांतून मनुष्याला मुक्त करतें, म्हणजेच कर्माचीं फळें त्याला स्पर्श करीत नाहींत. ज्ञानासारखें पवित्र या जगांत दुसरें कांहीं नाहीं. म्हणून तूं श्रद्धा बाळगून, ईश्वरपरायण होऊन, इंद्रियांना ताब्यांत ठेवून असें ज्ञान मिळविण्याकरितां झट; त्यानें तुला परम शांति मिळेल.

तिसरा, हा चौथा आणि यानंतरचा पांचवा अध्याय हे तीन्ही एकत्र मनन करण्यालायक आहेत. त्यांतून अनासक्तियोग काय तें समजून येतें. ही अनासक्ति– निष्कामता – कशी साधते हेंहि त्यांत थोडचाफार प्रमाणांत सांगितलें आहे. हे तीन्ही अध्याय बरोबर समजून घेतले असले तर पुढचे समजण्याला फारसे अवघड जाणार नाहींत. यानंतरचे अध्याय अनासक्ति कशी साधावी त्याचीं साधनें अनेक रीतींनीं आपल्याला सांगतात. या दृष्टीनें गीतेचा अभ्यास आपल्याला आवश्यक आहे आणि त्याच्या योगानें आपल्या रोजच्या अडचणींचा उकल आपल्याला विनायास करतां येईल. रोज संवय लावून घेतल्यानें हें शक्य होईल. प्रत्येकानें प्रयोग करून पाहावा. क्रोध आला कीं लगेच त्याच्या विषयींचा श्लोक आठवावा आणि तो शांत करावा. एखाद्याचा द्वेष वाटला, उतावीळपणा होतोसें वाटलें, खाखा सुटली, अमुक करावें की करूं नये असें संकट येऊन पडलें– अशा सर्व प्रश्नांचा उकल, श्रद्धा असेल तर आणि नित्य मनन असेल तर, गीतामातेकडून मिळत जाईल. असें आपण करूं लागावें याकरितांच रोजचें पारायण आणि त्याचकरितां हा प्रयत्न आहे.

# यज्ञ*–१

आपण 'यज्ञ' शब्दाचा उपयोग पुष्कळ करतों. आपण नित्याचा महायज्ञहि योजला आहे. म्हणून त्या शब्दाचा विचार करणें आवश्यक आहे. 'यज्ञ' म्हणजे या लोकांत किंवा परलोकांत कसल्याहि मोबदल्याची किंवा प्राप्तीची अपेक्षा न राखतां परार्थ केलेलें कोणतेंहि कर्म. कर्म कायिक, वाचिक, मानसिक कोणतेंहि असेल. कर्माचा अत्यंत विशाल अर्थ घ्यावा. पर म्हणजे केवळ मनुष्यजातच नव्हे तर जीवमात्र. या दृष्टीनें. आणि अहिंसेच्या दृष्टीनेंसुद्धां, मनुष्यजातीच्या सेवेकरितांहि दुसऱ्या जीवांची आहुति देणें किंवा त्यांचा नाश करणें हें यज्ञांत बसूं शकणार नाहीं. वेद इत्यादींमध्यें अश्व, गाय इ. चा होम करावा असा उल्लेख येतो. त्याचा आपण भावार्थ घेतला आहे. सत्य आणि अहिंसेच्या ताजव्यांत अशी पशुहिंसा बसूं शकत नाहीं असें समजून तेवढ्यावर आपण समाधान मानलें आहे. धर्म म्हणून मानल्या गेलेल्या वचनांचे ऐतिहासिक अर्थ आपण करीत बसत नाहीं आणि तसे अर्थ शोधण्याची आपली असमर्थता आपण कबूल करतों. ती समर्थता मिळविण्याचाहि आपण प्रयत्न करीत नाहीं, कारण ऐतिहासिक अर्थाला जीवहिंसा पसंत असली तरी सत्य–अहिंसा हा सर्वश्रेष्ठ धर्म मानल्यानंतर आपल्या बाबतींत त्या अर्थाला शोभणारा आचार त्याज्य आहे.

वरील व्याख्येप्रमाणें विचार करतां, ज्या कर्मांत जास्तींत जास्त जीवांचें ज्यास्तीत ज्यास्त क्षेत्रांत कल्याण होईल आणि जें कर्म जास्तींत जास्त माणसें जास्तींत जास्त सहज रीतीने करूं शकतील, आणि ज्याच्या मार्फत जास्तींत जास्त सेवा होत असेल तो महायज्ञ किंवा उत्तम यज्ञ, हें आपल्याला सहज दिसून येईल. म्हणजे कोणाच्याहि सेवेकरितां

---

*'मंगलप्रभात' मध्यें प्रसिद्ध केलेल्या पत्रांनंतर गांधीजींनीं 'यज्ञा' विषयीं दोन पत्रें लिहिलीं होतीं. तसेंच त्या काळांत खासगी पत्रांतून त्याविषयीं कांहीं विशेष लिहिलें होतें. 'यज्ञा'चा अर्थ समजून घेतांना तें सहाय्यकारी होईल असें मानून तें येथें देण्यांत आलें आहे.

— प्रकाशक ( मूळ गुजराती आवृत्ति )

दुसऱ्या कोणाचें अकल्याण इच्छिणें किंवा करणें हें यज्ञकार्य मुळींच नव्हे. आणि यज्ञाखेरीज केलेलें कर्म म्हणजे बंधन आहे असें भगवद्‌गीता, आणि आपला अनुभवसुद्धां, आपल्याला शिकवितो.

अशा यज्ञावांचून हें जगत् एक क्षणसुद्धां टिकूं शकणार नाहीं. आणि म्हणूनच गीताकारांनीं ज्ञानाचें कांहीं थोडेंसें दर्शन दुसऱ्या अध्यायांत करून दिल्यानंतर तिसऱ्या अध्यायात त्याकडे जाण्याच्या साधनांत आपला प्रवेश करून दिला, आणि स्पष्ट शब्दांत सांगून टाकलें, कीं आपण जन्मापासूनच यज्ञाला बरोबर घेऊन आलों आहों, म्हणजेच हा देह केवळ परमार्थाकरितांच आपल्याला मिळालेला आहे. आणि म्हणून यज्ञ न करतां जो जेवतो तो चोरीचें जेंवतो असें कडक वाक्य गीताकारांनीं सांगितलें आहे. शुद्ध जीवन घालवूं इच्छिणाऱ्यांचें सर्व कार्य यज्ञ म्हणूनच होईल. आपण यज्ञाबरोबर अवतरलों म्हणजे आपण सर्वांचे ऋणी– देणेकरी झालों. म्हणून आपण जगाचे सदोदित गुलाम–सेवक. आणि गुलामाला स्वामी सेवा घेतल्याचा मोबदला म्हणून जसें अन्नवस्त्रादि देतो तसा जगाचा धनी आपल्याला आपल्याकडून चाकरी घेतल्याबद्दल जें कांहीं अन्नवस्त्रादि देईल तें आपण आभारपूर्वक घ्यावें. तेवढ्याचासुद्धां आपल्याला हक्क आहे असें आपण मानूं नये; म्हणजेच तें न मिळालें तर धन्याची आपण निंदा करूं नये. हें शरीर त्याचें आहे; आपल्या इच्छेप्रमाणें त्यानें तें ठेवावें वा टाकावें. ही स्थिति दुःखदायक नाहीं, कींव करण्याजोगीहि नाहीं; आपलें स्थान जर आपण समजून घेतलें तर ती स्वाभाविक आहे, आणि म्हणून सुखद आहे, वांच्छनीय आहे. असें परम सुख अनुभवण्याकरितां अविचल श्रद्धेचीच आवश्यकता आहे. स्वतःविषयीं चिंताच करूं नये, सर्व चिंता परमेश्वरावर सोंपवावी असा आदेश मीं तर सर्व धर्मांत बघितला आहे.

पण या वचनानें कोणी घाबरून जाण्याचें कारण नाहीं. मन स्वच्छ ठेवून जो सेवेचा आरंभ करतो त्याला त्याची आवश्यकता दिन-प्रतिदिन स्पष्ट होत जाते आणि तसतशी त्याची श्रद्धा वाढत जाते. जो स्वार्थ सोडायलाच तयार नाहीं, आपली जन्माची स्थिति ओळखायलाच तयार नाहीं, त्याच्या बाबतींत कोणताहि सेवामार्ग कठीण आहे. त्याच्या सेवेला

स्वार्थाचा वास येतच राहील. पण असे स्वार्थी जगांत क्वचित्च आढळतील. कांहीं ना कांहीं निःस्वार्थ सेवा आपण सर्वजण कळत नकळत करीतच असतों. तीच गोष्ट जर आपण विचारपूर्वक करायला लागूं तर आपली पारमार्थिक सेवा करण्याची वृत्ति उत्तरोत्तर वाढतच जाईल आणि त्यांतच आपलें खरेंसुख आहे आणि जगाचें कल्याण आहे.

• •

## यज्ञ – २

ता. २८–१०–१९३०
मंगलप्रभात

'यज्ञ 'विषयीं गेल्या आठवड्यांत लिहिलें पण पोट भरलें नाहीं. जी वस्तु जन्माबरोबर घेऊन आपण या जगांत प्रवेश केला आहे तिच्याविषयीं जरा अधिक विचार करणें व्यर्थ ठरणार नाहीं. यज्ञ हें नित्याचें कर्तव्य आहे, अष्टौप्रहर आचरण्याची ती गोष्ट आहे असा विचार केला म्हणजे, आणि यज्ञ म्हणजे सेवा असें जाणलें म्हणजे, 'परोपकाराय सतां विभूतयः' असलें वचन खटकतें. निष्काम सेवा हा परोपकार नव्हे तर स्वतःवर केलेला उपकार आहे, जसें कर्ज फेडणें हा परोपकार नव्हे तर स्वतःची सेवा आहें, स्वतःवरच उपकार आहे, स्वतःवरचा भार उतरणें आहे, स्वतःचा धर्म संभाळणें आहे. शिवाय फक्त संताचेंच भांडवल 'परोपकारासाठीं'–म्हणजे अधिक चांगल्या शब्दांत–सेवेसाठीं आहे असें नाहीं तर मनुष्यमात्राचें भांडवलच सर्व सेवेकरितां आहे. आणि असें जर आहे तर सगळ्या जीवनांतून भोगाला संक्षेप जाऊन तें त्यागमय बनतें, किंवा त्यागांतच तो भोग भोगतो. मनुष्याचा त्याग म्हणजेंच त्याचा भोग आहे. हाच पशु आणि मनुष्य यांच्यामधला भेद. असा जीवनाचा अर्थ केला तरजीवन शुष्क होतें, कलेचा नाश होतो आणि गृहस्थजीवन नाहींसें होतें, असा आरोप पुष्कळजण करतात आणि वरील विचार दोषपूर्ण मानतात. पण मला वाटतें कीं असें म्हणण्यांत त्यागाचा विपरीत अर्थ केला जातो. त्याग म्हणजे संसारांतून उठून अरण्यांत जाऊन राहणें नव्हे, तर जीवनाच्या सर्व प्रवृत्तींत त्यागाची भावना

असणें. गृहस्थजीवन त्यागमय असूं शकेल आणि भोगमयहि असूं शकेल. चांभार जोडे शिवील, शेतकरी शेती करील, व्यापारी व्यापार करील, न्हावी केस कापील यांत त्यागभावना असूं शकेल किंवा भोगाची लालसा असूं शकेल. यज्ञार्थ व्यापार करणारा कोटचवधी रुपयांचा व्यापार करीत असूनसुद्धां लोकसेवेचाच विचार करील, तो कोणालाहि फसविणार नाहीं, तो उलटेंपालटें करणार नाहीं, करूं नये असें साहस करणार नाहीं, करोडो रुपयांचा धनी असतांनासुद्धां साधेपणानें राहील, करोडो कमवीत असतांनाहि तो कोणाचें नुकसान करणार नाहीं, कोणाचें नुकसान होत असेल तर तो करोडो गमावील. असा व्यापारी माझ्या कल्पनेंतच आहे असें म्हणून कोणी हंसूं नये. जगाच्या सुदैवानें असे व्यापारी पश्चिमेकडेहि आहेत आणि पूर्वेकडेहि आहेत. हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच का ते असेनात, एक जरी असा चालता बोलता नमुना असला, तरी काल्पनिकतेचा आरोप त्यामुळें नाहींसा होतो. असा एक शिंपी आपण वढवाण येथें बघितला. असा एक न्हावी मला माहीत आहे. अशा एका विणकराला आपल्यापैकीं कोण जाणत नाहीं ? विचार केल्यानें आणि शोधल्यानें सर्व धंद्यांत केवळ यज्ञार्थ जीवन घालविणारे आणि आपला धंदा चालविणारे लोक आपल्याला दिसून येतील. असे याज्ञिक आपला धंदा करतांना आपली उपजीविका मिळवितात हें खरें आहे. पण ते आपला धंदा उपजीविकेकरितां करीत नाहीत, निर्वाहाचें साधन हें त्यांच्या बाबतींत त्या धंद्यापासून मिळणारें गौण फळ आहे. मोतीलाल पूर्वींहि शिंपी होता आणि ज्ञान झाल्यानंतरसुद्धां शिंपीच राहिला. त्याची भावना बदलतांच त्याचा धंदा यज्ञरूप झाला, त्यांत पवित्रता आली आणि धंद्यांत दुसऱ्याच्या सुखाचा विचार आला. त्याच्या जीवनांत त्याच वेळीं कलेनें प्रवेश केला. यज्ञमय जीवन ही कलेची पराकाष्ठा आहे, खरा रस त्यांतच आहे. कारण त्यांतून रसाचे नित्य नवे झरे फुटतात. त्यांचा आस्वाद घेतांना मनुष्य कंटाळत नाहीं, झरे कधीं आटत नाहींत. यज्ञ हा बोजा वाटूं लागला तर तो यज्ञ नव्हे; बोचतो तो त्याग नव्हे. भोगाच्या अंतीं नाश असतो, त्यागाच्या अंतीं अमरता असते. रस ही स्वतंत्र वस्तु नाहीं, तो आपल्या वृत्तींत असतो. एकाद्याला नाटकाच्या पडद्याविषयीं रस वाटेल,

दुसऱ्याला आकाशांत नित्य नवे पडदे उघडतात त्यांत रस वाटेल. तेव्हां रस हा शिक्षणाचा विषय आहे. रसरूपानें ज्याचें लहानपणीं वळण लागलें असेल, रसरूपानें जें लोकांच्या अंगीं बाणेल तो रस म्हटला जाईल. एका लोकसमाजाला जें रसमय वाटतें तें दुसऱ्याला रसहीन वाटतें. अशीं उदाहरणें आपल्याला पुष्कळ मिळतील.

दुसरें म्हणजे, यज्ञ करणारे पुष्कळ सेवक असें समजतात कीं आपण निष्काम भावानें सेवा करतों तेव्हां लोकांकडून जें आपल्याला आवश्यक असेल तें घेण्याचा आणि नको असलेलेंसुद्धां घेण्याचा आपल्याला परवाना मिळाला आहे. असा विचार ज्या सेवकाच्या मनांत ज्या क्षणीं आला त्या क्षणीं तो सेवक संपला आणि पुढारी झाला. सेवेंत स्वतःच्या सुखसोयींच्या विचारांना स्थानच नसतें. सेवकाची सुखसोय त्याचा स्वामी–ईश्वर–पहाणारा आहे, ती त्याला द्यावयाची असेल तर, किंवा जितकी द्यावयाची असेल तितकी, तो देईल. असा विचार करून, सेवक हा जें पुढें येईल तें आपलें असें करीत बसणार नाहीं. अवश्य तेवढेंच घेऊन बाकीच्याचा तो त्याग करील. आपली सुखसोय लागली नाहीं तरी तो शांत राहील, रोषरहित राहील, मनांतसुद्धां वाईट वाटून घेणार नाहीं. याज्ञिकाचा मोबदला–सेवकाची मजूरी–यज्ञ म्हणजे सेवा हीच आहे. त्यांतच त्याला समाधान असणार.

आणखी एक गोष्ट. सेवाकार्यांत वेठ (बिगार) करून चालणार नाहीं. सेवा सर्वांच्या शेवटीं ठेवतां येणार नाहीं. आपलें असेल तर सजवायचें, दुसऱ्याचें आहे, फुकट करायचें आहे, तेव्हां वाटेल तसें आणि वाटेल तेव्हां केलें तरी चालेल, असा विचार करणाऱ्याला आणि वागणाऱ्याला यज्ञाचीं मूळाक्षरेंहि समजलीं नाहींत. सेवा ही सर्व कलांनीं सजवायची असते, आपली सारी कला त्यांत ओतायची असते. ती सेवा पहिली, मागाहून आपली. सारांश, शुद्ध यज्ञ करणाऱ्याला स्वतःचें असें काहींच नसतें. त्यानें सर्व कृष्णार्पण केलेलें असतें.

• •

## यज्ञ — ३

(खासगी पत्रामधून)

... चरख्याविषयीं आणि फ्रेंच भाषेविषयीं तुम्हीं लिहिलें आहे त्यांतसुद्धां सिद्धान्ताच्या दृष्टीनें मला दोष दिसतो. चरख्याला एकदां सर्वार्पण केल्यानंतर तो वेळ इतर लाभ घेण्यामध्यें घालवितां येणार नाहीं. यज्ञार्थ कांतीत असतांना कोणी आलें आणि बोलूं लागलें तर सभ्यपणा म्हणून त्यांच्याशीं बोलावें; पण बोलणें चालतें तर शिकायला काय हरकत आहे असा न्याय येथें चालणार नाहीं. बोलणें आंखडतें घ्यायचें म्हटलें तर घेतां येतें; बोलणाराहि पुष्कळ वेळ बसूं म्हणणार नाहीं. पण शिक्षक म्हटल्यानंतर मग पुरता वेळ बसायला तो बांधलेला आहे. हें सारें यज्ञ म्हणून आपण चरखा चालवीत असूं तर त्यापुरतें आहे. माझ्या बाबतींत या सत्याचा मी प्रत्यक्ष अनुभव घेत आहें. चरखा चालवीत असतांना इतर विचारांत मी गुंतलों कीं गतीवर, नंबरावर, समानतेवर परिणाम होतो. समजा, रोमे रोलाँ किंवा बीथोवन पियानोवर बसले आहेत. त्यांत ते इतके तन्मय होतील कीं ते बोलूं शकणार नाहींत कीं मनांत दुसरे विचार आणणार नाहींत. कला आणि कलाकार वेगळे राहात नाहींत. हें जर पियानोच्या बाबतींत लागू तर चरखा-यज्ञाच्या बाबतींत किती अधिक लागू असलें पाहिजे ? असें आचरण आज आपल्याला शक्य होणार नाहीं ही गोष्ट बाजूला ठेवा. आपलें विचारक्षेत्र जर आज आपण संपूर्ण दोषरहित असें ठेवूं तर त्याप्रमाणें आचार करण्याला केव्हांतरी समर्थ होऊं. पुनः सांगतों कीं यांत जें होऊन गेलें त्यावर टीका नाहीं. अति अपूर्ण अशा मला दुसऱ्यावर टीका करण्याचा अधिकार तरी कुठें आहे ? मला जें समजतें त्याचा मी तरी स्वतः कुठें पुरता अंमल करतों आहे ? तसा मीं केला असता तर चरख्याचें संगीत सात लाख खेड्यांत केव्हांच ऐकूं यायला लागलें असतें; अजूनसुद्धां जें मी जाणतों त्याप्रमाणेंच पुरते शंभर टक्के वागूं शकलों तर येथें बसल्या बसल्यां चरखा वायुवेगानें फैलावेल. मालवीयजींना भागवत-पुराणाबद्दल बोलतांना जर थकवा येत नाहीं तर चरखा-संगीताविषयीं बोलतांना मी कां थकेन ? चरखा 'पुराण'

तरी कसें म्हणावें ? पुराण आमच्यानंतरची पिढी रचील, अर्थात् जर रचण्यासारखें आपण कांहीं केलें असेल तर ! आज आपण त्याचें मोडकें तोडकें 'संगीत' रचतों आहों झालें. शेवटीं त्यांतून कसा सूर निघेल तें आपली तपश्चर्या, आपलें समर्पण यांवर अवलंबून आहे.

....आतां मागच्या पत्रांत लिहिलें तें थोडेंसें पुढें चालू करतों.

यज्ञाच्या वेळीं मौन असावें आणि त्या वेळीं विचार चरख्यासंबंधींचे म्हणजे खादीविषयींचे असावेत किंवा रामनाम असावें हा आदर्श आहे असें मला वाटतें. रामनामाचा विस्तृत अर्थ करावा. खरें म्हणजे रामनाम हें कळत नकळत सदा सर्वकाळ असावेंच, संगीतांत जसा तंबोऱ्याचा सूर तसें. पण जें काम हात करीत असतील त्यांत जर आपण एकाग्र होत नसूं तर रामनामाचा मुद्दाम जप करावा. चरखा चालवीत असतांना आपण गप्पा मारतों किंवा कांहीं ऐकतों सवरतों. ही क्रिया अर्थात् यज्ञरूप होत नाहीं. जर हा यज्ञ कर्तव्य म्हणून असेल तर तेवढा वेळ त्यांत होमला गेला पाहिजे. आणि ज्याचें सारें जीवन यज्ञरूप आहे व जो अनासक्त आहे तो एकच काम एका वेळीं करील. हें सर्व जाणत असूनसुद्धां (कमीजास्त प्रमाणांत) मीच पहिला पापी ठरतो. कारण कीं मी कधीं निवांत बसून एकान्तांत म्हणजे मौनपूर्वक कांतलेंच नाहीं असें म्हणतां येईल. मौनवाराच्या दिवशीं कांतीत असतांना टपाल ऐकत असे किंवा कुणाला कांहीं सांगायचें असेल तर तें. ही वाईट संवय येथेंहि गेलेली नाहीं. तेव्हां मी नियमित कांतणारा असूनसुद्धां त्यांत ढ राहिलों आणि ताशीं कसाबसा २०० तारापर्यंत आतां पोचलों आहें यांत काय नवल ? दुसरेहि कित्येक दोष माझ्यांत असलेले मला दिसत आहेत. जसे, धागा तुटणें, माळ करायला न येणें, चमरख्यांचें कमी ज्ञान असणें, कापसाची जात न समजणें, समानता वगैरे निश्चितपणें काढतां न येणें, धाग्याची पारख न करतां येणें इ. हें काम काय याज्ञिकाला शोभण्यासारखें आहे ? मग खादी ढिलेपणानें चालली आहे यांत काय आश्चर्य ? जर दरिद्रनारायण असेल (आणि तो आहेच) आणि जर त्याचा प्रसाद खादी असेल तर तें सांगणारा व समजणारा जो मी, त्या माझा आचार किती ढिला बरें ! म्हणून याविषयीं दुसऱ्या कोणाला दोष द्यायला मनच होत

नाहीं. तुम्हांलाच फक्त माझ्या दोषाचें आणि दुःखाचें, आणि त्यांतून उत्पन्न होणाऱ्या जाणिवेचें व ज्ञानाचें दर्शन करवून देत आहे. . . . .मी चरख्याचा किती कच्चा मांत्रिक आहें हें मला दिसत आहे. मंत्र मीं जाणला पण त्याचा विधि पुरता आचरला नाहीं, अर्थात् तो मंत्र पूर्ण शक्ति प्रकट करूं शकला नाहीं. हें जसे चरख्याला लागू तसेंच याच पद्धतीनें सगळ्या जीवनाला लागू करून पाहा. म्हणजे कल्पनेंत तरी निदान तुम्हांला जीवनांतल्या अद्भुत शांतीचा अनुभव येईल, आणि साफल्याचाहि. ‘ योगः कर्मसु कौशलम् ’ चा हा अर्थ आहे. असें करीत असतांना होईल तेवढेंच करावें, तेवढेंच हातीं घ्यावें आणि संतोष मानावा. तसें केल्यानें आपण आपल्या आणि समाजाच्या तीव्रतम प्रगतींत भाग घेतल्यासारखें होणार आहे याविषयीं मला दृढ विश्वास आहे. . . .यज्ञ म्हणून जेवढे तार तुम्ही समजत असाल तेवढे अशा शास्त्रीय रीतीनें काढा. बाकीचे वाटेल त्या स्थितींत काढतां येतील—हिंदुस्थानची संपत्ति वाढविण्याकरितां म्हणून वगैरे...

## अध्याय ५ वा

अर्जुन म्हणतो : तुम्ही ज्ञान वरचढ म्हणतां तेव्हां कर्म करण्याची जरूर नाहीं, संन्यासच बरा असा माझा समज झाला आहे. पण पुनः कर्माचीहि तुम्ही स्तुति करतां तेव्हां योगच बरा असें वाटूं लागतें. या दोहोंत अधिक बरें काय तें मला निश्चयपूर्वक सांगाल तरच कांहीं शांति लाभेल.

हें ऐकून भगवान् म्हणाले : संन्यास म्हणजे ज्ञान आणि कर्मयोग म्हणजे निष्काम कर्म. हे दोन्ही चांगले आहेत. पण माझी जर पसंती विचारशील तर मी म्हणतों कीं योग, म्हणजे अनासक्तिपूर्वक कर्म, हें अधिक चांगलें. जो मनुष्य कशाचाहि किंवा कोणाचाहि द्वेष करीत नाहीं, कसली इच्छा ठेवीत नाहीं आणि सुख-दुःख, थंडी-ऊन वगैरे द्वंद्वांपासून दूर राहतो तो संन्यासीच आहे, मग तो कर्म करीत असो वा नसो. असा मनुष्य सहजच बंधनमुक्त होतो. अज्ञानी लोक ज्ञान आणि योग वेगळे वेगळे मानतात. ज्ञानी तसें मानीत नाहीं. दोन्हींतून परिणाम एकच

निघतो, म्हणजेच दोन्हींतून स्थान तेंच लाभतें. म्हणून जो दोहोंना एकरूप जाणतो तोच खरा जाणणारा, कारण ज्याला शुद्ध ज्ञान आहे तो केवळ संकल्पानें कार्यसिद्धि पावतो, म्हणजे बाह्यकर्म करण्याची त्याला जरूर पडत नाहीं. जनकपुरी जळत असतांना इतरांचा धर्म आग विझवायला जाणें हा होता. जनकानें फक्त संकल्प करण्यांतच ती आग विझविण्याचें त्याच्या वांट्याचें काम होऊन जात होतें, कारण त्याचे सेवक त्याच्या ताब्यांत होते. तो घागरभर पाणी घेऊन धांवला असता तर समूळ नुकसान झालें असतें. दुसरे त्याच्याकडे पाहात राहिले असते आणि आपलें कर्तव्य विसरले असते, आणि गडबडून जाऊन भल्या मनानें जनकाचें रक्षण करायला धांवले असते. पण साऱ्यांनाच कांहीं झटपट जनक होणें शक्य नसतें. जनकाची अवस्था फार दुर्लभ आहे. कोटचवधींमधून एखाद्याला पुष्कळ जन्मांच्या सेवेनंतर ती लाभूं शकते. ती लाभण्यांत कांहीं विशेष शांति आहे असेंहि नाहीं. उत्तरोत्तर निष्काम कर्म केल्यानें मनुष्याचें संकल्पबळ वाढत जातें आणि बाह्य कर्म कमी कमी होत जातें. खरें म्हणजे त्याला त्याची जाणीवहि होत नाहीं असें म्हणतां येईल. त्याकरितां त्याचा प्रयत्नहि नसतो. तो आपला सेवाकार्यांतच निमग्न राहतो, आणि तसा राहिल्यानें सेवाशक्ति इतकी वाढते कीं त्या सेवेंतून विसावा घ्यावासें त्याला वाटतच नाहीं. त्यामुळें शेवटीं त्याच्या संकल्पांतच सेवा येऊन जाते. जशी खूप गतिमान् वस्तु स्थिर असल्यासारखी वाटते तशी. असा मनुष्य कांहीं करीत नाहीं असें म्हणणें उघडच अयोग्य आहे. पण अशी स्थिति सामान्यपणें कल्पिण्याजोगीच आहे, अनुभवाला येत नाहीं. म्हणून मी कर्मयोग हा विशेष आहे असें म्हटलें आहे. करोडो लोक निष्काम कर्मांतूनच संन्यासाचें फळ मिळवीत असतात. ते संन्यासी होऊं पाहातील तर हेंहि नाहीं न् तेंहि नाहीं असें होईल. संन्यासी होऊं जातां, मिथ्याचारी बनण्याचा मोठा संभव आहे; आणि इकडे कर्मांतून तर गळालाच, तेव्हां सगळेंच गमावलें असें होईल. पण जो मनुष्य अनासक्ति-पूर्वक कर्म करीत शुद्ध झाला, ज्यानें आपल्या मनाला जिंकलें, ज्यानें आपलीं इंद्रियें ताब्यांत ठेवलीं, ज्यानें सर्व जीवांशीं आपलें ऐक्य साधलें आणि सर्वांना आपल्यासारखेंच जो मानूं लागला, तो कर्म करीत असून-

सुद्धां त्यापासून अलग राहतो; म्हणजेच बंधनांत सांपडत नाहीं. असा मनुष्य बोलण्या–चालण्याची क्रिया करीत असला तरी त्याच्या क्रिया इंद्रियें आपापल्या धर्माप्रमाणें करतात असें होतें; तो स्वतः कांहीं एक करीत नाहीं. शरीरानें निरोगी असलेल्या मनुष्याच्या क्रिया कशा स्वाभाविक असतात. त्याचा कोठा वगैरे आपोआप काम करीत असतो; त्याकडे त्याला लक्ष द्यावें लागत नाहीं. तसाच ज्याचा आत्मा निरोगी आहे तो शरीरांत राहूनसुद्धां स्वतः अलिप्त असतो, कांहीं करीत नाहीं, असें म्हणतां येईल. म्हणून माणसानें सर्व कर्में ब्रह्मार्पण करावींत. ब्रह्माच्या प्रीत्यर्थच करावींत. त्यायोगें कर्म करीत असतांनासुद्धां पापपुण्याचा पुंज तयार होणार नाहीं आणि पाण्यांत असलेल्या कमळपत्रासारखा तो कोरडाच राहील. म्हणून ज्याच्या चित्तांत अनासक्ति बाणली आहे असा योगी शरीर-मन-बुद्धीनें कर्में करीत असूनहि संगरहित होऊन, अहंपणा सोडून, वागतो, आणि शुद्ध होतो व शांति पावतो. दुसरा अ–योगी परिणामांत गुंतून राहिल्यामुळें कैद्याप्रमाणें आपल्या कामनांनीं बांधला जातो. नऊ दरवाजे असलेल्या देहरूपी शहरांत सर्व कर्मांचा मनानें त्याग करून आपण कांहीं करीत व करवीत नाहीं हें समजून योग्यानें सुखानें राहावें. संस्कारी संशुद्ध आत्मा पापहि करीत नाहीं, पुण्यहि करीत नाही. ज्यानें कर्मांतून आसक्ति काढून घेतली, अहंभावाचा नाश केला, फळाचा त्याग केला जो जडवत् होऊन वर्ततो, निमित्तमात्र बनतो, त्याला पापपुण्याचा स्पर्श कसा होणार? याच्या उलट, जो अज्ञानांत सांपडला आहे तो रोज योजतो कीं 'आज इतकें पुण्य केलें, इतकें पाप केलें,' आणि असें करीत करीत तो रोज खड्ड्यांत उतरत जातो आणि शेवटीं त्याच्या वांट्याला पापच राहातें; पण जो ज्ञानाच्या योगानें आपल्या अज्ञानाचा रोज नाश करीत जातो त्याच्या कार्यांत रोज निर्मळता वाढत जाते. जगाच्या दृष्टीनें त्याच्या कर्मांत पूर्णता आणि पुण्यता असते. अशा मनुष्याचीं सर्व कर्में स्वाभाविक दिसून येतात. असा मनुष्य समदर्शी असतो. त्याला विद्या-विनयसंपन्न, ब्रह्म जाणणारा ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रें, विवेकहीन –– म्हणजे पशूपेक्षांसुद्धां अधोगतीला गेलेला मनुष्य – हे सर्व सारखेच असतात. म्हणजेच तो सर्वांची समभावानें सेवा करील. एकाला मोठा मानून त्याला मान

द्यायचा आणि दुसऱ्याला तुच्छ मानून त्याची अवगणना करायची असें करणार नाहीं. अनासक्त मनुष्य आपल्याला सर्वांचा देणेकरी मानील आणि त्याचें त्याचें देणें चुकवून प्रत्येकाला पूर्ण न्याय करील. अशा मनुष्यानें येथेंच जगताला जिंकून घेतलें आणि तो ब्रह्ममय झाला. त्याचें कोणी प्रिय केलें तरी तो फुलत नाहीं, कोणी शिव्या दिल्यानें तो दुखवला जात नाहीं. आसक्ति असणारा मनुष्य आपलें सुख बाहेरून शोधतो, अनासक्ताला निरंतर अंतरांतून शांति मिळते, कारण त्यानें बाहेरून जीवाला ओढून घेतलेलें असतें. इंद्रियजन्य भोग तेवढे सर्व दुःखाला कारण आहेत. मनुष्यानें काम-क्रोध इत्यादींपासून होणारे उपद्रव सहन करणें इष्ट आहे. अनासक्त योगी सर्व प्राण्यांच्या हितांतच मग्न राहतो. संशयांची त्याला बाधा होत नाहीं. असा योगी बाह्य जगापासून निराळा राहतो, प्राणायामादींचे प्रयोग करून अंतर्ध्यानी होण्याचा प्रयत्न करतो आणि इच्छा–भय–क्रोधादीं-पासून वेगळा राहतो. तो मलाच सर्वांचा महेश्वर, मित्र आणि यज्ञादींचा भोक्ता म्हणून जाणतो आणि शांति मिळवितो.

• •

## अध्याय ६ वा

अनु. २६३०६ निबंध
क्रमांक १२०९ २२।३।६०

येरवडा मंदिर
१६–१२–१९३०
मंगलप्रभात

श्रीभगवान् सांगतात: कर्मफळ सोडून जो मनुष्य कर्तव्यकर्म करतो तो संन्यासी म्हणावयाचा आणि योगीहि म्हणावयाचा. कर्मांचा त्याग करून बसतो तो आळशी आहे. खरें म्हणजे मनाच्या वावड्या उडविण्याचें सोडलें पाहिजे. ज्याला योग म्हणजे समत्व साधावयाचें आहे त्याचें कर्मा-शिवाय चालायचेंच नाहीं. ज्याला समत्व प्राप्त झालें आहे तो शान्त दिसेल, याचाच अर्थ त्याच्या विचारा विचारांत कर्माची शक्ति आलेली असते. जेव्हां मनुष्य इंद्रियांच्या विषयांत किंवा कर्मांत लिप्त होऊन राहात नाही आणि मनाचे सर्व तरंग सोडून देतो तेव्हां त्यानें योग साधला–तो योगारूढ झाला–असें म्हणतां येतें.

आत्म्याचा उद्धार आत्म्यानेंच व्हावयाचा. म्हणून आपणच आपले शत्रु किंवा मित्र बनतों असें म्हणतां येईल. ज्यानें मन जिंकलें त्याचा आत्मा मित्र आहे, ज्यानें जिंकलें नाहीं त्याचा आत्मा शत्रु आहे. ज्यानें मन जिंकलें आहे त्याची ओळख अशी कीं, त्याला ऊन-थंडी, सुख-दुःख, मान-अपमान सर्व समान असतात, ज्याला ज्ञान आहे, ज्याला अनुभव आहे जो अविचल आहे, ज्यानें इंद्रियांवर ताबा मिळविला आहे आणि ज्याला सोनें-माती-दगड समान वाटतात, त्याचें नांव योगी. असा मनुष्य शत्रु, मित्र, साधु, असाधु वगैरेविषयीं समभाव ठेवतो. अशा स्थितीप्रत पोचण्याकरितां मन स्थिर करावें, वासनांचा त्याग करावा, एकान्तांत बसून परमात्म्याचें ध्यान करावें, केवळ आसनादि करणें पुरेसें नाहीं. समत्वाकडे पोचूं इच्छिणाऱ्यानें ब्रह्मचर्यादि महाव्रतांचें चांगलें पालन केलें पाहिजे. असा आसनबद्ध होऊन यमनियमांचें पालन करणारा मनुष्य आपलें मन परमात्म्यांत स्थिर करतो तेव्हां त्याला परम शांति लाभते.

असें समत्व अधाशीपणें खाणाऱ्याला मुळींच मिळत नाहीं, पण कडक उपवासांनींहि मिळत नाहीं, फार झोपणाऱ्याला मिळत नाहीं, तसेंच जागरण करण्यानेंहि मिळत नाहीं. समत्व साधूं इच्छिणाऱ्यानें सर्व गोष्टींत–खाण्यांत, पिण्यांत, झोपण्यांत, जागण्यांतसुद्धां प्रमाण संभाळलें पाहिजे. एखाद्या दिवशीं खूप खाल्लें आणि दुसऱ्या दिवशीं उपवास केला, एखाद्या दिवशीं खूप झोपून दुसऱ्या दिवशीं जागरण केलें, एखाद्या दिवशीं खूप काम करून दुसऱ्या दिवशीं आळस केला, ही योगाची खूण मुळींच नाहीं. योगी हा सदा स्थिरचित्त असेल आणि कामनेचा त्यानें स्वाभाविकपणें त्याग केलेला असेल. अशा योग्याची स्थिति वारा नसलेल्या जागेंत दिवा जसा स्थिर राहतो तशी असते. त्याला जगांत चाललेले खेळ किंवा त्याच्या मनांत उठणाऱ्या विचारांच्या लाटा इकडेतिकडे फेकूं शकत नाहींत. हा योग हळूंहळूं पण दृढतापूर्वक प्रयत्न केल्यानें साधतां येतो. मन चंचल आहे म्हणून तें इकडेतिकडे धांवत असतें. त्याला हळूंहळूं स्थिर करणें योग्य आहे. तें स्थिर झालें तरच शांति मिळेल. असें मनाला स्थिर करण्याकरितां निरंतर आत्म्याचें चिंतन ठेवावें. असा मनुष्य सर्व जीवांना आपल्यांत आणि आपल्याला सर्वांत पाहतो. कारण तो मला सर्वांत आणि

सर्वांना माझ्यांत पाहतो. माझ्यांत जो लीन झाला, जो मलाच सर्वत्र पाहतो तो 'स्वत:' नाहींसा होतो; म्हणजे कांहींहि करीत असतांना-सुद्धां माझ्यांतच लीन होऊन राहतो. त्यामुळें न करण्याजोगें त्याच्या हातून कधीं कांहीं व्हायचेंच नाहीं.

अर्जुनाला असा योग कठिण वाटला आणि तो उद्गारला :

ही आत्मस्थिरता कशी काय मिळवितां येणार ? मन हें माकडासारखें आहे. वाऱ्याला जसें ताब्यांत ठेवणें शक्य नाहीं तसें मनाचें आहे. असें हें मन कसें आणि केव्हां वश होणार ?

भगवंतांनीं उत्तर दिलें : तूं म्हणतोस तें खरें आहे. पण रागद्वेष जिंकल्यानें आणि प्रयत्न केल्यानें कठिण तें सोपें करतां येतें. मन जिंकल्यावांचून योग साधणें शक्य नाहीं याविषयीं शंका नको.

त्यावर अर्जुन पुन: विचारतो : समजा, मनुष्यांत श्रद्धा आहे पण त्याचा प्रयत्न मंद आहे त्यामुळें तो यशस्वी होत नाहीं. अशा मनुष्याची गति काय ? विखुरलेल्या ढगांसारखा तो नाश नाहीं का पावत ?

भगवान् म्हणाले : अशा श्रद्धावन्ताचा कधींच नाश होत नाहीं. कल्याण-मार्ग अवलंबणाऱ्याची दुर्गति कधींच होत नाहीं. असा मनुष्य मेल्यानंतर पुण्यलोकांत कर्मानुसार राहून परत पृथ्वीवर येतो आणि पवित्र घरांत जन्म पावतो. असा जन्म लोकांत दुर्लभ आहे. अशा घरांत त्याच्या पूर्वींच्या शुभ संस्कारांचा उदय होतो, त्याचा आतांचा प्रयत्न तीव्र होतो, आणि शेवटीं तो सिद्धि पावतो. अशा रीतीनें प्रयत्न करीत करीत, कोणी लवकर तर कोणी अनेक जन्मांनंतर, आपल्या श्रद्धेच्या आणि प्रयत्नांच्या बळानुसार, समत्व पावतात. तप, ज्ञान, कर्मकांडांतील कर्में या सर्वांहून समत्व हें विशेष आहे. कारण तपादिकांतून शेवटीं समताच निघाली पाहिजे. म्हणून तूं समत्व पाव आणि योगी हो. त्यांतसुद्धां जो आपलें सर्वस्व मला अर्पण करतो आणि श्रद्धापूर्वक माझीच आराधना करतो त्याला तूं श्रेष्ठ समज.

या अध्यायांत प्राणायाम-आसनादींची स्तुति आहे. पण त्याचबरोबर ब्रह्मचर्याची म्हणजे ब्रह्म पावतांना यमनियमादींच्या पालनाची आवश्यकता भगवंतांनीं सांगितली आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आसनादींच्या नुसत्या

क्रियेनें समत्व कधीं लाभायचें नाहीं हें समजून घेणें अवश्य आहे. आसन-प्राणायामादि क्रिया मन स्थिर करतांना, एकाग्र करतांना कांहीं अंशीं मदत करतात, जर त्या हेतूनें त्या होत असतील तर. नाहींतर त्या इतर शारीरिक व्यायामासारख्या समजून त्यांची शरीरापुरतीच किंमत जाणावी. शारीरिक व्यायामाच्या रूपानें प्राणायामादींचा पुष्कळ उपयोग आहे आणि व्यायामांत हा व्यायाम सात्त्विक आहे असें माझें मत आहे. शारीरिक दृष्टचा त्याचें शिक्षण घेण्यासारखें आहे. पण त्यांच्या योगें सिद्धी मिळवाव्या आणि चमत्कार पाहावे या हेतूनें या क्रिया केल्या जातात, त्यामुळें लाभा-ऐवजीं हानि झालेली मीं पाहिली आहे. हा अध्याय तिसऱ्या, चौथ्या आणि पांचव्या अध्यायाचा उपसंहार म्हणून समजण्यासारखा आहे, आणि प्रयत्नशील मनुष्याला तो आश्वासन देणारा आहे. कच खाऊन, समता मिळविण्याचा प्रयत्न आपण कधीं सोडतां कामा नये.

• •

## अध्याय ७ वा

२३-१२-१९३०
मंगलप्रभात

भगवान् म्हणाले : हे राजा, माझ्यांत चित्त गुंतवून आणि माझा आश्रय घेऊन कर्मयोग आचरणारा मनुष्य निश्चयपूर्वक मला संपूर्णपणें कसा ओळखूं शकतो हें मी तुला सांगतों. हे अनुभवाचें ज्ञान मी तुला सांगितल्यानंतर दुसरें जाणण्याजोगें कांहीं शिल्लक राहत नाहीं. हजारोंतून एखादाच कोणी तें मिळविण्याचा प्रयत्न करतो आणि प्रयत्न करणारां-तून एखाद्यालाच यश मिळतें.

पृथ्वी, पाणी, आकाश, तेज आणि वायु तसेंच मन, बुद्धि आणि मीपणा अशा आठ प्रकारची एक माझी प्रकृति आहे. तिला ‘अपरा’ प्रकृति म्हणतात, आणि दुसरी ‘परा’ प्रकृति. ती जीव (चैतन्य) रूप आहे. या दोन प्रकृतींमधून— म्हणजे देह व जीव यांच्या संबंधांतून— सारें जग झालें आहे. म्हणून सर्वांच्या उत्पत्तीचें आणि नाशाचें कारण

मी आहे. जसे माळेच्या आधारानें तिचे मणी असतात तसें जग हें माझ्या आधारानें राहिलें आहे. म्हणजेच पाण्यांत रस तो मी आहे, सूर्य-चंद्रांचें तेज मी, वेदाचा ॐकार मी, आकाशाचा आवाज मी, पुरुषांचा पराक्रम मी, मातीचा सुगंध मी, अग्नीचें तेज मी, प्राणिमात्रांचें जीवन मी, तपस्व्याचें तप मी, बुद्धिमानाची बुद्धि मी, बलवानाचें शुद्ध बळ मी, जीवमात्रांत धर्माला अविरोधी अशी कामना मी आहे. थोडक्यांत सत्त्व, रज आणि तम यांतून उत्पन्न होणारे जे जे भाव आहेत ते सर्व माझ्यामधून उत्पन्न झाले आहेत असें समज, आणि ते माझ्या आधारानेंच राहूं शकतात. या तीन भावांत किंवा गुणांत निमग्न झालेले लोक मला—अविनाशीला—ओळखूं शकत नाहींत अशी माझी त्रिगुणी माया आहे. ती तरून जाणें कठिण आहे. पण जे मला शरण येतात ते ही माया म्हणजे तीन गुण पार करूं शकतात.

पण ज्यांचे आचार-विचार स्वैर आहेत असे मूढ लोक माझें शरण (आश्रय) कसें शोधणार ? ते मायेंत गुरफटून राहून अंधारांतच फिरत राहातात आणि ज्ञान पावत नाहींत. पण चांगल्या आचाराची माणसें मला भजतात. यांपैकीं कोणी आपलें दुःख नाहीसें व्हावें म्हणून मला भजतात, कोणी मला ओळखण्याच्या इच्छेनें भजतात, कोणी कांहीं मिळविण्याच्या इच्छेनें भजतात आणि कोणी कर्तव्य समजून ज्ञानपूर्वक मला भजतात. मला भजणें म्हणजे माझ्या जगाची सेवा करणें. त्यांत कोणी दुःखामुळें, कोणी कांहीं लाभ मिळविण्याकरितां, कोणी 'बघूं या काय होतें' असें मनांत धरून, सेवा करतात; आणि कोणी समजून उमजून, त्यावांचून राहणेंच शक्य नाहीं म्हणून, सेवापरायण राहातात. हे शेवटचे माझे ज्ञानी भक्त आहेत आणि मला सर्वांपेक्षां अधिक प्रिय आहेत असें म्हणतां येईल. किंवा ते मला जास्तींत जास्त ओळखतात आणि माझ्या जास्तींत जास्त जवळ आहेत म्हणा. असें ज्ञान अनेक जन्मांनंतरच मनुष्य पावतो आणि तें पावल्यानंतर या जगांत मी वासुदेव याशिवाय दुसरें ते पाहातच नाहींत. पण ज्यांना कामना आहेत ते आपले वेगवेगळ्या दैवतांना भजतात. आणि जशी ज्याची भक्ति त्याप्रमाणें फळ देणारा तर मीच आहे. अशा संकुचित समजुतीच्या लोकांना जें फळ मिळतें तेंसुद्धां तसेंच संकुचित

असतें, त्यांचा संतोषहि तेवढ्यांतच असतो. असे लोक आपल्या संकुचित बुद्धीमुळें असें समजतात कीं परमात्म्याला इंद्रियांच्या द्वारां आपण ओळखूं शकतों; त्यांना हें समजत नाहीं कीं माझें अविनाशी आणि अनुपम स्वरूप इंद्रियांच्या पर आहे आणि हात, कान, नाक, डोळे इत्यादींच्या मदतीनें तें ओळखणें शक्यच नाहीं. असा मी सर्व वस्तूंना उत्पन्न करणारा असूनसुद्धां मला अज्ञानी लोक ओळखूं शकत नाहींत. ही माझी योगमाया जाण. रागद्वेषांमुळें सुखदुःखादि होतच राहातात आणि त्यामुळे जग हें मूर्च्छेमध्यें– मोहांत राहतें. पण जे त्यांतून सुटले आहेत आणि ज्यांचे आचारविचार निर्मळ झाले आहेत ते आपल्या व्रतांच्या बाबतींत स्थिर राहून मलाच निरंतर भजतात. ते पूर्ण ब्रह्मरूपानें सर्व प्राण्यांत अलग अलग वाटणाऱ्या जीवरूपानें असलेल्या मला आणि माझ्या कर्मांना जाणतात. असे जे मला अधिभूत, अधिदैव आणि अधियज्ञ म्हणून ओळखतात आणि त्यामुळें समत्व पावले आहेत ते मृत्यूनंतर जन्ममरणांच्या बंधनांतून मुक्त होतात, कारण इतकें जाणल्यानंतर त्यांचें मन दुसरीकडे भटकतच नाहीं आणि सारें जगत् ईश्वरमय बघून ते ईश्वरांतच प्रविष्ट होतात.

● ●

## अध्याय ८ वा

१९-१२-१९३०
सोमप्रभात

अर्जुन विचारतो : तुम्ही पूर्णब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ हीं नामें बोललात, पण या सर्वांचा अर्थ मला समजला नाहीं; आणखी तुम्ही म्हणतां कीं तुम्हांला अधिभूतादिरूपानें जाणणारे समत्व पावलेले मरणसमयीं ओळखतात. हें सारें मला समजावून सांगा.

भगवंतांनीं उत्तर दिलें : जें सर्वोत्तम नाशरहित स्वरूप आहे तें पूर्ण ब्रह्म. आणि प्राणिमात्रांत कर्ताभोक्ता रूपानें देह धारण करून राहिलें आहे तें अध्यात्म. प्राणिमात्रांची उत्पत्ति ज्या क्रियेनें होते तिचें नांव

कर्म–म्हणजे ज्या क्रियेनें सर्व उत्पत्ति होते तें कर्म असेंहि म्हणतां येईल. अधिभूत म्हणजे माझें नाशवंत देहस्वरूप आणि अधियज्ञ म्हणजे यज्ञानें शुद्ध झालेलें तें अध्यात्म स्वरूप. अशा रीतीनें देहरूपानें, मूर्च्छित जीवरूपानें, शुद्ध जीवरूपानें आणि पूर्ण ब्रह्मरूपानें सर्वत्र मीच आहे. आणि असा जो मी त्याचें मरण समयीं ध्यान करील, स्वतःला विसरून जाईल, कसलीहि चिंता करणार नाहीं, इच्छा करणार नाहीं तो माझ्या स्वरूपाला पावेलच यांत मुळींच शंका मानूं नको. ज्या स्वरूपाचें मनुष्य नित्य ध्यान करीत असेल–आणि अंतकाळींहि त्याचाच ध्यास असेल तर–त्या स्वरूपाला तो पावतो. आणि म्हणून तूं नित्य माझेंच स्मरण करीत राहा, माझ्यांतच मनबुद्धि गुंतवून ठेव. म्हणजे मलाच पावशील. असें चित्त स्थिर होत नाहीं असें तूं म्हणशील. तर रोजच्या अभ्यासानें, रोजच्या प्रयत्नानें असें एकाग्र होतां येतेंच असें समज, कारण आतांच मीं तुला सांगितलें कीं देहधारीसुद्धां मुळांत माझेंच स्वरूप आहे. म्हणून मनुष्यानें पहिल्यापासूनच अशी तयारी करावी कीं ज्यायोगें मरणसमयीं मन चळणार नाहीं, तें भक्तींत लीन राहील, प्राणाला स्थिर ठेवील, आणि सर्वज्ञ, पुरातन, नियंता, सूक्ष्म असूनसुद्धां सर्वांचें पालन करण्याची शक्ति असणारा, सूर्याप्रमाणें अंधार–अज्ञान नाहींसें करणारा जो परमात्मा त्याचेंच स्मरण करील.

या परम पदाला वेद ‘अक्षर ब्रह्म’ या नांवानें ओळखतात. राग–द्वेषादींचा त्याग करणारे मुनी तें पद पावतात, आणि तें पद पावण्याची इच्छा ठेवणारे सर्वजण ब्रह्मचर्याचें पालन करतात, म्हणजे काया–वाचा–मन यांना ताब्यांत ठेवतात, सर्व विषयांचा तीन्ही प्रकारें त्याग करतात. इंद्रियांना आवरून ॐ चें उच्चारण करीत माझेंच चिंतन करणारे जे स्त्री-पुरुष देह सोडतात ते परम पदाला पावतात. अशांचें चित्त इतर कुठें भटकणारच नाहीं. आणि अशा रीतीनें मला पावणाऱ्याला दुःखाचें घर असा जो जन्म तो पुनः घेण्याचें कारण पडत नाहीं. या जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटण्याचा उपाय मला पावणें हाच आहे.

आपल्या शंभर वर्षांच्या जीवनकालानें माणूस अनंत कालाचें माप करतो आणि तेवढ्या अवधींत हजारों जाळीं पसरून ठेवतो. पण काळ हा अनंत

आहे. हजारों युगें म्हणजे ब्रह्म्याचा एक दिवस समज. यांत मनुष्याच्या एका दिवसाची किंवा शंभर वर्षांची काय किंमत ? इतक्या अल्प काळाची मोजदाद करून फुकट डोकेफोड कां करायची ? या अनंत कालचक्रांत माणसाचें जीवन एका क्षणासारखें आहे. त्यांत त्यानें ईश्वरध्यान करणें हेंच साजेल. त्यानें क्षणिक भोगांच्या मागें कां धांवावें ? ब्रह्म्याच्या रात्र-दिवसांत उत्पत्ति आणि नाश चालतच राहातात आणि चालत राहाणार.

उत्पत्ति–लय करणारा ब्रह्मा हाहि माझा भाव आहे; आणि तो अव्यक्त आहे, इंद्रियांनीं कळूं शकत नाहीं. त्याहूनहि पर असें माझें दुसरें जें अव्यक्त स्वरूप आहे त्याचें कांहीं थोडें वर्णन मीं तुझ्यापुढें केलें. त्याला जो पावतो त्याचें जन्म–मरण टळतें. कारण त्या स्वरूपाला रात्र-दिवस यांसारखें द्वंद्व नाहीं, तें केवळ शांत, अचल स्वरूप आहे. त्याचें दर्शन अनन्य भक्तीनेंच होऊं शकतें. त्याच्याच आधारानें सारें जगत् आहे आणि सर्व व्यापून तें स्वरूप राहिलें आहे.

असें म्हणतात कीं उत्तरायणाच्या शुक्लपक्षांतील दिवसांत जो मरण पावतो, आणि दक्षिणायनांत, कृष्णपक्षांत, रात्रीं जो मरण पावतो तो पुनर्जन्माच्या फेऱ्यांत राहतो. याचा अर्थ असा करतां येईल कीं उत्तरायण आणि शुक्ल पक्ष म्हणजे निष्काम सेवामार्ग आणि दक्षिणायन व कृष्णपक्ष म्हणजे स्वार्थमार्ग. सेवामार्गानें मुक्ति आणि स्वार्थमार्गानें बंधन. सेवामार्ग म्हणजे ज्ञानमार्ग, स्वार्थमार्ग म्हणजे अज्ञानमार्ग. ज्ञानमार्गानें चालणाऱ्याला मोक्ष, अज्ञानमार्गानें जाणाऱ्याला बंधन. हे दोन मार्ग जाणल्यानंतर मोहानें अज्ञानमार्ग कोण बरे पसंत करील ? एवढें जाणल्यानंतर माणसानें सर्व पुण्यफळें सोडून अनासक्त राहून, कर्तव्यांतच परायण राहून, मीं सांगितलें तें उत्तम स्थान मिळविण्याचाच प्रयत्न करणें योग्य आहे.

• •

# अध्याय ९ वा

५-१-१९३१
सोमप्रभात

गेल्या अध्यायांत शेवटच्या श्लोकांत योग्याचें उच्च स्थान वर्णन केलें तेव्हां आतां भक्तीचा महिमा भगवंताला सांगणेंच भाग आलें, कारण गीतेचा योगी हा शुष्क ज्ञानी नव्हे, व्याकुळ भक्तहि नव्हे. गीतेचा योगी म्हणजे ज्ञानमय आणि भक्तिमय अनासक्त कर्म करणारा. म्हणून भगवान् म्हणतात : तुझ्यांत द्वेष नाहीं म्हणून तुला मी गुह्य ज्ञान सांगतों कीं जें पावल्यानें तुझें कल्याण होईल. हें ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे, पवित्र आहे आणि आचारांत सहज आणतां येण्याजोगें आहे. त्याविषयीं ज्याला श्रद्धा नसेल तो मला पावूं शकणार नाहीं. मनुष्यप्राणी माझें स्वरूप इंद्रियांच्या साहाय्यानें पारखूं शकत नाहींत तरी तें ह्या जगाला व्यापून आहे. जग त्याच्याच आधारानें टिकलें आहे; तें जगाच्या आधारानें नाहीं. शिवाय एक प्रकारें असेंहि म्हणतां येईल कीं हे प्राणी माझ्यांत नाहींत आणि मी त्यांच्यांत नाहीं तरी मी त्यांच्या उत्पत्तीचे कारण आहे आणि त्यांचा पोषणकर्ता आहे. ते माझ्यांत नाहींत आणि मी त्यांच्यांत नाहीं कारण तें अज्ञानांत असल्यामुळें मला जाणत नाहींत, त्यांच्यांत भक्ति नाहीं. हा माझा चमत्कार आहे असें तूं समज.

पण मी प्राण्यांत नाहीं असें वाटलें तरीसुद्धां वायूप्रमाणें सर्वत्र मीं व्यापलेला आहे. आणि सर्व जीव युगाचा अंत होतांच पुनः जन्मतात. या कर्मांचा कर्ता मी असूनसुद्धां तीं मला बंधन करणारीं नाहींत, कारण त्यांच्याविषयीं मला आसक्ति नाहीं, त्यांच्यासंबंधीं मी उदासीन आहे. ती कर्मे होत राहतात कारण ती माझी प्रकृति आहे, माझा स्वभाव आहे. पण अशा मला लोक ओळखीत नाहींत म्हणून ते नास्तिक राहातात. माझें अस्तित्वच नाकारतात. असे लोक फुकट आशांचे किल्ले बांधतात. त्यांचीं कामेंहि निरर्थक असतात. आणि ते अज्ञानानें भरलेले असतात म्हणून त्यांना आसुरी वृत्तींचे म्हणतात. पण जे दैवी वृत्तीचे आहेत ते मला अविनाशी आणि उत्पत्ति-कर्ता जाणून भजतात. त्यांचा निश्चय दृढ

असतो, ते नित्य प्रयत्नशील असतात, माझें भजन-कीर्तन करतात आणि माझें ध्यान करतात. दुसरे कित्येक मी एकच आहे असें मानणारे आहेत, कित्येक मला अनेक रूपांचा मानतात. माझे अनंत गुण आहेत, म्हणून अनेक रूपांनीं पाहणारे अलग गुणांना अलग रूपानें पाहतात. पण हे सर्व भक्तच समज.

यज्ञाचा संकल्प मी, यज्ञ मी, पितरांचा आधार मी, यज्ञाची वनस्पति मी, मंत्र मी, आहुति मी, हवनांत टाकलें जाणारें द्रव्य मी, अग्नि मी, या जगाचा पिता मी, माता मी, जग धारण करणारा मी, पितामह मी, जाणण्याजोगाहि मी, ओंकार मंत्र मी, ऋग्वेद-सामवेद-यजुर्वेद मी, गति मी, पोषण मी, प्रभु मी, साक्षी मी, आश्रय मी, कल्याण इच्छिणाराहि मी, उत्पत्ति आणि नाश मी, ऊन-थंडी मी, सत् आणि असत् पण मी.

जे वेदांत वर्णिलेल्या क्रिया करतात ते फळप्राप्तीच्या इच्छेनें करतात. त्यानें त्यांना स्वर्ग मिळत असला तरी जन्ममरणाचे फेरे चुकत नाहींत. पण जे अनन्यभावानें माझें चिंतन करीत राहातात आणि मलाच भजतात त्यांचा सगळा भार मी उचलतों. त्यांच्या गरजा मी सारतों आणि त्यांचें मीच जतन करतों. दुसरे कित्येक इतर देवतांविषयीं श्रद्धा बाळगून त्यांना भजतात त्यांत अज्ञान आहे. तरी शेवटीं तेहि मलाच भजणारे म्हणायचे. कारण सर्व यज्ञांचा मीच स्वामी आहे. पण माझी ही व्यापकता ते जाणत नाहींत म्हणून शेवटच्या अवस्थेला ते पोचूं शकत नाहींत. देवतांना पुजणारे देवलोक पावतात, पितरांना पुजणारे पितृलोक पावतात, भूतप्रेतादींना पुजणारे त्यांचे लोक पावतात आणि ज्ञानपूर्वक मला भजणारे मला पावतात. एखादें यःकश्चित् पानसुद्धां जे मला भक्तिपूर्वक अर्पण करतात तशा प्रयत्नशील लोकांच्या भक्तीचा मी स्वीकार करतों. म्हणून जें कांहीं तूं करशील तें सर्व मला अर्पूनच कर. म्हणजे शुभाशुभ फलाची जबाबदारी तुझ्यावर राहणार नाहीं. तूं तर सर्व फळाचा त्यागच केलास, तेव्हां तुला जन्ममरणाचे फेरे फिरावे लागणार नाहींत. मला सगळे प्राणी सारखे आहेत. एक प्रिय आणि दुसरे अप्रिय असें कांहीं नाहीं. पण जे भक्तिपूर्वक मला भजतात ते माझ्यांत आहेत आणि मी त्यांच्यांत आहे. यांत पक्षपात नाहीं. तर ते आपल्या भक्तीचें फळ पावले. या

भक्तीचा चमत्कार असा आहे कीं जे एकविधपणें मला भजतात ते दुराचारी असले तरी साधू बनतात. सूर्यापुढें जसा अंधार राहात नाहीं तसा माझ्यापाशीं येतांच मनुष्याचा दुराचार नाश पावतो. म्हणून तूं खात्री बाळग कीं माझी भक्ति करणारा कधींच नाश पावत नाहीं. ते धर्मात्मे होतात आणि शान्ति अनुभवतात. या भक्तीचा महिमा असा आहे कीं जे पापयोनीमध्यें जन्म पावलेले म्हटले जातात ते आणि निरक्षर अशा स्त्रिया, वैश्य आणि शूद्र, जे माझा आश्रय घेतात ते, मला अवश्य पावतात. मग पुण्यकर्म करणारे ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्याविषयीं काय सांगावें ? जे भक्ति करतात त्यांना तिचें फळ मिळतें. म्हणून तूं असार अशा संसारांत जन्म पावला आहेस तर मला भजून तो तरून जा. तुझें मन माझ्यांत गुंतवून टाक, माझाच भक्त हो, तुझे यज्ञहि माझ्या प्रीत्यर्थ कर, तुझे नमस्कारहि मला पोचीव; आणि असा तूं माझ्यांत परायण झालास आणि तुझा आतमा माझ्यांत होमून शून्यवत् झालास कीं तूं मलाच पावशील.

मंगलप्रभात

**टीप :**

यावरून आपल्याला दिसून येतें कीं भक्ति म्हणजे ईश्वरांत आसक्ति. अनासक्ति बाणवून घेण्याचाहि हा सोप्यांत सोपा उपाय आहे. म्हणून या अध्यायाच्या प्रारंभीं प्रतिज्ञा केली कीं भक्ति हा राजयोग आहे आणि सोपा मार्ग आहे. ती हृदयांत असली तर सोपा, नसली तर बिकट आहे. म्हणून त्याला 'शीश तणुं साटुं' (सतीचें वाण) हि म्हटलें आहे. पण ही गोष्ट 'देखनारा दाझे जोने', (बघ्यांना झळ लागते), 'मांही पडया ते महासुख माणे'. (आंत पडले त्यांना महासुख लाभतें), अशी आहे. कवि लिहितो कीं उकळत्या तेलाच्या कढईत सुधन्वा हंसत होता आणि बाहेर उभे राहिलेले थरथर कांपत होते. नंद अंत्यजाची अग्निपरीक्षा झाली तेव्हां तो अग्निमध्यें नाचत होता अशी कथा आहे. हें सगळें त्या त्या व्यक्तींच्या बाबतींत घडलें कीं नाहीं याचा शोध घेण्याची आवश्यकता नाहीं. कोणत्याहि गोष्टींत अत्यंत लीन होऊन

जाणाराची अशीच स्थिति होत असते. तो स्वतःला विसरून जातो. पण प्रभूला सोडून दुसऱ्यांत लीन कोण होणार? 'साकर शेलडीनो स्वाद तजीने, कडवो लीमडो घोळ मा ' (गोड उसाचा स्वाद टाकून कडूलिंब चघळत बसूं नको), 'सूरज चंद्रनु तेज तजीने, आगिया संगाथे चित्त जोड मा ' (सूर्य-चंद्राचें तेज टाकून काजव्याच्या संगतीला चित्त जोडूं नकोस). तेव्हां नववा अध्याय सांगतो कीं, प्रभूविषयीच्या आसक्तीशिवाय म्हणजे भक्तीशिवाय फळाची अनासक्ति अशक्य आहे. शेवटचा श्लोक सगळ्या अध्यायाचें सार आहे, आणि त्याचा अर्थ आपल्या भाषेंत 'तूं माझ्यांत एकरूप होऊन जा ' असा आहे.

● ●

## अध्याय १० वा

१२–१–३१
सोमप्रभात

भगवान् सांगतात : पुनः भक्तांच्या हिताकरितां सांगतों तें ऐक. देव आणि महर्षी यांनासुद्धां माझ्या उत्पत्तीची माहिती नाहीं. कारण मला उत्पन्न होणेंच नाहीं. मी त्यांच्या आणि इतर सर्वांच्या उत्पत्तीचें कारण आहे. जे ज्ञानी मला अजन्मा आणि अनादि म्हणून ओळखतात ते सर्व पापांतून मुक्त होतात. कारण परमेश्वराला त्या रूपांत जाणल्यानंतर आणि स्वतःला त्याची संतति किंवा अंश म्हणून ओळखल्यानंतर मनुष्याची पापवृत्ति राहूंच शकत नाहीं, सर्व पापप्रवृत्तीचें मूळच स्वतःबद्दलचें अज्ञान हें आहे.

जसे प्राणी माझ्यापासून उत्पन्न झाले आहेत तसे त्यांचे वेगवेगळे भाव, उदा० क्षमा, सत्य, सुख, दुःख, जन्म, मृत्यु, भय, अभय वगैरे माझ्यापासून उत्पन्न झाले आहेत. ह्या सर्व माझ्या विभूति आहेत असें जाणणाऱ्यांत आपोआप समता उत्पन्न होते, कारण ते अहंता सोडून देतात. त्यांचें चित्त माझ्यांत लीन होऊन राहतें. ते मला सर्वस्व अर्पण करतात, एक-मेकांत माझ्याविषयींच वार्तालाप करतात, माझेंच कीर्तन करतात आणि समाधानानें आणि आनंदानें राहतात. असे जे मला प्रेमपूर्वक भजतात

आणि माझ्यांतच ज्यांचें मन वास करतें त्यांना मी ज्ञान देतों आणि त्यायोगें ते मला पावतात.

तेव्हां अर्जुनानें स्तुति केली : तुम्हीच परब्रह्म आहां, परमधाम आहां, पवित्र आहां, ऋषी वगैरे तुम्हांला आदिदेव, अजन्मा, ईश्वर म्हणून भजतात असें तुम्हींच सांगतां. हे स्वामी, हे पिता, तुमचें स्वरूप कोणी जाणत नाहीं. तुम्हीच तुम्हांला जाणतां. आतां तुमच्या विभूती मला सांगा आणि तुमचें चिंतन करून तुम्हांला मी कशा रीतीनें ओळखूं शकेन तें सांगा.

भगवंतांनीं उत्तर दिलें : माझ्या विभूती अनंत आहेत त्यांतील थोड्या मुख्य मुख्य त्या तुला सांगतों. सर्व प्राण्यांच्या हृदयांत मी वास करतों. मी त्यांची उत्पत्ति, त्यांचा मध्य आणि त्यांचा अंत आहे. आदित्यांत विष्णु मी, उज्ज्वल वस्तूंत प्रकाशमान् सूर्य तो मी, वायूंमध्यें मरीचि मी, नक्षत्रांत चंद्र मी, वेदांत सामवेद मी, देवांत इंद्र मी, इंद्रियांत मन मी, प्राण्यांची चेतनशक्ति मी, रुद्रांत शंकर मी, यक्षराक्षसांत कुबेर मी, दैत्यांत प्रह्लाद मी, पशूंमध्यें सिंह मी, पक्ष्यांत गरुड मी, इतकेंच काय पण ज्यांत कपट आहे तें द्यूतसुद्धां मीच समज. या जगांत जें कांहीं घडतें तें माझ्या परवानगीशिवाय घडूंच शकत नाहीं. बरें-वाईटसुद्धां मी होऊं देतों तेव्हांच होतें. असें समजून मनुष्यानें अभिमान सोडावा आणि वाईटापासून बाजूला व्हावें हें उचित आहे, कारण बऱ्यावाईटाचें फळ देणारासुद्धां मी आहे. हें जग सगळें माझ्या विभूतीच्या अंशमात्रेंकरून टिकून राहिलें आहे एवढें तूं लक्षांत घे. • •

## अध्याय ११ वा

१२–१–१९३१
सोमप्रभात

अर्जुनानें विनंति केली : हे भगवन्, तुम्ही मला आत्म्याविषयीं जीं वचनें सांगितलीं त्यांनीं माझा मोह गेला आहे. तुम्हीच सर्व कांहीं आहांत, तुम्हीच कर्ता आहां, तुम्हीच संहर्ता आहां, तुम्ही नाशरहित आहां. शक्य असेल तर तुमच्या ईश्वरी रूपाचें दर्शन मला करवून द्या.

भगवान् म्हणाले : माझीं रूपें हजारों आहेत आणि अनेक रंगांचीं आहेत. त्यांत आदित्य, वसु, रुद्र वगैरे सर्व आहेत. माझ्यांत सारें जगत्–चर आणि अचर–सामावलें आहे. हें रूप तुझ्या चर्मचक्षूनीं तूं पाहूं शकणार नाहींस. म्हणून मी तुला दिव्यक्षू देतों त्यांनीं तें तूं पहा.

संजय धृतराष्ट्राला म्हणाला, हे राजन्, अशा रीतीनें बोलून भगवानांनीं अर्जुनाला आपलें जें अद्‌भुत रूप दाखविलें त्याचें वर्णन करणें शक्य नाहीं. आपण रोज एक सूर्य पाहतों; पण समजा असे हजारों सूर्य रोज उगवले तर त्यांचें जसें तेज असेल त्याहूनहि हें तेज अधिक दिपवून टाकणारें असें होतें. त्याचीं आभूषणें आणि शस्त्रेंसुद्धां अशींच दिव्य होतीं. तें दर्शन होतांच अर्जुनाच्या अंगावर रोमांच उभे राहिले, त्याचें डोकें फिरूं लागलें आणि थरथर कांपत तो स्तुति करूं लागला :

हे देवा, तुझ्या या विशाल देहांत मला तर सर्व कांहीं दिसत आहे, सर्वांना मी पाहात आहे. त्यांत ब्रह्मा आहे, महादेव आहे, ऋषी आहेत, सर्प आहेत. तुमचीं तोंडें आणि हात यांना तर गणतीच नाहीं. तुम्हांला ना आदि, ना अंत, ना मध्य. तुमचें रूप जणूं कांहीं तेजाचा पर्वतच ! तें पहातांना डोळे दिपून जातात. धगधगत्या निखाऱ्याप्रमाणें तुम्ही झगमगत आहां आणि तापत आहां. तुम्हीच जगाचे आधार आहां, तुम्हीच पुराणपुरुष आहां, तुम्हीच धर्माचे रक्षक आहां. पहावें तिकडे तुमचें अवयव दिसत आहेत. सूर्य चंद्र हे जणूं तुमचे डोळे असल्यासारखे वाटतात. तुम्हीच ही पृथ्वी आणि आकाश यांना व्यापलें आहे. तुमचें तेज साऱ्या जगाला तप्त करीत आहे. हें जग थरथर कांपत आहे. देव, ऋषी, सिद्ध वगैरे सर्व हात जोडून कांपत कांपत तुमची स्तुति करीत आहेत. हें विराट रूप आणि हें तेज पाहून मी तर व्याकुळ झालों आहे, शांति आणि धीर कांहीं राहात नाहीं. हे देवा प्रसन्न व्हा. तुमच्या दाढा विक्राळ आहेत, दिव्यावर जसे पतंग तसे हे लोक तुमच्या तोंडांत पडत असलेले मी पाहात आहे आणि तुम्ही त्यांचें पीठ करून टाकीत आहां. उग्ररूप असणारे हे तुम्ही कोण आहां ? तुमची प्रवृत्ति मला समजत नाहीं.

भगवान् म्हणाले : लोकांचा नाश करणारा काळ मी आहे. तूं लढ

अथवा लढूं नकोस, त्या सर्वांचा नाश झाला आहे असें समज. तूं फक्त निमित्तमात्र आहेस.

अर्जुन म्हणाला : हे देवा, हे जगन्निवासा, तुम्ही अक्षर आहां, सत् आहां, असत् आहां, आणि त्याहून जें पर तेंहि तुम्हीच आहां. तुम्ही आदिदेव आहां, पुराणपुरुष आहां. तुम्ही या जगाचा आसरा आहां. तुम्हीच जाणण्यायोग्य आहां. वायु, यम, अग्नि, प्रजापतिसुद्धां तुम्हीच आहां. तुम्हांला हजारो नमस्कार असोत. आतां तुमचें मूळ रूप धारण करा.

त्यावर भगवान् म्हणाले, तुझ्यावर प्रसन्न होऊन मी तुला माझें विश्वरूप दाखविलें. वेदाभ्यासानें, यज्ञानें, इतर शास्त्रांच्या अभ्यासानें, दानानें किंवा तपानेंसुद्धां हें रूप दिसणें शक्य नाहीं, तें तूं आज पाहिलेंस. तें पाहून तूं बावरून जाऊं नकोस. भय टाकून देऊन शांत हो आणि माझें परिचित रूप पाहा. माझें हें दर्शन देवांनासुद्धां दुर्लभ आहे. हें नदर्श केवळ शुद्ध भक्तीमुळेंच होऊं शकतें. जो आपलीं सर्व कर्में मला समर्पण करतो, माझ्यांत लीन होऊन राहतो, माझा भक्त बनतो, सर्व प्रकारची आसक्ति सोडून देतो आणिं प्राणिमात्राविषयीं प्रेममय होतो तोच मला पावतो.

**टीप :**

दहाव्या अध्यायाप्रमाणेंच हाहि अध्याय मी जाणून बुजून संक्षिप्त केला आहे. हा अध्याय काव्यमय आहे. त्यामुळें तो एकतर मुळांतून किंवा भाषांतररूपानें वारंवार वाचण्यासारखा आहे. त्यानें भक्तिरस उत्पन्न होण्याचा संभव आहे. तो रस उत्पन्न झाला आहे कीं नाहीं हें जाणण्याची कसोटी म्हणजे शेवटचा श्लोक. सर्वार्पणावांचून आणि सर्वव्यापक प्रेमावांचून भक्ति नाहीं. ईश्वराच्या काळरूपाचें मनन करण्यानें आणि सृष्टिमात्र त्याच्या मुखांत प्रवेश करणार आहे–क्षणोक्षणीं काळाचें हें काम चाललेंच आहे–याची जाणीव झाल्यानें सर्वार्पण आणि जीवमात्राशीं ऐक्य सहजीं होऊं शकतें. इच्छा असो नसो, त्या मुखांत आपल्याला अनपेक्षित क्षणीं जाऊन पडायचें आहे. तेथें लहान-मोठा, उच्च-नीच, स्त्री-पुरुष,

मनुष्य-मनुष्येतर असा भेद राहात नाहीं. आपण सर्व काळरूपी ईश्वराचा एक घांस आहोंत हें जाणून नम्र, शून्यवत् कां बरे नये होऊं ? सर्वांशीं मैत्री कां बरे नये करूं ? ती जो करील त्याला तें काळस्वरूप भयंकर वाटणार नाहीं, त्याला तें शांतीचें स्थान बनेल.

• •

## अध्याय १३ वा

२६–१–१९३२
सोमप्रभात

भगवान् म्हणाले : या शरीराचें दुसरें नांव क्षेत्र असें आहे. आणि तें जाणणारा तो क्षेत्रज्ञ. सर्व शरीरांत असणाऱ्या मला तूं क्षेत्रज्ञ समज, आणि खरें ज्ञान तें कीं ज्यानें क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्यांतला भेद ओळखतां येतो. पंचमहाभूतें–पृथ्वी, पाणी, आकाश, तेज आणि वायु, अहंता, बुद्धि, प्रकृति, पांच कर्मेंद्रियें आणि पांच ज्ञानेंद्रियें मिळून दहा इंद्रियें, एक मन, पांच विषय, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, संघात म्हणजे शरीर ज्याचें बनलें आहे त्याची एक होऊन राहण्याची शक्ति, चेतनशक्ति, शरीराच्या परमाणूंत एकमेकांना चिकटून राहण्याचा गुण, इतके मिळून विकारयुक्त क्षेत्र होतें. हें शरीर आणि त्याचे विकार जाणून घेणें अवश्य आहे, कारण कीं त्याचा त्याग करायचा आहे. त्या त्यागाकरितां ज्ञान पाहिजे. हें ज्ञान म्हणजे मानीपणाचा त्याग, दंभाचा त्याग, अहिंसा, क्षमा, सरळपणा, गुरुसेवा, शुद्धता, स्थिरता, विषयांवर ताबा, विषयांविषयीं वैराग्य, मीपणाचा त्याग, जन्म–मृत्यु–म्हातारपण आणि त्यांबरोबर येणारे रोग, दुःखें आणि नित्य घडणारे दोष यांची पुरती जाणीव, स्त्री–पुत्र–घरदार–सगेसोयरे यांतून मन काढून घेणें आणि ममता सोडून देणें, आपल्याला आवडेल असें घडलें किंवा न आवडेल असें घडलें तरी त्याविषयीं समता ठेवणें, ईश्वराची अनन्य भक्ति, एकान्तसेवन, लोकांत मिसळून भोग भोगायचे याविषयीं नावड, आत्म्याविषयीं जिज्ञासा आणि शेवटीं आत्मदर्शन. याच्या जें विरुद्ध तें अज्ञान. हें ज्ञान अंगीं बाणवून घेऊन जी जाणावयाची वस्तु–म्हणजे ज्ञेय आहे आणि जें जाणल्यानें मोक्ष मिळतो

त्यासंबंधीं थोडें ऐक. तें ज्ञेय अनादि परब्रह्म आहे. अनादि आहे कारण त्याला जन्म नाहीं–जेव्हां कांही नव्हतें तेव्हांसुद्धां तें परब्रह्म होतेंच. तें सत् नाहीं आणि असत्‌हि नाहीं. त्याहूनहि तें पर आहे. दुसऱ्या दृष्टीनें त्याला सत् म्हणतां येईल, कारण तें नित्य आहे. तरी त्याची नित्यतासुद्धां मनुष्य ओळखूं शकत नाहीं म्हणून त्याला सत्‌च्याहि पर म्हटलें. त्याच्या-वांचून कांहींच रिकामें नाहीं. त्याला हजारो हातापायांचें म्हणतां येईल. आणि असे त्याला हातपाय वगैरे आहेत असें वाटत असतांनासुद्धां तें इंद्रियरहित आहे, त्याला इंद्रियांची आवश्यकता नाही, त्याहून तें अलिप्त आहे. इंद्रियें आज आहेत, उद्यां नाहींत. परब्रह्म हें नित्य आहेच. आणि जरी तें सर्वाला व्यापून आणि धारण करून आहे म्हणून गुणांचा भोक्ता आहे असें म्हणतां येईल तरी तें गुणरहित आहे. गुण आहे तेथें विकार आहे. आणि परब्रह्म विकाररहित आहे. गुण म्हणजेच विकार. तें प्राण्याच्या बाहेर आहे असेंहि म्हणतां येईल, कारण जे त्याला जाणत नाहींत त्यांच्या मनानें तें बाहेरच आहे. आणि प्राण्यांच्या आंत तर तें आहेच कारण तें सर्वव्यापक आहे. तसेंच तें गतिमान् आहे आणि स्थिरहि आहे. सूक्ष्म असल्यामुळें न समजण्यासारखें आहे. दूरहि आहे आणि जवळहि आहे. नामरूपाचा नाश होतो तरी तें मात्र आहेच, या रूपानें तें अविभक्त आहे. परंतु तें असंख्य प्राण्यांत आहे असेंहि आपण म्हणतों, म्हणून तें विभक्तरूपानेंहि भासतें. तें उत्पन्न करतें, पाळतें आणि तेंच मारतें. तें तेजांचें तेज आहे, अंधकाराहून पर आहे, ज्ञानाचा शेवट त्याच्यांत झाला आहे. या सर्वांमध्यें असलेलें परब्रह्म हेंच एक जाणण्यायोग्य म्हणजे ज्ञेय आहे. जे कांहीं ज्ञान मिळवायचें तें केवळ तें पावावें म्हणूनच.

प्रभु आणि त्याची माया दोन्ही अनादिकालापासून चालत आलीं आहेत. मायेंतून विकार उत्पन्न होतात, आणि त्यांतून अनेक प्रकारचीं कर्में उत्पन्न होतात. मायेमुळें जीव सुख-दुःख, पाप-पुण्य हें भोगणारा बनतो. हें जाणून जो अलिप्त राहून कर्तव्य करतो तो कर्म करीत असतांनाहि पुनः जन्म घेत नाहीं, कारण तो सर्वत्र ईश्वरच पाहतो, आणि त्याच्या प्रेरणेवांचून एक पानहि हलूं शकत नाहीं हें जाणून तो स्वतःविषयीं मीपणा मानीतच नाहीं, स्वतःला शरीरापासून वेगळा पाहतो, आणि समजतो कीं आकाश

सर्वत्र असूनहि जसें कोरेंच राहतें तसा जीव शरीरांत असूनहि ज्ञानाच्या योगानें कोरा राहूं शकतो.

• •

## अध्याय १४ वा

२५–१–१९३२
मौनवार

श्री भगवान् म्हणाले : जें उत्तम ज्ञान मिळवून ऋषिमुनी परमसिद्धि पावले तें मी पुनः तुला सांगतों. तें ज्ञान पावल्यानें आणि त्याप्रमाणें धर्म आचरल्यानें लोक जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटतात. हे अर्जूना, जीवमात्राचा मी मातापिता आहे असें जाण. प्रकृतिजन्य तीन गुण—सत्त्व, रज आणि तम—हे देहाला बांधणारे आहेत. या गुणांना उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ असें क्रमवार म्हटलें तरी चालेल. यांत सत्त्वगुण निर्मळ आणि निर्दोष आहे आणि प्रकाश देणारा आहे, म्हणून त्याचा संग सुखद वाटतो. रज रागांतून—तृष्णेंतून उत्पन्न होतो आणि तो मनुष्याला व्यापांत टाकतो. तमाचें मूळ अज्ञान आहे, मोह आहे आणि त्यानें मनुष्य प्रमादी आणि आळशी बनतो; म्हणून थोडक्यांत सांगायचें तर सत्त्वांतून सुख, रजांतून व्याप आणि तमांतून आळस निष्पन्न होतो. रज आणि तम यांना दडपून सत्त्व जय मिळवितें, सत्त्व आणि तम यांना दडपून रज जय मिळवितें, आणि सत्त्व आणि रज यांना दडपून तम जय मिळवितें. देहाच्या सर्व व्यापारांत जेव्हां ज्ञान उमटून दिसून येईल तेव्हां तेथें सत्त्वगुण प्रधानपणें काम करीत आहे असें समजावें. जेथें लोभ, गडबड, अशांति, स्पर्धा दिसते तेथें रजाची वृद्धि झाली असें समजावें. आणि जेथें अज्ञान, आळस, मोह यांचा अनुभव येईल तेथें तमाचें राज्य आहे असें समजावें. ज्याच्या जीवनांत सत्त्वगुण प्रधान आहे तो मरणांतीं ज्ञानमय निर्दोष अशा लोकांत जन्म पावतो. रज प्रधान असेल तर गडबडच्या लोकांत जातो, आणि तम प्रधान असेल तो मूढयोनींत जन्मतो. सात्त्विक कर्माचें फळ निर्मळ, राजसाचें दुःखमय आणि तामसाचें अज्ञानमय असतें. सात्त्विकांची गति उच्च, राजसाची मध्यम आणि तामसांची अधोगति

असते. मनुष्य जेव्हां गुणांहून दुसरा कर्ता नाहीं असें पाहतो आणि गुणांहून पर अशा मला जाणतो तेव्हां तो माझा भाव पावतो. देहांत असलेल्या या तीन गुणांच्या वर जो देही उठतो, तो जन्म, जरा आणि मृत्यु यांच्या दुःखांच्या पलीकडे जाऊन अमृतमय मोक्ष पावतो.

गुणातीताची अशी सुंदर गति होते, तर त्यांचीं लक्षणें काय, त्याचें आचरण कसें, तीन गुणांच्या वर तो कसा उठतो, हे प्रश्न अर्जुन विचारतो.

भगवान् उत्तर देतात: जो मनुष्य आपल्यावर जें येऊन पडेल–मग तें प्रकाश असो, प्रवृत्ति असो किंवा मोह असो, ज्ञान असो, गडबड असो कीं अज्ञान असो – त्याचें अति दुःख किंवा सुख मानीत नाहीं किंवा त्यांची इच्छा (अथवा द्वेष) करीत नाहीं; जो गुणांच्या बाबतींत तटस्थ राहतो, चळत नाहीं; गुण आपला भाग बजावीत असतात असें समजून जो स्थिर राहतो, जो सुख-दुःख सम मानतो, ज्याला लोखंड, दगड किंवा सोनें सारखेंच आहे, ज्याला प्रियअप्रिय असें कांहीं नाहीं, ज्याला स्वतःची स्तुति किंवा निंदा स्पर्श करूं शकत नाहीं, ज्याला मान-अपमान सारखेच आहेत, जो शत्रु-मित्रासंबंधीं समभाव ठेवतो, ज्यानें सर्व आरंभांचा त्याग केला आहे, त्याला गुणातीत म्हणायचें. हीं जीं लक्षणें सांगितलीं त्यांनीं बुजून जाण्याचें किंवा हातावर डोकें टेकून निष्क्रिय होऊन बसण्याचेंहि कारण नाहीं. मी सांगितली ही सिद्धाची दशा आहे. तिला पोचण्याचा मार्ग असा: अव्यभिचारी भक्तियोगानें माझी सेवा कर. (तिसऱ्या अध्याया-पासून) मी तुला सांगितलें आहे कीं कर्माशिवाय, प्रवृत्तिशिवाय कोणीहि श्वाससुद्धां घेऊं शकत आहीं. तेव्हां कर्में ही प्रत्येक देहाला चिकटलेलींच आहेत. ज्याला गुणांच्या पलिकडे जायचें आहे अशा साधकानें सर्व कर्में मला अर्पण करावीं, आणि फळाची यत्किंचित्हि इच्छा ठेवूं नये. असें केल्यानें त्याचीं कर्में त्याच्या आड येणार नाहींत. कारण ब्रह्म मी आहे, मोक्ष मी आहे, सनातन धर्म तो मी आहे, अनंतसुख तें मी आहे, जें म्हणशील तें मी आहे. मनुष्य शून्यवत् झाला कीं मलाच सर्वत्र पाहणार. तो गुणातीत.

• •

# अध्याय १५ वा

श्रीभगवान् म्हणाले : या संसाराकडे दोन प्रकारें पाहातां येईल. एक प्रकार असा -- ज्याचें मूळ वर आहे, शाखा खालीं आहेत आणि ज्याला वेदरूपी पानें आहेत अशा पिंपळाच्या रूपांत जो संसाराकडे पाहतो तो वेदांना जाणणारा ज्ञानी आहे. दुसरा प्रकार म्हणजे -- संसाररूपी वृक्षाच्या शाखा वर खालीं पसरलेल्या आहेत, त्याला तीन गुणांनीं वृद्धि पावलेले विषयरूपी अंकुर आहेत, आणि ते विषय जीवाला मनुष्यलोकांत कर्माच्या बंधनांत जखडतात. या वृक्षाचें स्वरूपहि जाणतां येत नाहीं, त्याला आरंभ नाहीं, अंतहि नाही, त्याच्या आधाराचा पत्ताच नाहीं.

हा दुसऱ्या प्रकारचा जो संसारवृक्ष आहे त्यानें जरी आपलें मूळ बळकट केलेलें असलें तरी तें असहकाररूपी शस्त्रानें छेदून टाकावें, त्यायोगें जेथून मागें फिरफिरून येणें नाहीं अशा लोकांत आत्मा जाईल; आणि त्याकरितां ज्या आदिपुरुषाच्या मायेच्या योगानें ही जुनाट प्रवृत्ति पसरली आहे त्या आदिपुरुषाला त्यानें भजावें. ज्यांनीं मान–मोह सोडून दिले आहेत, ज्यांनीं संगदोष जिंकले आहेत, जे आत्म्यांत लीन आहेत, जे विषयापासून परावृत्त झाले आहेत, ज्यांना सुखदुःख सारखें आहे, ते ज्ञानी या अव्ययपदाला पावतात.

त्या स्थळीं सूर्याला किंवा चंद्राला किंवा अग्नीला तेज देण्याचें उरत नाहीं. जेथें गेल्यानंतर परत फिरणें नसतें, तें माझें परम स्थान आहे.

जीवलोकांत माझा सनातन अंश जीवरूपानें प्रकृतींत असलेल्या मनासकट सहा इंद्रियांना आकर्षित करतो. जेव्हां जीव देह धारण करतो आणि सोडतो, तेव्हां, वायु जसा आपल्या स्थळाहून गंधांना बरोबर घेऊन फिरतो तसा, हा जीवसुद्धां इंद्रियांना बरोबर घेऊन विचरतो. कान, डोळे, त्वचा, जीभ आणि नाक, तसेंच मन, इतक्यांचा आश्रय घेऊन जीव विषयांचें सेवन करतो. गतिमान् असणें, स्थिर राहणें किंवा भोग भोगणें या गुणांनीं युक्त असलेल्या या जीवाला मोहांत सापडलेले अज्ञानी ओळखत नाहींत. ज्ञानी ओळखतात. यत्न करणारे योगी आपल्यांत असलेल्या या

जीवाला ओळखतात. पण ज्यांनीं समभावरूपी योग साधला नाहीं असे लोक यत्न करीत असूनसुद्धां त्याला ओळखत नाहींत.

सूर्याचें जें तेज जगाला प्रकाश देतें, जें चंद्रांत आहे, जें अग्नींत आहे, तें सर्व माझें तेज जाण. माझ्या शक्तीच्या योगानें शरीरांत प्रवेश करून मी जीवांना धारण करतों. रस उत्पन्न करणारा सोम होऊन औषधिमात्राचें पोषण मी करतों. प्राण्यांच्या देहांत राहून, जठराग्नि होऊन, प्राण आणि अपानवायूंना समान करून, चार प्रकारचें अन्न मी पचवितों. सर्वांच्या हृदयाच्या अंतर्गत मी आहे. माझ्या योगानेंच स्मृति आहे, ज्ञान आहे, त्याचा अभाव आहे, सर्व वेदांच्या साहाय्यानें जाणण्याला योग्य तो मी आहे. वेदान्तहि मी, वेद जाणणाराहि मी.

या लोकांत दोन पुरुष आहेत असें म्हणतात : क्षर आणि अक्षर, म्हणजे नाशवंत आणि नाशरहित. यांत जीव हे क्षर म्हणावयाचे, त्यांत स्थिर असलेला मी अक्षर, आणि त्याहूनहि पर असा उत्तम पुरुष त्याला परमात्मा म्हणतात. तो अव्यय ईश्वर तीन्ही लोकांत प्रवेश करून त्यांचें पालन करतो तो सुद्धां मी, म्हणून मी क्षर आणि अक्षर यांहूनहि उत्तम आहे, आणि लोकांत व वेदांत मी पुरुषोत्तम या नांवानें प्रसिद्ध आहे. अशा रीतीनें जो ज्ञानी मला पुरुषोत्तमरूपानें ओळखतो तो सर्व कांहीं जाणतो, आणि सर्वभावें मला भजतो.

हे निष्पाप अर्जुना, हें अतिगुह्य शास्त्र मी तुला सांगितलें आहें. तें जाणून मनुष्य बुद्धिमान् होतो आणि आपल्या ध्येयाप्रत पोचतो.

• •

## अध्याय १६ वा

यरवडामंदिर
७–२–१९३२

श्रीभगवान् सांगतात : आतां मी तुला धर्मवृत्ति आणि अधर्मवृत्ति यांतला भेद सांगतों. धर्मवृत्तीसंबंधीं मी यापूर्वीं पुष्कळ सांगितलें आहे, तरी तिचीं लक्षणें पुनः सांगतों. ज्याच्यांत धर्मवृत्ति आहे त्याच्यांत निर्भयता, अंतःकरणाची शुद्धि, ज्ञान, समता, इंद्रियदमन, दान, यज्ञ,

शास्त्रांचा अभ्यास, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, कोणाची चहाडी–चुगली न करणें म्हणजेच अपैशुन, भूतमात्राविषयीं दया, अलोलुपता, कोमळपणा, मर्यादा, अचंचळपणा, तेज, क्षमा, धीर, अंतराची आणि बाहेरची स्वच्छता, अद्रोह आणि निरभिमानता असेल.

ज्याच्यांत अधर्मवृत्ति आहे त्याच्यांत दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरपणा आणि अज्ञान दिसून येईल.

धर्मवृत्ति ही मनुष्याला मोक्षाकडे नेते. अधर्मवृत्ति त्याला बंधनांत टाकते. हे अर्जुना, तूं स्वतः धर्मवृत्ति घेऊनच जन्मला आहेस.

अधर्मवृत्तीचा थोडा विस्तार करतों, अशाकरितां कीं त्यामुळें तिचा लोकांनीं आपोआप त्याग करावा.

अधर्मवृत्तीचीं माणसें प्रवृत्ति आणि निवृत्ति यांच्यांतला भेद जाणत नाहींत, त्यांना शुद्ध-अशुद्ध किंवा सत्य-असत्य यांचें भान नसतें. मग तें अंमलांत आणणें-न आणणें हें कोठून असणार? त्यांच्या मतानें जग हें खोटयानें भरलेलें, पाया नसलेलें असें आहे, जगाचा कोणी नियंता नाहीं. स्त्री-पुरुषांचा संबंध हें त्यांचें जग, म्हणजे त्यांत विषयभोगाशिवाय दुसरा विचारच मिळायचा नाहीं.

अशी वृत्ति असणारांचीं कामें भयानक असणार, त्यांची मति मंद असणार, असे लोक आपले दुष्ट विचार घट्ट धरून ठेवतात, आणि जगाच्या नाशाकरितांच त्यांची सारी प्रवृत्ति असते. त्यांच्या कामनांना अंतच नसतो, ते दंभ-मान-मदानें ताठलेले असतात.

असें असल्यामुळें त्यांना असलेल्या चिंतांनाहि कांहीं पार नसतो, त्यांना नित्य नवे भोग पाहिजे असतात, शेंकडो आशांचे किल्ले ते रचतात, आणि आपली कामना तृप्त करण्यासाठीं द्रव्य गोळा करतांना न्याय-अन्यायाचा भेद ते ठेवीतच नाहींत.

'आज मीं हें मिळविलें, उद्यां तें दुसरें मिळवीन; या शत्रूला आज मारलें, आणखी दुसऱ्यांना मारीन, मी बलवान्, माझ्यापाशीं ऋद्धिसिद्धी आहेत, माझ्यासारखा दुसरा कोण, कीर्ति मिळविण्यासाठीं मी यज्ञ करीन, दान देईन. आणि चैन करीन, असें मनांतल्या मनांत ते मांडे खात असतात आणि शेवटीं मोहजाळांत अडकून नरकांत जातात.

असे आसुरी लोक आपल्या घमेंडींत राहून परनिंदा करतांना थकत नाहींत, सर्वव्यापक ईश्वराचा द्वेष करतात, आणि त्यामुळें ते वारंवार आसुरी योनींत जन्म घेतात.

नरकाकडे नेणारे आणि आत्म्याचा नाश करणारे काम, क्रोध आणि लोभ हे तीन दरवाजे आहेत. या तीहींचा सर्वांनीं त्याग करावा. त्यांचा त्याग करणारे कल्याणमार्गानें जाणारे असतात, आणि ते परमगतीला पोचतात.

जे अनादि सिद्धान्तरूपी शास्त्राचा त्याग करून स्वेच्छेनें भोगांत गुंततात, त्यांना सुखहि मिळत नाहीं, आणि कल्याणमार्गांत असलेली शांतिहि लाभत नाहीं. म्हणून कार्य-अकार्याचा निर्णय करतांना तूं अनुभवी लोकांकडून अविचल सिद्धांतांचें ज्ञान करून घे, आणि त्याला अनुसरून आचारविचार ठेव.

● ●

## अध्याय १७ वा

यरवडामंदिर
१४–२–१९३२

अर्जुन विचारतो : शिष्ट आचार सोडून पण श्रद्धापूर्वक जे सेवा करतात त्यांची गति काय होते ?

भगवान् उत्तर देतात : श्रद्धा तीन प्रकारची असते– सात्त्विक, राजस आणि तामस. जशी ज्याची श्रद्धा तसा मनुष्य बनतो. सात्त्विक मनुष्य देवाला, राजस यक्षराक्षसांना आणि तामस भूतप्रेतांना भजतात. पण कोणाची श्रद्धा कशी आहे हें एकाएकीं कळूं शकत नाहीं. त्याचा आहार कसा आहे, त्याचें तप कसें, यज्ञ कसा, दान कसें हें समजून घेतलें पाहिजे, आणि त्या सर्वांचेहि तीन तीन प्रकार आहेत ते तुला सांगतों.

ज्या आहारानें आयुष्य, निर्मळता, बळ, आरोग्य, सुख आणि रुचि वाढते तो आहार सात्त्विक म्हणावा. जिभेला चरचरणारा, आंबट, अति तिखट, उष्ण असा जो आहार तो राजस. त्यानें दुःख आणि रोग उत्पन्न

मराठा ... ग्रंथालय
अनुक्रम २६३०६ ...... वि: निबंध ......
क्रमांक ... १२०९ ...... नों: दि: ३३।३।५०

होतात. शिजविलेलें अन्न शिळें झालें असेल, वास मारणारें, उष्टें आणि इतर रीतींनीं अपवित्र असेल तो आहार तामस समजावा.

फळाची इच्छा न राखतां जो कर्तव्यरूपानें तन्मयतापूर्वक केला जातो तो सात्त्विक यज्ञ म्हणायचा. ज्यांत फळाची अपेक्षा आहे, शिवाय दंभहि आहे तो राजस यज्ञ जाणावा. ज्यांच्यांत कसलाहि विधि नाहीं, कांहीं उत्पत्ति नाहीं, कांहीं मंत्र नाहींत, कांहीं त्याग नाहीं, तो यज्ञ तामस आहे.

ज्यांत संतांची पूजा आहे, पवित्रता आहे, ब्रह्मचर्य व अहिंसा आहे. तें शारीरिक तप होय. सत्य, प्रिय, हितकर वाणी आणि धर्मग्रंथांचा अभ्यास तें वाचिक तप आहे. मनाची प्रसन्नता, सौम्यता, मौन, संयम, शुद्ध भावना हें मानसिक तप म्हणायचें. असे शारीरिक, वाचिक आणि मानसिक तप जें समभावानें, फलेच्छेचा त्याग करून केलें जातें तें सात्त्विक तप म्हणायचें. जें तप मानाच्या अपेक्षेनें दंभपूर्वक करण्यांत येतें तें राजस समजावें, आणि जें तप कष्टानें, दुराग्रहपूर्वक किंवा दुसऱ्याच्या नाशाच्या इच्छेनें केलें जातें आणि ज्यांत शरीरांत असलेल्या आत्म्याला निरर्थक क्लेश होतात तें तप तामस आहे.

देणें कर्तव्य म्हणून दिलेलें, फलेच्छाविरहित, देशकालपात्र पाहून दिलेलें दान सात्त्विक आहे. ज्यांत मोबदल्याची अपेक्षा आहे आणि जें देतांना संकोच आहे तें दान राजस आहे. देशकालादींचा विचार न करतां तिरस्कारपूर्वक किंवा आदर न दाखवितां दिलेलें दान तामस आहे.

वेदांनीं ब्रह्माचें वर्णन ' ओम् तत् सत् ' या रूपानें केलें आहे. आणि म्हणून श्रद्धावान् लोकांनी यज्ञ-दान-तप आदि क्रिया त्यांचें उच्चारण करून कराव्या. ओम् म्हणजे एकाक्षरी ब्रह्म, तत् म्हणजे तें, सत् म्हणजे सत्य-कल्याण-रूप. म्हणजेच ईश्वर एक आहे, तोच आहे, तोच सत्य आहे, तोच कल्याण करणारा आहे, अशी भावना ठेवून आणि ईश्वरार्पण बुद्धीनें जे यज्ञादि करतात त्यांची श्रद्धा सात्त्विकी आहे. हा शिष्ट आचार न जाणल्यामुळें किंवा जाणत असतांनासुद्धां ईश्वरार्पण बुद्धीनें त्याहून कांहीं भिन्न केलें तरी तें दोषरहित आहे. पण जी क्रिया ईश्वरार्पण बुद्धि न ठेवतां होते ती श्रद्धारहित मानावी, ती असत् आहे.

• •

## अध्याय १८ वा

यरवडामंदिर
२१-२-१९३२

मागील सोळा अध्यायांचें मनन केल्यानंतर अर्जुनाच्या मनांत अजून शंका राहते; कारण गीतेचा संन्यास त्याला प्रचलित संन्यासापेक्षां वेगळा वाटतो. त्याग आणि संन्यांस या दोन वेगळचा वस्तु आहेत कीं काय ?

या शंकेचें निवारण करतांना भगवान् या शेवटच्या अध्यायांत गीतेच्या शिक्षणाचें सार काढून देत आहेत.

कित्येक कर्मांत कामना भरलेली असते; अनेक प्रकारच्या इच्छा भागविण्यासाठीं मनुष्य अनेक उद्योग रचतो; हें काम्य कर्म. दुसरीं आवश्यक आणि स्वाभाविक अशी कर्मे आहेत, उदा० श्वासोच्छ्‌वास घेणें, देहाच्या रक्षणापुरतें खाणेंपिणें, कपडे घालणें, झोंपणें, बसणें इ. आणि तिसरीं पारमार्थिक कर्मे. यांपैकीं काम्य कर्मांचा त्याग म्हणजे गीतेचा संन्यास; आणि सर्व प्रकारच्या कर्मांच्या फळाचा त्याग तो गीतामान्य त्याग.

सर्व कर्मांत थोडा दोष हा असतोच असें जरी म्हटलें तरी यज्ञार्थ म्हणजे परोपकारार्थ करावयाच्या कर्मांचा त्याग संभवत नाहीं. यज्ञांत दान आणि तप येतें. तथापि परमार्थाविषयीं सुद्धां आसक्ति, मोह असतां कामा नये, नाहींतर त्यांत खोटें मिसळण्याचा संभव असतो.

मोहाला वश होऊन नियत कर्मांचा त्याग हा तामस होय. देहाला कष्ट होतील असें समजून केलेला त्याग राजस होय. पण सेवाकार्य केलें पाहिजे अशा भावनेनें फलेच्छा न ठेवतां होणारा त्याग हाच खरा सात्त्विक त्याग होय. म्हणजे या त्यागांत कर्मांचा त्याग नाहीं. पण कर्तव्यकर्माच्या फळाचा त्याग आहे, आणि इतर म्हणजे काम्य कर्मांचा तर त्याग त्यांत आहेच. अशा त्यागी माणसाला शंका उद्‌भवत नाहींत. त्याची भावना शुद्ध असते, आणि तो सोयी-गैरसोयीचा विचार करीत नाहीं.

कर्मफलत्याग जे करीत नाहींत त्यांना बरीं वाईट फळें भोगावींच

लागतात आणि त्यामुळें ते बंधनांतच राहतात. ज्यानें फलत्याग केला आहे तो बंधनमुक्त होतो.

आणि कर्माविषयीं मोह कशाला ? आपणच कर्ता आहोंत हा अभिमान मिथ्या आहे. कोणत्याहि कर्माची सिद्धि होण्याकरितां पांच कारणें असतात. स्थान ( उपादान ), कर्ता, साधनें, क्रिया आणि हे सर्व असूनहि शेवटीं दैव.

असें समजून माणसानें अभिमान सोडणें योग्य, आणि जो मीपणा सोडून कांहींहि करतो तो करीत असूनसुद्धां करीत नाहीं असें म्हणतां येईल; कारण त्याला तें कर्म बांधत नाहीं. अशा निरभिमान शून्यवत् झालेल्या मनुष्याविषयीं असें म्हणतां येईल कीं तो मारीत असूनसुद्धां मारीत नाहीं, याचा अर्थ कोणीहि मनुष्य शून्यवत् झाला असूनहि हिंसा करील आणि अलिप्त राहील, असा होऊं शकत नाहीं; कारण निरभिमान्याला हिंसा करण्याचें प्रयोजनच असूं शकत नाहीं.

कर्माच्या प्रेरणेंत पुढील तीन गोष्टी असतात : ज्ञान, ज्ञेय आणि परिज्ञाता. आणि त्याचीं पुढील तीन अंगें असतात : इंद्रियें, क्रिया आणि कर्ता. करायचें काय तें ज्ञेय, त्याची रीत तें ज्ञान, आणि तें जाणणारा तो परिज्ञाता अशा रीतीनें प्रेरणा झाल्यानंतर कर्म होतें त्यांत इंद्रियें हीं करण असतात, करणें ही क्रिया, आणि ती करणारा तो कर्ता. असा विचारांतून आचार होतो. ज्यायोगें आपण प्राणिमात्रांत एकच भाव पाहूं, म्हणजेच सर्व वेगळेंवेगळें वाटत असतांनाहि खोल उतरलें असतां एकच भासमान होईल तें सात्त्विक ज्ञान. त्याच्या उलट, जें वेगळें दिसतें तें वेगळेंच आहे असें वाटणें तें राजस ज्ञान. आणि जेथें कांहीं कळतच नाहीं आणि जेथें कारण न कळल्यामुळें सर्व गोंधळ वाटतो तें तामस ज्ञान.

जसे ज्ञानाचे विभाग पडूं शकतात तसेच कर्माचेहि. जेथें फलेच्छा नाहीं, रागद्वेष नाहींत तें कर्म सात्त्विक; जेथें भोगाची इच्छा आहे, जेथें मी करतों असा अभिमान आहे आणि म्हणून व्यांप आहे तें राजस कर्म. जेथें परिणामाचा, हानीचा किंवा हिंसेचा अथवा शक्तीचा विचार हें कांहींच नाहीं, आणि जें मोहाला वश होऊन होतें तें तामस कर्म.

कर्माप्रमाणेंच कर्ताहि तीन प्रकारचा समजावा, अर्थात् कर्म समजल्या-

नंतर कर्ता समजण्याला अडचण पडणारच नाहीं. सात्त्विक कर्ता तो कीं ज्याला राग (आसक्ति) नाहीं, अहंकार नाहीं, तरी ज्याच्यांत दृढता आहे, साहस आहे आणि तरीसुद्धां ज्याला बऱ्यावाईट फळानें हर्षशोक होत नाहीं. राजस कर्त्यांत राग असतो, लोभ असतो, हिंसा असते, हर्षशोक तर असणारच, मग कर्मफलाच्या इच्छेविषयीं काय विचारावें ? आणि तामस कर्ता म्हणजे व्यवस्था नसलेला, दीर्घसूत्री, हट्टी, शठ, आळशी थोडक्यांत म्हणजे संस्कारशून्य.

बुद्धि, धृति आणि सुख यांच्याहि वेगवेगळचा जाती समजून घेणें बरें.

सात्त्विक बुद्धि ही प्रवृत्ति–निवृत्ति, कार्य–अकार्य, भय–अभय, बंध–मोक्ष वगैरेचा बरोबर भेद पाडते आणि समजते. राजसी बूद्धि हा भेद करूं लागते पण बहुतांशीं चुकीचा किंवा उलटा करते. आणि तामसी बुद्धि तर धर्माला अधर्म समजते, सर्व उलटेंच पाहते.

धृति म्हणजे धारणा, कोणतीहि गोष्ट ग्रहण करून तिला चिकटून राहण्याची शक्ति. ही शक्ति कमीजास्त प्रमाणांत सर्वांत आहे. ती जर नसेल तर जग एक क्षणहि टिकूं शकणार नाहीं. आतां ज्या धृतींत मन, प्राण आणि इंद्रियांच्या क्रिया यांच्यांत साम्य आहे, सारखेपणा आहे, आणि एकनिष्ठा आहे, ती धृति सात्त्विक होय. आणि जिच्या योगानें मनुष्य धर्म, काम आणि अर्थ आसक्तिपूर्वक धारण करतो ती धृति राजस आहे. जी धृति मनुष्याला निद्रा, भय, शोक, निराशा, मद वगैरे सोडूं देत नाहीं ती तामस आहे.

सात्त्विक सुख तें कीं ज्यांत दुःखाचा अनुभव नाहीं; प्रारंभीं जरी तें विषासारखें वाटलें तरी परिणामीं तें अमृतासमान आहे हें आपण जाणतों, आणि ज्यांत आत्मा प्रसन्न राहतो. विषयभोगांत जें आरंभीं गोडसें वाटतें, पण मागाहून विषासारखें होतें तें राजस सुख होय. आणि ज्यांत केवळ मूर्च्छा, आळस, निद्रा हेंच असतें तें तामस सुख होय.

अशा रीतीनें वस्तुमात्राचे तीन भाग पाडतां येतात. ब्राह्मणादि चार वर्णसुद्धां या तीन गुणांच्या कमीजास्तपणामुळें पडले आहेत. ब्राह्मणाच्या कर्मांत शम, दम, तप, शौच, क्षमा, सरळपणा, ज्ञान, अनुभव, आस्तिकता असलीं पाहिजेत. क्षत्रियांत शौर्य, तेज, धृति, दक्षता, युद्धांत मागें

न हटणें, दान, राज्य चालविण्याची शक्ति हीं असलीं पाहिजेत. शेती, गोरक्षा आणि व्यापार हें वैश्याचें कर्म आणि शूद्राचें सेवा हें कर्म आहे. याचा अर्थ, एकमेकांचे गुण एकमेकांत नसतात, किंवा ते गुण अंगीं आणण्याचा कोणाला अधिकार नाहीं, असा नाहीं. पण वरीलप्रमाणें गुणानें किंवा कर्मानें त्या त्या वर्णाची ओळख पटूं शकते. प्रत्येक वर्णाचे गुण–कर्म जर ओळखतां आले तर एकमेकांविषयीं द्वेषभाव वाटणार नाहीं आणि हानिकारक चढाओढीहि होणार नाहींत. येथें उच्च–नीच भावनांना स्थानच नाहीं. पण सर्वजण आपापल्या स्वभावाप्रमाणें निष्कामपणें आपलीं कर्में करीत राहातील तर तीं तीं कर्में केल्यानें ते मोक्षाचे अधिकारी होतात. म्हणूनच म्हटलें आहे कीं परधर्म जरी बरा वाटत असला आणि स्वधर्मांत कांहीं अर्थ नाहीं असें वाटत असलें तरी स्वधर्मच चांगला. स्वभावजन्य कर्मांत पाप नसण्याचा संभव आहे, कारण कीं त्यांतच निष्कामता राखतां येईल, दुसरें कांहीं करण्याची इच्छा करण्यांतच कामना येते. बाकी अग्नि तेथें जसा धूर असायचा तसा कर्म आहे तेथें दोष हा आहेच, पण सहजप्राप्त कर्म फलेच्छा न ठेवतां केलें म्हणजे कर्माचा दोष लागणार नाहीं.

आणि अशा रीतीनें जो स्वधर्म पाळून शुद्ध झालेला आहे, ज्यानें मन ताब्यांत ठेवलें आहे, ज्यानें पांच विषयांना सोडून दिलें आहे, ज्यानें राग–द्वेष जिंकले आहेत, जो एकान्तसेवी म्हणजे अंतर्ध्यानांत मग्न राहूं शकतो, जो अल्पाहार करून मन–वचन–कायेला ताब्यांत ठेवतो, ईश्वर-ध्यान ज्याचें निरंतर चालतें, ज्यानें अहंकार, काम, क्रोध, परिग्रह इ. टाकले आहेत, तो शांत योगी ब्रह्मभाव पावण्याला योग्य आहे. असा मनुष्य सर्वांविषयीं समभाव ठेवून राहतो आणि हर्ष–शोक करीत नाहीं. असा भक्त ईश्वरतत्त्व यथार्थपणें जाणतो, आणि ईश्वरांत लीन होतो. अशा प्रकारें तो भगवंताचा आश्रय घेतो आणि अमृतपद पावतो.

म्हणून भगवान् म्हणतात : सर्व मला अर्पण कर, माझ्यांत लीन हो, आणि विवेक बुद्धीचा आश्रय घेऊन माझ्यांत चित्त गुंतवून टाक. असें करशील तर साऱ्या विटंबना पार करशील, पण जर मीपणा ठेवून माझें न ऐकशील तर नाश पावशील. सर्वांत मोलाची गोष्ट म्हणशील तर ही

कीं सगळ्या भानगडींचा त्याग करून मलाच शरण ये, म्हणजे तूं पाप-मुक्त होशील. जो तपस्वी नाहीं, भक्त नाहीं, ज्याला ऐकण्याची इच्छा नाहीं आणि जो माझा द्वेष करतो त्याला हें ज्ञान सांगूं नकोस. पण हें परम गुह्य जो माझ्या भक्तांना देईल, तो माझी भक्ति केल्यानें अवश्य मला पावेल.

शेवटीं संजय धृतराष्ट्राला म्हणतो : ‘ जेथें योगेश्वर कृष्ण आहे, जेथें धनुर्धारी पार्थ आहे, तेथें श्री आहे, विजय आहे, वैभव आहे आणि अविचल नीति आहे.’

येथें कृष्णाला योगेश्वर विशेषण लावलें आहे म्हणून त्याचा शाश्वत अर्थ शुद्ध अनुभवज्ञान, आणि धनुर्धारी पार्थ म्हणून असें सुचविलें आहे कीं जेथें अशा अनुभवसिद्ध ज्ञानाला अनुसरणारी क्रिया आहे, तेथें परम नीतीला अविरोधी अशी मनःकामना सिद्ध होत असते.

• •

गीताभ्यास

# गीताभ्यास

## गीतेचें महत्त्व

गीता हा माझ्या मतें समजायला अतिशय सोपा असा ग्रंथ आहे. त्यांत कित्येक मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत आणि ते सोडवायला कठिण आहेत यांत शंका नाहीं. परंतु गीतेचें तात्पर्य माझ्या मतें अगदीं स्पष्ट आहे. ती सर्व हिंदु संप्रदायांनीं प्रमाण मानिली आहे. तिच्यांत कुठल्याहि प्रकारें सांप्रदायिक सिद्धान्तवाद नाहीं, एकान्तिकता नाहीं. ती थोडक्यामध्यें तर्कयुक्त संपूर्ण नीतिधर्म शिकवते. ती बुद्धि आणि हृदय दोहोंचेंहि समाधान करते. अशा प्रकारें ती तत्त्वज्ञान व धर्म उभयरूप आहे. तिची शिकवण सार्वभौम आहे. तिची भाषा अतिशय सोपी आहे. तथापि प्रत्येक लोकभाषेंत तिचें अधिकृत भाषांतर व्हायला पाहिजे आणि तें भाषांतर असें व्हायला पाहिजे कीं त्यांत शास्त्रीय परिभाषा शक्य तों टाळण्यांत यावी आणि गीतेची शिकवण सामान्य माणसालाहि समजावी. ही सूचना मूळ संस्कृत संहितेचें उच्चाटण करण्याच्या हेतूनें केलेली नाहीं. कारण प्रत्येक हिंदु मुलानें आणि मुलीनें संस्कृत शिकलें पाहिजे हें माझें मत मी पुन्हां सांगतों आहें. परंतु पुढें सुदीर्घ काळपर्यंत ज्यांना संस्कृतचा गंध नाहीं असे लक्षावधि लोक राहणार आहेत. ते संस्कृत जाणत नाहींत. म्हणूनच त्यांना भगवद्गीतेच्या शिकवणीपासून वंचीत राखणें हें आत्मघातकीपणाचें होईल.[१]

---

[१]यंग इंडिया : ऑगष्ट २५, १९२७

## गीताध्ययनाचा अधिकार : अर्थाचा अनर्थ

एक गृहस्थ एका शाळेच्या मुख्याध्यापकांच्या मदतीनें विद्यार्थ्यांत गीतेचा अभ्यास दाखल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण गीतेच्या वर्गाची योजना करण्यासाठीं कांहीं दिवसांपूर्वीं घेतलेल्या सभेंत एक बँकेचे व्यवस्थापक उभे राहिले आणि सभेच्या कामांत अडथळा आणून म्हणाले: 'विद्यार्थ्यांना गीता शिकण्याचा अधिकार नाहीं. गीता म्हणजे विद्यार्थ्यांच्या हातीं देण्याचें खेळणें. नव्हे.' आतां त्या गृहस्थांनीं या प्रसंगा-विषयीं विस्तृत व युक्तिवादांनीं भरलेलें असें पत्र लिहिलें आहे. आणि आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ रामकृष्ण परमहंसांचीं कित्येक वचनें उद्धृत केलीं आहेत. त्यांतून खालील येथें देत आहे.

"मुलांना त्याचप्रमाणें तरुणांना ईश्वरप्राप्तीची साधना करण्याला प्रोत्साहन दिलें पाहिजे. ते खराब न झालेल्या फळासारखे असतात. त्यांना सांसारिक वासनांचा दूषित स्पर्श थोडाहि झालेला नसतो. अशा वासनांनीं एकदां त्यांच्या मनांत घर केलें म्हणजे मग त्यांना मोक्षाच्या मार्गाकडे वळविणें फार कठिण.

"मला तरुण इतके कां आवडतात ? कारण ते आपल्या मनाचे सोळाचे सोळा आणे मालक असतात. ते मोठे होत जातात तसतसे त्याचे लहान लहान तुकडे पडत जाणार. विवाहित माणसाचें अर्धें मन स्त्रींत गुंतून राहतें. मूल होतें तेव्हां चार आणे मन तें खेंचून घेतें. आणि बाकीचे चार आणे आईबाप, जगांतले मान-अपमान, कपडे-लत्ते वगैरेंची मौज-मजा इत्यादींमध्यें विखुरलें जातें. म्हणून बाळकाचें मन ईश्वराला सहजपणें ओळखूं शकतें. वृद्ध माणसाला ही गोष्ट फार कठिण आहे.

"पोपटाचा कंठ मोठेपणीं जून झाल्यानंतर त्याला गायला शिकवतां येत नाहीं. तो बच्चा असतो तेव्हांच त्याला शिकवायला पाहिजे. त्याचप्रमाणें म्हातारपणीं ईश्वरांत मन लावणें कठिण आहे; लहान वयांत तें सहजपणें लावतां येईल.

"भेसळीच्या एक शेर दुधामध्यें दोन छटाक पाणी असेल तर तेवढें पाणी आटवायला फार थोडी मेहनत आणि थोडेंसें जळण लागेल. पण एक शेर

दुधांत पाऊण शेर पाणी असल्यास तें आटवण्यास किती मेहनत आणि किती जळण लागेल ? मुलांच्या मनाला वासनांचा स्पर्श थोडाच झालेला असतो. त्यामुळें तें ईश्वराकडे वळूं शकतें. वासनांनीं पुरेपूर बरबटलेल्या म्हाताऱ्या लोकांच्या मनाला कसें वळवतां येईल ?

" कोवळा फोक वळवावा तसा वळतो, पण जून कळक वांकवूं लागल्यास मोडूनच जायचा. मुलाच्या मनाला ईश्वराकडे वळवणें सोपें, पण म्हाताऱ्या माणसाचें मन वळवूं जातां तें निसटून जातें.

" मनुष्याचें मन मोहरीच्या पुडीसारखें आहे. पुडी फाटून दाणे विखुरले म्हणजे ते वेचून गोळा करणें कठिण. त्याप्रमाणें मनुष्याचें मन अनेक दिशांनीं धांवत असलें आणि संसाराच्या जाळ्यांत गुरफटलें गेलें म्हणजे त्याला वळवून एकाग्र करणें महाकठिण. मुलाचें मन नाना दिशांनीं धांवत नसतें. त्यामुळें तें कोणत्याहि विषयावर सहज एकाग्र करतां येतें. परंतु म्हाताऱ्या माणसाचें मन संसारांतच रमून गेलेलें असल्यामुळें त्याला त्यांतून खेंचून ईश्वराकडे वळवणें कठिण आहे. "

वेदाध्ययनाच्या अधिकाराबाबत मीं ऐकलें होतें, परंतु त्या बँकेच्या व्यवस्थापकानें कल्पिलेल्या अधिकाराची गरज गीतेच्या अभ्यासासाठीं असेल अशी कल्पना मला कधीं शिवली नाहीं. त्या अधिकारासाठीं कोणते गुण पाहिजेत हें त्यानें सांगितलें असतें तर बरें झालें असतें. गीता निंदकाखेरीज सर्वांसाठीं आहे हें गीतेनें स्वतःच स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. खरें पाहतां हिंदुधर्माची मूळ कल्पनाच ही आहे कीं विद्यार्थ्याचें जीवन म्हणजे ब्रह्मचाऱ्याचें जीवन होय. आणि त्यानें त्या जीवनाचा आरंभ धर्मज्ञानापासून त्याचप्रमाणें *त्याच्या आचरणापासून* करायला पाहिजे. म्हणजे स्वतः तो जें शिकेल तें पचवूं शकेल आणि आपल्या जीवनांत धर्माचरण ओतप्रोत करून टाकील. प्राचीन काळचा विद्यार्थी आपला धर्म काय आहे हें समजण्यापूर्वींच त्याचें आचरण करूं लागायचा. आणि ह्या आचरणानंतर त्याला जें ज्ञान मिळायचें त्यामुळें आपल्यासाठीं नेमलेल्या आचाराचें रहस्य तो समजूं शकायचा.

म्हणजे अधिकार तर त्या वेळींहि होता. पण हा अधिकार पंच यम —अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रह्मचर्य— या स्वरूपाचा होता.

धर्माचें आचरण करूं इच्छिणाऱ्या प्रत्येकाला या नियमांचें पालन करावें लागे. धर्माचा पायाच असलेल्या या तत्त्वांची आवश्यकता सिद्ध करण्यासाठीं धर्मग्रंथ वाचण्याची गरज राहत नसे.

परंतु आज या प्रकारच्या पुष्कळ अर्थवाही शब्दांप्रमाणें 'अधिकार' शब्दाचीदेखील विकृति झाली आहे. एखाद्या धर्मभ्रष्ट माणसाला, तो ब्राह्मण म्हटला जातो एवढ्याच कारणानें, शास्त्रें वाचायचा आणि तीं आपल्याला समजावून सांगायचा अधिकार मानला जातो. उलट दुसऱ्या एखाद्या माणसाला, जो अमुक एका स्थितींत जन्मला म्हणून 'अस्पृश्य' म्हटला गेला तो मग कितीहि धर्मनिष्ठ असला तरी त्याला, शास्त्रें वाचायचा निषेध आहे !

पण ज्या महाभारताचा गीता हा एक भाग आहे, त्याच्या लेखकानें या वेडगळ निषेधाचा विरोध करण्यासाठींच सदर महाकाव्य लिहिलें आणि वर्ण अथवा जाति यांचा किंचित्‌हि भेद न राखतां तें सर्वांना वाचण्याची मोकळीक करून दिली. मात्र मी समजतों कीं त्यांत मीं उल्लेखिलेल्या यमांच्या पालनाची अट राखली असेल. 'मी समजतों' हे शब्द मीं एवढ्यासाठीं घातले कीं महाभारताच्या अभ्यासासाठीं यमांच्या पालनाची अट घातली असल्याचें मला हें लिहितांना स्मरत नाहीं. पण अनुभव सांगतो कीं हृदयाची शुद्धि आणि भक्तिभाव या दोन गोष्टी शास्त्रग्रंथ बरोबर समजण्यासाठीं आवश्यक आहेत.

आजच्या छापखान्याच्या युगानें सगळीं बंधनें तोडून टाकलीं आहेत. आज धर्मनिष्ठ लोक जितक्या मुक्तपणें शास्त्रें वाचतात तितक्याच मुक्तपणें नास्तिकदेखील वाचतात. परंतु आपण या ठिकाणीं विद्यार्थ्यांनीं धर्म-शिक्षणाचें आणि उपासनेचें एक अंग म्हणून गीता वाचणें योग्य आहे कीं नाहीं, याची चर्चा करीत आहों. या बाबतींत मी इतकेंच म्हणेन कीं यमनियमांच्या पालनाची शक्ति आणि त्यामुळें गीताभ्यासाची लायकी ज्यांत विद्यार्थ्यांहून अधिक आहे असा एकहि वर्ग माझ्या कल्पनेंत येत नाहीं. दुर्दैवानें हें कबूल करावें लागतें कीं विद्यार्थी त्याचप्रमाणें शिक्षक हे पांच यमांच्या खऱ्या अधिकाराबाबत थोडाहि विचार करीत नाहींत.[२]

[२] नवजीवन, ११-१२-१९२७

## गीता-पाठक

गीतेसारखे (धर्म-)ग्रंथ कंठस्थ करणें ही गोष्ट मी सदैव अति स्पृहणीय मानिली आहे. परंतु पुष्कळ प्रयत्न करूनहि गीतेचे सर्व अध्याय पाठ करणें मला स्वत:ला मात्र कधीं जमलें नाहीं.

तथापि मला वाटतें, गीता पाठ करणारांनीं हें लक्षांत ठेवायला पाहिजे कीं नुसतें गीता तोंडपाठ म्हणतां येणें हें स्वतःच कांहीं अंतिम साध्य नव्हे. तें गीतार्थाचें चिंतन करायला व गीतेचा संदेश आत्मसात् करायला साधनभूत वा उपकरण म्हणून असावें. चिकाटी धरल्यास एखाद्या पोपटालासुद्धां ती तोंडपाठ म्हणायला शिकवितां येणें शक्य आहे. पण त्यानें कांहीं त्याच्या ज्ञानवत्तेंत भर पडणार नाहीं. गीता पाठ करणारां-पासून गीताकाराची अपेक्षा आहे कीं त्यांनीं योगी व्हावें. त्यांनीं तसें (योगी) व्यापक अर्थानें व्हायला पाहिजे. गीता आपल्या भक्तांपासून विचार, उच्चार आणि आचार यांत समत्व व त्या तिहींत पूर्ण एक वाक्यता अपेक्षिते. ज्याच्या उच्चाराची व आचाराची आपल्या विचाराशीं एकवाक्यता नाहीं तो मिथ्याचारी अथवा दांभिक होय.[३]

## गीतेचें अध्ययन आणि आचरण

गीतेचा अभ्यास सुरू केला. एक लहानसें ‘जिज्ञासु-मंडल’हि बनविण्यांत आलें आणि नियमितपणें अभ्यास सुरू झाला. गीतेवर माझें प्रेम आणि श्रद्धा पूर्वीपासूनच होतीं. आतां तिचें रहस्य खोल जाऊन समजून घेण्याची गरज वाटली. मजजवळ एकदोन अनुवाद होते. त्यांच्या मदतीनें मूळ संस्कृत समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि रोज एक-दोन श्लोक पाठ करण्याचा निश्चय केला.

सकाळचा दांत घासायचा आणि स्नानाचा वेळ मी गीता पाठ करण्याकडे देत असें. दांत घासायला पंधरा आणि स्नानास वीस मिनिटें लागत. दंतधावन इंग्रजी पद्धतीप्रमाणें उभ्या उभ्या करीत असें समोर भिंतीवर गीतेचे श्लोक कागदावर लिहून डकवून देत असें

३ Harijan 2-2-1934

आणि ते पाहून पाहून घोकीत असें. अशा प्रकारें घोकलेले श्लोक स्नान करींपर्यंत पक्के होऊन जात. मध्यंतरीं मागील श्लोकांचीहि उजळणी करून घेत असें. अशा प्रकारें मला आठवतें, तेरा अध्यायांपर्यंत गीता पाठ केली होती. परंतु पुढें कामाचा व्याप वाढला. सत्याग्रहाचा जन्म झाला आणि या बालकाच्या संगोपनाचा भार मजवर येऊन पडला. त्यामुळें विचार करण्याचा वेळदेखील त्याच्या लालनपालनांत गेला आणि आतांहि जात आहे, असें म्हणतां येईल.

गीतापाठाचा परिणाम माझ्या सहाध्यायींवर जो काय झाला त्याविषयीं तेच सांगूं शकतील, परंतु माझ्यासाठीं तर गीता ही आचरणाची एक प्रौढ मार्गदर्शिकाच होऊन बसली. ती माझा एक धार्मिक कोशच होऊन बसली. अपरिचित इंग्रजी शब्दांचा वर्णक्रम अथवा अर्थ पहायला जसा मी इंग्रजी कोश उघडीं, त्याचप्रमाणें आचारविषयक अडचणी आणि त्यांतील घोटाळ्यांत पाडणाऱ्या गुंतागुंती मी गीतेच्या द्वारा सोडवूं लागलों. तिच्यांतील अपरिग्रह, समभाव इत्यादि शब्दांनीं माझ्या मनाची पकड घेतली. समभाव कसा प्राप्त करून घेऊं, त्याचें पालन कसें करूं, याचाच ध्यास लागून राहिला. जे अधिकारी आमचा अपमान करतात, जे अधिकारी लाचखाऊ आहेत, कालपर्यंत जोडीनें काम करून आतां मात्र जे निष्कारण विरोध करतात, असे असे लोक आणि ज्यांनीं आमच्यावर खूप उपकार केले आहेत असे सज्जन यांच्यामध्यें भेद नाहीं म्हणजे काय? अपरिग्रहाचें पालन कसें काय करायचें? देह हासुद्धां काय कमी परिग्रह आहे? स्त्री-पुत्रादि परिग्रह नाहीं तर काय आहे? पुस्तकांनीं भरलेलीं कपाटें का जाळून टाकायचीं? घर जाळून का तीर्थयात्रा करायची? आंतून लगेच उत्तर मिळालें, "होय, घरादाराची होळी केल्याशिवाय तीर्थयात्रा नाहीं होऊं शकत." यांत इंग्रजी कायद्याचें अध्ययन माझ्या मदतीस आलें. स्नेलकृत कायद्याच्या सिद्धान्तांची चर्चा आठवली. ट्रस्टी (विश्वस्त वा न्यासधारक) शब्दाचा अर्थ गीतेच्या अध्ययनामुळें चांगल्या प्रकारें लक्षांत आला. कायदेशास्त्राविषयीं मनांत आदर वाढला. त्यांतदेखील मला धर्मतत्त्व दिसून आलें. ट्रस्टी तसे करोडोंची संपत्ति बाळगतात, परंतु तिच्यांतील एका पैवरहि त्यांचा अधिकार नसतो. अशाच प्रकारें

मुमुक्षूला आपलें आचरण ठेवलें पाहिजे. हा धडा मी गीतेपासून शिकलों. अपरिग्रही होण्यासाठीं, समभाव राखण्यासाठीं हेतु व हृदय यांचें परिवर्तन आवश्यक आहे, ही गोष्ट मला दिव्याइतकी स्पष्ट दिसूं लागली. झालें, ताबडतोब रेवाशंकरभाईंना लिहून टाकलें कीं विम्याची पॉलिसी बंद करून द्या. कांहीं रक्कम परत मिळाली तर ठीक, नाहींतर रामराम. मुलांबाळांचा व गृहिणीचा सांभाळ ज्यानें त्यांना व आम्हांला जन्म दिला आहे तो ईश्वर करील. हा माझ्या त्या पत्राचा आशय होता. पित्यासमान असलेल्या आपल्या थोरल्या भावाला लिहिलें, "आजवर जें कांहीं मी शिल्लक टाकीत राहिलों तें आपल्याला अर्पण करीत आलों. आतां माझी आशा सोडावी. आतां जें कांहीं शिल्लक पडेल तें इथल्याच सार्वजनिक कामाकडे लागेल." [४]

## गीता-माता

गीता हें शास्त्रांचें दोहन आहे. मीं कुठेंतरी वाचलें होतें कीं सर्व उपनिषदांचें सार तिच्या श्लोकांत येऊन जातें. म्हणून मीं निश्चय केला कीं दुसरें कांहीं न जमलें तरी गीतेचें ज्ञान प्राप्त करून घ्यायचें. आज गीता ही मला नुसतें बायबल नाहीं, नुसतें कुराण नाहीं, मला ती माता होऊन बसली आहे. मला जन्म देणारी माता तर निघून गेली, परंतु संकटकाळीं गीतामातेकडे जायला मी शिकलों आहें. माझा असा अनुभव आहे कीं जो कोणी या मातेला शरण जातो, त्याला ती ज्ञानामृतानें तृप्त करते.

कांहीं लोक म्हणतात कीं गीता तर महागूढ ग्रंथ आहे....परंतु आमच्यासारख्या सामान्य माणसाला ती गूढ नाहीं. समग्र गीतेचें वाचन तुम्हांला कठिण वाटत असेल, तर तुम्ही पहिले तीन अध्यायच वाचा. गीतेचा सर्व गाभा या तीन अध्यायांत येऊन जातो. बाकीच्या अध्यायांत तोच विषय अधिक विस्तारानें आणि अनेक दृष्टींनीं सिद्ध केला आहे. इतकेंदेखील कोणाला कठिण वाटल्यास या तीन अध्यायांतून असे श्लोक निवडणेंहि शक्य आहे कीं ज्यांत गीतेचा निष्कर्ष येऊन जातो. तीन ठिकाणीं तर गीतेंत 'सर्व धर्म सोडून तूं एक मलाच शरण ये' असेंहि येतें. याहून

---

[४] आत्मकथा पृ. २३९–४०

अधिक सोपा व साधा उपदेश आणखी काय असूं शकतो ? जो मनुष्य गीतेंतून आपल्याला आश्वासन मिळवूं इच्छील त्याला तें तींतून पुरेपुर मिळूं शकतें. जो मनुष्य गीतेचा भक्त बनतो, त्याच्या बाबतींत निराशेला कुठें वावच नाहीं, तो नेहमीं आनंदांत असतो.

परंतु ह्यासाठीं बुद्धिवाद नव्हे तर अव्यभिचारिणी भक्ति पाहिजे .... तुम्ही तींत भक्तिपूर्वक प्रवेश कराल, तर तुम्हांला पाहिजे तें तींतून मिळेल.

अठरा अध्याय तोंडपाठ करणें कांहीं खेळ नव्हे, परंतु करण्यालायक मात्र ती गोष्ट अवश्य आहे. तुम्ही एकदां तिचा आश्रय घेतला म्हणजे तुम्हांला दिसून येईल कीं दिवसेंदिवस तिच्याविषयीं तुमचा अनुराग वाढतो आहे. मग तुम्ही तुरुंगांत असा कीं जंगलांत, खुल्या आकाशांत असा कीं अंधाऱ्या कोठडींत, गीतेचा ध्वनि तर तुमच्या हृदयांत चालूच राहील. आणि त्यांतून तुम्हांला आश्वासन मिळेल. तुमच्यापासून हा आधार तर कोणी हिरावून घेऊंच शकत नाहीं.[५]

## गीतेचा ऐतिह्य उपोद्घात

पहिल्या अध्यायांत जीं नांवें आलीं आहेत तीं नांवें माझ्या मतें व्यक्तिवाचक असण्यापेक्षां गुणवाचक अधिक आहेत. दैवी आणि आसुरी वृत्ति यांच्यामधील लढ्याचें वर्णन करतांना कवीनें वृत्तींना मूर्तिमान् केलें आहे. या कल्पनेंत पांडव व कौरव यांच्यामध्यें हस्तिनापुराजवळ खरेंखुरें युद्ध झालें असेल या गोष्टीचा इनकार केलेला नाहीं. त्या काळचा एक दृष्टांत घेऊन कवीनें या महान् ग्रंथाची रचना केली आहे. यांत चुकीची धारणाहि असूं शकेल. अथवा हीं सर्व नांवें ऐतिहासिक असल्यास ऐतिहासिक आरंभासाठीं हीं नांवें देणें गैरहि मानतां येणार नाहीं. विषयविचारासाठीं पहिला अध्याय आवश्यक आहे. म्हणून गीतापाठाच्या वेळीं त्याचा पाठ करणें आवश्यक आहे.[६]

---

[५]गीतामाता पृ. ५२१–३१

[६]महादेवभाईनी डायरी भा. १, पृ. २२३, १८ जून १९३२

न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति

## इच्छा आणि प्रबल संकल्प

सहाव्या अध्यायानुसार थोडीहि केलेली साधना वायां जात नाहीं आणि जिथून राहिली असेल तिथून येत्या जन्मांत ती पुढें चालू होते. याचप्रमाणें ज्याला कल्याणमार्गाकडे वळण्याची इच्छा तर आहे, परंतु आचरण करण्याची शक्ति नाहीं, त्याची ती इच्छा बलवान् होईल अशी संधि त्याला पुढील जन्मीं मिळेल याविषयींहि मला शंका नाहीं. परंतु याचा अर्थ असा नाहीं कीं या जन्मीं आम्हीं ढिलेपणा केला तरी चालेल. अशी इच्छा ही इच्छाच नव्हे. अथवा ती नुसती बौद्धिक म्हणजे मनाचा तरंग आहे, हृदयापासूनची नाहीं. मनाच्या तरंगाला, बौद्धिक इच्छेला, कांहीं महत्त्व नाहीं. ती मेल्यानंतर राहत नाहीं. परंतु जी इच्छा हृदयांत भिनून, जाते तिच्या मागें प्रयत्न तर असलाच पाहिजे. परंतु अनेक कारणांस्तव आणि शारीरिक दुर्बलतेमुळें ही इच्छा या जन्मीं पूर्ण न होणें संभवनीय आहे. आणि असा अनुभव आपल्याला नित्यच येतो. परंतु ही इच्छा घेऊन जीव देह सोडतो आणि दुसऱ्या जन्मांत या जन्मांतील उपाधि कमी होऊन ही इच्छा सफल होते अथवा निदान दृढ तर होतेच. अशा प्रकारें कल्याणकृत् म्हणजे पुण्याचरण करणारा हा पुढें प्रगति करीतच राहतो.[७]

## गीतेचा अर्थ

एक मित्र पुढीलप्रमाणें प्रश्न करतात :

"गीतेचा संदेश काय आहे, हिंसा कीं अहिंसा ? हा झगडा पुष्कळ काळपर्यंत चालूच राहणार असें वाटतें. गीतेंतून कोणता संदेश आपण शोधूं इच्छितों, काढूं इच्छतों, हा प्रश्न वेगळा. आणि गीता वाचतांना आपल्यावर सरळ छाप कोणती पडते हा प्रश्न वेगळा. ज्याला अहिंसातत्त्व हाच जीवन-संदेश होऊन बसला, ज्याच्या चित्तांत ती गोष्ट ठसून गेली, त्याच्या

---

[७] महादेवभाईंनी डायरी भा. १, पृ. २२३, १८ जून १९३२

बाबतींत हा प्रश्न गौणच आहे. तो तर असेंच म्हणणार कीं 'गीतेंतून अहिंसा निघत असेल तर गीता मला मान्य. एवढ्या भव्य ग्रंथांतून अहिंसे-सारखा भव्य सिद्धांतच निघायला पाहिजे. पण जर निघत नसेल, तर गीता राहिली बाजूला! तिला आम्ही आदरानें पूजूं, पण प्रमाणग्रंथ मानणार नाहीं.'

पहिला अध्याय पाहतां असेंच वाटतें कीं अहिंसा-वृत्तीनें प्रेरित झालेला अर्जुन निःशस्त्र होऊन कौरवांच्या हातून मरायला तयार आहे. हिंसेमुळें होणारें नुकसान आणि पाप त्याच्या दृष्टीसमोर स्पष्ट उभें राहतें. विषादानें तो थरथरूं लागतो व कांपत कांपत म्हणतो :

**अहो बत महत् पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।**

तेव्हां श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतो : 'शहाणा असून तूं हें असें काय बोलतो आहेस? कोणी कुणास मारीत नाहीं आणि कोणी मरत नाहीं. आत्मा अमर आहे आणि शरीर हें पडायचेंच आहे. धर्मानें प्राप्त झालेलें युद्ध करून मोकळा हो. जय कसला नि पराजय कसला? कर्तव्य करून मोकळा हो.'

अकराव्या अध्यायांत विश्वरूप दाखवून तिथेंहि भगवान् असेंच म्हणतात :

**कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धो**
**लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः ।**
**मया हतांस्त्वं जहि, मा व्यथिष्ठाः ।**

ईश्वराजवळ हिंसा-अहिंसा समान आहेत. परंतु माणसासाठीं ईश्वराचा कोणता संदेश आहे?

**युद्धस्व जेतासि रणे सपत्नान्**

हा? गीतेचा संदेश अहिंसाच असेल तर पहिला व अकरावा अध्याय हे जुळत नाहींत. पोषक तर नाहींतच. अशा नाना शंकांचें समाधान कोण करणार?

कामाच्या गर्दीतून वेळ काढून उत्तर द्याल तर किती बरें होईल?"

असे प्रश्न उत्पन्न होतच राहणार. त्यांचा उलगडाहि यथाशक्ति ज्यानें कांहीं अभ्यास केला आहे अशाला करावा लागेल. पण समाधान केलें

तरी मला शेंवटीं सांगून टाकलें पाहिजे कीं अखेर हृदय सांगेल तेंच मनुष्य करणार. आधीं हृदय मग बुद्धि. आधीं सिद्धान्त मग प्रमाण. आधीं स्फुरणा आणि मग तिला अनुकूल युक्तिवाद. आधीं कर्म मग बुद्धि. म्हणूनच 'बुद्धिः कर्मानुसारिणी' म्हटलें आहे. मनुष्य जें करायचें ठरवतो अथवा करतो त्याच्या समर्थनार्थ प्रमाण शोधून घेत असतो.

म्हणजे माझा गीतेचा अर्थ सर्वांना अनुकूल नाहीं होणार हें मी समजूं शकतों. अशा स्थितींत कशा रीतीनें गीतेच्या अर्थाला मी पोंचलों तें सांगितलें. आणि धर्मशास्त्राचा अर्थ लावण्यांत मीं जे सिद्धान्त मानले ते सांगितले म्हणजे तें पुरेसें म्हटलें जावें. "युद्ध करून मोकळें व्हायचें एवढेंच माझें काम; त्याचा परिणाम मग कांहींहि होवो. मरण्यालायक शत्रु मेलाच आहे, मला तर त्याला मारण्यांत निमित्तमात्रच व्हायचें आहे."

गीतेचा प्रथम परिचय मला सन १८८९ सालीं झाला. त्या वेळीं माझें वय वीस वर्षांचें होतें. या वेळीं अहिंसा धर्म मला थोडाच समजला होता. शत्रूलादेखील प्रेमानें जिकावें हें मी शामळदासाचा छप्पा (षट्पदी) 'पाणी आपेने पाय भलुं भोजन तो दीजे' यावरून शिकलों होतों. त्यांतील सत्य माझ्या हृदयांत नेमकें ठसलें होतें. परंतु त्यांतून जीवदया त्या वेळीं मला नव्हती स्फुरली. मी याच्या अगोदरच हिंदुस्थानांत असतांनाच मांसाहार करून चुकलों होतों. सर्पादिकांचा नाश करणें हा धर्म आहे असें मी मानीत होतों. मीं ढेकूण वगैरे मारल्याचें आठवतें. एक विंचूदेखील मारल्याचें मला स्मरण आहे. आज अशा विषारी जंतूंनादेखील मारतां कामा नये असें मी समजलों आहें. त्या वेळीं इंग्रजांशीं लढाई करण्याची तयारी करावी लागेल असें मी मानीत होतों. 'इंग्रज राज्य करतात त्यांत काय नवल' ही कविता मी गुणगुणत असें. माझा मांसाहार हा या तयारीखातर होता. विलायतला जाण्यापूर्वीं माझे विचार असे होते. मांसाहार इत्यादिकांतून मी बचावलों त्याचें कारण आईला दिलेल्या वचनाचें आमरण पालन करण्याची वृत्ति हेंच होतें. सत्यावरील माझ्या प्रेमानें मला पुष्कळ आपत्तींतून वांचवलें आहे.

आतां दोन इंग्रजांच्या निमित्तानें मला गीता वाचावी लागली. 'वाचावी लागली' म्हणतों, कारण मला कांहीं खास इच्छा नव्हती. परंतु जेव्हां

ह्या दोघा जणांनीं मला आपल्याबरोबर गीता वाचायला बोलावलें, तेव्हां मला लाज वाटली. मला आपल्या धर्मशास्त्राचें कांहींच ज्ञान नाहीं, याची जाणीव झाल्यामुळें दुःख झालें. या दुःखाचें कारण अभिमान होता, असें वाटतें. माझें संस्कृतचें ज्ञान असें नव्हतें कीं मदतीवांचून मी सर्व श्लोक बरोबर समजूं शकेन. या मित्रांना तर कांहींच समजत नव्हतें. त्यांनीं सर एडविन आर्नोल्डकृत गीतेचा उत्तमोत्तम काव्यनुवाद आणून दिला. मीं तें पुस्तक अथपासून इतिपर्यंत लगेंच वाचून काढलें आणि त्यावर मी मुग्ध झालों. तेव्हांपासून आजतागायत दुसऱ्या अध्यायांतील शेवटचे एकोणीस श्लोक माझ्या हृदयावर कोरलेले आहेत. त्यांत माझ्या-पुरता सारा धर्म येऊन जातो. त्यांत संपूर्ण ज्ञान आहे. त्यांत सांगितलेले सिद्धांत अढळ आहेत. बुद्धीचादेखील त्यांत संपूर्ण प्रयोग आहे. परंतु ही बुद्धि संस्कारी बुद्धि आहे. त्यांत अनुभवाचें ज्ञान आहे.

या परिचयानंतर मीं पुष्कळ भाषांतरें वाचलीं, पुष्कळ टीका वाचल्या. पुष्कळ युक्तिवाद केले–ऐकले, परंतु माझ्यावर जी छाप हें वाचून पडली ती कांहीं पुसली जात नाहीं. गीतेचा अर्थ समजून घेण्याची हे श्लोक किल्ली होत. त्यांच्याशीं विरुद्ध अर्थाचीं वाक्यें आल्यास त्यांचा त्याग करण्याचीदेखील मी सल्ला देईन. नम्र माणसाला अर्थात् त्याग करण्याचें कारण नाहीं. त्यानें इतकेंच म्हणावें : ‘ इतर श्लोक यांच्याशीं आज जुळत नाहींत हा माझ्या बुद्धीचा कच्चेपणा आहे. कालांतरानें त्यांचा आणि ह्या एकोणीस श्लोकांत सांगितलेल्या सिद्धांतांचा मेळ बसून जाईल. ’ असें आपल्या मनाला आणि इतरांना सांगून माणसानें शांत रहावें.

शास्त्राचा अर्थ लावण्यांत संस्काराची व अनुभवाची गरज आहे. शूद्रासाठीं वेदाभ्यास असूं शकत नाहीं हें वाक्य सर्वस्वीं खोटें नाहीं. शूद्र म्हणजे संस्कारहीन, मूर्ख, अज्ञानी हा वेदादिकांचा अभ्यास करून अनर्थ करावयाचा. सगळे प्रौढदेखील बीजगणितांतील कठिण कोडीं परभारेंच समजण्यास अधिकारी नाहींत. तीं समजून घेण्यापूर्वी त्यांना अमुक एक प्राथमिक अभ्यास करायला पाहिजे. व्यभिचाऱ्याच्या तोंडीं ‘ अहं ब्रह्मास्मि ’ कसें शोभेल ? त्याचा तो कसा अर्थ ( कीं अनर्थ ) करील ?

तेव्हां शास्त्राचा अर्थ करणारा हा यमादींचें पालन करणारा असला

पाहिजे. यमादिकांचें शुष्क पालन जसें कठिण तसेंच निरर्थक आहे. शास्त्रानें गुरूची गरज मानली आहे. परंतु गुरूचा सांप्रत जवळजवळ लोपच आहे. म्हणून ज्ञानी पुरुषांनीं भक्तिप्रधान प्राकृत ग्रंथाचें पठन पाठन करायला सुचविलें आहे. परंतु ज्याला भक्ति नाहीं, ज्याला श्रद्धाहि नाहीं, तो शास्त्राचा अर्थ करायला अधिकारी नाहीं. त्यांतून विद्वत्तापूर्ण अर्थ विद्वान् भले काढोत, पण तो शास्त्रार्थ नव्हे. शास्त्रार्थ अनुभवीच करूं शकतो.

परंतु सामान्य माणसासाठींहि कित्येक सिद्धांत तर आहेतच. जो सत्याला विरोधी जात असेल तो शास्त्रार्थ खरा असूं शकणार नाहीं. ज्याला सत्याच्या सत्यतेविषयीं शंका आहे त्याच्यासाठीं शास्त्र नाहींच, अथवा त्याच्या बाबतींत सारें शास्त्र हें अशास्त्र आहे. त्याचें समाधान कोणी करूं शकणार नाहीं. ज्याला शास्त्रांत अहिंसा सांपडली नाहीं, त्याला धोका आहे पण त्याचा उद्धार नाहीं असें नाहीं. सत्य करणरूप वा भावरूप आहे, अहिंसा अकरणरूप वा अभावरूप आहे. सत्य सद्रूप आहे, भाववाचक आहे; अहिंसा हि सद्रूपच आहे, भाववाचकच आहे, तथापि ती हिंसारूप भावाचा निषेध करून भावरूप आहे, आणि तोच ( हिंसा-निवृत्ति हा ) धर्म होय. सत्य स्वयंसिद्ध आहे. अहिंसा हें त्याचें संपूर्ण फलित आहे. सत्यांत ती ( बीजरूपानें ) निहितच आहे. परंतु सत्याप्रमाणें ती प्रकट नाहीं म्हणून ती प्रथम मान्य न करतांहि माणसानें शास्त्रांत शोध घ्यायला हरकत नाहीं. तथापि त्याचें सत्य त्याला अहिंसाच शिकवील.

सत्यासाठीं तपश्चर्या तर करावीच लागते. सत्याचा साक्षात्कार करणाऱ्या तपस्व्यानें चौफेर चाललेल्या हिंसेंतून अहिंसा देवीला जगासमोर प्रकट करून म्हटलें : हिंसा ही माया आहे, मिथ्या आहे; अहिंसा हेंच सत्य आहे. अहिंसेशिवाय सत्याचा साक्षात्कार असंभवनीय आहे. ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह हे देखील अहिंसेकरितांच आहेत, अहिंसेला सिद्ध करणारे (तिचीं साधनें)च आहेत. अहिंसा सत्याचें प्राणतत्त्व आहे. मनुष्य तिच्याशिवाय पशु आहे. हें सारें सत्यार्थी सत्यशोधनाच्या आपल्या प्रवासांत आधींच पाहून घेईल आणि मग त्याला शास्त्रार्थ लावण्यांत कुठेंहि अडचण येणार नाहीं.

ग्रं. स्थळप्रत.
मराठी ग्रं.
२६३०६
वि. निबंध
अनुक्र. १२०९
नों: दि: ३२।३।६०
क्रमांक

शास्त्रार्थाबाबत दुसरा नियम हा आहे कीं शास्त्राच्या प्रत्येक अक्षराला चिकटून न बसतां त्याचा ध्वनि वा सूर तपासावा, त्याचें रहस्य पहावें. तुलसीदासाचें रामायण हा उत्तम ग्रंथ आहे, कारण त्याचा ध्वनि आहे शुद्धि, दया, भक्ति. त्यांत ‘ढोर गंवार शूद्र अरु नारी । ये सब ताडनके अधिकारी’ शूद्र, गांवढळ, ढोर आणि स्त्री हे ताडनास पात्र म्हणून वर्णिले आहेत, यावरून जो पुरुष आपल्या स्त्रीला मारझोड करील तो अधोगतीला जाईल. रामानें सीतेला कधीं मारलें तर नाहींच पण दुखविलेंदेखील नाहीं. तुलसीदासानें त्या वेळचा प्रचलित वाक्प्रचार लिहून टाकला. त्याला असा विचारदेखील आला नसेल कीं या वचनाच्या आधारें आपल्या अर्धांगीला ताडन करणारा पशुसुद्धां निघेल. अथवा तुलसीदासानें स्वत:सुद्धां रूढीला वश होऊन आपल्या पत्नीला ताडन केलें असलें तरी काय झालें ? तें ताडन दोषरूप तर आहेच. रामायण कांहीं पत्नीताडनासाठीं लिहिलेलें नाहीं. रामायण तर पूर्ण पुरुषाचें दर्शन घडवण्यासाठीं, सतीशिरोमणि सीतेचा परिचय करून देण्यासाठीं, भरताचें आदर्श चित्र उभें करण्यासाठीं लिहिलेलें आहे. दोष-युक्त रूढीचें त्यांत आढळणारें समर्थन त्याज्य होय. तुलसीदासानें भूगोल शिकविण्यासाठीं आपला अमूल्य ग्रंथ नाहीं लिहिला. म्हणून तुलसीदासाच्या ग्रंथांत भूगोलविषयक चुकीची माहिती आढळल्यास तिचा त्याग करणें आपला धर्म आहे.

आतां गीता पाहूं. गीतेंत ब्रह्मज्ञानाची प्राप्ति आणि त्याचीं साधनें हाच विषय आहे. दोन सैन्यांमधील युद्ध हें तर निमित्त आहे. कवि स्वत: युद्धादिकांना निषिद्ध मानीत नव्हता असें फार तर तुम्ही म्हणूं शकतां. त्यानें युद्धाच्या प्रसंगाचा उपयोग केला. महाभारत वाचल्यानंतर माझ्यावर वेगळीच छाप पडली आहे. व्यासांनीं इतका सुंदर ग्रंथ लिहून युद्धाचें मिथ्यात्वच वर्णन केलें आहे. कौरव हरले म्हणून काय झालें ? पांडव जिंकले म्हणून काय झालें ? जिंकणारे किती शिल्लक राहिले ? त्यांचें काय झालें ? कुंतीमातेची काय दशा झाली ? आणि आज यादवकुल कुठें आहे ?

जिथें युद्ध-वर्णन आणि हिंसेचें प्रतिपादन हा विषय नाहीं तिथें त्यावर

भार देणें अगदीं अयोग्य म्हटलें पाहिजे. आणि कित्येक श्लोकांचा अहिंसेशीं मेळ बसवणें कठिण जात असेल तर संपूर्ण गीतेला हिंसेच्या चौकटींत बसवणें तर त्याहूनहि कठिण आहे.

कवि एखादा ग्रंथ लिहितो तेव्हां तो सगळेच अर्थ कल्पून लिहीत नसतो. काव्याची खुबीच ही कीं कवीहून त्याचें काव्य वर चढतें. आपल्या एकतानतेमध्यें जें सत्य तो उच्चारूं शकतो तें पुष्कळदां त्याच्या जीवनांत आढळून येत नाहीं. त्यामुळें पुष्कळ कवींचें जीवन त्यांच्या काव्याशीं विसंगत असतें. गीतेचा तात्पर्यार्थ हिंसा नाहीं, तर अहिंसा आहे, हें दुसरा अध्याय ज्या विषयाचा आरंभ करतो आणि अठरावा अध्याय ज्याची परिसमाप्ति करतो त्यावरून दिसून येतें. मध्येंहि पाहिल्यास तेंच आहे. क्रोधाशिवाय, रागाशिवाय, द्वेषाशिवाय हिंसा संभवतच नाहीं. आणि गीता तर क्रोधादिकांना ओलांडून गुणातीताच्या स्थितीला आपल्याला पोंचविण्यासाठीं झटते आहे. गुणातीतांत क्रोधाचा सर्वस्वीं अभावच असणार. अर्जुनानें जेव्हां जेव्हां धनुष्याची दोरी आपल्या कानापर्यंत खेंचली तेव्हां तेव्हां त्याचे लाल झालेले डोळे मी आतांदेखील पाहूं शकतों.

पण अर्जुनानें कुठें अहिंसेसाठीं युद्धाचा त्याग करायचा हट्ट घेतला होता ? त्यानें तर कितीक युद्धें केलीं होतीं. त्याला एकाएकीं मोह झाला होता. त्याला स्वजनांना मारायची अनिच्छा उत्पन्न झाली होती. दुसऱ्या कुणाला, ज्याला तो पापी मानीत होता त्याला, न मारण्याची गोष्ट अर्जुन करीत नव्हता. श्रीकृष्ण अंतर्यामी आहे. तो अर्जुनाचा क्षणिक मोह ओळखून घेतो. म्हणून तो त्याला म्हणतो : 'तूं हिंसा तर करून चुकला आहेस. असा एकदम शहाणपणाचा आव आणून अहिंसा शिकतां येईल असें नाहीं. तूं जें आरंभ करून चुकलास तें आतां तुला पूर्ण करणेंच भाग आहे.' ताशीं चाळीस मैलांच्या वेगानें जाणाऱ्या आगगाडीमध्यें बसलेल्याला एकाएकीं विरक्ति आली आणि त्यानें उडी घेतली तर ती आत्महत्या झाली. तें कांहीं प्रवासाचें किंवा गाडीमध्यें बसण्याचें मिथ्यात्व शिकणें नव्हे. अर्जुनाची गत अशीच होती. अहिंसक कृष्ण अर्जुनाला दुसरी सल्ला देऊंच शकत नाहीं. परंतु म्हणून त्यांतून गीता हिंसा शिकवते अथवा युद्धाचें समर्थन करते असा अर्थ काढणें हें तितकेंच

अयोग्य आहे कीं जितकें शरीरव्यापारासाठीं कांहीं-ना-कांहीं हिंसा अनिवार्य असते तेव्हां हिंसा हाच धर्म आहे हें म्हणणें. सूक्ष्मदर्शी ह्या हिंसामय शरीरांतून अशरीरी होण्याचा म्हणजेच मोक्षाचा धर्म शिकवितात.

पण मग धृतराष्ट्र कोण, दुर्योधन कोण, युधिष्ठर कोण आणि अर्जुन कोण ? कृष्ण कोण ? हे सर्व का ऐतिहासिक पुरुष ? आणि ह्यांच्या स्थूल व्यवहाराचें का गीता वर्णन करते ? अर्जुन एकाएकीं युद्धांत प्रश्न विचारतो आणि कृष्ण सगळ्या गीतेचा पाढा वाचतो ? शिवाय हीच गीता अर्जुन आपला मोह नष्ट झाला असें म्हणूनसुद्धां पुनः विसरून जातो आणि कृष्णमुखानें परत अनुगीता सांगायला लावतो ?

मी तर दुर्योधनादिकांना आसुरी वृत्ति समजतों आणि अर्जुनादिकांना दैवी वृत्ति. धर्मक्षेत्र हें आपलें शरीर होय. त्यांत द्वंद्व चालूच राहतें. त्याचें हुबेहूब वर्णन अनुभवी ऋपिकवींनीं दिलें आहे. कृष्ण हा अंतर्यामी होय. तो शुद्ध चित्तांत सदैव घडयाळाप्रमाणें टिकटिक करीत असतो. चित्ताला चित्तशुद्धिरूपी किल्ली जर दिली नसली तर अंतर्यामी तिथें असूनहि त्याची टिकटिक बंद पडते.

यांत स्थूल युद्धाला वावच नाहीं असें म्हणावयाचा आशय नाहीं. ज्याला अहिंसा सुचलीच नाहीं त्यानें भ्याड बनावें असा धर्म नाहीं शिकवला. जो भितो, जो संग्रह करतो, जो भोगांत रमतो तो हिंसायुद्ध करणारच. पण तो कांहीं त्याचा धर्म नव्हे. धर्म तर एकच आहे--अहिंसा म्हणजे मोक्ष. मोक्ष म्हणजे सत्यनारायणाचा साक्षात्कार. भागूबाईपणाला यांत कुठेंहि थारा नाहीं. या विचित्र जगामध्यें हिंसा तर चालूच राहणार. त्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग गीता दाखवतें. पण त्याचबरोबर गीता हेंहि दाखवून देते कीं, भ्याड बनून पळ काढल्यानें हिंसेंतून सुटका होत नाहीं. जो पळ काढील तो तर मारीलहि आणि मरेलहि.

जे श्लोक प्रश्नकर्त्यानें उद्‌धृत केले आहेत त्यांचा अर्थ अजूनहि जर कळला नसेल तर तो समजावून सांगण्यास मी असमर्थ आहें. सर्वशक्तिमान् ईश्वर कर्ता धर्ता संहर्ता आहे आणि असायलाच पाहिजे याविषयीं तर शंका नसणारच ना ? जो उत्पन्न करतो तो त्याचा नाशहि करण्याचा अधिकार राखतोच. तथापि तो मारीत नाहीं. कारण तो उत्पन्नहि करीत

नाहीं. जें जन्मलें तें मरण्यासाठींच, असा नियम आहें. तो ईश्वरदेखील मोडूं शकत नाहीं ही त्याची दया आहे. ईश्वर जर स्वच्छंदी आणि स्वेच्छाचारी झाला तर मग आपली गति काय ?[८]

## गीतेची मुख्य शिकवण

गीतेची मुख्य शिकवण कोणती– निष्काम कर्म का अहिंसा ?

अनासक्ति, निष्काम कर्म, हीच गीतेची मुख्य शिकवण आहे, याविषयीं मला मुळींच शंका नाहीं. गीतेचें जें लहानसें भाषांतर मीं केलें आहे, त्याला मुळीं मीं अनासक्तियोग असेंच म्हटलें आहे. आणि अनासक्ति ही अहिंसातिशायी आहे. जो कोणी अनासक्त होऊं इच्छितो त्याला निष्कामता वा अनासक्ति प्राप्त करून घेण्यासाठीं अवश्यच अहिंसापालन करावें लागतें. म्हणून अहिंसा ही एक आवश्यक पूर्वतयारी आहे. अनासक्तींत ती अंतर्भूतच आहे, ती तिच्या अतीत नाहीं.

तर मग काय गीता हिंसा आणि अहिंसा दोहींचें प्रतिपादन करते ?

गीतेचा अर्थ मी तसा लावीत नाहीं. ग्रंथकारानें अहिंसा बिंबवण्यासाठीं ती लिहिलेली नसेल हें पूर्ण संभवनीय आहे. परंतु टीकाकार ज्याप्रमाणें एखाद्या काव्यपंक्तीचे असंख्य अर्थ लावतो, त्याप्रमाणें गीतेचें मुख्य सूत्र जरी अनासक्ति असली तरी त्याबरोबरच ती अहिंसाहि प्रतिपादिते असा मी अर्थ लावतों. जोंवर आपण रक्तमांसाचा हा सांगाडा धारण केला आहे, आणि जोंवर या स्थविष्ठ पृथ्वीवर आपण वावरतों आहों, तोंवर आपल्याला अहिंसेचें पालन हें करावेंच लागणार. परलोकीं गेल्यावर हिंसा नाहीं नि अहिंसा नाहीं.

‘परंतु’, बाळासाहेब खेर म्हणाले, ‘भगवान् कृष्णानें तर सरळ सरळ अहिंसा तत्त्वाचा प्रतिपक्षच मांडला आहे. कारण अर्जुन आपला अयुद्धाचा शांतिमय निश्चय घोषित करतो कीं

---

[८]नवजीवन ११-१०-१९२५

१०२६५
अनुक्रमांक २६३०६
१२०८
निबंध
दि: २२/३/६०

**यदि मां अ-प्रतीकारं अ-शस्त्रं शस्त्र-पाणयः ।**
**धार्तराष्ट्रा रणे हन्युस् तन् मे क्षेमतरं भवेत् ॥**
त्याहूनि शस्त्र सोडूनि उगा राहीन तें बरें ।
मारोत मग हे युद्धीं शस्त्रांनीं मज कौरव ॥

आणि भगवान् कृष्ण त्याला उपदेश करतो--

**'युध्यस्व भारत'** 'झुंज तूं सुखें'.

## तेंव्हां काय करायचें ?

'येथें तुमचा मी प्रतिवाद करतों–' गांधीजी म्हणाले, 'अर्जुनाचे ते शब्द उसनें ज्ञान होतें.' "परवां परवांपर्यंत" भगवान् त्याला म्हणतात, "अर्जुना, तूं आपल्या सग्यासोयऱ्यांशीं, प्राणघातक शस्त्रास्त्रांनीं, मुळींच कींव न करतां, लढला आहेस. आणि आजहि शत्रुस्थानीं, जर तुझे सगे-सोयरे नसते आणि दुसरेंच कोणी असतें तर तूं लढलाच असतास !" त्याच्यासमोर पेच अहिंसेचा नव्हता तर आपल्याच स्वजनांना सग्या-सोयऱ्यांना मारावें का हा होता.[१]

REFBK-0010266

[१] Harijan 1-9-40